
वर्षारंभ २८

जून/जुलै १९८८ • दहा रुपये

टीव्ही विशेषांक

# माणूस



# तुमच्या मुलांची कॉलेजजीवनाची वाटचाल करा अधिक यशस्वी

त्यांना त्यांच्या अभ्यासाकडे अधिक लक्ष पुरवू द्या.

त्यांचे छंद त्यांना जोपासू द्या.

आणि खेळांमध्येही रमू द्या.

पण खरं तर ह्या सगळ्यासाठी त्यांना हवा आहे आणखी थोडासा वेळ आणि भरपूर जोम.

अन् म्हणूनच तुम्ही त्यांना घेऊन द्या एक लूना. ज्यामुळे त्यांना कॉलेजमध्ये नि क्लासेसमध्ये भरकन् जाता येईल.

आणि सुरक्षितपणेही.

खरोखर, त्यांनी नुकत्याच मिळविलेल्या यशाचं बक्षिस म्हणून लूना ही निश्चितच एक उत्तम भेट आहे.

मग त्यांना लांबचलांब रांगेत बसची वाट पहावी लागणार नाही की सायकलवरून ये-जा करून त्यांची दमछाकही होणार नाही.

इतकंच नाही, लूना घेण्यासाठी तुम्हाला एकदम सगळे पैसे मोजायचीही गरज नाही. तर ठराविक बाबींची पूर्तता केल्यास, कायनेटिक विक्रेत्यांतर्फे ती सुलभ हप्त्यांतही मिळू शकते.

अधिक माहितीसाठी, तुमच्याजवळच्या कायनेटिक विक्रेत्याशी संपर्क साधा.

अगदी आजच!



**लूना.** ही तर तुमच्या मुलांना छानशी शाबासकीच!

QUIKSEL/88116

कायनेटिक इंजिनिअरिंग लिमिटेड

# माणूस

वर्ष : अठ्ठाविसावे
अंक : एक
किंमत : दहा रुपये

टीव्ही विशेषांक

संपादक
**श्री. ग. माजगावकर**


सहाय्यक
**दिलीप माजगावकर**
**अविनाश कोल्हे**

या अंकाचे
संपादन सहाय्य
**रंगा मराठे**
**शरद कर्णिक**

मुखपृष्ठ
**अशोक गोखले**

अंक मांडणी
**चंद्रशेखर अवंतकर**

चित्रसहाय्य
**श्याम देशपांडे**



फोटोटाईपसेटींग
*अक्षरकला*
*३८३ अ, शनिवार पेठ*
*पुणे ४११०३०*

निर्मिती
*ग्राफिक कम्युनिकेशन्स*
*३८३ अ, शनिवार पेठ*
*पुणे ४११०३०*

मुखपृष्ठ छपाई
साप्ताहिक मुद्रण, पुणे

संपर्क : 'माणूस'
१०२५ सदाशिव पेठ
पुणे ४११०३०
फोन - ४४३४५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादिंबाबतचे हक्क स्वाधीन

अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक

टीव्ही विशेषांक **माणूस**

## अनुक्रम

### लेख


आकाशवाणी ते प्रकाशवाणी
*मंगला गोडबोले / ६*

मंडी हाऊस
*अभिराम भडकमकर / १४*

पैलतीरी मी
*माधव वाटवे / १६*

साहनी ते निहलानी
एक बेईमानी
*रा. म. शास्त्री / २०*

पायोजित मालिकेचे अर्थशास्त्र
*शरद कर्णिक / ६०*

दूरदर्शनची वाटचाल
*नर्मदा शहाणे / ६४*

दूरदर्शन
*आशा बगे / ६८*

पुन्हा आदिमतेकडे
*संजय संगवई / ७१*

टीव्ही आणि व्हिडिओ
ज्ञानप्रसाराची द्रुत साधने
*प्रभाकर देवधर / ९१*


### ललित


एलेवंथ अवर
*फिरोझ रानडे / ९५*


### परिसंवाद


*कॅलिडोस्कोप*
*सतीश आळेकर*
*मुकुंदराव किर्लोस्कर*
*भास्कर चंदावरकर*
*सुजाता बजाज*
*अनिल भागवत*
*सदा डुंबरे*
*मंजू पराडकर*
*बातचीत : मेधा राजहंस / ८०*


### 'माणूस' दर्शक चाचणी


'इडियट बॉक्स' की नवा मित्र ?
*दिलीप सरवटे / ९*


### फोकस


*स्वामी : सेटवर - सेटबाहेर*
*स्वामी अडकली ती अर्थकारणात*
*श्रीकांत मोघे / २८*
'सती मागचे प्रेम दाखविणार'
*गजानन जागिरदार / ३५*


### खास मुलाखती


आकाशानंद
लोकांसाठी - लोकांनी
सादर केलेला 'ज्ञानदीप'
*बातचीत : शरद कर्णिक / ३९*

विनय धुमाळे
थिजवून टाकणारा टीव्ही
*बातचीत : विनया खडपेकर / ४३*

विनय आपटे
दूरदर्शनला प्रतिभावंतांची
गरज नाही
*बातचीत : विनया खडपेकर / ५१*


**यानंतरचा अंक दिवाळी अंक**


Tru-Life Vision
— only with Optonica
CS 5120
Optonica's new-generation Japanese technology, incorporating a **super microchip** for the latest in tuning and a **super sensitive auto tracking** of colour and contrast, puts you in control with a host of unique features.
Manufactured by KALYANI SHARP INDIA LTD
OPTONICA
COLOUR TELEVISION
with Tru-Life Vision

# वर्षारंभ ८८

**ए**का गोष्टीचा इथे प्रामुख्याने उल्लेख करायला हवा. 'माणूस'च्या या अंकासाठी लेखन साहित्य, मुलाखती, परिसंवाद याकरिता ज्या ज्या व्यक्तींशी आम्ही संपर्क साधला त्या सर्वांनी आम्हाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. याचा अर्थच असा की, गेल्या २७ वर्षात माणूसने फार मोठी Goodwill, प्रतिष्ठा, लोकप्रियता मिळवली आहे. बुद्धिवंतांना, विचारवंतांना आदर वाटत असलेले हे नियतकालिक आहे. विचारांना निश्चित दिशा असलेले माजगावकर हे एक संपादक आहेत. अनेक लेखक, विचारवंत, कलाकार, सहसंपादक, संपादन साहाय्य करणारी तरुण मंडळी माणूसच्या मांडवाखालून गेली आहेत. त्याची कृतज्ञता, जाणीव त्या सर्वांना आहे. माणूसने कमावलेली ही फार मोठी संपत्ती आहे.

या अंकाचे काम करताना आम्हाला माजगावकरांनी जे full freedom दिले ते महत्त्वाचे आहे. मॅनेजमेंटचं महत्त्वाचं तत्त्व delegation of authority हे खऱ्या अर्थाने माजगावकरांनी पाळलं. त्यांच्याबरोबर काम करताना त्यांचं मार्गदर्शन, कार्यपद्धती व विचारसरणीचा आम्हाला लाभ झाला.

हा अंक जास्तीत जास्त मनोरंजक व उद्बोधक व्हावा व टीव्ही या प्रभावी माध्यमाचा सर्वांगीण शोध घ्यावा हा हेतू डोळ्यासमोर ठेवला होता. तो कितपत सफल झाला हे वाचकांनी ठरवायचे आहे.

**रंगा मराठे, शरद कर्णिक**

**संपादन साहाय्यक**

स.न.

**स**हज बोलता बोलता दोनतीन महिन्यांपूर्वी टीव्हीचा विषय निघाला. त्यातून अंकाची कल्पना पुढे आली. तुम्ही दोघांनी ती उचलून धरली व कुठल्याही आर्थिक वा इतर लाभाची अपेक्षा न बाळगता हा अंक उत्कृष्ट करण्यासाठी गेले दोन महिने धडपड केलीत; मात्र या धडपडीला यश लाभले आहे, अंक चांगला झाला आहे हे मी म्हणून काय उपयोग! वाचक शेवटी जो निर्णय देतील तो खरा. पण तो अनुकूल असेल असे मला वाटते.

मराठे साहेब! तुम्हा दोघांपैकी तुम्ही तर लेखकच आहात. कर्णिकांचे आजवरचे क्षेत्र जाहिरातींचे. तरी दोघांनी आलटून पालटून पडतील ती कामे केली. तुम्ही जाहिरातींसाठी खटपट करीत होतात तर कर्णिकांनी तुमच्या जोडीने संपादकीय जबाबदारी उचलली. काही लेख- मुलाखती तर दोन/ दोन, तीन/ तीन वेळा पुन्हा लिहून काढल्या. केवळ 'माणूस' संबंधी वाटणाऱ्या आत्मीयतेपोटी तुम्ही दोघ जण हे करत होतात. हे मला जाणवत होते. अगदी मनापासून मी तुम्हा दोघांचे आभार मानतो.

असाच कृपालोभ असावा ही विनंती.

**श्री. ग. माजगावकर**

**मा**गे 'माणूस' बंद होत आहे अशा अर्थाचे लिखाण मुंबईच्या दैनिकातून प्रसिद्ध झाले होते. यावर आपापसात बोलणीही होत असत. त्या सुमारास जयवंत दळवींनी पत्र लिहून कळविले होते,

''माणूस'' संबंधी मी बरेच वाचले ऐकले आहे. तुम्हाला हे साप्ताहिक बंदही करता येणार नाही किंवा तुम्हाला निवृत्तही होता येणार नाही. तुम्ही तुमच्या मार्गदर्शनाखाली 'माणूस' पुढे चालू ठेवील असा उत्साही ग्रुप निर्माण करणे आवश्यक आहे. तुमच्यासारख्याला हे मुळीच कठिण नाही. लेख, जाहिरात, वितरणाच्या सर्व गोष्टी पाहणारा हा ग्रुप हवा.'' (१०/२/८६)

'सत्यकथा' मासिक बंद झाले तेव्हा 'ललित' मासिकात, ठणठणपाळांनी, व्याकरणात जरी भूत, भविष्य, वर्तमान असे तीन काळ असले, तरी माणूस, सत्यकथा सारख्या नियतकालिकांच्या बाबतीत 'पडता काळ' हा एकच काळ असतो', अशी फर्मास कोपरखळी मारली होती.

काळ जर सारखा पडताच असला तर तुमच्या वरील पत्राप्रमाणे 'उत्साही ग्रुप' तरी कसा तयार करायचा, दळवी साहेब?

तरीपण असा ग्रुप थोडाफार होता म्हणून गेल्या दोन वर्षात 'माणूस' चे दहा विशेषांक निघू शकले. या ग्रुपचे प्रमुखपण मुंबईचे अविनाश कोल्हे यांनी मनापासून केले; इतरही अनेकांचे सहकार्य लाभले. त्यात वसईच्या वीणा गवाणकर, चारुदत्त देशपांडे आहेत; पुण्याचे अविनाश व पूर्णा धर्माधिकारी हे पतीपत्नी आहेत; विनया खडपेकर, गिरीश प्रभुणे, यशवंत ठकार, श्यामराव गोडबोले, निरंजन आगाशे कितीतरी नावे घेता येण्यासारखी आहेत. या सर्वांच्या सहकार्याबद्दल कृतज्ञता वाटते.

कुठल्याही आर्थिक वा इतर लाभाची अपेक्षा न

८६ जुलैपासून 'माणूस' चे साप्ताहिक प्रकाशन स्थगित झाले आणि फक्त विशेषांक निघू लागले. ऑगस्ट १९८६ मधले दोन 'नवजागर' विशेषांक, ते चालू टीव्ही विशेषांक असे या विशेषांक मालिकेत एकूण दहा अंक गेल्या दोन वर्षात प्रसिद्ध झाले. भांडवलाची चणचण, बदलते तंत्रज्ञान, सतत वाढणारी महागाई, टीव्हीचा वाढता प्रभाव, वैचारिकतेचा ऱ्हास किंवा कंटाळा, मोठ्या वृत्तपत्रांच्या साप्ताहिक आवृत्त्या - रंगीत पुरवण्या, नवनवीन निघणारी पाक्षिके - मासिके, पडता नाही तरी बदलता काळ, बदलती अभिरुची, 'माणूस' सारख्या एकहाती नियतकालिकाच्या बाबतीत असणाऱ्या अपरिहार्य व्यक्तिगत मर्यादा वगैरे अडचणी पूर्वी होत्या तशा आजही आहेतच. पण 'माणूस' बंद पडू नये, या नाही त्या स्वरुपात वाचकांसमोर येत रहावा असे एखाद दुसरा अपवाद वगळता सर्वांचे मत असल्याने हा विशेषांक प्रयोग गेली दोन वर्षे केला. या दहा विशेषांकाद्वारे जवळजवळ १२०० पृष्ठांचे (पुस्तकाकारातील सुमारे २५०० पृष्ठे) सकस, वेधक व प्रबोधनाला चालना देणारे विविध साहित्य वाचकांना सादर केले गेले. नुकतेच एप्रिल - मे (८८) मध्ये लागोपाठ दोन 'स्वयंसेवी चळवळ विशेषांक' निघाले. पाठोपाठ हा टीव्ही अंक. त्यामुळे आता एकदम दिवाळी अंक. दिवाळीपूर्वी मध्ये माणूसचा अंक निघणार नाही याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी.

रंगा मराठे यांनी या अंकाचे काम सुरु केले तेव्हा म्हटले होते- ही एक दिंडी आहे, ती अशीच पुढे चालत राहिली पाहिजे. यादृष्टीने खटपट तर चालू आहे. वाचक कसा काय प्रतिसाद देतात ते पाहायचे.

**संपादक**

# आकाशवाणी ते प्रकाशवाणी -

**आकाशवाणीनं मराठी साहित्य समृद्ध केलं. मात्र दूरदर्शननं मराठी साहित्याला कायम दूर ठेवलं. टीव्ही आल्यावर झालेला हा सूक्ष्म पण महत्वाचा बदल.**

**मंगला गोडबोले**

भल्या सकाळी चहा घेताघेताच आकाशवाणीच्या कार्यक्रमांवरुन नजर फिरवली जायची. भावसरगम, या महिन्याचे गीत, सकाळ दुपारचा शास्त्रीय संगीताचा कार्यक्रम, रात्री सव्वानऊला होणारं विनोदी भाषण, युववाणी, क्रीडासमालोचन, प्रपंच - पुन्हा प्रपंच सारख्या कौटुंबिक श्रुतिकामाला आणि या सर्वांचा मेरुमणी म्हणजे रात्रीच्या साडेनऊच्या श्रुतिका किंवा क्रमशः तुकड्यातुकड्यानं सादर केली जाणारी मोठी नाटकं. साधारणपणे कुठल्या वारी काय कार्यक्रम आहे हे स्मरणात असायचंच. पण तरीही एकदा पेपरमध्ये आपल्या लाडक्या कार्यक्रमाचा उल्लेख केलेला दिसला की आश्वस्त वाटायचं. मग दिवसाचे आपले कार्यक्रम त्यानुसार बेतले जायचे. रात्रीचे तर नक्कीच! भराभरा जेवणं उरकून, मागची आवराआवर करुन, घरातले मुख्य दिवे बंद करुन, गाद्यांवर सगळी पसरायची आणि रेडिओचं बटण दाबलं जायचं. आतासारखा घरोघरी वाजणाऱ्या टेलिफोनचा, रस्त्यावरच्या वाहनांच्या हॉर्नचा व्यत्यय नसायचा. त्यामुळे देवापुढच्या एखाद्या दिव्याचा किंवा एखाद्या नाइटलॅम्पच्या मंद प्रकाशात रेडिओ ऐकताना घरात, डोळ्यासमोर काहीतरी घडतंय असं वाटत राहायचं. सौभद्र-मानापमान पासून ते मर्ढेकरांच्या 'बदकांचे तळेपर्यंत, कोल्हटकर- दारव्हेकर वगैरेंच्या सामाजिक नाटकांपासून ते 'रंगायन'च्या तेव्हाच्या 'खुर्च्या' वगैरे प्रायोगिक नाटकांपर्यंत, राज्यनाट्यस्पर्धांपासून ते भवन्स, पुरुषोत्तम करंडक वगैरेंच्या आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धांपर्यंत. याखेरीज खास आकाशवाणीसाठी लिहिलेल्या नाटिका, संगीतिका वगैरेही असत. ग.दि. माडगूळकरांची 'शशांक मंजिरी', दारव्हेकरांच्या, बोरकरांच्या काही संगीतिका आठवतात. शाहीर साबळे, अमरशेख वगैरेंना राष्ट्रीय सणांच्या निमित्तानं 'आवतनं' जात असावीत. पण महाराष्ट्र दिनाला 'गर्जा महाराष्ट्र माझा' असं शाहीरांनी गर्जायचाच अवकाश, शाळाशाळांच्या वार्षिक महोत्सवांमध्ये त्यांच्या भल्याबुऱ्या आवृत्त्या निघायला वेळ नाही लागायचा. एवढी शब्दांची स्वरांची हुकमत! या साम्राज्याचे अनभिषिक्त सम्राट म्हणजे पुण्याला माडगूळकर, मुंबईला पु.ल. देशपांडे आणि यातले बिनीचे सरदार दरकदार म्हणजे वसंत सबनीस, व.पु. काळे, श्याम फडके, वि.आ. बुवा, रत्नाकर मतकरी, बबन प्रभु, द.मा. मिरासदार, सई परांजपे, शंकर पाटील, कै. पद्माकर डावरे आणि यांच्यासारखेच इतर काहीजण. यांच्या तोलामोलाच्या लेखी शब्दांना लिलया पेलणारे बाळ कुडतरकर, प्रभाकर जोशी, नीलम प्रभू, लीलावती भागवत, पुरुषोत्तम जोशी, कुमुदिनी विजयकर हे सुरेल मोहरेही होतेच. पण सरदारांची मर्दुमकी जास्त की शिपाईगड्यांचा पराक्रम मोठा हा वाद इथे गैरलागू ठरावा. सगळे मिळून खिळवून ठेवू शकत हे निर्विवाद. नीलम प्रभूंनी हसत हसत 'टेकाडेभावजीऽ' म्हणून हाका मारायला सुरुवात केली की भल्या- भल्यांचे कानसुद्धा टवकारले जायचे. आपला पार 'टेकाडेभावजी' झाला तरी चालेल, पण एवढ्या गोड आवाजात एखाद्या स्त्रीने कधीतरी आपल्याला हाक मारावी असंही अनेकांना वाटलं असण्याची दाट शक्यता आहे. दुसऱ्या दिवशी लोकलमध्ये हमखास आदल्या दिवशीच्या रेडियोवरच्या श्रुतिकेवर, सीरिअलवर चर्चा व्हायची. 'गीतरामायणां'च्या दिवसात गाण्याच्या साप्ताहिक ध्वनिक्षेपणाच्या वेळी लोकलला थोडी कमी गर्दी असायची. आतासारखे घराघरात टेपरेकॉर्डर नव्हते. त्यामुळे सवडीनं तेच गाणं ऐकण्याची सोय नसायची. त्यामुळे लोक प्रवासात, रस्त्यात, कचेरीत शक्य असेल तिथे थांबून एखाद्या हॉटेलमधला, दुकानातला रेडिओ ऐकायचे. शाळेशेजारच्या घरांना आधीच 'इन्स्ट्रक्शन्स' गेलेल्या असायच्या की 'गीतरामायणा'च्या वेळात त्यांनी रेडियो मोठ्यांदा लावावा. या कटात काही शिक्षकही सामील व्हायचे आणि मुलांना नेमक्या तेवढ्या वेळात 'मनातल्या मनात धडे वाचायला' सांगायचे. नुसतं एवढ्यावरच हे 'रामायण' थांबायचं असं नव्हे. तर अमुक गीत माडगूळकरांनी कसं अर्ध्या तासात लिहिलं, तमुक घरात जन्मलेल्या छोट्या जुळ्या मुलांची नावं बरोबर रेडियोवरच्या लवकुशांच्या बारशाच्या जोडीनेच 'लवकुश' कशी ठेवली, फडके - माडगूळकर या व्दयींच कसं, कुठे फिसकटलं वगैरेबद्दल खऱ्याखोट्या गोष्टीही प्रसृत व्हायच्या. लोक त्या चवीने बोलायचे, ऐकायचे, वाचायचे. 'लिसनर'चा अंकही वाचला जायचा आणि या रेडियोस्टार्सबद्दलची गॉसिपही वाचली जायची. अमकातमका 'रेडियोस्टार' आहे असा जाहिरातींमध्ये आवर्जून उल्लेख असायचा.

'रेडियोवर गाजलेलं नाटक प्रत्यक्ष रंगमंचावर बघा' अशी भलामणही व्हायची. मूळ मुद्दा काय, रेडियोवरही अधूनमधून काही गाजत असायचं! घराघरातल्या गृहिणी, पेन्शनर किंवा संसारातून निवृत्त झालेली माणसं, प्रवासी, शेतावर- रानामध्ये राखण करणारी माणसं, सीमेवरचे जवान, हॉस्टेलमधली मुलं, आजारी- अपंग माणसं अशा नाना स्तरांवरचे श्रोते होते. मग श्रोतेसंघ, त्यांची देवघेव, श्रोत्यांनी सामूहिकरित्या कार्यक्रमात भाग घेण्याचा प्रयत्न, आकाशवाणीशी पत्रव्यवहार...

आज आठवलं की वाटतं, होता, आकाशवाणीचाही एक सुवर्णकाळ होता! ज्यातला काही भाग आम्ही पाहिला.

उगाचच 'नोस्टाल्जिया'च्या आहारी जाऊन, हे

सगळं महान् साहित्यिक मूल्याच होत असं मी म्हणणार नाही. कारण ते तस नव्हतच. 'सौ. अमुक करते' छापाची अगणित विनोदी भाषण रेडियोवर वाजली. तो काही उत्तम विनोद नव्हता. अमर्याद रडारड- हुदके- उसासे असणाऱ्या, 'माझ तुझ्यावर फार्फार प्रेम आहे' छापाच्या श्रुतिकाही होत होत्या. त्याच्यामध्येही थोर नाट्यगुण नव्हते. साहित्यिक भविष्य लिहीत असताना पु.ल. देशपांडे यानी एके ठिकाणी म्हणून ठेवलच होत की 'ग्रह उच्चीचे असतील तर रेडियोवर श्रुतिका वगैरे लिहिण्याची आमत्रण येतील आणि हेच ग्रह फिरले की स्वतःच लिहिलेल्या श्रुतिका ऐकण्याचा करुण प्रसग येईल'. ज्याना आकाशवाणी पुष्कळ 'घडली' होती ते याच्याशी सहमत झाले असतीलही पण नव्या उमेदीच्या लेखकाना आकाशवाणीसाठी लिहावस वाटायच खर! तरी तेव्हा मोबदल्याचा आकडा फारसा रम्य नसायचाच (माझ्या गेल्या आठदहा वर्षांच्या आकाशवाणी- लेखन- कारकीर्दीमध्येसुद्धा आकाशवाणीचा मोबदला दुपटीहून जास्त वाढला आहे!) पण अधूनमधून स्पर्धा व्हायच्या. त्याला लोक धो- धो प्रवेशिका पाठवायचे 'अनाहूत साहित्याची दखल घेतली जायची कार्यक्रम- अधिकारी किंवा निर्माते लेखकाना टाळण्यापेक्षा भेटण्याकडे जास्त कटाक्ष ठेवायचे. सराईत लेखकाना 'असाइनमेंट्स' दिल्या जायच्या. एखादी चागली कथा किंवा कथाबीज वाचनात आल तर त्याच्या जन्मदात्याशी सपर्क साधला जायचा. एकदोन भेटींमध्ये बोलून, चर्चा करुन नियोजित कार्यक्रमाची आखणी केली जायची आणि तो शक्य तेवढा चागला करण्याचा प्रयत्नही व्हायचा. अशा एखाद्या चागल्या कार्यक्रमाच्या प्रतीक्षेत श्रोते काही वाईट कार्यक्रमही सोसायचे. (मंत्र्याची भाषण किंवा 'देशके नाम सदेश' कोणत्या काळाला चुकवता आले आहेत बर?) नाही अस नाही. पण आपल्या मानलेल्या माणसाचे चार अपराध पोटात घालावे तशी भावनाच त्यामागे जास्त असावी भलीबुरी कशीही असो, आकाशवाणी 'आपली' होती! ('आपली आव्रड' हे शीर्षक मला या अगाने अर्थपूर्ण वाटत) आपल्या भाषेत बोलणारी, आपल्या साहित्याशी नात सागणारी, आपल्या सस्कृतीशी इमान राखणारी, 'आपली' आकाशवाणी!

आणि ही कामगिरी तरी किती कठीण होती एकट 'शब्द' हे माध्यम! बाकी काहीच नाही. ध्वनिमुद्रण, ध्वनिसवर्धन, इतर इफेक्टस वगैरेंची शास्त्रही आताच्या तुलनेत अप्रगत. त्यात सर्वस्वी सरकारी आणि अस्पर्धात्मक यत्रणा. त्यामुळे ''काय काय लागेल?'' यापेक्षा ''कशात भागेल'' हा एकच विचार असणार. आजसुद्धा आकाशवाणीवर सोयींपेक्षा गैरसोयी जास्त आहेत. मग १९५० / ६० / ७० साली त्या निश्चितच असणार. अस असूनही इतका मोठा श्रोतृवर्ग एखाद्या माध्यमाने ओढून घ्यावा हे कसब कोणाच? ते माध्यम ज्याच्या हातात होत त्याच? माध्यमाच्या नवेपणाच? इतर कोणतीही माध्यम स्पर्धेमध्ये उभी नसण्याच? की या सर्वांच, एकत्रित परिणामाचं?

प्रसारमाध्यमाचे अभ्यासक ही चिकित्सा वेगवेगळ्या पातळ्यावर करु शकतील. प्रथम एक सामान्य श्रोता म्हणून आणि आता आकाशवाणीची लेखक म्हणून मला तरी अस वाटतं की या माध्यमाच एकपदरीपण हेच त्याच सामर्थ्य आहे. जे काही दाखवायचं, भासवायच, सुचवायच, शिकवायचं ते फक्त शब्दामधून. त्यामुळे लेखकापुढच आव्हान मोठ. त्यान ते त्याच्या कुवतीन पेलायच. श्रोत्यापर्यंत फक्त शब्दच पोचणार म्हणून ते बोलणाऱ्यानी बोलण्याच आव्हान पेलायच. श्रोत्यानी फक्त श्रवणभक्ती केली तर त्याना पुरेसा आनद मिळणार नाही म्हणून त्यानी त्याच्याशी रममाण व्हायचं आपल्या कल्पनेन त्या ऐकीव शब्दाना लाबी रुदी खोलीची परिमाण द्यायची. रगीत पडद्यावरच्या चित्राला लांबी आणि रुदी आधीपासून आहेच. शब्दानी फक्त 'खोली' ही तिसरी मिती द्यायची आहे. म्हणजे एका अर्थान काम सोप आहे पूरक आहे पण दुसऱ्या अर्थान अडचणीचही आहे. 'शब्दाच्या पलीकडले' वगैरे म्हणायला काय जातय? इथे शब्दानी कुठवर न्यायचय हेही स्पष्ट नाही, रगरेषा कोणती भर घालतील याचीही खात्री नाही, आणि या सगळ्यामधून टीव्हीचे लाडके 'दर्शक' नेमक काय बघतील किंवा उचलतील याचा तर अजिबातच भरवसा नाही अगदी उदाहरणानच स्पष्ट करायच तर 'स्त्री' ही बुवा अमुक एका प्रकारे बदिनी आहे' अस सुचवणारा कार्यक्रम डोळ्यापुढे आणावा शीर्षकासाठी वापरलेला शब्द सूचक आहेच तरी 'बदिनी' म्हटल्यावर दिग्दर्शक सारखासारखा नायिकेला या ना त्या गजाच्या आड दाखवणार. तो अभिनय करणारी अभिनेत्री सारखी दातओठ खाऊन किंवा हताश होऊन गजाना टकरा देणार त्याचवेळी पार्श्वसगीत किंवा शीर्षकगीत किंचाळत असणार आणि हे सगळ कमी झाल म्हणून की काय, शेवटी समारोपादाखल दिग्दर्शक एखाद्या पात्राच्या तोंडी लेखकाची वाक्यच्या वाक्य टाकणार - "एकूण काय, आपण बायका म्हणजे अशा बदिनीच गऽ'. आता बोला! स्त्री बदिनी असते याविषयी आहे कोणाच्या मनात काही शका?

याचीच दुसरी बाजू म्हणजे अनेक सूक्ष्म छटा, तरल सवेदना, हळुवार भावना दाखवायच्या राहून जाण किंवा ओझरत्या दाखवल्या असल्या तर त्या प्रेक्षकाच्या नजरेतून सुटण. आशा बगे, विद्याधर पुडलिक, विजया राजाध्यक्ष याच्या काही चागल्या कथाची दूरदर्शन रुपातर अवश्य आठवून बघावीत. या लेखकाची नाव श्रेयनामावलीत नसती तर पडद्यावर पुन्हा एकदा 'बदिनी'च बघितल्यासारख वाटल असत! इतक्या त्या गुतागुतीच्या कथा सरळसोट करुन टाकलेल्या होत्या. आपल्या साहित्याच दूरदर्शन रुपातर करण्याची सधी बहुधा मूळ लेखकाना मिळत नाही, करण कपूर, शर्मा, वर्मा वगैरे कोणीतरी निर्मातेच हे काम घरच्याघरी करतात. समजा लेखकाना सधी मिळाली तर मार्गदर्शन मिळत नाही. आकाशवाणीवरचे अनेक अधिकारी साहित्याचे, सगीताचे चागले जाणकार, रसिक, मर्मज्ञ असत. बुखारीसाहेबापासून तो पुढे मर्ढेकर, बोरकर, पु.ल. देशपांडे, व्यकटेश माडगूळकर, कृ द. दीक्षित, ज्योत्स्नाबाई देवधर वगैरेंची नाव या सदर्भात चटकन आठवण्याजोगी आहेत. इतरही अनेक निघू शकतील ही मडळी मुळात आपापल्या साहित्यिक किंवा सगीतविषयक कामगिरीमुळे आकाशवाणीसाठी निवडली गेलेली होती. दूरदर्शनवर या दर्जाची कर्तबगारी व्यवस्थापकीय पातळीवर फारशी नाही. त्यामुळे या व्यवस्थापनाच्या अवतीभोवती गोळा झालेल्या माणसामध्येही मोठी जाणकारी किंवा समज नसण्याची शक्यताच जास्त. मग 'एकमेका साह्य करु, अवघे धरु सुपथ' अस म्हणत कमीत कमी त्रासात पडद्याचा जास्तीत जास्त वेळ कसा जाईल हे बघण्यातच त्याचा जास्तीत जास्त वेळ जावा हे ओघान आलच. अशा एकूण पोटभरु परिस्थितीमध्ये उत्कृष्टतेसाठी धडपडण, त्यासाठी लागणार अधिकृत शिक्षण घेण, अभ्यास- व्यासग या गोष्टी केव्हाच नामशेष झाल्यास आश्चर्य नाही दूरदर्शन लेखनाच किंवा मूळ साहित्यकृतीच्या दूरदर्शन रुपातराच तत्र आणि मत्र शिकवण्याच्या सस्था आपल्याकडे आहेत का? पुस्तक आहेत का? तज्ज्ञ माणसाकडून काही वर्कशॉप्स वगैरे याच्यासाठी घेतले जातात का? असे प्रयत्न होत असतील तर निदान आमच्यापर्यंत तरी ते आलेले

नाहीत तूर्तास तरी साधारणपणे कथेमधल्या ठळक प्रसगावर काही सवाद लिहिले जातात. ते कागद बघून, आकाशवाणीवर वाचले तर त्याना 'श्रुतिका' म्हणतात आणि कागद न बघता, पडद्यावर माफक हावभावासहित म्हटले तर त्याना दूरदर्शनवरची नाटक म्हणतात

त्यात, राष्ट्रीय माध्यम झाल्यामुळे अनेकाच्या भावना जपण्याची जबाबदारीही ओढवतेच. अनेक चागल्या साहित्यकृती अत्यत विचित्र किंवा साहित्यबाह्य कारणासाठी दूरदर्शनच्या पडद्याला मुकत्यात चागल्या कथाबीजाचे कोपरे, कगोरे घासून गुळगुळीत केले जातात काना मात्रा वेलाट्या छाटून टाकल्यावर नुसती बाराखडी उरावी तसे मग अतिशय ढोबळ प्रंसगाचे काही क्रमश तुकडे शिल्लक राहतात लेखकाची नाव बदलली तरी त्या तुकड्याचे चेहरेमोहरे सारखेच दिसतात; की त्याना काही चेहरेमोहरेच नसतात ?

फार गभीर जीवनार्थ तर दूरच, पण आपण महिन्याकाठी एखाद्तास आपल्या समाजाची चागली करमणूकसुद्धा करु शकत नाही हे दृश्य फार भयावह वाटत. आठवा, 'गजऱ्या'च्या पाकळ्या. विनोदाला कारुण्याची झालर लावण्यात आपले पुष्कळ विनोदी लेखक झटले. पण कारुण्याला विनोदाची झालर लावण्यास एकेक 'गजरा'सुद्धा पुरेसा होता. महिन्याकाठी तासाभराचा प्रसन्न, विनोदी, खेळकर कार्यक्रम- तोही सलग नव्हे तर तुकडेबाज- लिहायला आपल्याला माणस मिळू नयेत ? 'गजऱ्या'चा फक्त शेवट विनोदी झाला. 'गजरा' बद झाला, पण त्याच कारण काय दिल होत ? तर म्हणे अखेरच्या भागात 'आई' हा विषय हाताळल्यामुळे त्यान पावित्र्याची इतकी उची गाठली होती की त्याहून जास्त काही करण निर्मात्याना शक्य नव्हत. केवढी ही पावित्र्याची तातडी !

यातली एक विसगती अजून नीट उलगडत नाहीये दूरदर्शनवर गाजलेल्या अनेक कलाकृतींना समृद्ध साहित्याची भक्कम बैठक असते. (याला अपमाननीय अपवाद 'रथचक्र'चा पण तो स्वतत्र विषय ) मग ते 'मालगुडी डेज' असोत, चिमणराव असोत किंवा 'द ग्रेट एक्स्पेक्टेशन्स' असोत 'येस प्राइममिनिस्टर'सारखी दर्जेदार उपहासिकासुद्धा फार परिश्रमपूर्वक लिहिलेली असावी अस वाटत 'पार' सारख्या उत्कृष्ट चित्रपटामागे छोटी पण सकस कथाच असते. फुलवण्याच कसब दिग्दर्शकाच असत हे तर खरच पण मुळात ती ती कथावस्तू किंवा साहित्यबीज निवडण्याची दृष्टीही त्याची असते. अस असताना मराठीमधले दिवगत किंवा यात नामवत लेखक दूरदर्शनवर अभावानेच का दिसावेत ? चागल्या साहित्यकृती हेरण्याचा, लेखक टिपण्याचा, त्याच्याकडून दृश्य माध्यमाला साजेलस लेखन करुन घेण्याचा प्रयत्न झाल्याच दिसत नाही. अनेक चागले लेखक दूरदर्शनने पार दुर्लक्षिले आहेत वयाच्या किंवा साहित्यिक कर्तबगारीच्या विशिष्ट कक्षा ओलाडल्यानतर त्यानी रागेत उभ राहाव ही अपेक्षा गैरवाजवी आहे सुरुवातीला जे कोणी धीर करुन रागेमध्ये उभे राहिले होते त्याचे अनुभव फारसे उत्साहवर्धक नव्हते या रागेला शिस्तही नव्हती आणि धड आगापिछाही नव्हता. त्यामुळे नतर फारस कोणी स्वत हून तिथे फिरकल नसाव. बर, 'आपण नाहीच गेलो त्या वाटेला' अस सागण्याचीही चोरी आणि कोणी सागितलच तर विश्वास कोण ठेवणार आहे ? 'कोल्ह्याला द्राक्ष आबट' हे वाक्य न बोलताही तो बरच काही सुचवून जाईल ! (हे खर शब्दाच्या पलिकडल !)

या सगळ्याचा एक निश्चित परिणाम झालेला आहे मराठी लेखक कधी नव्हे एवढा दैववादी झालेला आहे. 'कधीं झळकविसी नाम माझे , तुज ठावे परमेश्वरा' अशी आळवणी तो करत नाही एवढच. पण एरवी धारणा त्याला समातरच आहे एखादी कलाकृती किंवा लेखक का निवडला जातो, केव्हा निवडला जातो, तोच का ? इतर का नाहीत ? त्याची तरी क्ष कलाकृतीच का ? 'य' का नाही ? असल्या प्रश्नाना इथे उत्तर नाहीत. मूळ कथेमधील पाच सलग वाक्यसुद्धा टिकतील याची खात्री नाही. काटछाट, भर वगैरे घालणारा काय पात्रतेचा असेल हे माहीत नाही. कोणता विषय, कोणत्या वेळी, कोणत्या प्रेक्षकासमोर टाकला जाईल याचा भरवसा नाही खर म्हणजे कशाचाच काही भरवसा नाही 'टीव्ही म्हणे स्वस्थ रहावे जे जे होईल ते ते पहावे'

किंचित विनोदबुद्धी टिकून असलेला एखादा लेखक यावर म्हणतो, ' आम्हाला टीव्हीवाले कशाला हो विचारताहेत ? आम्ही थोडेच पार्ल्याला किंवा डोंबिवलीला राहतो ? आमची आडनाव थोडीच कपूर, शर्मा व वर्मा अशी अमराठी असतात ? आणि मुख्य म्हणजे, इसापनीतीसारख्या तात्पर्याच्या गोष्टी आम्ही थोड्याच कधी लिहितो ?',

तात्पर्य काय की मराठी लेखनाची आणि लेखकाची दूरदर्शनवर पार दुर्दशा झाली आहे. काहीतरी मूलभूत बदल झाल्याशिवाय ती सुधारण्याची आशा नाही लेखकजात तर ते कदापि करणार नाही. 'स्वामी' दाखवली तरी आनद न दाखविली तरी आनद असा अतिमचूक पवित्रा घेऊन आपण दूरदर्शन समोर बसतोय इतकच

याचा आणखी एक दुष्परिणाम म्हणजे लोक आकाशवाणीसाठी लिहायला उत्सुक नाहीत. पुण्यासारख्या मराठीच्या, मराठी साहित्यिकाच्या बालेकिल्ल्यामध्ये आकाशवाणीला चागल साहित्य मिळवण्याची भ्रात पडते आहे. कित्येक आकाशवाणी अधिकारी अस सागतात की पुढच्या क्वार्टरच प्रोग्रॅम प्लॅनिग द्यायची वेळ आली की आमच्या पोटात गोळा उठतो काय करणार ? उद्या रेडियोवर चागल नाटक लिहून द्या म्हटल तर लेखक नाक मुरडतात पण टीव्हीवर दोन हजार साली एखादी सीरियल होणार असेल तर तिच्यात नाव झळकवायला हे धडपडतील

यातली अतिशयोक्ती किंवा त्रागा क्षणभर दूर केला तरी वास्तव बव्हशी असच दिसेल. आकाशवाणी नभोनाट्यस्पर्धा १९८७ साठी मी एक परीक्षक होते त्यानिमित्त सुमारे सव्वाशे नभोनाट्य वाचताना मला हे तीव्रपणे जाणवल की शब्द माध्यमात अजिबात विचार न करता यापैकी बहुतेक नभोनाट्य लिहिलेली आहेत जवळजवळ प्रत्येक लेखकाने, 'ती गाल फुगवते,' 'तो डोळे मोठे करते' 'सासूबाई कप आदळतात ' अशा अगणित सूचना केलेल्या आहेत हे गाल फुगवण, डोळे मोठे करण वगैरे रेडियो कस दाखवू शकेल ? हा मुळी कुठे विचारच नाही कारण (बहुधा) या लेखकाच्या नजरेवर दूरदर्शनचा प्रभाव आहे म्हणजे शोकातिका बघा. रेडियोसाठी दृश्यात्मक लेखन आणि दूरदर्शनसाठी शब्दबबाळ लेखन अशी काहीतरी गल्लत होत आहे.

'आकाशवाणी ' या शब्दापासूनच भाषिक समज दिसून आली. टेलेव्हिजनला दूरदर्शन हा काही खरा चागला प्रतिशब्द नव्हता. कोणीतरी सुचवला, इतरानी वापरला इतकच दैवदुर्विलास म्हणावा अस शब्दाच सार्थक झाल ते दूरदर्शनन मराठीपणाला, मराठी साहित्याला कायम दूर ठेवल्यामुळे. आकाशवाणीशी यमक जुळणारा 'प्रकाशवाणी' असा काहीतरी शब्द चालला असतो पण नुसत्या शब्दाने काय होणार ? आकाशवाणी ते प्रकाशवाणी ही मराठी साहित्याची मात्र निखालस अधारयात्रा आहे एवढ खास !

o o o

# 'इडियट बॉक्स' -की, नवा मित्र?
## 'माणूस' दर्शक चाचणी.



**टीव्ही आल्यामुळे पुस्तक वाचणं मुळीच कमी झालं नाही. मात्र सिनेमा पाहणं बरंच कमी झालं. 'रामायणा'ला सर्वप्रथम स्थान देऊन टीव्ही मनोरंजनासाठीच म्हणणारे दर्शक 'चुनौती', 'बुनियाद' या मालिकादेखिल पसंत करतात. खास 'माणूस' करीता डॉ. दिलीप सरवटे यांनी घेतलेली दर्शक चाचणी.**

इतर देशांच्या तुलनेने टीव्ही भारतात तसा उशिराच आला. १९५९ साली प्रायोगिक पद्धतीने टीव्ही चे आगमन झाले तरी त्याची खऱ्या अर्थाने वाढ सुरु झाली ती १९७२ नंतरच. मुंबई दूरदर्शन केंद्र कार्यान्वित झाल्यावर. 'अशियाड' च्या वेळी रंगीत दूरदर्शनचे आगमन झाले. रिलायन्स क्रिकेट चषकामुळे १९८७ साली तांत्रिक बाबीत अनेक सुधारणा झाल्या. आता देशात असा एकही नागरी भाग नसेल ज्याला टीव्हीचा स्पर्श झाला नाही. देशातील टीव्ही संचाच्या उत्पादनाच्या आकडेवारी वरूनही हे दिसून येईल. १९७५ – ७६ पर्यंत टीव्हीचे उत्पादनाच्या आकडेवारी वरूनही हे दिसून येईल. १९७५ – ७६ पर्यंत टीव्हीचे उत्पादन तसे क्षुल्लकच, काही हजारात होते. सरकारी आकडेवारी प्रमाणे, एका दशकाने म्हणजेच १९८६ – ८७ मध्ये ३० लाख टीव्ही संचांचे आपल्या देशात उत्पादन झाले. १९९० पर्यंत हे उत्पादन प्रतिवर्षी ६० लाखावर पोचेल असा अंदाज आहे. त्यातील निदान १० लाख टीव्ही संच हे रंगीत असतील. सध्या भारतात ५ कोटीच्या वर टीव्ही असावेत असा अंदाज आहे. इतके असून सध्या भारताच्या लोकसंख्येच्या फक्त ३० टक्के भागापर्यंत टीव्ही आतापर्यंत पोचला आहे. म्हणजे तसे बघायला गेले तर अजून बरीच मजल मारावयाची बाकी आहे.

टीव्हीमुळे आपल्या दररोजच्या सवयींवर व एकूण समाज जीवनात क्रांती घडून आली आहे. ही क्रांती कशातऱ्हेची आहे, टीव्हीमुळे इतर माध्यमांवर काय परिणाम झाला, त्यावर होणारे कार्यक्रम, जाहिराती व तत्सम बाबीं विषयी सर्व सामान्य माणसांची मते काय हा एक जिज्ञासेचा विषय असल्यामुळे 'माणूस' साठी पुण्यात एक टेलिव्हिजन दर्शक अभ्यास (OPINION POLL) घेण्यात आला. वेगवगळ्या वयोगटातील व्यवसायातील, उत्पन्नगटातील अशा १००० लोकांच्या मुलाखतीं घेण्यात आल्या. त्यांनी केलेल्या मतप्रदर्शनाच्या आकडेवारीचे विश्लेषण देण्यात येत आहे.

### फावल्या वेळचा उद्योग

नागरीकरणामुळे व नव - नवीन उपकरणांचा शोध लागल्यामुळे सर्वसामान्य माणसाला जादा वेळ आता उपलब्ध झाला आहे. तो हा वेळ कसा वापरतो ? काही सरासरी ठोकताळे खाली दिले आहेत.

सुशिक्षित म्हणजे ज्यांना वाचता येते अशा लोकांमध्ये वाचनाचे प्रमाण अजूनही सर्वात जास्त (९६.५९%) आहे. फावल्या वेळच्या वाचनात दररोज एक ते दोन तास घालविणारे ६२ टक्के आहेत.

त्यानंतर टीव्ही बघण्यात वेळ घालविणारे ९५ टक्के आहेत. हे लोक सरासरीने ७७ टक्क्याच्या जवळपास दररोज एक ते दोन तास टीव्ही बघतात.

आकाशवाणी ऐकणारे लोक ८२ टक्के आहेत. दररोज एक ते दोन तास आकाशवाणी ऐकणारे लोक ५९ टक्के आहेत.



'बुनियाद'मध्ये अनिता कन्वर, आलोकनाथ

याचा अर्थ असा की कोठल्याही माध्यमाचे वर्चस्व अजून कमी झालेले नाही. याचे असेही कारण असू शकेल की आकाशवाणी व दूरदर्शन यांचे कार्यक्रम विशिष्ट वेळातच असतात. त्यामुळे उरलेला वेळ घालविण्यासाठी सामान्य माणूस इतर माध्यमांकडे वळतो. येत्या काही वर्षात या वेळेच्या वापरात प्रकर्षाने फरक पडेल असे वाटत नाही. याला तांत्रिक तशा व्यावसायिक मर्यादा राहतील. त्यामुळे प्रत्येक माध्यम आपला प्रवास चालू ठेवू शकेल असे वाटते.

टीव्ही मुळे सिनेमा बघण्याचे प्रमाण मात्र नक्कीच वाढले आहे. सिनेमा थिएटर मधे जाऊन सिनेमा बघणे लोकांना कठिण वाटत असेल. मात्र आता रविवारचे धरुन चार व प्रादेशिक भाषेतील धरुन निदान दोन असे महिन्यात सहा सिनेमे घरी बसून टीव्ही वर बघता येतात. त्यामुळे जरी ५७ टक्के दर्शकांनी टीव्ही मुळे सिनेमा बघण्याच्या प्रमाणात फरक पडला नाही असे म्हटले असले तरी ३० टक्क्यांनी हे प्रमाण वाढले आहे असा निर्वाळा दिला आहे. मात्र व्हिडीओ मुळे सिनेमा बघण्याचे प्रमाण वाढल्याचे म्हणणारे फक्त १५ टक्केच लोक आहेत. याचे कारण म्हणजे रु. १५०००/- ला पडणारा व्हिडीयो कॅसेट रेकॉर्डर अजूनही बहुतांशी लोकांच्या आवाक्याबाहेरच आहे. इतके असूनही थियेटरमधे सिनेमा बघणाऱ्यांचे प्रमाण सर्वात जास्त म्हणजे ४७ टक्के आहे.

## 'रामायणा'ला अग्रस्थान

आज आपल्या टीव्ही वर आठवड्याचे साधारण ४० ते ५० तासांचे कार्यक्रम होतात. यात विविधता आहे. यातील सर्वच कार्यक्रम सर्वच लोकांना बघता येणे शक्य नाही. त्यामुळे प्रत्येकाची पसंती असणारच. या पसंतीचे आठवड्याला किंवा महिन्याला खात्रीलायकपणे मोजमाप करता येईल अशी यंत्रणा अजून आपल्याकडे नाही. अमेरिकेत 'नेल्सन्स् रेटींग' नावाची संस्था अशा तऱ्हेचे मोजमाप करीत असते. त्याचा उपयोगही होतो. मात्र अमेरिकेत टीव्ही खाजगी असल्यामुळे या मोजमापाचा उपयोग लोकांना जास्तीत जास्त आवडतील असे कार्यक्रम देण्यासाठी करण्यात येतो. दुर्दैवाने आपल्या देशात दूरदर्शन सरकारच्या अखत्यारीत असल्यामुळे व बहुतेक केंद्रात एकच चॅनेल असल्यामुळे आपल्याला पर्याय नाही. त्यामुळे दूरदर्शन जे सादर करते ते गोड मानून घ्यावे लागते.

सध्या टीव्हीवर दाखविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांविषयी लोकांना काय वाटते ?

सहसा न चुकविणाऱ्या कार्यक्रमांमध्ये 'रामायण' चा क्रम पहिला लागतो यात आश्चर्य नव्हे. राजनैतिक, सामाजिक व इतकेच काय लग्न वगैरे कार्यात सुध्दा 'रामायण' दाखविण्याची सोय आज करावी लागते. 'रामायणा'नंतर सहसा न चुकविणारे कार्यक्रम या क्रमाने येतात – चुनौती, नेटवर्क कार्यक्रम (म्हणजे रात्री ९ नंतर दाखविण्यात येणारे कार्यक्रम), बातम्या, १००, छायागीत / चित्रहार इत्यादी.

कधीही न बघावेसे वाटणाऱ्या कार्यक्रमांच्या अग्रस्थानी आहे 'आमची माती आमची माणसे' व 'कामगार विश्व' या पाहणीतून जरी हा निष्कर्ष आलेला असला तरी हे ही विसरता येणार नाही की यातील दर्शक प्रामुख्याने नागरी विभागातील आहेत, त्यामुळे त्यांची मते ही पूर्ण बरोबर ठरतील असेही नाही. या शीर्षकाखाली येणारे इतर कार्यक्रम आहेत- 'होनी-अनहोनी', बातम्या, मराठी कार्यक्रम, किलबिल इत्यादी. इथे एक गोष्ट लक्षात घ्यावी लागेल की काही कार्यक्रम दोन्ही याद्यात दिसून येतील म्हणजे त्यांच्या आवडण्याचे किंवा नावडण्याचे प्रमाण समसमान असू शकेल. गेल्या सहा महिन्यात सर्वात आवडलेले कार्यक्रम कोणते ? यात सुद्धा रामायणचा पहिला नंबर (६७ टक्के) आहे. त्यानंतर चुनौती (४७ टक्के), बुनियाद (३३ टक्के), १०० (२४ टक्के), बंदिनी (१४ टक्के), स्वामी (१३ टक्के), तमस (१३ टक्के), इत्यादी आहेत. या मतप्रदर्शनावरुन काही बोध घेता येईल का ?

भारतीय जनमानसावर धर्माचा पगडा जबरदस्त आहे. त्यामुळे रामायण सर्वात आवडते ठरल्यास नवल नाही. त्याचबरोबर भव्य निर्मिती व स्पेशल इफेक्टसमुळेही लोकांना हे आवडले आहे.

सध्याच्या भ्रष्टाचारी वातावरणात, 'चुनौती' एखाद्या मंद झुळुकीसारखे वाटते. कॉलेज जीवनाचे यथार्थ दर्शन व त्यातील गोंधळाच्या वातावरणात आपल्या निष्ठांशी अढळ राहणारा प्रमुख लोकांवर छाप पाडतो आहे. मन सर्व बाजूंनी साशंक झालेले असले तरी अशा भूमिकांमुळे कोठेतरी आशेचा एक अंधुक किरणही यातून दिसत आहे.

'बुनियाद' सारखा 'सोप ऑपेरा', '१००' व 'बंदिनी' सारखे जीवनाचे जवळून व खरे दिसणारे चित्रण, 'स्वामी' व 'तमस' सारखे इतिहास पुनःप्रत्ययास आणणारे कार्यक्रम लोकांना जास्त आवडल्याचे दिसते आहे. निखळ करमणूक करणारे कार्यक्रम या यादीत जवळपासही नाहीत. तशा गुणवत्तेचे कार्यक्रम सादरही झाले नाहीत ही पण वस्तुस्थिती.

## मोहन भंडारी व दीपिका

टीव्ही वरील आवडलेले कलाकार कोणते ? टीव्ही च्या माध्यमामुळे अनेक कलाकार प्रकाशझोतात आले हे सत्य आहे. टीव्ही माध्यमाचा प्रभाव आवडलेल्या कार्यक्रमातील अगदी लहानसा कलाकार जरी सार्वजनिक ठिकाणी दिसला तरी त्याची ओळख पटण्याने दिसून येतो. सध्याचे टीव्ही वरील आवडलेले कलाकार खालील प्रमाणे आहेत.

पुरुषांमधे मोहन भंडारी [चुनौती २४.५५%], अरुण गोवील [रामायण २२.७६%], मजहर खान [बुनियाद व इसी बहाने १५.१२%], आलोकनाथ



सुप्रिया पाठक - आवडणारा चेहरा



**दर रविवारी अवतरणारं रामराज्य - 'रामायण' मालिकेत अरुण गोविल, दीपिका**

[बुनियाद १४.४७%] व अरविंद त्रिवेदी [रामायण ११.३८%] हे सर्वात लोकप्रिय कलाकार. यातील रामायणातील प्रमुख कलाकाराची प्रसिद्धी सर्वात जास्त दिसून येते. कांही दिवसापूर्वी पुण्यात अरविंद त्रिवेदी (रावण) यांना मिळालेल्या स्वागतावरूनही हे दिसून येईल.

स्त्री कलाकारामधे दीपिका [रामायण २७.८%], सुप्रिया पाठक [जिंदगी १५.९३%], अनिता कन्वर [बुनियाद ११.८७%], स्मिता तळवलकर [बंदिनी व बातम्या १०.५७%] व अर्चना जोगळेकर [चुनौती ९.२७%] या जास्त आवडलेल्या दिसतात.

## त्यांना जाहिराती आवडतात

सर्व सामान्यपणे टीव्ही वरील जाहिराती विषयी दोन तऱ्हेचे मतप्रवाह आढळून येतात.

टीव्ही वर खूप जाहिराती दाखवितात. त्या सुरु झाल्या की टीव्ही आम्ही बंद करतो.

टीव्ही वरील कार्यक्रमांपेक्षा जाहिरातीच जास्त आकर्षक असतात.

या दर्शक अभ्यासावरुन हे निष्कर्ष बरोबर आहेत का याचाही पडताळा घेण्यात आला आहे. यातील मते अशी :

टीव्ही जाहिराती बघणारे लोक बहुमतात म्हणजे ८३ टक्के आहेत. याचा अर्थ टीव्ही वरील जाहिराती बघितल्या जात नाहीत म्हणणे साफ झूट!

टीव्ही जाहिराती आवडणारे सुद्धा चक्क बहुमतात म्हणजे ५४ टक्के आहेत. न आवडणारे फक्त १७ टक्के. उरलेल्यांना स्वतःचे मतच नाही.

टीव्ही वरील जाहिरात बघून नेहमी वस्तू विकत घेणारे अल्पमतात म्हणजे ५ टक्केच आहेत. कधी-कधी घेणारे मात्र बहुमतात ६० टक्के आहेत. टीव्ही जाहिराती बघून वस्तू विकत घेण्याचे प्रमाण वाढल्याचा तर्क ही एक आणखी मिथ्या गोष्ट!

दररोजच्या, घरगुती वापरातल्या व कमी किमतीच्या वस्तू टीव्ही वरील जाहिराती बघून घेण्याचे प्रमाण जास्त म्हणजे ६२ टक्के आहे. त्याच्या तुलनेने टिकाऊ व महागड्या वस्तू विकत घेण्याचे प्रमाण कमी म्हणजे १७ टक्के आहे. मार्केटिंगच्या तत्त्वानुसारच हे आचरण आहे. किंमती व टिकाऊ वस्तु घेण्यासाधी इतर तज्ज्ञांचा सल्लाही घेतला जातो.

## 'निरमा' लोकप्रिय

टीव्ही वर इतक्या जाहिराती येत आहेत. यातील सर्वात आवडलेल्या किंवा नापसंत जाहिराती कोणत्या?

गुणवत्ता यादीप्रमाणे सर्वात आवडलेल्या जाहिरातीत निरमा डिटर्जंट (२१.९५%) चा पहिला क्रम लागला. याचे कारण त्यांचे जाहिरात देण्याचे प्रमाण जास्त आहे, इतरांपेक्षा ती जास्त मुदतीची आहे व तिचे संगीत श्रवणीय व लक्षात राहण्यासारखे आहे. त्याच्या खालोखाल विमल टेक्सटाईल्स (१८.५४%), रसना (११.५४%), ओनिडा टीव्ही (९.९२%), गार्डन वरेली (९.२७%), थम्स अप (८.२९%), जीवनधारा विमा पॉलिसी (६.८३%) व बॉम्बे डाईंग (५.८५%) या आहेत. एकूण जाहिरात खर्चात कापड उद्योगाचा सिंहाचा वाटा ठरेल. या नंतर साबण उद्योग व मग इतर. जाहिरात आवडण्याच्या कारणात, चांगली दिसणारी मॉडेल्स, पार्श्वसंगीत, खुसखुशीत संवाद हे प्रामुख्याने आढळतात. त्याचबरोबर ओनिडा टीव्ही च्या जाहिरातीमधील फॅंटमीचा भाग दर्शकांच्या मनात कुतूहल निर्माण करतो.

न आवडलेल्या जाहिरातीमधे 'सर्फ' चा (१९.०२%) पहिला क्रम आला आहे. ललिताजींची पर्सनॅलिटी, ग्राहक बुद्दु आहे व त्याला अक्कल शिकवायची गरज आहे या पवित्र्यामुळे ही हे मत झाले असेल. या नंतर ओनिडा टीव्ही (१२.५२%), ओके साबण (९.११%), निरमा (४.८८%), सुपर रीन (३.५८%) व व्हील डिटर्जंट (३.०९%) आहेत. काही जाहिराती 'आवडलेल्या' व 'नावडलेल्या' या दोन्ही सदरात आलेल्या दिसतील. या द्वारे लोकांची पसंती-नापसंती दोन्ही समप्रमाणात दिसून येते. अशा तऱ्हेचा दर्शक / ग्राहक अभ्यास करुन कोठल्या तऱ्हेच्या जाहिराती पसंतीस उतरतील हे ठरविता येईल. त्याद्वारे जाहिरातीवर करण्यात येणारा खर्च वाया जाणार नाही याची ही खात्री बाळगता येईल.

अशा तऱ्हेने दर्शकांनी व ग्राहकांनी टीव्हीविषयी आपले विचार विविध शीर्षकाखाली मांडले आहेत. अशा अभ्यासाचा उपयोग विविध तऱ्हेने

करता येईल. प्रायोजकाना कशा तऱ्हेचे कार्यक्रम लोकाना आवडतील याची खूणगाठ बाघण्यास, जाहिरातदाराना जाहिराती तयार करण्यास तर इतर स्पर्धक माध्यमाना टीव्हीचे आक्रमण थोपवून धरण्यास या दर्शक अभ्यासाचा साराश काढावयाचा झाल्यास तो खालील प्रमाणे काढता येईल.

फावल्या वेळेचा उद्योग म्हणून टीव्ही बघण्यात वाढ होत असूनसुद्धा इतर छापील व श्राव्य माध्यमाना नजिकच्या काळात धोका नाही.

टीव्ही मुळे सिनेमा / नाटके बघण्याचे प्रमाण कमी होणार.

जाहिरातीसाठी टीव्ही हे एक मुख्य प्रभावी व पसतीचे माध्यम ठरणार.

सरकार टीव्ही सारखे प्रभावी माध्यम आपल्या हातात ठेवून हवा तसा प्रचार करण्यास मोकळे राहील. त्यामुळे टीव्हीच्या विश्वासार्हते विषयी शका.

टीव्हीचा व्याप वाढत जाऊन बहुताशी भारतभर पोचण्याचा त्याचा प्रयत्न राहील.

या 'इडियट बॉक्स'ला आता पर्याय नाही. फक्त *त्यामुळे आपण 'इडियट' बनत नाही किंवा ठरत नाही ना हे प्रत्येकाने तपासून बघणे आवश्यक आहे.*

•••

### दर्शक पृथःकरण

दर्शक संख्या. ६१५   पुरूष : ६९ ७६%   स्त्रिया : ३०.२४

**वयोगट:**

२० वर्षापर्यंत- २१.७९%
२१-३० वर्षांत- ४० ९८%
३१-४० वर्षांत- १६.५९%
४० च्या वर- २० ६५%

**शिक्षण:**

हायरसेकडरी : २७.१६%
पदवीधर: ५३.५०%
पदव्युत्तर:११.२२%
डिप्लोमा व इतर ८.१३%

**व्यवसाय:**

विद्यार्थी : ३२.३६%
नोकरी : ३४ ६३%
धदा.१४.३१%
घरकाम:९.११%
इतर:९.५९%

**मासिक उत्पन्न:**

रु १००० पर्यंत: ७.३२%
रु. १००० ते रु ३०००: ४१.७९%
रु. ३००० ते रु ५०००: २७ ८०%
रु. ५००० च्या वर: १६.१०%
माहिती नाही. : ६.१८%

### फावल्या वेळेचा उद्योग

अ) वाचन ९६.५९%
आकाशवाणी ८२%६०
दूरदर्शन ९५.७७%
व्हिडिओ / सिनेमा ७५ १२%

ब) वेळेचा सदुपयोग

| | १-२ तास | ३-४ तास | ४ तासाच्यावर |
|---|---|---|---|
| वाचन | ६२.६०% | २७.८% | ३.५% |
| आकाशवाणी | ५९.०२% | ८.९% | २.९% |
| दूरदर्शन/ व्हिडियो | ७७ ३९% | १३.९८% | १ ९५% |

क) सिनेमा बघण्याचे प्रमाण (दर महिन्याला)

| | १-२ | ३-४ | ४ च्या वर |
|---|---|---|---|
| थियेटर मधे | ४७.८% | १० ९% | ६ ०% |
| टीव्ही वर | १० ८९% | ६.०% | ३७.७२% |
| व्हिडीयोद्वार | ३२.५२% | ११.५४% | ३१.०६% |

ड) टीव्ही व सिनेमा

टीव्ही मुळे सिनेमा बघणे

| | |
|---|---|
| वाढले | ३० ०८% |
| कमी झाले | १२ ६८% |
| फरक नाही | ५७ २४% |

### टीव्ही वरील कार्यक्रम

**अ) सहसा न चुकविणारे कार्यक्रम (पहिले सहा)**

रामायण ४७.९७%
चुनौती २२.४४%
नेटवर्क कार्यक्रम १७.२४%
बातम्या १५.४५%
१०० १४ ९६%
छायागीत/ चित्रहार ११.३८%

**ब) कधीही न बघावेसे वाटणारे कार्यक्रम**

आमची माती आमची माणसें १०.१६%
कामगार विश्व १०.८९%
होनी- अनहोनी १०.८९%
बातम्या ४.३९%
मराठी कार्यक्रम ३.९०%
किलबिल ३.९०%

**क) गेल्या सहा महिन्यात सर्वात आवडलेले कार्यक्रम**

रामायण ६७.८०%
चुनौती ४७.३२%
बुनियाद ३३.१७%
१०० २४.०७%
बंदिनी १४.४७%
स्वामी १३.३३%
तमस १३.३३%
जिंदगी ११.०६%
मनोरंजन १०.२४%

**आवडलेले कलाकार**

मोहन भंडारी २४ ५५%
दिपीका २७.८०%
अरुण गोवील २२ ७६%
सुप्रिया पाठक १५ ९३%
मजहर खान १५ १२%
अनिता कन्वर ११.८७%
आलोकनाथ १४ ४७%
स्मिता तळवलकर १०.५७%
अरविंद त्रिवेदी ११ ३८%
अर्चना जोगळेकर ९.२७%

अ) टीव्ही जाहिराती बघणे. होय ८३.०९%, नाही १६.९१%
ब) आवडतात का? होय ५४.३१%, नाही १७ २४%, मत नाही २२.७६%
क) जाहिराती बघून वस्तु विकत घेता का? - नेहमीच ५ ३७%
- कधी - कधी ६०.६५%,
कधीच नाही २७ ९७%
- मत नाही ६.०२%

ड) कोठल्या तऱ्हेच्या वस्तु घेता?
दररोजच्या वापरातल्या: ६२ ४४%, महागड्या व टिकाऊ: १७ ४०% ग्राहक सेवा: ७.८०%, मत नाही: ३०.५७%

### टीव्ही एक माध्यम

अ) टीव्ही हे एक माध्यम म्हणून तुमचे काय मत आहे?

| | | | |
|---|---|---|---|
| शिक्षणासाठी | ५६.७५% | करमणूकीसाठी | ९२.८५% |
| जाहिरातीसाठी | ४७.९७% | सामाजिक जाणिवेसाठी | ३६.९१% |

ब) टीव्हीचे नियंत्रण कोणाकडे हवे?
सरकारी नियंत्रणाखाली २८.२९%
स्वतंत्र विभाग म्हणून २८.२९%
खाजगी क्षेत्राकडे २५.०४%

**टीव्ही वरील सर्वात आवडलेल्या जाहिराती**

निरमा डिटर्जंट : २१.९५%
विमल टेक्सटाईल्स : १८.५४%
रसना : ११.५४%
ओनीडा टीव्ही : ९.९२
गार्डन वरेली : ९ २७%
थम्स अप · ८.२९%
जीवनधारा विमा पॉलिसी : ६ ८३%
बॉंबे डाईंग : ५.८५%

**न आवडलेल्या जाहिराती**

सर्फ डिटर्जंट १९.०२%
ओनिडा टीव्ही १२.५२%
ओ के साबण ९ ११%
निरमा ४.८८%
सुपर रीन ३.५८%
व्हील डिटर्जंट ३.०९%

वरील टीव्ही दर्शक चाचणी 'माणूस' साठी खास करण्यात आली. सरवटे अँड असोसिएटस्, व्यवस्थापन सल्लागार सस्था पुणे ४ यानी हा अभ्यास केला व सगणकावर त्याचे पृथ:करण केले


Vishal ENTERPRISES
Sales & Services

DEALERS IN:
ALL TYPES OF FANS
ORIENT, CROMPTON, INNOVA,
MIXERS: MAHARAJA, SUMEET, TAPERECORDERS,
ARK, NIKITASHA, CHOICE, COLORMAN.

562 SADASHIV PETH
CHITRSHALA BHAVAN
PUNE 411030.

# मंडी हाऊस

**दूरदर्शन व त्याच्या सीरियल्स आज थेट कलाक्षेत्रात ठाण मांडून आहेत. मंडी हाऊस परिसरातील नाट्य - साहित्य चळवळी व या सीरियल्स यांच्यातल्या रागा - लोभाच्या संबंधांची एक झलक.**

**अभिराम भडकमकर**

- दिल्लीचं मेघदूत ओपन एअर थिएटर.

- स्टेजवर एका कोपऱ्यात कलाकार आणि वाद्यवृंद.

रंगला : ऐ. तुममेंसे दो लडकियाँ उठो और बनियेकी लुगाइयाँ बनो।

मुली : नहीं।

रंगला : अबे चलो

मुली : (पुन्हा नाक मुरडून) नहींऽऽ!

रंगला : (खाजगी स्वरात) कुछ दिन बाद इस नाटकपर एक सिरियल बननेवाला है।

आणि या वाक्यासरशी मुली धावतच स्टेजवर!

'भवाई'तील 'पाँच चोरोंका वेश' या नाटकातला हा सीन म्हणजे हमखास टाळ्या आणि हंशा! कारण प्रेक्षकवर्गातले नाट्यरसिक आणि नाट्यकलाकार यांना या मागची खरी गंमत परिचयाचीच आहे. कारण हे मेघदूत थिएटर आणि त्याचा मुख्य प्रेक्षकवर्ग आहे दिल्लीच्या 'मंडी हाऊस' मधला! मंडी हाऊस म्हणजे आपला दूरदर्शनचा संसार. हेडक्वार्टर या तीर्थक्षेत्राचं स्थानमहात्म्य वेगळं सांगायला नकोच.

मागल्यावर्षी माझी नॅशनल स्कूल ऑफ ड्रामाला निवड झाली. तेव्हा माझी नाटकं (माझं नाटक) आवर्जून पहाणाऱ्या मित्रांपासून ते मी नाटकात काहीतरी करत असतो एवढच ठाऊक असणाऱ्या ओळखीच्या लोकांपर्यंत सर्वांनीच म्हटलं, 'व्वा! आता काय लवकरच तुम्ही टीव्हीवर दिसणार बुवा!' आणि सुट्टीसाठी आलो की हमखास विचारलं गेलं, 'तुम्हाला तिथे कॅमेरा फेस करायला शिकवत असतीलच नं?'

नाटक बाहेरुन बघणाऱ्या प्रेक्षकांची ही रोखठोक भूमिका. पण प्रत्यक्ष नाट्यचळवळीतल्या कलाकारांवर दूरदर्शन मालिकांचा प्रभाव मोठ्या प्रमाणावर आहे. दिल्लीच्या मंडी हाऊस मध्ये तीन नाट्यगृहं आहेत. सगळे रंगकर्मी इथेच भेटतात. इथल्या गप्पा ऐकल्या तर मालिकांचा प्रभाव कळून येईल. सध्या कोण कुठली सिरीयल करतंय, कुणी काय साईन केलं, नवीन काय सुरु होणारेय इत्यादी. इत्यादी.

आज नाटक हा दूरदर्शन मालिकांसाठी स्टेपिंग स्टोन होतो आहे. चित्रपट आले आणि नाटकावर आघात झाला. पण तरीही नाटक या माध्यमाचं महत्वं कमी होऊ शकलं नाही. या मालिका तेही करुन दाखवणार की काय?

ज्याप्रमाणे चित्रपट हे स्वतंत्र माध्यम आहे. त्याचप्रमाणे नाटक आणि टीव्ही ही दोन स्वतंत्र माध्यमं आहेत. त्यांच्या गरजा आणि परिणाम हेही भिन्न आहेत. परंतु खरी गोची इथेच आहे. ही तीन स्वतंत्र माध्यमं आहेत हे आपण लक्षात घेत नाही. आपण त्यांचे क्रम लावून टाकतो. त्यावरच यश अपयशाच्याही संकल्पना निश्चित करतो.

कालपरवापर्यंत 'मंडी हाऊस' आवारात नाटक करणारा कलाकार, याला जर सिनेमा मिळाला तर उत्तमच. मग रोल काही का असेना. मग त्याच्याकडे आदरपूर्वक कटाक्ष. त्यानंतर जर सिनेमा नाही पण सिरियल मिळाली तर एक पायरी जरा खाली. पण नजरेत मात्र आदरच. आणि याच कलाकाराचं एखादं नाटक चांगलं नाटक असेल तर कौतुक होईल आणि अंदाज व्यक्त होतील की आता कुणीतरी याला लिफ्ट देणार. नाटक हे स्वतंत्र माध्यम आहे की 'स्ट्रगल पिरीएड' मध्ये एक आधार?

मंडी हाऊस मध्ये वेगवेगळ्या नाट्यसंस्थांची नाटकं बघायला मिळतात. त्या निमित्तानं खूप ओळखी आणि मित्रमैत्रिणी मिळतात. या सगळ्यांनी अनेकदा 'एकदा तुमच्या पुण्याला यायचं आहे' असं बोलून दाखवलं. (मी सुद्धा त्यांना पुणेरी निमंत्रण देतो.) वाटायचं की पुणं, विद्येचं माहेर घर, महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी वगैरे वगैरे म्हणून यांना पुण्याला यायचं आहे. पण आता लक्षात आलंय की पुणे आणि फिल्म इन्स्टिट्यूट असं पक्कं समीकरण झालंय आणि त्यामुळे तिथल्या विद्यार्थ्यांच्या डिप्लोमा फिल्म्स

करण्याच्या प्रबल इच्छेतूनच पुण्याची ओढ निर्माण झाली आहे.

काहींना तर पुणे मुंबई चार तासाचा प्रवास हे ऐकून माझ्या भाग्याचा हेवा वाटतो. म्हणजे रोज जाणं येणं करता येईल !

टीव्ही हे माध्यम आता सर्वत्र पसरत चाललंय. या माध्यमाकडे वळणाऱ्यांची संख्याही वाढत चालली आहे. या सर्वाबद्दल दोन विचार प्रवाह सरळ सरळ आढळतात. एक म्हणजे या माध्यमाकडे नाटकवाल्यांनी जाऊ नये. केवळ नाटकावर लक्ष केंद्रित करावं असं म्हणणारे लोक आणि दुसरा प्रवाह जो या माध्यमाची शक्ती ओळखून त्याचा योग्य वापर करुयात असं म्हणतो. हा दुसरा प्रवाह या माध्यमाशी फटकून राहू इच्छित नाही. मात्र गुणवत्तेशी कोणतीही तडजोड न करता या माध्मयाला जवळ करण्याचा विचार ते मांडतात आणि दर्जा पूर्णत्वानं टिकवून हे होऊ शकतं यावर त्यांचा विश्वास आहे. विजया मेहतांच्या 'स्मृतीचित्रे'ची इथे आठवण होते. आजही हे दोन्ही प्रवाह आज मंडी हाऊसमधे आढळतात. पहिल्या प्रवाहात 'संभव', 'चिंगारी' या सारख्या संस्था जोमानं नाट्यकृती सादर करतात. 'संभव'च्या देवेंद्रराज अंकुर यांनी नुकतेच कथा आणि नाटक या दोन साहित्य माध्यमांना एकत्र आणून त्याचे प्रयोग सादर केले. निर्मला वर्मांच्या कथा या प्रयोगात सादर केल्या जातात. 'चिंगार'नंही इडिपस, हयवदन सादर केले.

'तमस' ही नुकतीच प्रचंड वादग्रस्त ठरलेली मालिका. त्या वादात मी पडत नाही पण तमसची




गुणवत्ता वादातीत आहे आणि यात दिल्लीच्या रंगभूमीवरचे अनेक चेहरे दिसले. त्यांना संधी मिळाली. त्यांच्याशी त्यावेळी नेहमी चर्चा व्हायची आणि ठळकपणे जाणवायचं की हे दुसऱ्या प्रवाहातील रंगकर्मी या माध्यमाशी फटकून राहण्यापेक्षा त्याचा उपयोग करुन घेऊन अधिक लोकांपर्यंत पोहोचू इच्छितात.

रघुवीर यादव, बॅरी जोन, एस. एम. जहीर, विरेंद्र सक्सेना हेही याप्रमाणेच या माध्यमाकडे वळताना दिसतात. आणि या बरोबरच रंगभूमीवरही नवे प्रयोग करताना दिसतात. बॅरी जोन चा टॅग (TAG), प्रसन्नाची नवी टीम यांचाही यात समावेश होतो.

दूरदर्शनवर आर्थिक लाभ अधिक आहे. प्रसिद्धी मोठ्या प्रमाणावर मिळते, भारतभर मिळते. एकंदरीतच कॅमेरा या प्रकारचे सर्व फायदे मिळतात. पण रंगभूमीसारखी प्रायोगिकता नसल्याने, एकंदरीतच सुमार दर्जाचे कार्यक्रम निवडले जात असल्याने, विषयांवरही मर्यादा पडत असल्याने रंगभूमीवरचा जिवंतपणा अनुभवणारा कलाकार तिथे मनापासून रमत नसावा असं वाटतं. म्हणून यशापयशाचा दर्जा ठरवण्याऱ्या दूरदर्शनकडे बटबटीत माध्यम म्हणूनच बघितलं जातं. आणि रंगभूमीवरच्या आदरणीय व्यक्तींचं स्थान मोठंच मानलं जातं. आज ही अल्काझींचा उल्लेख अल्काझीसाब असा होतो. विजयाबाईंच्या भाषणांना गर्दी उसळते आणि शंभू मित्रांना 'फादर पर्सनॅलिटी' मानलं जातं.

पण तरीही दूरदर्शन मालिकांचा प्रभावही वाढतो आहे. तो रंगभूमीला गिळून टाकणार की काय असा प्रश्न विचारला जातो आहे.

रंगभूमी हे जिवंत माध्यम आहे. तोच प्रयोग रोज नवा होऊन येतो आणि हे वैशिष्ट्य किंवा वरदान म्हणूयात फक्त रंगभूमीकडेच आहे. म्हणूनच नसिरुद्दीन शहा, अमरीश पुरी सारखे कलावंत अजून ही या माध्यमातून काम करत आहेतच. यातच या प्रश्नाचं उत्तर नाही का ?

● ● ●

## श्री शारदा सहकारी बँक लि.

मुख्य कार्यालय : ४७/१ तावरे कॉलनी
अजय अपार्टमेंट पुणे ४११ ००९.
सुरक्षित जमा कक्षासहित

-: शाखा :-

(१) पुणे.सातारा रोड (मुख्य शाखा)
६९२ / अ / २ अ सलुजा चेंबर्स
पुणे - ४११ ००९
फोन - ४२१९४७

(२) पाषाण शाखा
'गंगौध'
१७८ पाषाण पुणे.
फोन - ५५९६३

(३) सदाशिव पेठ शाखा व योजना कार्यालय
१२०९ सदाशिव पेठ
पुणे. ३०
फोन : ४३५६८५

(४) शनिवार पेठ शाखा
२६९ / २७० शनिवार पेठ
देवी हाऊटस्
पुणे - ४११ ०३०
फोन : ४३७३६६.

(५) बिबवेवाडी शाखा
सं.नं. ५७३ प्लॉट नं. ९
संध्यादीप सोसायटी
पुणे - ४११ ०३७
फोन. ४२१ ०३७

# 'पैलतीरी' मी

**'पैलतीर' या मालिकेने दूरदर्शनच्या सामर्थ्याचा प्रत्यय आणूनं दिला. नाट्याकडून टीव्हीकडे आलेल्या ज्येष्ठ कलावंताचे मनोगत**

## माधव वाटवे

'पैलतीरी' पोचून बराच काळ लोटला. अजूनही बाहेर पडलो की रस्त्यात, बसमध्ये, प्रवासात, एसटीत, रेल्वेत, समोर येणाऱ्या बऱ्याच डोळ्यात दूरदर्शनवर दाखविलेल्या 'पैलतीर' या मालिकेची आठवण चमकताना मला दिसते. याला साक्षी सर्वात अधिक मीच आहे. मालिकेच्या तेराही भागात शीर्षक गीतापासून शेवटपर्यंत बहुतेक वेळा माझाच चेहरा असे. माझा एरवीचा चेहरा, पोषाखही नानासाहेब सरंजाम्यांसारखाच गळ्यात अडकविलेल्या पिशवीसकट. मालिका यशस्वी करणाऱ्या सर्वांचा प्रतिनिधी म्हणून मी, दिलेली दाद स्वीकारतो - संकोचाने - कारण खऱ्या अर्थाने यशाचे धनी नेहमीच पडद्याआड राहतात.

दूरदर्शनचं जाळं महाराष्ट्रातील बऱ्याच प्रमुख शहरात पोहोचलेलं असल्याने या माध्यमाचा घरोघरी पोहोचणारा हा आवाका पाहून मीही आवाक होत होतो. कामानिमित्त मुंबईबाहेर गेलो की प्रचिती यायची,

'वो देख पैलतीरका बूढा,'

'तरी मी त्यांना म्हटलं की तेच आहेत म्हणून,'

'आवडली सिरीयल',

'आमचे वडील अगदी असेच होते - हट्टी; आपलं सोडायचे नाहीत,''

'काय संपादकसाहेब 'प्रहार'च्या कचेरीत का?'

'अहो, टीव्हीमध्ये दाखवून काय उपयोग? प्रत्यक्ष लढ्यात उतरलं पाहिजे,'

''अहो तुमचे साहेबराव दुमणे म्हणजे इथलेच शुगरकिंग'',

''या बित्तंबातम्या तुम्ही कशा मिळविल्यात हो,'' ''दोन मिनिटं आमच्या घरी चहा तरी घेऊन जा ना,'' ''तुम्ही 'हे' घेता असं वाटलं नाही,'' ''झ्याक झाली सिरीयल. अहो तेच चाललंय नव्हं का सगळीकडं. पण म्हातारा लईच कडक दाखविलात तुम्ही! मी भविष्य केलंच व्हतं की हा मोडणार.''


नाना थरातले, व्यवसायातले बायका, मुले, मराठी, अमराठी, थक्क झालो. तसा व्यावसायिक रंगभूमीवर आणि दूरदर्शनवरील काही कार्यक्रमात मी लोकांसमोर येत होतो. पण हे काही विलक्षणच होत. माझ्या अहंकाराला थोडसं खतपाणी मिळत असलं तरी संकोचाचंच प्रमाण जास्त होतं. स्वातंत्र्याला बाधा येत होती. ते काही असलं तरी माझ्या आयुष्यात काही महत्त्वाचं घडलं होत, घडत होतं. मला अंतर्मुख करीत होतं. या मालिकेची संहिता प्रथित यश लेखक डॉ. सुभाष भेण्डे यांनी त्यांच्याच 'पैलतीर' या कादंबरीच्या आधाराने तयार केली होती. त्यांचा चित्रमालिकेचा हा पहिलाच अनुभव. दिग्दर्शक होते डॉ. अनिल बांदिवडेकर. नव्या दमाच्या तरुणांना बरोबर घेऊन त्यांच्या 'माध्यम' या संस्थेतर्फे काही नवीन घडवून नाव कमावलेलं! पण त्यांचाही या माध्यमातला अनुभव पहीलाच. भेण्डे आणि बांदिवडेकर मला म्हणाले, ''प्रमुख भूमिकेसाठी आमच्या दोघांच्याही मनांत एकाचं वेळी तुमचं नाव आलं आहे तेव्हा तुम्ही हे स्वीकारा'' मी म्हटलं, ''हे सगळं ठीक आहे, पण आपण सगळेच या माध्यमातले नवशिके, पैलतीर गाठणं जमणार का? तुमचा विषय गंभीर, म्हातारा हिरो; अहो, हल्ली दूरदर्शनच्या प्रेक्षकांना हलकं फुलकं लागतं. आयुष्यातल्या कटकटीतून दोन घटका करमणूक!'' ते म्हणाले, ''तुम्ही हो म्हणा, बाकीचं आम्ही बघतो.''

नाही म्हणायला 'संध्याछाया' चा माझा अनुभव थोडा दिलासा देणारा होता. आम्ही दोन म्हाताऱ्यांनी गंभीर विषय उलगडत प्रेक्षकांना खिळविले होते. पण ते नाटक होतं. नट म्हणून स्वातंत्र्य होतं. नाटकाच्या नाड्या हातात होत्या. इथं नटाच्या शेंड्या दिग्दर्शक आणि कॅमेरामन ह्यांच्या ताब्यात. सुदैवाने एक कुशल कॅमेरामन अनिल साळवी ती बाजू संभाळणार होते. शूटिंग

सुरु होण्यापूर्वी मी त्यांनाच पहिला नमस्कार ठोकला. म्हटलं 'संभाळून घ्या.'

दूरदर्शनच्या अधिकाऱ्यांकडून प्रथम एक पायलट एपिसोडला मान्यता मिळायला लागते. कारखान्यांच्या पाण्यामुळे ढालगावात होणाऱ्या प्रदूषणाचा भाग करायचा ठरला. पनवेल पेण रस्त्यावरील 'तारा' ह्या गावातील नदीत आम्ही पैलतीर गाठण्यासाठी उड्या मारल्या. प्रत्येक जण आपलं काम चोख बजावत होता. बांदिवडेकरांच्या 'माध्यम' ची उत्साही मुलंमुली छोट्या छोट्या भूमिका तर करत होतीच शिवाय पडेल ते कुठलही काम. पण खेळीमेळीचं वातावरण होतं. समस्या निर्माण झाली की आम्ही आमची डोकी एकत्र घालून मार्ग काढीत होतो. खऱ्या अर्थानं समूहकला होती ती. दूरदर्शनची मान्यता मिळाली. आमची पाणी कापायला सुरुवात झाली.

मालिकेचे एकंदर तेरा एपिसोड होते आम्ही हप्त्याहप्त्याने चित्रीकरण करत चाललो होतो. दूरदर्शनवर मालिका जाहीर झाली. बोलबाला बराच झाला होता. 'सोमवार' हा मालिकेचा दिवस ठरला. माझा आवडता वार. पहिला सोमवार उजाडला. 'पैलतीर'चं भविष्य ठरणार होत. आम्ही सगळे डॉ. भेण्ड्यांकडे एकमेकांना आधार देण्यासाठी जमलो. एपिसोड संपला. मी प्रथमच सलगपणे पाहिला. दोघा 'अनिलांची' कामगिरी प्रथम लक्षात आली. त्यांचं अभिनंदन केलं. भेंड्यांचा टेलिफोन मग अर्धा तास वाजतच होता. सगळीकडून अभिनंदनाचा वर्षाव होतो असं भेण्डे म्हणाले. मी म्हटलं, ते सगळे मित्रांचे असणार, अंदाज लागणं कठिण. ते म्हणाले मित्रांचे होते आणि काही खडूस प्रेक्षकांचेही होते. तेही 'बरं' म्हणताहेत. दुसऱ्या दिवशी मी बाहेर पडलो. 'बरी सुरवात केलीत, आता पुढं बघू'. अभिनंदन वजा दमदाटी! पुढे एकदोन भाग झाल्यावर ''आरंभशूर दिसताय'' तोच माणूस. एका विलक्षण पत्रकाराचं आयुष्य रंगविताना त्याच्या व्यक्तिमत्त्वाचे सर्व बाजूने दर्शन व्हायला लागतं. त्याचं घर, संसार, त्याचा पिंड बनविणाऱ्या आयुष्यातील महत्त्वाच्या घटना. ते उभं करताना कथा थोडी रेंगाळली. नाट्यात्मकता कमी झाली. पण चवथ्या पाचव्या एपिसोडपासून पुन्हा पकड घेतली. बेस्टचे कंडक्टरस्, ''या संपादकसाहेब'' म्हणून स्वागत करु लागले. रिक्षावाले ''कुठं जायचं साहेब, सोडतो'' म्हणायला लागले. बँकेतील काम लवकर होऊ लागली. लोक ''पैलतीर'' ची वाट पाहू लागले.



आम्ही पुढच्या एपिसोडचे चित्रण करीत होतो आणि मागचे एक एक करुन दाखवले जात होते. पूर्वीचे एपिसोड सलगपणे बघायला मिळत गेल्या कारणानं काही चुका सुधारत होतो. नानासाहेब सरंजाम्यांचं ऑफिस आणि घराचे सेट राजकमल स्टुडिओत मांडले होते. एकदा शूटिंगच्यामधे दमून बाजूला बसलो होतो. तिथेच काम करणारा एक वयस्कर जुना जाणता कामगार माझ्यापाशी आला. मी तंबाखूवाला होतो आणि त्याची तंबाखू संपली होती. तंबाखूला चुना चोळीत म्हणाला, ''ही तुमची सिरीयल टॉप होनार.'' बस् आणखी काय पाहिजे होतं! मोठा आशीर्वाद मिळाला.

मालिका मध्यापर्यंत आली. लोक काही काम न ठेवता सोमवारी उत्सकुतेने टीव्ही लावायचे. माणसं भेटतच होती. 'तुम्ही एरवी असेच कडक आणि जिद्दी आहात का हो?'' "By the way are you in journalism?", ''तुम्ही हे पत्रकार जवळून पाहिलेत का हो?'' मी हसून म्हणायचो, ''मी एक नट आहे - एवढंच, कमी नाही जास्त नाही'' खरं तर असे पत्रकार मी जवळून पाहिले नाहीत. माझ्या वडिलांचे एक स्नेही दा. न. शिखरे हे गांधीवादी पत्रकार होते. त्यांच्या काही आठवणी होत्या. पण खरं तर नानासाहेब सरंजाम्यांच्या वृत्तीचे सच्चे लोक अनेक व्यवसायात मी पाहिलेले आहेत. खरी साधुसंत मंडळी प्रकाशात कधीच येत नाहीत. सामान्यत्व खुशीनं पत्करुन जनसामान्यात वावरत असतात. दुर्दैवाने त्यांची जमात कमी कमी होत चालली आहे. माझे वडील असेच स्पष्टवक्ते आणि सरळमार्गी होते. अर्थात् त्यांच्यात पत्रकाराची आक्रमक वृत्ती नव्हती. म्हणूनच मला वाटतं मालिका चालू असताना मला भेटून किंवा पत्राद्वारे अनेक स्त्री - पुरुषांनी, आम्हाला अमूक अमूक माणसाची आठवण झाली, असं कळवलं 'नानासाहेब' रंगविताना मी योग्य दिशेने चाललो होतो येवढाच अंदाज मी बांधला.

एक वृद्ध गृहस्थ तीन मजले चढून माझ्याकडे आले. माझ्या पाठीवर हात ठेवला. म्हणाले, ''अभिनंदन. अहो, आता ही टिळक, आगरकरांचा वारसा सांगणारी माणसं भेटणं मुष्कील. पुन्हा एकदा अभिनंदन चहा नको. फक्त एवढ्याचसाठी आलो होतो''.

एक पोलीस ऑफिसर भेटले होते. म्हणाले, ''छान तोंड फोडलंत करप्शन प्रॉब्लेमला. अहो, या राजकारणामुळे ह्या बड्या धेंडांपर्यन्त आम्हाला पोचता येत नाही हो. पण साहेब आमच्या डिपार्टमेंटवर नाही ना घसरत आहात?''

एकदा एका बिअरबारमध्ये बसलो असता एक अमराठी गृहस्थ एकदम माझ्यासमोर उभा राहून म्हणाला, "Now I am going to report you" थोडा नशेतच होता. मोठ्यांदा मग हसला. ''अहो, मला तुमची सगळी सिरीयल बघायला मिळत नाही. पण आमची मुलं एंजॉय करतात. Today I will tell them, I met you. They will be happy."

एकदा कामानिमित्त पार्ल्याहून परळबाजूला बसनं निघालो होतो. अर्थातच बस बदलायला लागायची. एक इसम पार्ल्यापासून होता. उतरताना मला म्हणाला, ''बघा किती त्रास होतो. खरं तर डायरेक्ट बस पाहिजे.'' मी म्हटलं, ''प्रभूकृपेने दोन लिमिटेड झालीय ना'' म्हणाला, ''या बाजूने कुठे येते? तुम्ही जरा खरमरीतपणे लिहा तुमच्या पेपरात. उपयोग होईल.'' जाताना मिश्कील हसला.

हळूहळू मालिका शेवटची चढण चढत होती. मंडळी शेवट काय होणार याची चर्चा करत होती. मला विचारलं तर मी म्हणायचो ''पडद्यावर बघा'' बस, रेल्वे मध्ये माझ्या भोवती लोक ओळखून जमायचे . सगळ्या थरातले. प्रश्न विचारायचे. आपापसात चर्चा करायचे. भ्रष्टाचाराला, अन्यायाला जबाबदार कोण? वादविवाद व्हायचे. एकानं मला सांगितलं, ''तुम्ही आमच्या ऑफिसचे इनचार्ज म्हणून या हो.

असली वशिलेबाजी चाललीय. काम करायला नको. नुसते साहेबाला मस्के लावतात. तुम्ही साफ करुन टाका सगळं.'' नगरच्या एस्.टीत एक मारवाडी मुलगा भेटला. म्हणाला, ''अरे, आमच्या बाबांना तुमची सिरीयल एकदम आवडते. तुमच्या सारखेच कडक आहेत. सिरीयलच्या दिवशी त्यांची ताकीद असते एक आवाज नाही पाहिजे.''

शेवटचे एकदोन एपिसोड राहिले होते. एकजण मला म्हणाला, ''नाही, शेवट नका सांगू. पण तुमच्या जिवाला काही धोका नाही ना ? आमची मिसेस् म्हणते ती चांडाळ चौकडी नानासाहेबांचं बरंताईट करणार.'' माझ्या मनांत आलं, कलाकृतीतला आभास रोजच्या जीवनापेक्षाही किती खरा खरा होतो ?

शेवटच्या एपिसोडचा दिवस उगवला. लोकांची उत्कंठा शिगेला पोचली होती. आम्ही मंडळीही थोडे टेन्शनमध्येच होतो. मालिकेच्या शेवटावर तिची यशस्वीता बरीच अवलंबून असते. मी घरीच कुटुंबियात बसून शेवट पाहिला. मला परिणामकारक वाटला. डोळे थोडे पाणावले. नानासाहेब सरंजामे आणि माधव वाटवे ह्यांना जोडणाऱ्या अदृश्य रेषेचा परिणाम असावा. दुसरे दिवशी पुन्हा आमचे वृद्ध गृहस्थ तीन जिने चढून वर आले. मी उत्सुकतेनें स्वागत केलं. म्हणाले, ''शी ! एकदम वाईट शेवट. नानासाहेबांसारखा मनुष्य माघार घेईल ? नाही ! पटत नाही. साफ चूक. जातो.'' पुन्हा एकदा चहा न घेता निघून गेले.

दुसऱ्या दिवशी अर्थातच लोकमत सर्वबाजूंनी येत राहिली. ''शेवट उत्तम केलात. अभिनंदन.'' ''शेवटच्या एपीसोडला डोळ्यात पाणी आलं हो. पण अब्रप्टली संपल्यासारखं वाटलं.'' पेपरमधेही चर्चा झाली शेवटाबद्दल. पण सर्वसामान्यपणे शेवट आवडला.

''संपली का हो सिरीयल ? लवकर संपली. दुसरा भाग आहे का हो ?''

बसमधून उतरता उतरता एक बाई म्हणाल्या, ''असंच काहीतरी चांगलं करत जा हो.''

''आता म्हणजे पुढच्या सोमवारी पैलतीर नाही. चुटपुट लागेल आता.''

मालिका संपली. वर्तमानपत्रात लेख आले. एक संस्मरणीय मालिका दूरदर्शनवर केल्याचं श्रेय मिळालं. कला आणि हेतूच्या एका सुरेख मिश्रणाचे पडसाद प्रेक्षकांवर अजून रेंगाळत आहेत.

मालिका सर्व थरांवर परिणाम करणारी होण्याचं कारण काय ? जनसामान्यांच्या कुठल्या जिव्हाळ्याच्या कोपऱ्याला समाधान मिळाले ? मला उत्तर सापडले. पैलतीर या मालिकेने काळाचे स्पंदन बरोबर पकडलं. सध्या जनमानसात असंतोष, असमाधानानी भरलेल्या अस्थिरतेला मालिकेने अचूक पकडलं. चोहोबाजूंनी घेरुन टाकणाऱ्या अन्याय, भ्रष्टाचाराने जनता वैतागली होती. शिक्षण क्षेत्रासारखं पवित्र जगही ह्यातून सुटलेलं नव्हतं. समाजाची तुंबलेली गटारं साफ करायला निघालेला एक झुंजार पत्रकार यांच्यावतीनं उभा राहिला होता. आपल्याला जमत नाही तर आपली लढाई हा लढतोय म्हटल्यावर त्यांना दिलासा आला. त्यांच्या असंतोषाला वाचा फुटली. नानासाहेब सरंजामे त्यांना आपला वाटला.

शेवटच्या भागात हे शिवधनुष्य आता मला एकट्याला पेलत नाही म्हणून नानासाहेब शेवटचा एक प्रहार करणाऱ्या खास अंकाची घोषणा करतात. तो निघायच्या आत छापखान्याला आग लागते. नानासाहेब म्हणतात, प्रहारला हौतात्म्य


हार्दिक शुभचिंतन !

'समृद्धीसाठी सहकार'

# श्री सुवर्ण सहकारी बँक लिमिटेड

७५९ / ५१, डेक्कन जिमखाना, फर्ग्युसन कॉलेज रोड, पुणे
४११ ००४
फोन : ५४५२९, ५८१५४, ५३९२५

अन्य शाखा :
- जोगेश्वरी : फोन : ४४६५१९
- टिळक रोड : फोन : ४४२६४८
- शनिवार पेठ : फोन : ३६५८०
- कर्वे रोड : फोन : ३३९६९
- श्रीपूर : फोन : ५७

कामाच्या वेळा :
मुख्य कचेरी : सकाळी ९ ते ११ संध्याकाळी ५-३० ते ७-३०
अन्य शाखा : सकाळी ९ ते ११ संध्याकाळी ५ ते ७
बुधवार साप्ताहिक सुट्टी.
रविवार : सकाळी ९ ते ११

सौजन्यशील सेवा म्हणजेच सुवर्णसेवा

लाभलं. प्रेक्षकांच्या डोळ्यात पाणी येतं. पण त्यांना नानासाहेबांनी लढ्यातून माघार घेतली हे पसंत पडलं नाही. शेवट अचानक लुटल्यासारखा वाटला. नानासाहेबांवर Poetic justice झाला नाही असं वाटलं. त्यांना नानासाहेबांनी प्रतिपक्षाला नामोहरम करताना पहायचं होतं. नानासाहेबांच्या शोकात्मिकेने ते बधीर झाले. त्यांचा आदर्श डगमगला.

''ही शोकान्तिका माझी नाही. लोकहो ही तुमची, जनतेची शोकान्तिका आहे.'' माझ्या कानात नानासाहेबांचा खणखणीत आवाज आला. जणू ते प्रहारच्या वाचकांशी आणि दूरदर्शनच्या प्रेक्षकांशी बोलत होते.

''आयुष्याच्या उत्तरायणातसुद्धा मी माझं पत्रकारितेचं कर्तव्य करीत झुंजत होतो. मी एकटा पडलो तरी दोन होत करत होतो. तुम्ही मला एकटा ठेवलंत... आम्ही अन्यायाला वाचा फोडली. भ्रष्टाचाऱ्यांची पितळ उघडी केली. कशासाठी? तुम्हाला सकाळी चहा पिता पिता मिटक्या मारीत पेपर वाचण्यासाठी? कुणी उभा राहिलाच तर त्याच्या खांद्याला खांदा भिडवलात? तुमच्यापैकी काही तर इलाज नाही म्हणून भ्रष्टाचारात सामील झाले आणि वर सांगत की आजकाल याशिवाय चालत नाही! भ्रष्टाचारी शेवटी तुमच्या आमच्यातलेच नं! शेण खाल्लं तर किती खाल्लं हा हिशेब नसतो. भ्रष्टाचार छोट्या प्रमाणात घरात सुरु होतो आणि पर्यायाने समाजात पोहोचतो.'

'बेचाळीसच्या लढ्यातले माझे सोबती स्वातंत्र्य मिळाल्यावर एक एक गळत गेले. त्यांना माहीत नव्हतं मिळवलेलं स्वातंत्र्य टिकविण्यासाठीच जास्त जागरुक व्हायचं असतं. आमच्यापैकी काही तर तडजोडी स्वीकारुन आता मोठ्या जागा भूषविताहेत. मोटारीतून हिंडताहेत. मला म्हणताहेत, ''तू जरा शहाणपण शिक आणि आमच्यात ये.'' कुंपणच शेत खाऊ लागल्यावर आम्ही शेताच्या वतीनं दाद मागितली. कोळशाच्या खाणीत साळुंकी जशी पंखाची फडफड करुन कामगारांना धोक्याचा इशारा देते, तसे आम्ही आमचे चिमुकले पंख फडफडवीत तुम्हाला धोक्याचा इशारा देत राहिलो. सद्सद्विवेक बुद्धी गहाण ठेवली नाही, कणा ताठ ठेवला. आता सुद्धा तो वाकला नाही. अंकुश देशमुखसारख्या अन्यायाविरुद्ध पोडतिडकीने लढणाऱ्या तरूणाच्या खांद्याचा जरा आसरा घेतला. कारण आता ह्या तरूण मंडळींचाच मला भरोसा आहे; ही माझी शोकान्तिका नाही. असलीच तर तुमचीच आहे''!

खऱ्या अर्थाने चांगल्या कलाकृतीचा संदेश वाजत गाजत येत नाही. तो समोर ऐकू येणाऱ्या आणि दिसणाऱ्या गोष्टीत जसा लपत वाटचाल करीत असतो, तो भासत राहतो प्रेक्षकांच्या अंतर्मनात. काही प्रेक्षकांच्या हृदयात जरी अन्यायाविरुद्ध प्रतिकार करण्याची ज्योत पेटली तरच 'पैलतीर' यशस्वी झालं असं होईल.



पैलतीर नंतर मला अनेक तरुण आणि बाल भेटले. मी काही कोणी गाजलेल्या सिनेमातला तरुण नट-नटींसारखा नाही की माझी सही घेण्यासाठी तरूण आणि बाल माझ्याकडे आकृष्ट व्हावेत. मी तर होतो त्यांच्यासारखाच बस, रेल्वे, रस्त्यात भेटणारा. मला वाटतं त्यामुळेच ती माझ्याकडे जास्त आकृष्ट झाली. माझ्याशी मनमोकळेपणानं बोलू शकली. 'पैलतीर' ह्या मालिकेतून दिलेला हा संदेश त्यांच्यापर्यन्त पोचल्यासारखा वाटला. मला म्हणाली, ''टिळक, आगरकर, गांधी, सावरकर, विवेकानंद अशा माणसांना सर्वच आजचे पुढारी आदर्श मानायला सांगतात. स्वतः त्यांच्या जवळपासही नसतात. आमचा आयुष्यावरचा विश्वास उडण्याची वेळ आली आहे. 'पैलतीर' ने आमच्यापुढे एक या लोकांशी नातं सांगणारा आदर्श ठेवला.'' माझ्यातला नट आणि माणूस थोडा सुखावला. तरुण आणि बाल पुढचे आधारस्तंभ. आशेला थोडी जागा असल्यासारखं वाटलं!


मला अस्वस्थ करणारी एकच आठवण सांगून संपवतो.

मी नगरला भिंगार भागात माझ्या मुलीकडे गेलो होतो. रोज संध्याकाळी जवळच असलेल्या राधाकृष्ण मंदिरात माझ्या नातवाला घेऊन जात असे. मंदिर मोठं, मोकळं आणि स्वच्छ. लहान मुलांना बागडण्यासाठी सुरक्षित आणि सुबक परिसर. तिथे एके दिवशी मला एका बालगोपालांच्या घोळक्यांनी घेरलं. भिंगारमधे राहणाऱ्या आपल्या नातेवाईकांकडे पुणे, नाशिक येथून आलेली, ५ ते १२ या वयोगटांतील मुलमुली. मला संकोच होत होता. मी कुणीतरी देवमाणूस असल्यासारखे माझ्याकडे पहात होती. नातू बरोबर होता म्हणून त्या सगळ्यांनीच मला आजोबा केला. सही घेण्याचं साहित्य नसल्याने माझा पत्ता मुखोद्गत केला. म्हणाले, ''आजोबा, आम्ही तुम्हाला पत्र लिहू? उत्तर पाठवाल ना? तुमची स्वाक्षरी तर मिळेलच पण आम्हाला बरं वाटेल''. मी म्हटल, ''मला आलेल्या प्रत्येक पत्रांचं उत्तर मी पाठवितो? माझ्या वडिलांची शिकवण आहे.'' मुंबईला परत आल्यावर पत्रांची रांग लागली. मला मंदिरात भेटलेल्या मुलांची, त्यांच्या मित्रमैत्रिणींची आणि नातेवाईकांची. पैलतीर फार आवडल्याचं आणि त्यातील माझ्या भूमिकेचं त्यांनी कौतुक केलं होतं. मालिका संपल्याबद्दल वाईट वाटल्याचं त्यांनी नमूद केलं होतं. काही गोष्टींचं मार्गदर्शन विचारलं होत. एका हॉस्टेलमध्ये राहून शिकणाऱ्या मुलीनं लिहिलं होत, ''माझ्या मैत्रिणीकडून मिळालेल्या पत्त्यावर मी पत्र लिहित आहे. मला तुम्हाला आजोबा म्हणावसं वाटतं. म्हणू ना? अहो, माझे आजी आजोबा लहानपणीच वारले. 'पैलतीर' पाहिल्यापासून मला तुम्ही माझ्या आजोबांसारखे वाटायला लागलात. तुमचा फाटो मला पाठवाल का? माझ्या आयुष्यातील अडचणींना तोंड देताना मला धीर येईल.'' मी तिला पत्र लिहिलं, ''माझ्याकडे माझा फोटो नाही. मी इतक्या लांबून तुझा आजोबा होऊ शकत नाही. तुझ्या पत्राची उत्तर मात्र पाठवीन. जमल्यास आसपासच आजोबा–आजी शोध. त्यांच्यावर प्रेम कर आणि मग त्यांची नात हो''

मनात एक पाल चुकचुकली. अरे, आम्हाला आमच्या आजोबा–आजींच्या अजूनसुध्दा ह्या आठवणी येतात. मग हे बालगोपाल आज आपले आजोबा–आजी ही संस्था हरवून बसलेत का काय?

अजूनही माणसं भेटत राहतात. काही फक्त हातात हात घेऊन न बोलता जातात आणि काही जवळ बसवून life history सांगतात. दूरदर्शन माध्यमात माणसांची मन आकांक्षा चेतविण्याची प्रचंड ताकद आहे. आयुष्य जगण्यासाठी लागणारा दिलासा त्यातून मिळू शकतो. ह्या ताकदीचा आम्ही काय उपयोग करतो ह्यावर फार काही अवलंबून आहे.

० ० ०



'तमस'च्या समर्थनार्थ मुंबईमध्ये केलेल्या निर्दशनात दिग्दर्शक गोविंद निहलानी.

**'जातीय पक्षांना विरोध करण्यात आपला पक्ष पुढे होता असे आज नंबुद्रीपाद भासवीत आहेत. पण केरळमध्ये मुस्लिम बहुसंख्येचे वेगळे जिल्हे करणारे कम्युनिस्टच होते. फाळणीपूर्वी मुस्लीम लीगला पाठिंबा कम्युनिस्टांनी दिलेला होता.'**

'महाराष्ट्र टाअिम्स' ४ एप्रिल १९८८ अग्रलेखातून

तर असे हे भारतीय कम्युनिस्ट आता फाळणीचा इतिहास सांगायच्या उद्योगाला लागलेले आहेत. यासाठी त्यांना अत्यंत सोयीचे माध्यम 'दूरदर्शन' शिवाय अन्य कोठले असणार ? यासाठी उपलब्ध साहित्यसंस्कृतीची सोयीस्कर मोडतोड करणारे, अर्धवट बुध्दीचे कलाकारही लागतात. 'तमस' ही दूरदर्शनवर दाखवली गेलेली मालिका हा असाच अेक सहकारी उद्योग होता. आधी फाळणी काळावर फारसे ललित साहित्य उपलब्ध नाही. रामानंद सागरांची - 'और इन्सान मर गया' व भीष्म साहनींची 'तमस' या कादंबऱ्याच काय त्या पटकन आठवणाऱ्या. यापैकी 'तमस' या कादंबरीवर गोविंद निहलानी यांनी तयारी केलेली दूरदर्शनमाला, दूरदर्शनला दाखवण्यात आली व या मालिकेने सनसनाटी निर्माण करण्यात यश मिळवले.

## हे निहलानी कोण ?

हे गोविंद निहलानी तसे मराठी प्रेक्षकांना नवीन नाहीत. त्यांनी आपलीशी केलेली एक कथा डॉ. श्रीराम लागू यांना दिली. त्यावर डॉ. लागू यांनी तयार केलेला 'झाकोळ' हा चित्रपट सर्वांनी पाहिलेला असेल. म्हणजे जवळजवळ कोणीच पाहिलेला नसेल. ! हा चित्रपट एक आठवडाभरही तग धरू शकला नाही व तूर्त तो कायमचा डब्यात पडून आहे. मी तो पाहिला असल्याने निहलानी यांची ही चित्रपट कथा व व्हर्जेनिया वुल्फ यांची एक दीर्घकथा यांच्यातले विलक्षण साम्य लक्षात आले. परंतु इंग्रजी कथा हडपून कलात्मक चित्रपट निर्माण करण्याची आपल्याकडे परंपराच आहे. नचिकेत व जयू पटवर्धन यांनी तयार केलेला व खूप गाजावाजा करून दूरदर्शनवर दाखवलेला 'अनंतयात्रा' हा चित्रपटही अेका इंग्रजी कथेचा सहीसही भारतीय पेहेराव होता. 'बुक डायनेस' या अमेरिकन नियतकालिकात प्रसिद्ध झालेली ही कथा. आजही जिज्ञासूंना वाचून आंग्ल पुनः प्रत्ययांचा आनंद घेता येईल. हा चित्रपट हिंदीतील सर्वोत्कृष्ट चित्रपट ठरला. ताश्कंद महोत्सवात तो दाखवण्यात आला. विख्यात समीक्षक ज्ञानेश्वर नाडकर्णी यांनी १ जून ८६' च्या 'रविवार सकाळ' मध्ये या

# साहनींते निहलानी - एक बेईमानी

**ही मालिका वेगळी होती. प्रेक्षकांना आत्मसंतुष्टतेतून उचकटून काढून अस्वस्थ करण्याचे काम 'तमस' मालिकेने केले. भारतीय टीव्हीवर क्वचितच येणाऱ्या राजकीय सीरीयलची ही तेवढीच सणसणीत राजकीय प्रतिक्रिया !**

**रा. म. शास्त्री**

चित्रपटकथेची ती कशी आगळी वेगळी आहे म्हणून भलावण केली. पण ही चित्रपटकथाही जशीच्या तशी इंग्रजीवरुन घेतली आहे. मूळ कथेत 'टेस' या हार्डीच्या कादंबरीची नायिका अनंतराव जोशांना भेटते, या चित्रपटात शाकुंतलाचीच शकुंतला, असा किरकोळ फरक. समीक्षकाने ही कथा इंग्रजीवरुन घेतलेली आहे याचा उल्लेखदेखील केलेला नाही. तर असे हे आपले कलाकार. त्यांतलेच आपले हे गोविंद निहलानी ! त्यांनी 'तमस' वर दूरदर्शनाचित्रपट तयार करताना अप्रामाणिकपणा केला याबद्दल आश्चर्य वाटण्यांचे कारण मग राहात नाही. 'तमस' या कादंबरीची पटकथा करताना, त्यांनी म्हणे या कादंबरीत, भीष्म साहनींच्या इतर दोन कथाही मिसळल्या असे ते मालिकेच्या श्रेय नामावलीपटात ठळकपणे सांगतात. या दृष्टीने जगात श्रेष्ठ कादंबऱ्यांवर चित्रपट निघाले असले, तरी कादंबरीत दोन कथा मिसळून काढलेला, हा एकमेव महान प्रयत्न असावा !

श्री. निहलानी यांनी काय दाखवले आणि काही प्रसंग किती भिकार पद्धतीने दाखवले. [शीख स्त्रिया विहिरीत कुर्बानी करताना, त्या आत्मघात करत नसून 'स्विमिंग पुल' मध्ये उड्या मारतात असे वाटते की नाही ?] हे सर्व विसरुन, आपण जर भीष्म सहानींची 'तमस' ही कादंबरी वाचली, तर ही एक फार चांगली कादंबरी आहे हे लक्षात येते. १९७३ साली 'तमस' प्रथम प्रसिद्ध झाली व १९७५ साली तिला साहित्य अ‍ॅकॅडेमी पारितोषिक मिळाले. कादंबरीचा कालविस्तार बघितला, तर तो केवळ पाच दिवसांचा आहे. पण या पाच दिवसात लेखकाने जे नाट्य रंगवले आहे ते काहीजागी अतिशय थरारक आहे हे निर्विवाद.

### डुक्कर वध

कादंबरीतील पहिला प्रसंग अर्थात नत्थू खाटीक डुक्कर मारतो हा आहे. मूळ कादंबरीतुनच वाचू -

'हमारे सलोतरी साहिबा को अेक मरा हुआ सुवर चाहिये, डाक्तरी काम के लिये।' मुरादअलीने नत्थूसे कहा।

'सुवर ? क्या करना होगा मालिक ?' नत्थूने हैरान होकर पूछा।

नत्थूने आँख अुठाकर मुरादअलीके चेहेरेकी ओर देखा।

'हमने कभी सुवर मारा नहीं मालिक। मारनेका काम पिगरीवालेही करते हैं।'

'पिंगरीवालोंसे करवाना था तो तुमसे क्यों कहते ? यह काम तुम्हीं करोगे।'

और मुरादअलीने पाँच रुपये का चरमराता नोट जेबमेंसे निकालकर नत्थूके जोडे हाथोंके पीछे, उसकी जेबमें ठूँस दिया।

'इधर इलाका मुसलमानी हैं। किसी मुसलमानने देख लिया, तो वो लोग बिगडेंगे। तुम भी ध्यान रखना।' और मुरादअली चला गया। [पृ. १०]

जिथे नत्थू राहतो व मुरादअली राहतो तो सर्व भाग मुसलमानांची बहुसंख्या असलेला आहे. या इलाख्यातील अल्पसंख्य हिंदूंवर, अत्याचार सुरु करुन, त्यांना हुसकून लावण्यासाठी, मुरादअली हा मुसलमान गुंड, नत्थूकडून डुक्कर कापवून घेतो. ते मांस मशिदीपुढे टाकले जाते. निहलानीचे कलात्मक कर्तृत्व असे की त्यांनी भीष्म



**हिंदूंना कितीही बदनाम केले तरी ते सहन केले जाते असा अनुभव असल्याने निहलानी ही बेईमानी करु शकले.**

साहनींनी रंगवलेला मुरादअली - हिंदू करुन टाकला!

कोणत्या का जातीचा असेना, हा बाष्कळ प्रश्न इथे विचारता येण्यासारखा नाही! फाळणीपूर्व काळात उद्भवलेल्या हिंदू - मुसलमान यांच्यातील जातीय उद्रेकाची ही कथा असल्याने मुरादअलीची जात हा महत्त्वाचा तपशील होता. मुरादअली हा महंमदी पंथीयांच्या बहुसंख्या असलेल्या इलाख्यातील मुसलमान आहे. भीष्म साहनीनी रंगवलेला हा नीच माणूस मुसलमान दाखवण्यात काही इमानदारी होती. निहलानींनी ही कादंबरीशी बेइमानी का बरं केली असावी? उत्तर सोपे आहे. मुरादअली हा मुसलमान आहे व तो तसाच मी दाखवीन, अशी ठाम भूमिका घेण्याची हिंमत या डरपोक निहलानीत नाही, आणि तसा तो दाखवला तर अशी मालिका दूरदर्शनवर दाखविण्याची मुसलमान अनुनयात धन्यता मानणाऱ्या सरकारी यंत्रणेची प्राज्ञाही नाही. शिवाय हिंदूंना कितीही बदनाम केले तरी ते सहन केले जाते असा आजपर्यंतचा अनुभव गाठीला असल्यानेच निहलानी ही बेइमानी करु शकले.

आता त्यांनी पुढे आणखी काय केले ते पाहू.

नत्थू अेकटाच गांवातून फेरफटका मारत असताना त्याला गल्लीतून नारे ऐकू येतात - 'पाकिस्तान झिंदाबाद। कायदे आझम झिंदाबाद।' अेक मुसलमान सांगत असतो -

'काँग्रेस हिंदूओंकी जमात है और मुस्लिम लीग मुसलमानोंकी। काँग्रेस मुसलमानोंकी रहनुमाई नहीं कर सकती।'

ही वाक्ये निहलानी यांनी दूरदर्शनवर ठेवली होती, परंतु महत्त्वाची गाळली आहे. ती अशी -

**'हमें हिंदुओंसे नफरत नहीं। इनके कुत्तोंसे नफरत है। मौलाना आझाद हिंदुओंका सबसे बडा कुत्ता है। गांधीके पीछे दुम हिलाता फिरता है।'**

भीष्म साहनी यांनी मौलाना आझादांच्या मागे कोणीही मुसलमान नव्हते तरी गांधींनी त्यांना अध्यक्ष केले, या गोष्टीकडे सामान्यतः मुसलमान काय म्हणून पाहत होते, याचे वस्तुस्थिती निदर्शक चित्रण कादंबरीत केलेले आहे. जिथे कादंबरी घडते, त्या ठिकाणच्या मुसलमानांना आझाद हा गांधींच्या मागे शेपुट हलवीत फिरणारा कुत्रा वाटत होता, या वस्तुस्थितीत अर्थात निहलानींना रस नाही.

## संघ आणि गुरुजी

भीष्म साहनी यांना आर्यसमाज व रा.स्व. संघ यांच्या कार्यपद्धतीची चांगली माहिती असावी असे दिसते. दोन्ही संघटना फाळणीविरोधी आहेत. परंतु मुसलमानांच्या अत्याचारापासून हिंदूंना संरक्षण देण्यासाठी जे करता येईल ते करावे, या पलीकडे दोघांची दृष्टी नाही व ताकदही नव्हती. यामुळे भीष्म साहनी यांनी कादंबरीत ''सत्संगसभा'' म्हणुन जी संघटना दाखवली आहे, त्यात आर्यसमाज व रा. स्व. संघ यांच्या या मनोधारणेचे यथातथ्य चित्रण असले, तरी कादंबरीकाराने लेखनात, 'संघ' किंवा 'गुरुजी' याचा कोठेही चुकूनदेखील उल्लेख केलेला नाही. काँग्रेस, हिंदुमहासभा, मुस्लीम लीग, कम्युनिस्ट यांचे स्पष्ट उल्लेख करणाऱ्याने, संघाचा नामनिर्देश टाळावा याला काही आहे की नाही? परंतु आज कम्युनिस्टांच्या लेखी शत्रू क्रमांक एक या स्थानावर रा.स्व. संघ आहे. केरळात त्यांची सलामी झालेली आहे. केरळात रास्व संघाचे कार्यकर्ते ठार मारण्याचा उद्योग तेथील कम्युनिस्टांनी गेली काही वर्षे निष्ठेने केला. परंतु एकासएक या हिशोबात कम्युनिस्टही मरु लागले, तेंव्हा हे हत्याकांड तूर्त संपलेले आहे असे दिसते. हा अगदी ताजा इतिहास आहे. तेंव्हा अशा रा. स्व. संघाला 'तमस' मालिकेतून बदनाम करण्याची संधी, निहलानींनी साधली नसती तरच नवल झाले असते!

कादंबरीत, 'सत्संग सभा' संपल्यावर, निवडक कार्यकर्त्यांची अेक 'अंतरंग' सभा भरते असे दाखवले आहे. त्यात वानप्रस्थजी हे नेते सांगतात -

'लालाजी अपनी रक्षा तो अपने हाथों होंगी।'

इसपर शहरके हिंदु - सिख्खोंको व्यापक रुपसे संगठित करने, आत्मरक्षा की साझी योजना बनाने के सुझावोंपर विचार किया जाने लगा। [पृ.६]

इलाखा मुसलमानी आहे. मुरादअलीने मुसलमानांना चिथावले आहे. अल्पसंख्येने असलेल्या हिंदु - शिखांचे जीवित व आयाबहिणींचे पावित्र्य धोक्यात आहे. या पार्श्वभूमीवर वानप्रस्थीजी फक्त संरक्षणाचाच विचार काय तो सुरु करीत आहेत. यांची त्यांना खंतही आहे ते सांगतात -

'यही हम हिंदुओंमें बहुत बडी कमजोरी है। हम प्यास लगनेपर कुआँ खुदवाते है। आज जब हालत बिगड रही है, और मुसलमान जामा मस्जिदमें असला इकट्ठा कर रहे हैं, हम लाठियाँ खरीदने जा रहें हैं।'

भीष्म साहनींचे असे हे संयमित, वास्तवाचे साधे चित्रण आहे. गावातील आखाडा संचालक मास्टर देवव्रत आहेत. यांनाच मास्टरजी असे हिंदू तरुण संबोधतात. हे मास्टरजी रणधीर नावाच्या मुलाला

प्रतिशोधाच्या वेळी त्याचे मन खंबीर रहावे म्हणून, कोंबडी कापायला सांगतात. रक्ताची संवय व्हावी म्हणून त्या तरुण मुलाला कोंबडी कापणेही जमत नाही! अखेर एकदाची तो कोंबडी मारतो. मास्टर देवव्रत त्याला म्हणतात -

### 'तुम अभी दीक्षा के अधिकारी हो।'

भीष्म सहानी यांना हे ज्ञान होते की, 'सर्वसाधारण हिंदू हा भित्रा - नेभळट असतो, तर सर्वसाधारण मुसलमान हा क्रूर होऊ शकतो.' निरपराधावर तो केवळ अन्य धर्माचा आहे म्हणून शस्त्राघात करणे हिंदूंना जमत नाही. त्यांची जास्तीत जास्त मजल आगी लावण्यापर्यंत जाते. याचे कारण, मुसलमानांना ज्याप्रमाणे अेक काफर ठार केला, तर धर्मग्रंथानुसार स्वर्गात स्थान निश्चित आहे तशी हिंदुधर्मात काहीही 'सोय' नाही. अतिरेक झाला तर तीव्र प्रतिक्रिया म्हणून केंव्हा केंव्हा हिंदू प्राणाघात करतात, नाही असे नाही. परंतु आक्रमण, धर्म बदलण्यासाठी, छळ करुन ठार मारणे, परधर्मीय मुलींची अपहरणे करणे, या गोष्टी हिंदुच्या रक्तातच आज तरी नाहीत. इतिहासात याची शेकडो उदाहरणे दाखवता येतील की शक्य असूनही हिंदुंनी या गोष्टी केलेल्या नाहीत. रा.स्व. संघ किंवा आर्यसमाजाचा हिंदू संघटनेवर भर आहे, तो आक्रमणासाठी नसून, धर्मसुधारण्यासाठी व परधर्मियांच्यापासुन स्वसंरक्षणासाठी आहे, याची पुरेपूर कल्पना भीष्म साहनींना आहे. म्हणून त्यांनी कादंबरीत 'रणधीर' नाव मिरवणारा परंतु रक्तपाताला न सरावलेला हिंदू तरुण प्रतिनिधी म्हणून रंगवलेला आहे. पण निहलानी काय करतात? मुसलमानी इलाख्यात हिंदू देखील अत्याचार करतात आणि याला 'गुरुजी' नामक नेता प्रेरणा देतो असे चित्रण करुन दूरान्वयाने रा.स्व. संघाला बदनाम करण्याचे पापकर्म निहलानी करतात. कारण ते त्यांना सोयीचे वाटते.

### 'मुझे क्या बापू बचाएंगे?

लेखकाचे अवलोकन खूप सूक्ष्म आहे. या दृष्टीने मेहताजी या नेत्याचे चित्रण पाहण्यासारखे आहे. या माणसाची हयात काँग्रेसमध्ये गेलेली आहे. परंतु मुसलमानांनी देशविच्छेदनासाठी सुरु केलेले हत्याकांड पाहून हा माणूस हिंदुमहासभेशीही संबंध ठेऊन आहे. मेहताजी सांगतो -

'अगर फिसाद होगा तो क्या तुम मुझे बचाने आओगे? नालेके पार का सारा इलाका मुसलमानी है, और मेरा घर नालेके सीरेपर है। मुझे क्या बापू आकर बचायेंगे? अुस वक्त तो मुझे मुहल्लेवाले हिंदूओंकाही आसरा है। छुरा मारनेवाला मुझसे यह तो नहीं पूछेगा की तुम काँग्रेसमें थे या हिंदूसभा में थे।'

पाकिस्तानातले हिंदू कम्युनिस्टही अखेर तेथून पळालेच ना! सुरा मारणारा मुसलमान हिंदुला हे विचारीत नाही की तू स्पृश्य आहेस की अस्पृश्य? काँग्रेसवाला की 'हिंदुमहासभावाला? सोशॅलिस्ट की कम्युनिस्ट?

भीष्म साहनी यांनी मुसलमानी बहुसंख्य असलेल्या भागातील कोंडून पडलेल्या हिंदुच्या अगतिक अवस्थेचे चित्रण, अतिशय वास्तवपूर्ण व मर्मभेदक शब्दात केलेले आहे.

### मिलखीचा अंत

दूरदर्शनवर दाखवल्या गेलेल्या मालिकेत शहानवाज हा पठाण, रघुनाथच्या बायकोचा दागिन्यांचा डबा [जो घर सोडतांना, घरातच विसरला गेला होता] आणण्यासाठी रघुनाथच्या, घरी जातो हा प्रसंग आहे. मिलखी हा रघुनाथचा अपंग नोकर, घर सांभाळत असतो. शहानवाज वरच्या खोलीत जाऊन, कपाटातील डबा काढत असताना, त्याला खिडकीतून जवळच्या मशिदीचे अंगण दिसते. तिथे कोणाचेतरी प्रेत आणलेले असते. हा दंग्यात मारला गेलेला मुसलमान असावा असे त्याला वाटते व त्याचे माथे सणकते. मिलखीही त्याच्या पाठोपाठ आलेला असतो. दागिन्यांचा डबा शहानवाजने उचलताच तो उलट फिरुन जिना उतरु लागतो. शहानवाज त्या अपंगाच्या पाठीत लाथ मारतो. इथेच दृश्य संपवलेले आहे. कादंबरीत वर्णन असे -

'बाहर आनेपर दोनो सीढियाँ उतरने लगे। मिलखी के हाथमें चावीओंका गुच्छा था और वह आगे आगे उतरता था। डिब्बे को दोनो हाथोंमें उठाये, शहानवाज पीछे पीछे चला आ रहा था, जब सहसा उसके अंदर भभुकासा उठा। न जाने ऐसा क्यों हुवा। मस्जिदके आँगनमें लोगोंकी भीड को देखकर या इस कारणको जो कुछ वह पिछले तीन दिनसे देखता सुनता आया था, वह विष की तरह उसके अंदर घुलता रहा था। शहानवाजने सहसा ही बढकर मिलखीकी पीठमें जोरसे लाथ जमाई। मिलखी लुढकता हुआ गिरा और सीढियोंके मोड़ पर सीधा दीवार से जाकर टकराया। जब वह नीचे गिरा तो उसका माथा फूटा था और पीठ टूट चुकी थी क्योंकि जहाँ गिरा, वहाँसे उठ नहीं पाया। शहानवाज उसके पाससे निकलकर आयां तो मिलखीका सिर नीचे की और लटक रहा था और टाँगे आखिरी दो सीढियोंसे लटक रही थी। मिलखीकी आँखे खुली थी। गर्दन टूट गयी थी।' [पृ. १३२]

अपंग मिलखीला अशा रीतीने ठार करणाऱ्या शहानवाजला त्याचे मुसलमान गुंड मित्र तत्पूर्वी हिणवत असतात.

'पाँच काफिर हमने काटे हैं। इनकी माँकी--' याच्या परिणामीच मिलखीचाही अंत होतो. निहलानी मिलखीचा अंत चित्रित करीत नाहीत. फक्त शहानवाजने मारलेली हलकीशी लाथ काय ती दाखवतात! हा अर्धवटपणा मुसलमानांच्या कृत्यांचे भेसूर रुप टाळण्यासाठीच आहे हे सहज लक्षात येईल. म्हणजे एकीकडे भीष्म साहनीने दाखवलेले मुसलमानी अत्याचार पुरतेपणी दाखवायचे नाहीत, याउलट जे हिंदु केवळ संरक्षणासाठी झगडत होते, ते देखील मुसलमानांप्रमाणेच अत्याचारी होते असे दाखवायचा अक्षम्य अपराध निहलानी करतात.

**'तमस' कथेशी अशी बेईमानी करुन त्यांनी काय साधले? हिंदूंनी हे सर्व विसरुन पुन:पुन: तीच तीच कर्मे पुन्हा भोगावी अशी का निहलानींची इच्छा आहे?**



### अिकबालसिंहाचे धर्मांतर

कादंबरीच्या दुसऱ्या खंडात, याच पाच दिवसातील शीख - मुसलमान संघर्ष येतो. हरनामसिंग व त्याची पत्नी बन्तो यांचे चहाचे

दुकान, मुसलमान लुटतात व दोघे भारताच्या दिशेने वाटचाल सुरु करतात. इथे हकिगत सुरु होते. या हरनामसिंगाचे दोन मुलगे, जसबीर व इकबालसिंह बेपत्ता आहेत. हरनामसिंगाला व बन्तोला, अेहसानअली याच्या घरात आश्रय मिळतो. कारण अेहसानअली घरी नसतो व त्याची आई आणि पत्नी यांना दोघांची दया येते. हरनामसिंगाच्या दुकानाच्या लुटीतून मिळालेली ट्रंक घेऊन अेहसानअली घरी येतो. ट्रंक फोडू लागतो तेव्हा हरनामसिंग लपलेल्या ठिकाणी बसून सर्व पाहत असतो. तो ट्रंक ओळखतो व अेहसानअलीला पुढे येऊन सांगतो - 'ट्रंक फोडू नकोस ही किल्ली घे' मूळ कादंबरीतला हा हृद्य प्रसंग, दूरदर्शन मालिकेतही चांगला चित्रित केला गेलेला आहे. पण निहलानी हरनामसिंगाच्या मुलाची कहाणी का चित्रित करीत नाहीत? इकबालसिंहाला रमजान, इलाहीबक्ष आदि मुसलमान तो लपलेला असताना पाहतात. लपलेल्या जागेतून तो बाहेर यावा, म्हणून त्याला दगडांनी ठेचून काढतात. पुढचा भाग असा -

'ओये, ठहरो, ओये। मत मारो पत्थर।'

कुछ लोगोंने हाथ रोक लिये। इक्का, दुक्का पत्थर फिर भी पडता था।

फिर वह दानिशमंद सामने आकर खडा हो गया और अूँची आवाजमें बोला -

'ओ सरदार, दीन कबूल कर ले, हम तुम्हें छोड देंगे।'

अंदरसे कोई जबाब नहीं आया।

'बोल सरदार, इस्लाम कबूल करेगा या नहीं? अगर मंजूर है तो अपने आप बाहर आ जा। हम तुम्हें कुछ नहीं करेंगे। वरना ढेले मार मारकर मार डालेंगे।'

सरदारका माथा और घुटने जगह जगहसे सूज रहे थे और जखमोंसे खून रीझ रहा था।

'बोल कलमा पढेगा या नहीं?' रमझानने कहा। वह अभी भी बडा सा पत्थर हातमे उठाये हुअे था।

'मुँहसे बोल मादर...। बोल नहीं तो देख यह पत्थर अभी तेरे खोपडी पर पडेंगा।'

'कलमा पढूँगा...।' इकबालसिंहने कहा।

तभी आवाज अुठी

'अल्ला - हो - अकबर -'

[पृ. २०२]

अेवढे झाल्यावर इकबालसिंहाला तो मुसलमान जमाव धक्के मारीत मारीत गावच्या मशिदीत नेतो. तिथे मौलवी येतो. न्हावी आणला जातो. इकबालसिंहाचे केस कापले जातात. त्याच्या तोंडात गाईचे मांस कोंबले जाते. इकबालसिंहाला कलमा पढवला जातो. त्याची जबरदस्तीने सुंता केली जाते.

या प्रसंगाचे चित्रण करण्याचा 'दम' निहलानीत अर्थातच नाही. अशी धर्मांतरे केवळ गुंडांनी घडवली नाहीत. मौलवींची त्याला साथ होती - फूस होती. नेहमीच असते. एकदा तरी इतिहास विसरणाऱ्या हिंदूंना हा अघोरी अत्याचार निहलानींनी दाखवायचा होता ना!

आता एका ब्राह्मणाच्या तरुण मुलीला अल्लारख्खा पळवतो व तिचे पुढे काय होते त्याचे चित्रण भीष्म साहनींच्या कादंबरीत आहे ते वाचू. या मुलीचे नाव प्रकाशो.

'प्रकाशोको अल्लारखाने घरपर बिठा लिया था। फिसाद होनेपर माँ - बेटी पहाडीकी तलहरीपर लकडियाँ चुन रही थी। अल्लारखाँ पहलेसेही दो तीन आदमियोंके साथ कही घात लगाये बैठा था। मौका देखकर वे भागते हुअे रोती चिल्लाती प्रकाशोको उठाकर ले गया था। दूसरे दिन अल्लारखांने असके साथ निकाह किया।' [पृ. २३९]

या दूरदर्शनवरील 'तमस' मालिकेचा प्रत्येक भाग दाखवताना अेक वाक्य वाचावे लागे - 'जे इतिहास विसरतात, तोच इतिहास पुनः घडलेला बघण्याचे त्यांच्या वाट्याला येते. [Those who forget history are condemned to repeat it] भारतीय इतिहास - मुसलमानांनी घडवलेली सक्तीची धर्मांतरे आणि हिंदु स्त्रियांची अपहरणे यांनी असंख्यवेळा विद्रुप झालेला आहे. भीष्म साहनींना याची जाणीव आहे. त्यांनी कादंबरीत नेमकी ही दोन्ही उदाहरणे अंतर्भूत केलेली आहेत. अशी बदकर्मे पुनः घडू नयेत, अशी जर निहलानींची खरोखरच इच्छा असती, तर त्यांनी हा कादंबरीतील इतिहास - का चित्रित केला नाही? 'तमस' कथेशी अशी बेइमानी करुन त्यांनी काय साधले? हिंदूंनी हे सर्व विसरुन पुनः पुनः तीच तीच कर्मे पुनः भोगावी अशी का निहलानींची इच्छा आहे?

## वा रे निर्माता

निहलानींची इच्छा आहे की 'तमस' मुळे ते ओळखले जावेत! चांगली इच्छा आहे! ते जरुर ओळखले जातील - 'तमस' नावाच्या चांगल्या कादंबरीची भ्रष्ट दूरदर्शनमालिका तयार करुन, इतिहासाशी बेइमानी केल्याबद्दल! मूळ कादंबरीतल्या महत्त्वाच्या घटना गाळल्याबद्दल! मूळ कथेत नसलेल्या गोष्टी घुसडल्याबद्दल! मुरादअलीला हिंदू केल्याबद्दल! हे महान मालिका निर्माते आपल्या या निर्मितीबद्दल काय सांगतात ते पहा. ही मुलाखत त्यांनी 'THE WEEK' या साप्ताहिकाला दिलेली आहे.

प्रश्न : कम्युनिस्ट पक्षाने मुस्लिम लीगच्या पाकिस्तान मागणीला पाठिंबा दिलेला होता ही गोष्ट आपण मालिकेत का निर्देशित केली नाही?

**....भुंकणारे एक बरे कुत्रे**



**या बुध्दीने कम्युनिस्टांनी त्यांना जवळ केले असेल तर त्या सुखात सुखेनैव डुंबावे. मात्र 'तमस' मुळे कलाक्षेत्रातील आपली प्रतिमा उंचावली हा गैरसमज काढून टाकावा.**

निहलानी : हे बघा, मालिकेचा भर फाळणीची शोकांतिका दाखवण्याचा होता. जातीयवादी, लोकांच्या भावना कशा भडकावतात हे त्यात दाखवलेले आहे.

प्रश्न : तुम्ही मूळ कादंबरीत 'मास्टरजी' हा जो शब्द आहे तो 'गुरुजी' केलात कारण तुम्हाला गोळवलकर गुरुजी अभिप्रेत करावयाचे होते असा तुमच्यावर आरोप आहे.

निहलानी : पण मी मूळ कादंबरीत आहे तेच दाखवले आहे 'मास्टरजी' आहे तेथे 'मास्टरजी' व 'गुरुजी' आहे तेथे 'गुरुजी' ठेवले आहे.

प्रश्न : मूळ कादंबरीत डुक्कर मुसलमान माणूस मारतो असे असताना तुम्ही मालिकेत तो हिंदू का दाखवलात ?

निहलानी : मी मुळी धर्माचा उल्लेखच केलेला नाही. नुसतेच ठेकेदार म्हटले आहे. मला कळत नाही. याबद्दल एवढा वाद का ?

प्रश्न : पण पहिला आघात कोणी केला याला महत्त्व असतेच

निहलानी : कुठल्या आघाताबद्दल बोलता हेच कळत नाही. राजकीय गुंतागुंतीत मी शिरलेलो नाही.

[I have not gone into political complexities]
[THE WEEK - 14-2-1988]

वा रे निर्माता ! फाळणी ही अत्याचार व बलात्कार यांच्या जोरावर घडवून आणली. त्यांना हे जमले कारण हिंदूनी महात्माजींच्या नेतृत्वावर विश्वास ठेवण्याची घोडचूक केली ! कम्युनिस्ट पक्षाचा फाळणीला पाठिंबा होता. फाळणी ही राजकीय घटना होती. तरी निर्माता म्हणतो - 'मी राजकीय गुंतागुंतीत शिरलेलो नाही.' यासाठी आवश्यक ती बुद्धी नव्हती, तर 'झाकोळ' ची हिंदी - दूरदर्शनमाला तयार करायची ! 'तमस' च्या वाट्याला कशाला जायचे ? मूळ कादंबरीत 'गुरुजी' हा शब्द अेकदाही येत नाही. सर्वत्र 'मास्टरजी' हाच शब्द येतो असे असताना निहलानी धादांत खोटी विधाने करतात. मुरादअली - मुरादअलीच का ठेवला नाही, याला उत्तर काय तर - 'मी मुळी धर्माचा उल्लेखच केला नाही !' मुरादअली - मुरादअली ठेवला असता तर धर्माचा उल्लेख करावा असा कोण आग्रह करणार होते ? उलट धर्म स्पष्ट होईल म्हणून निहलानींनी पळपुटेपणा केलेला आहे. मग निदान तो पदरात घेण्याचा प्रामाणिकपणा दाखवा ना !

धडधडीत सत्यालाप हेच जर निहलानींनी केले असेल व म्हणूनच - 'भुंकणारे एक बरे कुत्रे' या बुध्दीने आज कम्युनिस्टांनी त्यांना जवळ केले असेल, तर त्या सुखात त्यांनी सुखेनैव डुंबावे. मात्र 'तमस'मुळे कलाक्षेत्रात आपली प्रतिमा उंचावलेली आहे, हा गैरसमज त्यांनी डोक्यातून काढून टाकावा. निहलानींना कोणी ओळखत नाही हीच स्थिती चांगली आहे. न जाणो एखाद्या सत्यप्रिय भारतीयाला - 'विंचू पिंडीतही बैसला। देवपूजा नावडे त्याला। तेथे पैजाराचे काम।' ही तुकारामउक्ती त्याक्षणी आठवली, तर उगाच फट म्हणता ब्रम्हहत्या व्हायची !

## भीष्म साहनी आणि अितिहास

आता लेखक स्वत: आपल्या कादंबरीविषयी काय म्हणतो ते पाहू. भीष्म साहनी सांगतात -



**अशी ही चांगली 'तमस' कादंबरी. सुमार निर्मात्याच्या हातात जाऊनही परिणामकारक ठरली. हा सोन्याचा गुण. लबाड सोनाराला याचे श्रेय नव्हते.**

'''तमस' ही ऐतिहासिक कादंबरी नाही. इतिहासातील काही घटनांचा उपयोग त्यात आहे आणि या घटनांवर कथानक उभे आहे इतकेच. ललितवृत्तीचे मुख्य अस्तर मानवीजीवन असते. आणि लेखक आपल्या कल्पनाशक्तीनुसार व वास्तवाच्या आपल्या समजुतीनुसार त्यातून रचना घडवतो.''

भीष्म साहनी हे स्वत: फाळणीबाबत कॉंग्रेसने सुरू केलेल्या निर्वासितांच्या अेका छावणीत, तपशील गोळा करण्याचे काम करत होते. किती माणसे मेली ? किती घरे जळाली ? किती बलात्कार झाले ? हा तपशील जमा करण्यासाठी त्यांना काही खेड्यातून जावे लागले, की ज्या खेड्यातून अशी हत्याकांडे घडली होती. 'तमस' ही कांदबरी, आपण त्या अनुभवातून लिहिली असे ते सांगतात. म्हणजे हे अनुभव हे त्यांचे 'वास्तव' आहे. आता त्यांनी हे अनुभव नेमके कोठकोठल्या खेड्यातून घेतले - तो 'भूगोल' सांगण्यास मात्र भीष्म साहनी यांनी नकार दिलेला आहे. याचे उघड कारण ही खेडी आता पाकिस्तावासी झालेली आहेत. वर्णन केलेल्या घटना नेमक्या कोठे घडल्या, अशातऱ्हेचा तपशील ते सांगत नाहीत. आता ज्या घटना ते सांगतात, तो इतिहासाचा भाग असल्याने आपली कांदबरी 'ऐतिहासिक' नाही, या त्याचा म्हणण्याला परस्पर छेद जातो.


'तमस'ला प्रस्तावना लिहणारे रामचंद्र तिवारी याबाबतीत स्पष्टपणे सांगतात -

''१९४७ च्या मार्च - एप्रिल महिन्यात पंजाब प्रांत हा जातीय उद्रेकांमुळे अशांत होता. वस्तुस्थिती अशी आहे, की मार्च एप्रिल ४७ मध्ये यादवी रावळपिंडी भागातच काय ती सुरु झाली. या उद्रेकांना दंगा हा साळसूद शब्द वापरणे योग्य नाही. दंगा दोघात होतो. हा दंगा नव्हता. मुसलमानांनी रावळपिंडी भागातून हिंदू - शिखांना हुसकून लावण्यासाठी सुरु केलेल्या या कत्तली व अत्याचार होते. मुसलमानांनीच सुरु केलेल्या या हत्याकांडाची प्रतिक्रिया सुरु झाली, ती पुढे काही महिन्यांनी. 'तमस' मध्ये जो काल वर्णिलेला आहे, तो काल म्हणजे - हिंदू - शिखांची अतोनात हत्या मुसलमानांनी केली तो काल होय.''

श्री. प्रबोधचंद्र यांनी त्यांच्या 'रेप ऑफ रावळपिंडी' या पुस्तकात दिलेली छायाचित्रे यासाठी पाहता येतील. अुपवाचन म्हणुन श्री.

# पिरॅमिड टेलीव्हिजन: मग शंकाच नाही.

पिरॅमिड देते हे प्रकार—पिरॅमिड २००० ई, पिरॅमिड २००० आर, पिरॅमिड प्लस (रिमोटसहित व रिमोटशिवाय), पिरॅमिड परफेक्ट आणि पिरॅमिड २०९ ह जे हे रंगीत टीव्ही. पिरॅमिड १४१, पिरॅमिड १४५ टी, व पिरॅमिड १४५ ई हे १४" ब्लॅक अँड व्हाइट पोर्टेबल टीव्ही आणि पिरॅमिड ५१० व पिरॅमिड ५११ हे २०" ब्लॅक अँड व्हाइट टीव्ही.



PYRAMID TELEVISION

जपानी तंत्रज्ञानाचे एक उत्पादन.

| | | |
|---|---|---|
| नितीन इलेक्ट्रॉनिक्स<br>दारुवाला पूल, कसबा पेठ, पुणे<br>फोन - २७७२८ | पंकज टेलेव्हिडिओ सेंटर<br>लक्ष्मी रोड, विजयटॉकीज जवळ, पुणे<br>फोन - ४४४३३८, ४३४३३८ | टेक्नो सेंटर<br>कर्वे रोड, नळस्टॉपसमोर, पुणे<br>फोन - ४३२६५३, ४४८७०९ |
| | न्यू इंडिया इलेक्ट्रॉनिक्स<br>तापकीर गल्ली,<br>वसंतटॉकीजजवळ, पुणे<br>फोन - ४४९६४४ | |
| राधिका सेल्स<br>पिंपरी, पुणे<br>फोन - ८६३००, ८२००५ | जे. डी. इलेक्ट्रॉनिक्स<br>ईस्ट स्ट्रीट, पुणे | मल्टी सेल्स एजन्सीज<br>टिळक रोड, पुणे<br>फोन - ४३८००१, ४३७००१ |

प्यारेलाल यांच्या 'लास्ट फेज' या पुस्तकातील बगालमधील हत्याकाडाच्या लीलाही वाचाव्या.

अैतिहासिक घटनावर कादबरी लिहिणाऱ्या लेखकावर, आपली कल्पनाशक्ती प्रचारकी पद्धतीने 'स्वमत' समर्थनार्थ किती खोडसाळपणे वापरावी, यावर बधने येतात. ही बधने त्याला पत्करावीच लागतात. उदाहरण द्यायचे तर 'पद्मिनी' वर कादबरी लिहणारा लेखक पुरोगामी, समाजवादी वगैरे वगैरे असला, तर त्याने कल्पनेला ताण देऊन देऊन अल्लाउद्दीन खिलजी किती प्रकाराने थोर होतो हे दाखवायला हरकत नाही; परतु राणी पद्मिनी ही अल्लाउद्दीनावर खुष होऊन स्वखुषीने पळून गेली, असे दाखवण्याचे धारिष्ट्य लेखक म्हणूनही त्याला परवडणारे नाही! यामुळे अिकबालसिहाचे मृत्युभयाने घडवलेले धर्मांतर, प्रकाशो या तरुण मुलीचा अपहरणाचा प्रसग, शीख माता भगिनींनी विहिरीत उड्या घेऊन साजरा केलेला 'जोहाराचा' प्रसग, हे सर्व भीष्म साहनी यानी प्रत्यक्ष अनुभवलेल्या वास्तवाचे हे सर्वांग होते. हे प्रसग त्याच्या कादबरीचे अविभाज्य घटक होणे अपरिहार्य होते व तसे ते झालेले आहेतही. हिंदू प्रतिक्रियेचे जे क्षीण दर्शन त्यानी कादंबरीत घडवले आहे, ते मात्र त्यानी कादबरीतील कथांतर्गत वास्तवाचा तोल सभाळण्यासाठी केलेले आहे हे लक्षात येते. अपवाद म्हणुन कदाचित असे काही पुढे घडलेही असेल.

## हा कसला कॉमरेड!

कादबरीत जाणवणारा दोष म्हणजे लिजा व रिचर्ड या इग्लीश दापत्याला, त्याच्या वागण्याला सभाषणाला दिलेले अवाजवी महत्व. हा अेक दोष असा आहे की कदाचित काही वाचकाना दोष वाटणारही नाही, इतका तो सौम्य आहे, अन्यथा ही कादबरी वाचकाला खिळवून ठेवणारी चागली कादबरी आहे यात शका नाही. कादबरीत पाकिस्तानातील हिंदू कम्युनिस्टच काय ते डोकी शात ठेऊन राजकीय काम करणारे, मानवी सभ्यतेचे तारणहार दाखवलेले आहेत. शातता समित्या [अमन कमिटी] स्थापन करणे वगैरेत त्याचा पुढाकार असतो; परतु हे करतानाही लेखकाने काही सूचक गमती केल्या आहेत.

शातता कमिटीचा अध्यक्ष कॉमरेड देवदत्त होतो. कार्यकारिणी तयार करताना तो फॉर्म्युला काय स्वीकारतो? सात मुसलमान, पाच हिंदू व तीन शीख असावेत! या अमन कमिटीचा दौरा सुरु होतो आणि अैक्याच्या घोषणा देणारात अग्रभागी असतो- मुरादअली! डुक्कर कापणारा मुरादअली! एवढे थोर कार्य करणाऱ्या हिंदू कम्युनिस्टाना पाकिस्तानातच मुसलमानानी ठेऊन का घेतले नाही, असा प्रश्न वाचकाच्या मनात येईल, त्याला भीष्म साहनींचाही नाअिलाज आहे!

झाले काय की, अशी ही चागली 'तमस' कादबरी, सुमार निर्मात्याच्या हाती जाऊनही, मूळ आधार ऐतिहासिक असल्याने, बरीच परिणामकारकता दूरदर्शन चित्रमालेतही शिल्लक उरली. हा सोन्याचा गुण होता लबाड सोनाराला याचे श्रेय नव्हते जी काही थोडी परिणामकारकता या मालेत उतरली, ती देखील पाकिस्तानात न जाऊन भारतावर उपकार करणाऱ्या जातीय मडळींना त्रासदायक वाटू लागली!

## न्यायमूर्तीचा जमालगोटा

*श्री. जावेद सिद्दीकी यानी २१ जाने. ८८ ला कोर्टाकडे धाव घेतली* - 'आमच्या भावना दुखावल्या....!' अर्जात त्यानी मालिकेवर बदी का घालावी याची चार कारणे दिली -

(१) तमस ही दूरदर्शनमालिका आम्हा मुस्लिमांच्या भावना दुखावणारी आहे.

(२) *फाळणीच्या काळात जे अत्याचार झाले त्याविषयी नव्या* पिढीला काहीही माहिति नाही या मालिकेमुळे ती होईल

(३) प्रत्येक दृश्यात हिंसक प्रक दाखवले आहेत.

(४) या मालिकेने मागील जखमावरची खपली निघेल.

या सिद्दीकीसाहेबानी मूळ कादबरी वाचली नसावी! मूळ कादबरीनुसार प्रामाणिकपणाने दूरदर्शन फिल्म तयार केली गेली असती, *तर मुसलमानांच्या भावनाचे काय झाले असते, याची कल्पना करवत* नाही. मुस्लिमाच्या भावना हे एक गौडबंगाल कॉंग्रेसी सस्कृतीने या देशात निर्माण केलेले आहे. चीन व रशियातही कोट्यवधी मुसलमान रहातात. त्याच्या भावना दुखावल्या गेल्याचे गेल्या पन्नास वर्षात वृत्त नाही! मूळ कादबरीची मोडतोड केलेली- पातळ केलेली ही- दूरदर्शनमालाही दाखवू नये हा मुस्लिमाचा आग्रह अजबच होता.

न्या. बख्तावर लेंटीन व न्या. सुजाता मनोहर यानी अर्जदार सिद्दीकी याचा अर्ज नुसता फेटाळला नाही, तर बजावले -

'अर्जदाराला वय विचारले तर ३१ सागितले. अर्जदाराचे म्हणणे त्याच्या पिढीला पूर्वी काय घडले याची काहीही माहिती नाही. आमचे यावर साधे म्हणणे आहे की आता त्याना फाळणीचे वेळी काय घडले, कसे घडले हे कळेल आणि काही समज येईल.'

या मालिकेने जुन्या जखमांवरची खपली निघेल, या अर्जदाराच्या म्हणण्यावर न्यायमूर्तींनी सुनावले -

'आम्ही इथे देश चालवण्याकरता बसलेलो नाही. आम्ही कायद्यानुसार गोष्टी आहेत एवढेच पाहतो. धोरण हे सरकारने ठरवायचे असते व ज्याअर्थी या मालिकेला सरकारने अनुमती दिली आहे, तेव्हा ती देतानाच, हे धोरण धरुन आहे हे पाहिले गेले असावे.'

## हिंदु नेत्यांची चूक

या सर्व पार्श्वभूमीवर 'तमस' वरील बदी उठली, तेंव्हा काही जहाल हिंदू नेत्यानी जो गदारोळ उठवला. तो उठवण्याची गरज लक्षात येत नाही. 'मुसलमानाच्या भावना दुखावतात' यासाठी बदीची मागणी केली गेलेली होती. त्याच्या भावना दुखावल्या जाण्याचे कारण नाही अितिहास सर्वांनी माहीत करून घ्यायलाच हवा असा हा स्वच्छ निर्णय होता. हिंदू नेत्याच्या चुकीच्या पवित्र्याने निहलानीसारख्या अर्धवट बुद्धीच्या निर्मात्याला रस्त्यावर येऊन मिरवण्याची सधी मात्र उपलब्ध झाली. 'तमस' दूरदर्शन मालिकेमुळे 'तमस' कादबरीकडे सर्वांचे लक्ष वेधले गेले, याचा फायदा उठवून स्वस्त पुस्तक योजना आखून, सर्व भाषातून ही कादबरी सर्व भारतीय वाचकाना वाचनासाठी उपलब्ध करण्याची अधिक गरज आहे

कारण सत्य शाश्वत असते आणि लिखित शब्द दडपता येत नाही!

० ० ०

# 'स्वामी' सेटवर-सेटबाहेर

'मराठी साहित्य उत्तम आहे.
त्यातलं दूरदर्शनवर
का येत नाही?'
या सवालाभोवती फिरणारी
'स्वामी' ही दूरदर्शनमालिका.
आपल्याच निर्मितीकडं
साहित्यिक, आर्थिक आणि
व्यावसायिक अंगानं बघताना
मालिकेचे निर्माते
श्रीकांत मोघे आणि
दिग्दर्शक गजानन जागिरदार
यांच्याशी
विनया खडपेकर यांनी
केलेली बातचीत.

आयोजकाअभावी बंद पडलेले स्वामीचे चित्रीकरण पुन्हा तेवढ्याच उत्साहाने सुरु झाले. निर्माते श्रीकांत मोघे.



# 'स्वामी' अडकली ती अर्थकारणात


## श्रीकांत मोघे

बरेच दिवस गाजत असलेली ''स्वामी'' ही मराठी मालिका दूरदर्शनवर आली. बघता बघता सर्वांगाने फुलत बहरत गेली. वातावरण निर्मितीचे दिग्दर्शकांचे भान, भूमिकेला अनुरुप कलाकारांचे चेहरे- केशभूषा, - वेशभूषा, कलाकारांचे सुजाण अभिनय यातून पेशवाई साकार होऊ लागली. शनिवारवाड्यातले गृहकलह दिसू लागले. पानिपतच्या पराभवाच्या पार्श्वभूमीवर अुभा राहिलेला धीरोदात्त माधवराव पेशवा पहाताना मराठी मनं रंगून गेली. सुंदर, समंजस, निर्मळ डोळ्यांची रमा महाराष्ट्राच्या घराघरात प्रिय झाली.

त्याचवेळी राजस्थानात सती गेलेल्या रुप कुंवरमुळे 'स्वामी'ला वेगळेच महत्त्व आले. माधवरावाच्या मृत्यूनंतर रमाबाईचे सती जाणे दाखवावे की न दाखवावे यावर चर्चा सुरु झाली. दाखविले तर अमानुष रुढींचे अुदात्तीकरण होईल का? न दाखवावे तर इतिहासाशी बेईमानी होईल का? प्रतिगामी, पुरोगामी, कलावादी, इतिहासवादी सगळे विचारप्रवाह आपापले दृष्टिकोन मांडू लागले. मालिकेतली रमाबाई सती जाणार की नाही याबद्दल जनतेच्या मनात अुत्सुकता निर्माण झाली. हे वाद सुरु असतानाच स्वामीचे तेरा भाग संपले. पुढच्या भागांना परवानगी मिळाली. तरीही स्वामी बंद झाली. कोणाला वाटले 'सती' भोवती निर्माण झालेल्या वादळामुळे राजकीय पक्षाचे राजकारण होअून स्वामी बंद पडली. कोणी म्हणे यामागे अर्थकारण आहे. मराठी जनता स्वामी सुरु होण्यासाठी पैसा अुभारण्याची भाषा बोलू लागली. काही महिन्यात 'स्वामी' पुन्हा सुरु झाली. 'स्वामी'चा हा प्रवास जाणून घेण्याच्या दृष्टीने निर्माते श्रीकांत मोघे आणि दिग्दर्शक गजानन जागिरदार यांच्याशी विनया खडपेकर यांनी केलेली बातचीत.

शिरीष साटवेलकर, दिग्दर्शक गजानन जागिरदार व कलावंत नव्या रुपाने 'स्वामी' स्वीकारताना





बेकेट - हेन्रीच्या धर्तीवर राघोबा - माधवराव हे नाटक केले तर...

**स्वामी या विषयावर मालिका करावी ही कल्पना तुम्हाला कशी सुचली**

ही कल्पना माझी नाही. कल्पना सुचवली आमच्या पपांनी म्हणजे दिग्दर्शक गजानन जागिरदार. त्यांनी सुचविलेली कल्पना मला एकदम आवडली. भिडली. मी ती ताबडतोब स्वीकारली. त्याला कारण असलेली माझी पार्श्वभूमी सांगतो. १९६३-६४ ची गोष्ट. 'पार्ले म्युझिक सर्कल' ऐन भरात होतं. 'बटाट्याची चाळ' 'वाऱ्यावरची वरात' ही पार्ले म्युझिक सर्कलची निर्मिती गाजली होती. तिथला माझा मित्र मधू गानू नाटकाच्या फार लोभातला. त्यानं तेव्हा 'बेकेट' चित्रपट पाहिला. चित्रपट पाहून मधूच्या डोक्यात आलं, बेकेट आणि हेन्री यांच्या धर्तीवर राघोबा- माधवराव हे नाटक केलं तर ? मधू गानूनं ही कल्पना मला सांगितली. मी जाऊन 'बेकेट' पाहिला. हेन्री जसा बेकेटच्या प्रेमात तसा राघोबा माधवरावांच्या प्रेमात. हेन्रीसारखाच राघोबा. त्याला भव्यत्वाबद्दल प्रेम. चांगुलपणाचं आकर्षण. परंतु कोणी त्याच्या कानात विष ओतलं की चट्कन भिनतं, आणि तितक्याच चट्कन कोंबडी लावल्यासारखं ते अुतरतं. 'बेकेट' पाहून मी झपाटलो. दिवसभर हिंडून 'स्वामी' कादंबरी मिळवली. रात्री जागून ती वाचून काढली. मी आणि काशीनाथ घाणेकर तेव्हा तिशीत होतो. 'रायगडाला जेव्हा' मधून काशीनाथ बाहेर पडला होता. 'सीमेवरुन परत जा' चे माझेही प्रयोग संपले होते. आम्ही दोघं रंगभूमीवर सुप्रतिष्ठित झालो होतो. मधू गानूला मी म्हटलं, ''राघोबा माधवराव आपण करु.' काशीनाथ गोरा-घारा माधवराव म्हणून छान दिसेल. पण समजा त्याला राघोबा करावासा वाटत असेल तरी करु दे. निवड त्याला करु दे. मला कोणतीही भूमिका चालेल. पण आपण हे नाटक करायचं. परंतु अंतर्गत दुफळीत पेशवाईचं राज्य बुडालं तसंच फूट पडून 'पार्ले म्युझिक सर्कल' बुडालं. अर्थात् 'स्वामी' कल्पना बारगळली. 'स्वामी' चं स्क्रीप्ट तयार नव्हतं. पण पार्ले म्युझिक सर्कल राहतं तर ते स्क्रिप्ट तयार व्हायला काही वेळ लागला नसता.

१९७३- ७४ मधे मोहन वाघांनी ''गरुडझेप'' केलं. त्यात मी शिवाजी होतो. पुढे व्यक्तिगत मतभेद होअून मी मोहन वाघांच्या गटामधून बाहेर पडलो. मोहन वाघांनी 'स्वामी' केलं तेव्हा मी त्या गटात नव्हतो. मी असतो तर राघोबा मीच झालो असतो. नंतर रणजित देसाई आणि मधुसूदन कालेलकर ''स्वामी'' नाटक लिहू लागले. कालेलकरांचं नाटक प्रथम आलं. ते राजाराम शिंदे यांनी निर्माण केलं होतं. त्यांच्या पद्धतीत मी आणि काशीनाथ बसण्यासारखे नव्हतो. त्यात शशिकांत निकते आणि राम बापट यांनी भूमिका केल्या. पुढे 'बेईमान' आलं तेव्हाही माझी संधी हुकली. पण माझ्या मनात राघोबा अगदी रुतून बसला होता. तो साकार करायची संधी मिळायला १९८७ हे वर्ष अुजाडावं लागलं. राघोबाच्या प्रेमामुळं मी पपांना ताबडतोब होकार दिला. निर्माता व्हायला कबूल झालो.

**'स्वामी' ही तुमची पहिलीच मालिका ? चित्रीकरणाच्या जागा, पात्रयोजना कशी कशी करीत गेलात ?**

ही माझी पहिलीच मालिका. या पहिलेपणाची गंमत सांगतो. माधवरावाच्या भूमिकेसाठी आम्ही अर्ज मागवले होते. 'गोरा - घारा, स्वच्छ वाणीचा, अभिनयाचे संस्कार असलेला, जाण असलेला, माणूस पाहिजे' अशी जाहिरात आम्ही दिली होती. तेव्हा एकाचे पत्र आले, ''माझा रंग गोरा आहे. डोळे घारे आहेत. सगळं आहे. मात्र मला अभिनयाचा अनुभव नाही. परंतु मालिका निर्माण करण्याचा तुम्हाला तरी काही अनुभव आहे कां ? तेव्हा तुम्ही माझ्यावर ही भूमिका सोपवा.''

चित्रीकरणासाठी पुण्यातले खूप वाडे आम्ही पाहिले. भोरचा वाडा पाहून आलो. कमाल अमरोहीचा, राजकमलचा स्टुडिओ पाहिला. पण त्या ठिकाणी साडेतीन लाख रुपयांचा सेट अुभा करायला लागला असता. यामुळे एक वेळ अशी आली की वाटलं 'स्वामी' करु नाही. पण प्रा. वीणा देव म्हणाली की विश्रामबाग वाडा बाबासाहेब पुरंदऱ्यांनी चांगला केला आहे. म्हणून मी आणि जागिरदार बाबासाहेबांना भेटायला गेले. त्यांच्याकडे कळलं, विश्रामबागवाड्याचा बाहेरचा भाग सरकारी खात्याच्या ताब्यात आहे. पण आतला भाग बाबासाहेबांनी रंगरंगोटी करुन चांगला तयार केला आहे.



**एकेका भूमिकेसाठी एकेक व्यक्ती डोळ्यासमोर होती...**

सरकारी मंडळींनी महिरप असलेली सुंदर कमान कापून टाकून त्या ठिकाणी खिळे मारले होते. पण बाबासाहेबांनी पूर्वीसारखी कमान फायबर ग्लासमधे ओतून तयार करुन त्या ठिकाणी बसवून तिला रंग दिला. बाबांनी केलेले बदल आज तुम्हाला कळणार नाहीत. बाबासाहेबांनी ''स्वामी'' साठी त्यांनी सांभाळलेला वाड्याचा भाग देण्याचं कबूल केलं. यामुळे ''स्वामी'' मालिका होऊ शकली. हा खुद्द बाजीरावाचाच वाडा. त्यामुळं बदल करण्याची काही आवश्यकताच नव्हती. बाबासाहेबांनी आम्हाला मुक्तद्वार ठेवलं. रात्रंदिवस आम्ही त्या ठिकाणी चित्रीकरण केलं. शस्त्रागार, गालिचे, देवघर, बायकांच्या पैठण्या, दागिने या बऱ्याच गोष्टींसाठी पुरंदरे, मेहेंदळे, बापू गोखले यांची मदत झाली. त्याचं मोल कसं करणार ? आम्ही आमच्या कुवतीप्रमाणे ज्यांना मानधन दिलं. मात्र त्यांनी एका शब्दानंही तशी अपेक्षा व्यक्त केली नव्हती.

पात्रयोजना कशी केली म्हणाल तर एवढंच सांगतो, एकेका भूमिकेसाठी आमच्या डोळ्यासमोर एकेक व्यक्ती येत गेल्या आणि त्या आम्हाला मिळत गेल्या. मृणालला मी अगदी लहान म्हणजे जन्मापासून पाहिली म्हणा. रमा म्हणून ती अगदी प्रथमपासून माझ्या डोक्यात होती. जागिरदारांनी तिला पाहिली नव्हती. त्यांच्या डोळ्यासमोर दुसरी मुलगी होती. पण मृणालला पाहिल्यावर रमा म्हणून ती त्यांना एकदम योग्य वाटली. मल्हारराव होळकर व्हायला सूर्यकांत चांगला. त्यांचं बोलणं, हसणं, उठणं, चालणं. सगळं मल्हाररावाला साजेसं. निजामाचा सरदार म्हणून मधुकर तोरडमल डोक्यात आला. आता पुढे गुलाबराव म्हणून राम नगरकर आणि लुबरा भटजी म्हणून शरद तळवलकर येईल. ते कसे वाटतात पहा. सगळे अभिनयात समर्थ....

पहिल्याचं चित्रीकरणाच्या वेळची घटना सांगतो. माधवरावाचा पोषाख तयार झाला. पुस्तकातील पेशवेकालीन कपडे, दागिन्यांची जडणघडण यांच्या माहितीनुसार सर्व तयारी केली होती. नाटकाचे कपडे शिवणारे विशिष्ट शिंपीच ते शिवून देतात. पहिलं दृश्य दरबाराचं होत. माधवराव दरबारात येऊन बसले. भोवताली दरबारी मंडळी बसली. ध्वनी- पार्श्वध्वनी- ललकारी सगळे होऊन चित्रीकरण झाले. नंतर बाबासाहेब आले. म्हणाले, 'हे काय ? माधवरावाला अुपरणं नाही. कट्यार नाही. पगडीवर महत्त्वाचं पान असायला हवं ते नाही. हे सगळं पाहिजे.' झालं ! झालेलं सगळं चित्रीकरण रद्द करावं लागलं. एका अुपरण्यापायी दिवस वाया गेला. या पहिल्या मालिकेत आम्हीही एकीकडे शिकतच होतो. तशा गमतीजमती चालायच्या. राघोबा म्हणून मी गोटा करणार. रवीही गोटा करणार. बाळ कर्वेही (गंगोबा) दया डोंगरेला निरोप पाठवला, ''ऑथेंटीसिटी म्हणून हे दोघं गोटा करताहेत. दया, गोपिकाबाईची भूमिका करताना तू ऑथेंटीसिटीचा विचार करणार का ?'' मी एकदा म्हणालो, ''मला गोटा करण्याची आवश्यकता नाही. निर्माता असल्यामुळे माझी सगळ्या बाजूंनी चंपी होणारच आहे.'' चित्रीकरणाचे दिवस असे आनंदाचे मजेचे होते.

**मालिकेला दूरदर्शनची मंजुरी मिळणं, मंजुरी मिळाल्यानंतर प्रायोजक मिळणं, विशेषत: मराठी मालिकेला प्रायोजक मिळणं हे कठीण असतं असं मी ऐकलं आहे. तुमचा काय अनुभव ?**

मालिकेला दूरदर्शनची मंजुरी मिळायला आम्हाला काहीच त्रास पडला नाही. कारण 'स्वामी' कादंबरी गाजलेली होती. गजानन जागिरदारांचं आणि माझं नावही प्रस्थापित झालं होतं. मालिका हिंदीत करावी की काय असा विचार एकदा होता. पण ते तितकं व्यवहार्य वाटलं नाही. शिवाय बायकामंडळींकडून कॉमेंट आली- 'इश्, रमा काय हिंदीत बोलणार ?' मी म्हटलं, 'ज्या ठिकाणी मालिका हमखास अुचलली जाईल तिथंच करावी.' दरबाराचं पहिलं दृश्यच पायलट फिल्मसाठी केलं होतं. पायलट फिल्म ताबडतोब पास झाली. अर्थकारण यानंतर सुरु होतं.

## व्यवहार आणि महाराष्ट्र

आज मराठी मालिका हे seller's Market नाही. ते buyers' Market आहे. त्याचा हिशोब असा आहे. आज मराठीला मुख्य वेळेला (prime time) दर दहा सेकंदाला अठरा हजार रुपये असा जाहिरातीचा दर आहे. प्रायोजकाला रात्री आठ ते साडेआठच्या दरम्यान मालिका प्रायोजित करण्यासाठी दीड मिनिट फुकट मिळतं. म्हणजे नव्वद सेकंद- नअू स्लॉट्स फुकट मिळतात. म्हणजे त्याचे एक लाख बासष्ट हजार रुपये वाचतात. हा स्लॉट आरक्षित करण्यासाठी त्याला वीस हजार रुपये द्यावे लागतात. म्हणजे त्याचे एक लाख बेचाळीस हजार रुपये

वाचतात त्यातले पधरा टक्के तो जाहिरात एजन्सीला शुल्क म्हणून देतो. प्रायोजकाला तीस मिनिटाचा वेळ दिलेला असतो त्यातली पचवीस मिनिट आम्हाला मिळतात. त्यातल दीड मिनिट तो त्याच्या जाहिरातीसाठी घेतो. अुरलेल्या वेळात त्याला करमणुकीच काहीतरी द्यायच असत ती मालिका. आज इथ अशी स्थिती आहे की निर्मात्याला प्रायोजकाच्या अुबऱ्यापर्यंत पोहोचता येत नाही निर्माता आणि प्रायोजक याच्यामधे दुवा म्हणून म्हणा किवा दलाल म्हणा जाहिरात एजन्सी काम करते. याचे काही फायदे, काही तोटे आहेत. निर्माता आणि प्रायोजक याच्यामधला प्रत्येक व्यवहार या जाहिरात एजन्सीमार्फत होतो.

या नव्या अर्थव्यवहाराच आव्हान आमच्या महाराष्ट्रीय मडळींना कळल नाही पैसे देणारा मनुष्य मराठी नसतो. प्रामुख्याने पजाबी, गुजराथी, मारवाडी असतो. तुम्ही मरायच किंवा समोरच्याला मारायच अस वॉर फूटींगच हे अर्थशास्त्र चालल आहे. आज मराठी दूरदर्शन मालिकाची इतकी दैन्यावस्था आहे कारण कोणी या पद्धतीन अजून हे अर्थकारण हाताळल नाही महाराष्ट्र हे लोकसख्येच्या दृष्टीन तिसऱ्या क्रमाकाच राज्य आहे

---

**''कादंबरी शेवटपर्यंत न्यायची तर रमेनं सती जाणं दाखवावं लागेल... रमेचं उदात्तीकरणही करावं लागेल.''**

---

औद्योगीकरण महाराष्ट्रात खूप झालेल आहे. परतु दूरदर्शनवर सुरु होणारा नवा आर्थिक व्यवहार महाराष्ट्रीय लोकानी लक्षात घेतला नाही. रगभूमीवर आयुष्यभर राबून मला जेवढ्या लोकानी पाहिल नाही तेवढे लोक दूरदर्शनवरुन एका क्षणात मला पहातात ही या माध्यमाची ताकद लक्षात न घेअून कस चालेल ? पण महाराष्ट्रियानी ती लक्षात घेतली नाही. इतरानी ही ताकद लक्षात घेअून दूरदर्शनच्या जाहिरातींच्या जगात पाय रोवले. मग ते महाराष्ट्रीयाना कळल पण फार जुजबी पद्धतीन कळल. पाहिजे तितक्या गाभीर्यान त्यानी ते घेतल नाही म्हणून माझी तडफड तडफड होते माझ स्वतःच काही वाईट चालल नाही. माझ अुत्तम आहे पण मला वाटत, मराठी साहित्य गुणवत्तेत अुत्तम आहे. त्यातल दूरदर्शनवर का येत नाही ? कारण महाराष्ट्रियाजवळ स्वतःजवळ पैसे नाहीत आणि इतर कोण त्याना पैसे देणार ? एक विको वज्रदतीच्या पेंढारकराना हे अर्थकारण अुमगल होत बाकी म्हणजे माझी अशी तक्रार आहे की 'अर्थमूला क्रियासिद्धि'' हे आम्ही कधी लक्षातच घेतल नाही तर त्याऐवजी ''क्रियासिद्धी सते भवति महतानोपकरणे'' अशी आमची धारणा म्हणजे सत्त्वशील असल की झाल, कुठनतरी पैसे अुभे राहतात अशी आमची कल्पना. जो कोणी पैसे घालतो तो त्याचा मास्टर होतो हे आपण लक्षात घेतल पाहिजे

**अर्थकारणात जर आपण क्रमांक दोन तीन चार वर राहिलो तर *गुणाढ्य असूनही सामाजिक दृष्ट्या आपण क्रमांक दोन तीन चार* ढकलले जातो हे आधी आपल्या लक्षातच येत नाही. आलं तरी अुशीरा लक्षात येतं. अुशीरा लक्षात आल्यावरही आपल्याला त्याचं दुःख होत नाही. उलट समृद्धीमुळं गुणवत्तेची हानी होते अशी आपली खालच्या स्तरापासून वरच्या स्तरांपर्यंत सर्वांची मूर्खपणाची कल्पना आहे.**

महाराष्ट्रातल्या मुबईमध्ये आपण क्रमाक एकचे नागरिक नाही दोन तीन चारवर आहोत म्हणून मी निर्माता झालो.

को- ऑपरेटिव्ह यूनिट करायच ठरवल. पण त्यात इतक्या भानगडी की मला ते शक्य झाल नाही शेवटी पहिल्या कथाभागासाठी (episode) आम्ही मित्रानी मिळून पैसे अुभे केले खर्च अपेक्षेपेक्षा जास्त झाला. पुढे तो प्रायोजकानी दिला. एकाच जाहिरात एजन्सीला आम्ही जोडले नसल्यामुळे त्या एजन्सीने दुसऱ्या एजन्सीला विकले. दुसऱ्या एजन्सीने प्रायोजक घाडले. आम्हाला दोन गाळणी लागली त्यातून हल्ली निर्मात्याला चार कथाभाग तयार करावे लागतात त्याशिवाय तारीख मिळत नाहीत. तारीख मिळाल्याशिवाय प्रायोजक पुढे येत नाही. एकेकाळी निर्मात्याला मजुरीच पत्र मिळाल की प्रायोजक जाहिरात एजन्सी धावत त्याच्याकडे येत होती. बघता बघता परिस्थिती बदलली. Now they are blood hounds. They grab the opportunity and *the picture changed to this level today मला तोटा झाला नाही.* पण फायदाही झाला नाही. बुक बॉन्ड आणि विप्रोने तेरा कथाभागाचा करार केला होता पुढच्या भागासाठी मजुरी मिळाली तरी त्याचे अर्थसहाय्य करारप्रमाणे त्यानी थाबविले परिणामी मालिका थाबवावी लागली

***मालिका थांबण्यामागे 'सती' प्रकरणाची चर्चा होती का ? या चर्चेबद्दल तुमचं स्वतःचं मत काय ?***

मालिका थाबण्याच कारण 'सती' नव्हती. कराराप्रमाणे तेरा भाग झाले आणि मालिका थाबली. पुन्हा पैसा गुतवण्यात प्रायोजकाच्या काही अडचणी असतील. काही धोरण असतील

'सती'बद्दल मी अस म्हणतो राजस्थानमधे रुपकुँवर सती गेली म्हणून रमाच्या सती जाण्यावर महाराष्ट्रात खळबळ अुडाली एरवी रमाच सती जाण प्रेक्षकाना खटकल नसत. एवढच नाही तर कादबरीप्रमाणे त्याच अुदात्तीकरणही चालल असत. मुख्य गोष्ट अशी आहे की तेरा भागात कादबरी फक्त एकशेवीस पानापर्यंत येणार होती. म्हणजे राघोबाने माधवरावाला 'तूच पेशवा हो' म्हटल येथपर्यंत येणार होती. रमेच सती जाण प्रथमपासून यात येतच नव्हत. पण चर्चा म्हणजे- 'बाजारात तुरी,- भट भटणीला मारी' - तसा प्रकार झाला.

एक गोष्ट कानावर आली ती सागतो. बायकामडळी 'सती' विरुद्ध दूरदर्शन केंद्रावर मोर्चा घेअून आली होती. त्याच्यापैकी काहीजणींनी नतर टीव्हीवाल्याना विचारल ''आम्ही मोर्चा आणला होता तर सध्याकाळच्या बातम्यामधे आम्हाला कव्हर करता आहात ना ?'' यात अशक्य काही नाही. माणूस हा शेवटी माणूस असतो. निर्माता म्हणून एक सागतो, **कादंबरी शेवटपर्यंत न्यायची तर रमेचं सती जाणं दाखवावं लागेल. एवढच नाही तर रमाचं अुदात्तीकरणही *करावं लागेल.* पण दृश्य अुगीच भेसूर भडक करणं योग्य नाही.**

जो दैन्यात गेला, भुकेकंगाल राहिला, तो मोठा कलाकार... अशी आमची मराठी कल्पना....''

याबद्दलची माझी कलात्मक अभिव्यक्ति सागतो. माधवराव आसन्नमरण- रामशास्त्री काहीतरी सागायला आले आहेत. रमाबाई म्हणतात,

''आताच डोळा लागला आहे.''

रामशास्त्री म्हणतात, ''अुठवल नाही आणि सतापले तर ?''

रमाबाई म्हणतात, ''इतक महत्त्वाच आहे का ?'' अस म्हणून अुठवतात.

रामशास्त्री सागतात, ''रोहिले पठाणाना बीमोड करण्याइतपत झोडपल'' ऐकल्याबरोबर माणूस अुठला. पेशवाईची वस्त्र आणून देवाला गेला. जसा काही एक धक्का बसून तो बराच झाला. महाराष्ट्रभर दिवाळीच दारुकाम दिसू लागत. नतर आग दिसते. कॅमेरा जवळ गेला की ती चिता आहे हे लक्षात येत त्या चितेतून एकटा पक्षी अुडत जातो. दुसरा पक्षी कुठून तरी येअून त्याच्याबरोबर जातो रमा-माधव गेल्याच हे सूचक. आम्हाला जर बावन्न भाग मिळाले तर आम्ही सतीपर्यंत पोहोचू. आणखी एक 'जर-तर' सागतो. जर आम्ही सती दाखवली असती आणि नतर राजस्थानात सती गेली असती तर मला अपराधी वाटल असत.

पण स्वामी बद होण्यामागे 'सती' नव्हती अर्थकारण होत हे निश्चित. मराठी मालिका मुबईत तयार होते. कॅमेरा-प्रकाशयोजनेची अुपकरण सगळ मुबईत महाग आहे. मराठीला खर्च हिंदी मालिकेइतका होतो आणि प्रेक्षक हिंदीपेक्षा खूप कमी. तेव्हा प्रायोजक विचार करणारच की त्याची जाहिरात सहा कोटी लोकापेक्षा नव्वद कोटी लोकापर्यंत पोहोचलेली केव्हाही बर.

**सगळ्याच प्रादेशिक भाषेतील मालिकांपुढे हा प्रश्न आहे का ?**

थोड्या प्रमाणात आहे पण मराठीत तो जास्त आहे. मद्रासमधे हिंदी बातम्या दाखवत नाहीत तो वेळ ते त्याच्या प्रादेशिक कार्यक्रमाला वापरतात नतर रात्री नअूपासून तिकडे टीव्ही कोणी पहात नाही त्यामुळे जाहिरातीसाठी प्रायोजकाना प्रादेशिक भाषेचा कार्यक्रमच घ्यावा लागतो शिवाय मद्रासमधे मालिका तयार करायला मुबईपेक्षा खर्च कमी होतो

'स्वामी'ला खर्चाचा प्रश्नही विशेषच होता. कारण ती ऐतिहासिक आहे माझा दहा वर्षाचा मुलगा मला म्हणाला, '''बाबा तुमचे पेशवे आणि मडळी तलवारी नुसत्या कमरेला लटकावून फिरतात. त्या म्यानातून बाहेर काढीतच नाहीत '' मी त्याला म्हटल, ''तलवार बाहेर काढायची तर एक लाख रुपये लागतील. कसे आणायचे ? नाहीतर ती बाहेर काढलेली तलवार तुझ्या बापाला स्वतःच्या मानेवर फिरवून घ्यावी लागेल '' एक युद्धदृश्य दाखवायला दीड-पावणेदोन लाख रुपये पाहिजेत शक्य नाही मग युद्ध दृश्य अुसनी घेण भाग आहे.

**'स्वामी' ला जनतेने प्रतिसाद कशाप्रकारे दिला ? 'स्वामी' बंद झाल्यावर जनतेची प्रतिक्रिया काय होती ? 'स्वामी' पुन्हा कशी सुरु झाली ?**

'स्वामी'ला अफाट लोकप्रियता मिळाली. एकदा एक वृद्ध गृहस्थ चित्रीकरणाच्या वेळी आले. म्हणाले 'माधवराव' कुठे आहे ? रवी पुढे आला. गृहस्थानी झट्कन् त्याला वाकून नमस्कार केला. रवी सकोचला अस करु नका म्हणाला. ते गृहस्थ म्हणाले, 'अहो तुम्ही काही वाटून घेअू नका. मी आमच्या माधवराव पेशव्याला नमस्कार केला ' श्री. म. माटे यानी 'माणुसकीचा गहिवर' जे म्हटल आहे, त्याची मला त्यावेळी आठवण झाली माटे म्हणाले होते, रामाचे पाय धुवायला गुह बसला होता तेव्हा त्याला काय वाटल, राम-सीतेने परस्पराना पाहिल तेव्हा त्याना काय वाटल हे जर याची देही याची डोळा मला पहायला मिळेल तर मी अुरलेल्या आयुष्याच दान सुखान करीन माट्यानी जे नेमक्या शब्दात सागितल ते आपल्याला सागता येत नाही. पण आपल्याला सगळ्याना ते वाटत असत. त्या वृद्ध गृहस्थाची भावना ही अशीच असावी.

मार्केट रीसर्चप्रमाणे 'स्वामी' चा प्रेक्षकवर्ग ऐशी टक्के होता 'स्वामी' बद झाली. ती पुन्हा सुरु करण्याचा आग्रह चोहोबाजूनी सुरु झाला. पेट्रोल पपावर पेट्रोल भरणारा माणूस मला म्हणाला, 'स्वामी पुन्हा सुरु करा इडस्ट्रियॅलिस्टावर मोर्चा न्यायचा का ?'' गोरेगावहून एका मुलाचा फोन आला, ''आमच्या भागात आम्ही ब्रुक बॉन्डवर बहिष्कार घालणार आहोत.'' एकेक रुपया काढून 'स्वामी' ला फड

## आमची प्रतिमा अुजळेल

काही महिने खडित झालेली ही मालिका व्हिडीओकॉन टीव्हीने प्रायोजित केल्यामुळे परत सुरू झाली यात सुमारास व्हिडीओकॉनचे श्री. रमण भेंडे याची भेट घेतली. रात्री ९ वाजता प्रसारित होणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरच्या हिंदी मालिका उपलब्ध असताना तुम्ही रात्री ८ ची प्रादेशिक कार्यक्रमाची वेळ आणि मराठी मालिका का निवडलीत ? अस विचारल असता श्री भेंडे म्हणाले -

''थोरले माधवराव पेशवे आणि रणजित देसाई याची त्याच्या जीवनावरची कादबरी ''स्वामी'' या दोन्ही गोष्टी अभिरुचीसपन्न, सुसस्कृत मराठी माणसाच्या मनात घर करून राहिल्या आहेत महाराष्ट्राच्या भावविश्वात त्याना एक विशिष्ट स्थान आहे शिवाय 'स्वामी' अर्धवट स्थितीत बद पडल्यामुळे त्या मालिकेच्या असख्य चाहत्याची अनेक प्रकारे घोर निराशा झाली होती पुढील भाग पाहण्याची त्याची अिच्छा अतृप्त राहिली होती, त्यामुळे प्रेक्षकवर्ग मोठ्या प्रमाणावर मिळणार होता. शिवाय, ज्या अुच्चशिक्षित, सुसस्कृत मराठी माणसापर्यंत जाऊन आम्हाला पोहोचायचे होते तो माणूस म्हणजे 'स्वामी' चा प्रेक्षक हे आम्ही ओळखले होते आणि म्हणूनच रात्री ९चा राष्ट्रीय कार्यक्रम न घेता हा प्रादेशिक कार्यक्रम आम्ही घेतला या निमित्ताने आम्ही टीव्हीवर प्रथमच आलो. माझी खात्री आहे की या कार्यक्रमाशी आमचे नाव निगडित झाल्यामुळे महाराष्ट्रात व्हिडीओकॉनची प्रतिमा जास्त उजळ होईल.''

देण्याची जनतेची तयारी होती. या लोकप्रियतेचा मला केव्हाही आनद झाला. आनद आहे.. पण दुःख या गोष्टीचं होत की आपण मराठी माणस आर्थिक व्यवहार समजावून घेत नाही. प्रायोजित कार्यक्रम हा प्रायोजक पाठीमागे अुभा राहिल्याशिवाय करण शक्य नाही हे आपल्याला समजल पाहिजे. नुसत्या अुत्साहाचा, सदिच्छाचा काहीही अुपयोग नसतो.

**मराठी समाज आर्थिक दृष्ट्या दौर्बल्यावस्थेत आहे कारण हे असं भावूक बोलायला त्याला फार आवडतं. जो दैन्यात गेला तो मोठा कलाकार. जो भुकेकंगाल आहे तो मोठा कलाकार जो बेशिस्त वागला, ज्याने पैसा अुधळला तो मोठा कलाकार अशी आमची मराठी कल्पना. असा कलाकार दुसऱ्याच्या घरी जन्मावा, माझ्या घरी नको. अशी आणखी आपली कल्पना. जो थोडा पैसा राखून ठेवेल, अर्थकारणाचा विचार करेल तो कसला कलाकार? असं आम्हाला वाटतं. 'स्वामी' अर्थकारणात अडकली कारण प्रायोजकांच्या लॉबीत आमची महाराष्ट्रीय माणसं नाहीत.** आज महाराष्ट्राच्या सहकारी क्षेत्रात चार हजार कोटी रुपये पडून आहेत. 'सामना' मधे निळू फुलेन सहकार क्षेत्राची काळी बाजू तेवढी दाखवली. पण त्याची आर्थिक ताकद ओळखून तिचा अुपयोग आपण करून घेअू शकत नाही. वाळवा तालुक्यात राजाराम बापू पाटील याचा सव्वीस-सत्तावीस वर्षाचा मुलगा तीस-चाळीस कोटींचा व्यवहार मजेत करीत होता. सहकार क्षेत्रातल्या तरुणाच्या ताकदीचा ओघ अजून दिल्लीच्या दिशेन नाही. अशाची आर्थिक ताकद मुबईतल्या या नव्या क्षेत्राकडे कोणी वळवू शकल नाही. सपत्तीमुळं, समृद्धिमुळे गुणवत्तेची हानी होत नाही. गुणवत्ता वाढण्यासाठी सतत काहीतरी करण्याची ओढ, धडपड आवश्यक पाहिजे. विजया मेहतामधे गुणवत्ता कुठ कमी आहे? आपल्या काही कल्पनाच फार चुकीच्या आहेत.

'व्हिडिओकॉन' कपनी प्रायोजक म्हणून पुढ आली आणि 'स्वामी' पुन्हा सुरु झाली. अन्य कोणी का आल नाही? 'व्हिडिओकॉन'च का आली हे मला सागता येणार नाही. दिल्लीला प्रायोजित कार्यक्रमात शिरण त्याना कठीण असेल म्हणून मराठी मालिकेकडे असू शकतील बाकी अुत्तर नाही. व्हिडिओकॉनच्या एजन्सीनं विनय आपटेला फोन केला. विनय आपटेनी मला कळवल आणि 'स्वामी'चा व्यवहार पक्का झाला. मालिका पुन्हा सुरु झाली. प्रेक्षकानी जोरात स्वागत केल.

**सगळी जमवाजमव पुन्हा करताना, काही अडचणी आल्या? मधे काही काळ निघून गेल्यावर पोषाख, दागिने यांचे जुने संदर्भ लक्षात घेअून सगळं परत सुरु करणं कठीण गेलं असेल.**

अडचणी काही खूप आल्या नाहीत. थोड्या आल्या. मृणालची (रमा) परिक्षा जवळ आली. आमची निश्चिती नसल्यामुळे सुधीर दळवी, (सखारामबापू) इतर चित्रपटाच्या चित्रीकरणाना तारखा दिल्या. तरी एकदरीत सगळ्याचं सहकार्य आहे म्हणून जड गेल नाही. प्रथम जे कपडे आम्ही वापरले ते नतर मिळाले नाहीत. पहिल्या दरबारात राघोबा ज्या पोषाखात बसला होता तो पोषाख नतर मिळाला नाही. पण त्याने काही बिघडत नाही. इतक्या दिवसात प्रेक्षकाना तसा विसर पडला असतो. एकदरीतच दूरदर्शन या मालिकेत दोन दृश्यामधे साखळी (continuity) लागते. तितकी दोन कथाभागात लागत नाही. कारण मधे सात दिवस गेलेले असतात. आम्ही एक मात्र केल, बऱ्याच दिवसानतर 'स्वामी' पुन्हा सुरु झाली तर आधी होअून गेलेल्या घटनाच धावत दर्शन प्रेक्षकाना द्यायच अस ठरवल. हे धावत दर्शन घडवताना आम्ही वास्तवाच भान ठेवलं. निजाम आणि भोसले मिळून पेशवाई बुडवायला निघाले. राघोबादादाच्या गारद्याचा गराडा माधवरावाभोवती पडला. दुःखाच्या या कड्यावर अुभा राहून नतर निजामाला नेस्तनाबूत करून विजयी होअून माधवराव परत आले. सिहासनावर बसले आता त्याना जुन सगळ आठवण हे स्वाभाविक आहे ना? त्याना महत्त्वाच्या घटना आठवत आहेत अस आम्ही घेतल. आणि आमच्या प्रेक्षकानाही 'स्वामी' मालिकेतल्या महत्त्वाच्या घटनाच स्मरण दिल.

**'स्वामी' मालिका हिंदीमधे करण्याचा विचार आहे का?**

सधी मिळाली तर जरुर करु. 'स्वामी' हा काही फक्त मराठ्याचा इतिहास नाही. हा भारताचा इतिहास आहे. विशेषत पेशव्याच्या काळात बाजीरावानतरचा इतिहास हा भारताचा इतिहास आहे. किंवा भारतातील महत्त्वाच्या पानाचा इतिहास आहे. म्हणून हिंदी मालिका करण मला आवडेल "पूर्व दिव्य ज्याचे त्याना रम्य भावी काळ" किंवा "आपण त्याच्या समान व्हावे हाच सापडे बोध खरा" या कविवचनाना स्मरुनही मला 'स्वामी' मालिका हिंदीत करणे आवडेल मी जरी विज्ञानाचा विद्यार्थी होतो आणि व्यवसायाने आर्किटेक्ट आहे तरी इतिहास मला आवडतो. माझे वडील कीर्तनकार. महिम्न, पुरुषसूक्त, अथर्वशीर्ष सगळ पाठ आहे माझ. या सस्कारामुळेही इतिहास मला प्रिय वाटत असेल.

o o o

With Best Compliments from

K.M. BAHARAY.

K.M. BAHARAY & CO.
354 NARAYAN PETH
LAXMI ROAD
PUNE 411030
TEL - 444526

BEHARAY ASSOCIATES
SHOP NO 4,5
SHIV - NANDAN SOCIETY
TILAK ROAD PUNE - 30
TEL: 36604

# 'सती' मागचं प्रेम दाखवणार -

''कादंबरी तेरा भागातच
पूर्ण होईल.
आणखी भाग काय करायचे ?
वरणात पाणी घालून
वाढवणाऱ्यांपैकी मी नव्हे''

''सती हा आदर्श म्हणून
दाखवणार नाही...
मात्र ज्यामुळे
रमा सती गेली ते प्रेम
मला दाखवायचं आहे''

## गजानन जागिरदार

**'स्वामी' ही तुमची पहिलीच मालिका? ''स्वामी'' दूरदर्शनवर मालिकारुपानं करावी असं तुम्हाला का वाटलं ?**

'स्वामी' ही दूरदर्शन मालिका म्हणून प्रथमच मी दिग्दर्शित करीत आहे. यापूर्वी दूरदर्शनवर दोन-तीन नाटकं मी केली होती. बारा वर्षापूर्वी दूरदर्शनवर ''अप्पा, तुम्ही जाऊ नका'' हे नाटक मी लिहिलं आणि सादर केलं. विनायक चासकरांची निर्मिती होती. अप्पांचं कामही मी केलं होतं. नंतर जी. ए. कुलकर्णींच्या कथेवर आधारित एक दूरदर्शन नाटक केलं होतं. हिंदीमधे मी तीन दूरदर्शन-फिल्म केल्या 'जादुगर' मधे संजीवकुमार होता. 'आकाशकुसुम' आणि 'ये सच है' या इतर दोन फिल्म. त्यानंतर 'स्वामी' ही मालिका.

मराठीत प्रायोजित मालिका सुरु होणार आहेत हे कळलं तेव्हा माझ्या मनात दोन पुस्तकं आली. एक गो. नी. दांडेकरांचं ''कुणा एकाची भ्रमणगाथा'' आणि दुसरी रणजित देसाईंची ''स्वामी'' 'कुणा एकाची भ्रमणगाथा' हे अगदी काव्यमय आहे. नायकाचे परिक्रमेतले अनुभव दाखवणं सुंदर. पण ती परिक्रमा, ते अव्यक्त प्रेम हे तरल अनुभव प्रेक्षकांपर्यंत नीट पोहोचतील की नाही याची खात्री वाटली नाही. 'स्वामी' त्यापेक्षा सोपं. लोकांपर्यंत सहज पोहोचू शकणारं! म्हणून 'स्वामी' चा निर्णय मी घेतला. माझं वय ऐंशी. मालिका करणं म्हणजे खूप धावपळ. दगदग. ती माझ्याच्यानं होणं नाही. श्रीकांत मोघेचं नांव डोळ्यासमोर आलं. विचारल्याबरोबर ततक्षणी त्याने होकार दिला. पटकथा, लेखन आणि दिग्दर्शन या फक्त माझ्या जबाबदाऱ्या. बाकी सगळं जे काही करायचं ते श्रीकांतनं केलं.

**तुमची हयात चित्रपटात गेली. दूरदर्शन माध्यम तुमचं वय लक्षात घेता तसं बरंच उशीरा आलं. ते तंत्र हाताळायला तुम्ही कोठे कसे शिकलात ?**

दूरदर्शनशी ओळख झाली तेव्हा मी सत्तरीत होतो. नवं माध्यम आलं आहे म्हटल्यावर शिकण्याची उत्सुकता वाटली. फिल्म इन्स्टिट्यूटमध्ये टीव्ही फिल्म करणाऱ्यांकडून मी ते शिकलो. चित्रपट आणि दूरदर्शन यांची मूलतत्त्वं एकच आहेत. फक्त त्यांच्या पध्दती वेगळ्या आहेत. संकलन करताना चित्रपटात आम्ही कात्री वापरतो. दूरदर्शन फिल्मचं संकलन होताना ती एका टेपवरून दुसऱ्या टेपवर जाते. दूरदर्शनचं सॅटेलाइटवरून प्रक्षेपण होतं त्यातही मला भाग घ्यावासा वाटला-घेतला. सॅटेलाइटचं प्रक्षेपणाचं काम करुन पाहिलं. अजूनसुद्धा कोणतं नवीन माध्यम आलं तर शिकणं मला आवडेल.

**'रामशास्त्री' या तुमच्या चित्रपटाला आणि तुमच्या भूमिकेला लोकप्रियता अफाट मिळाली. आताही 'स्वामी' मालिकेला अशीच लोकप्रियता मिळाली. त्यावेळच्या आणि आत्ताच्या प्रेक्षकांच्या प्रतिसादात तुम्हाला काही फरक जाणवतो का ?**



जागिरदार व मोघे : जुळलेले रसायन

फरक खूपच आहे. ''रामशास्त्री'' चित्रपट कधीतरी, कुठेतरी दाखवला जायचा. त्याची केव्हातरी कोणीतरी दखल घेऊन अभिप्राय सांगायचं. ''स्वामी'' मालिकेचं कसं झालं, रोज मी सकाळी शिवाजी पार्कला फिरायला निघालो की भोवतालचे ओळखीचे, अनोळखी लोक ''स्वामी'' बद्दल सांगायला लागतात. काल दूरदर्शनवर भाग झाला की आज लगेच प्रतिक्रिया. ''रामशास्त्री'' चित्रपटात मला भूमिकेचं आणि दिग्दर्शनाचं अशी दोन पारितोषिकं मिळाली होती. पण त्या काळी चित्रपटांवर वर्तमानपत्रातून तुरळक समीक्षा कधीतरी असायची. आता मालिकेच्या आधी-नंतर टीका-प्रतिटीका, चर्चा यांचं प्रमाण वर्तमानपत्रातून खूपच वाढलं आहे. त्यावेळच्या प्रेक्षकांनाही आजच्या प्रेक्षकांइतकं ज्ञान नव्हतं. आजच्या प्रेक्षकांना रस जास्त. स्पॉन्सर करणाऱ्यांबद्दल वगैरे लोकांनी किती विचारलं! किती पत्र लिहिली!

'स्वामी' बंद झाल्यावर माझ्याकडे एका बाईचं पत्र आलं, त्यांनी लिहिलं होतं, ''आम्हाला कळलं स्पॉन्सरमुळे ''स्वामी'' बंद पडली. त्या दिवशी वाण्याच्या सामानाची यादी मी तयार केली होती. त्यातून 'ब्रुक बॉन्ड'' चहा काढून टाकला. दुसरा घेतला. 'विप्रोचे' साबण वगैरे काढून टाकले. दुसरे घेतले आणि ठरवलं या दोन कंपन्यांचं काहीही घ्यायचं नाही. सगळ्यांनी मिळून मालिका सुरु केली पाहिजे. मी सामान्य गृहिणी. मला शक्य आहेत ते रु. १००/- पाठवते.' आमचे फॅमिली डॉक्टर माझ्या घरी येऊन म्हणाले, 'अहो मी इतर पेशंट्सच्या आग्रहामुळे तुमच्याकडे आलो. बऱ्याच बायकांनी सांगितलं आहे की 'स्वामी' सुरु होण्यासाठी आम्ही दागिने गहाण टाकायला तयार आहोत.'' मी डॉक्टरांबरोबर त्यांना कळवलं, ''तुमची भावना फार चांगली आहे. पण ती आम्हाला उपयोगाची नाही. आम्हाला कोणीतरी प्रायोजक पाहिजे. हा धंदा वेगळा आहे. सहानुभूतीचा उपयोग नाही.''

**मराठी माणसं अर्थकारणाचा, शिस्तीचा विचार करीत नाहीत का ?**

मी कोणाला दोष देत नाही. ज्याच्या त्याच्या स्वतःच्या कल्पना असतात. स्वतःचा धंदा असतो. तो करण्याची पद्धत असते. आबासाहेब गरवाऱ्यांची आणि माझी जुनी ओळख. माझी पहिली कार मी त्यांच्याकडून घेतली. 'स्वामी' बंद पडल्यावर त्यांची काही मंडळी म्हणाली की 'स्वामी' सुरु करण्याची त्यांची इच्छा आहे. आम्हाला आनंद वाटला. आठ दिवस आम्ही कधी प्रत्यक्ष बोललो, कधी फोनवर बोललो. शेवटी ते म्हणाले अमूक दिवशी आमची मिटींग आहे तेव्हा आम्ही ठरवू. शेवटी त्यांनी सांगितलं, ''आमच्या सल्लागाराचा सल्ला आहे एवढेच पैसे हिंदीत गुंतवले तर जाहिरात जास्त लोकांपर्यंत पोहोचेल.''

मी त्याना म्हटल, महाराष्ट्रीय लोकाना मदत आणि प्रोत्साहन या दृष्टीन तुम्ही विचार केलात तर बरं होईल. ते म्हणाले, आम्हाला आमच्या मर्यादा आहेत. 'गोदरेज' मधे बरेच मराठी अधिकारी आहेत त्यानी 'गोदरेज' प्रायोजक मिळविण्याचा प्रयत्न केला. आम्ही त्यांना पाहिजे तो सगळा तपशील दिला. पण त्याचा प्रयत्नही यशस्वी झाला नाही. आणखी एक किर्लोस्कर- ते म्हणाले, 'आमच्याकडे Consumers' good म्हणून असतो तो नाहीच. आमची एंजिन, नागर याची जाहिरात आम्ही यातून करीतच नाही.'

**'सती'बद्दल खूप चर्चा झाली. तेव्हा तुम्ही म्हणाला होतात, सतीचं अुदात्तीकरण करायचं नाही, रमाबाईंना ओंडक्यासारखी जळताना दाखवायची नाही ? आता मालिका सुरु झाली आहे. तुम्ही नेमकं काय करणार ? त्याचा सामाजिक परिणाम काय होईल ? तुमच्या आताच्या भागात कादंबरी पूर्ण होणार आहे का ? की कादंबरी पूर्ण होण्यासाठी आणखी भाग पाहिजेत ?**

कादबरी तेरा भागात पूर्ण होईल. आणखी भाग काय करायचे आहेत ? वरणात पाणी घालून वाढवण्याऱ्यापैकी मी नाही. 'सती'च त्या काळात अुदात्तीकरण झाल होत. ती भावना आपण सोडून देऊ शकत नाही. मात्र समाजात स्वतत्रपणे अुभी राहू शकणारी स्त्री हाच आमचा आदर्श आज आहे. सती हा आदर्श म्हणून मी दाखवणार नाही. पण रमेची प्रीती मला दाखवायची आहे. रमा-माधवाची अुत्कट प्रीती, ज्यामुळे रमा सती गेली ते प्रेम मला दाखवायचं आहे. हे सगळं कस दाखवायच ते माझ्या मनात अगदी स्पष्ट आहे. पण मी आता तुला ते सागणार नाही. मग लोकाच्या आधीच चर्चा सुरु होतात. त्या मला नको आहेत.

**रगभूमी, चित्रपट, आकाशवाणी, दूरदर्शन- कलेचं हे प्रत्येक माध्यम जे सर्वसामान्य लोकांच्या जीवनाशी निगडित आहे आणि त्यांच्यावर प्रभाव पाडणारं आहे. त्यांचा अुदयकाल, सर्वदूर पसरण्याचा काल तुम्ही जवळून पाहिला आहे. कलाकार म्हणून तुम्ही त्यात वावरलाही आहात. या प्रत्येक माध्यमातला फरक आणि त्यांचा जनमानसावरचा प्रभाव तुम्हाला कसा जाणवला ?**

सुरवातीला मला रगभूमीच जबरदस्त आकर्षण होत. हरींद्रनाथ चट्टोपाध्याय मुबई-दिल्ली-मद्रास सगळीकडे महाविद्यालयातून फिरत. अभिनय गुण असलेली मुले निवडत, त्याना नाटक करायला शिकवत. त्याची नाटकं इग्लिशमध्ये चालत. मी त्याच्याकडून शिकलो. महाराष्ट्रातल बालगधर्वांच नाटक मला आवडल नाही. कारण मी अुत्तर प्रदेशात होतो. तिकडे बायकाची काम बायकानी केलेली मी पाहिलेली होती. पण हरींद्रनाथाच्या शिकवण्यानुसार मी इथे इग्लिश नाटक बरीच केली. आम्ही कॉलेजमधे असताना म्हणजे १९२८ मधे चित्रपट सुशिक्षिताच माध्यम नव्हत. धार्मिक, ऐतिहासिक, फॅन्टसीच्या मूकचित्रपटाच मला कधीही आकर्षण वाटल नाही. परतु कोल्हापूरला चित्रपटातील एका माणसाचा क्लोजअप पाहताना मला त्या माध्यमाच सामर्थ्य तीव्रतेनं जाणवल. नतर मी चित्रपटाबद्दल खूप वाचन केलं. चित्रपटात गेल्यावर रगभूमीकडे परत यावं अस मला कधी वाटलच नाही. आकाशवाणी आली आणि बुखारींनी त्यात 'नाट्य' विभाग सुरु केला. तेव्हा हे माध्यम माहिती करुन घ्याव अस मला वाटल. शामराव ओक या त्या काळच्या विनोदी लेखकाकडे जाअून मी एक नाटक लिहून घेतलं. चाळीतली भाडण, नळावरचे आवाज, स्टोव्ह कपबशाचे आवाज, ती मुलगी पहायला येतात असं आवाजाच्या माध्यमातून ते नाटक सादर केल. बुखारी ते ऐकत त्याच्या खोलीत बसले होते. नाटक सपल्यावर मी माझा चेक घेण्यासाठी गेलो तेव्हा बुखारींनी माझ्यासाठी निरोप ठेवला होता मला येअून भेटा. मी जाअून त्याना भेटलो. ते म्हणाले, 'आमच्यासाठी आणखी नाटक करा.' मी म्हटल, 'मला अनुभव मिळाला. आवडला. पण मी पुन्हा येणार नाही.' चित्रपटाची सर आकाशवाणीला नव्हतीच. आकाशवाणी त्या काळात बातम्यासाठी अुपयोगी होतं. बातम्या, विशेषत. युद्धाच्या ताज्या बातम्या, आम्ही आकाशवाणीवरुन ऐकत होतो. बाकी कलेशी आकाशवाणीचा प्रामुख्यान सबध नव्हता.

**दूरदर्शन येण्यापूर्वी तुमची त्याविषयी काय कल्पना होती ? परदेशातल्या दूरदर्शनबद्दल काही पाहीलं, ऐकलं होतं ? दूरदर्शन आकाशवाणीच्या वळणावर जाईल किंवा चित्रपटाला मारक ठरेल असं तुम्हाला वाटलं होतं ?**

मी परदेशी गेलोच नाही. त्यामुळे दूरदर्शन तिकडे पाहण्याचा प्रश्नच नाही. पण हे दृश्य माध्यम आहे, हे चित्रपटाशी कसा सवाद साधणार आहे हे पाहण्याची मला अुत्सुकता होती. दूरदर्शनचा पडदा लहान आहे. आमचा पडदा मोठा आहे. चित्रपटातला स्टीरिओफोनीक साअूडचा परिणामही दूरदर्शनमधे नाही. त्यामुळे चित्रपट हा दूरदर्शनपेक्षा प्रभावी आहे. त्याला पर्याय नाही अस माझ अजूनही मत आहे.

**दूरदर्शन हे घराघरात पोहोचणारं माध्यम आहे. म्हणून काहीसं ते धोकादायक माध्यम आहे असं म्हटलं जातं. तुम्हाला काय वाटतं ?**

To some extent, it is compulsary medium. घरात टीव्ही सुरु रहातो. आपण पाहत बसतो. खर म्हणजे आपण कार्यक्रम निवडू शकतो. नको तेव्हा टीव्ही बद करु शकतो. मात्र दूरदर्शन आदर्श ठेवायच असेल तर व्यापारी आणि शासन याना एक मार्गदर्शक तत्त्व पाहिजे.

त्यासबधातला माझा एक अगदी मनात राहिलेला दुखद अनुभव सागतो. हरिभाई म्हणजे आमचे सजीवकुमार वारले. माझ्या 'जादुगर' या टी. व्ही. फिल्ममध्ये ते होते. दूरदर्शनन मला कळवल, 'श्रद्धाजली म्हणून आम्ही ती फिल्म दाखवणार आहोत.' फिल्म त्याच्या मालकीची होती. त्यानी आपल मला एक सौजन्य म्हणून कळवल. मी 'ठीक आहे' म्हटलं. दुपारी दूरदर्शनचा मला पुन्हा फोन आला. तेव्हा त्यानी सागीतल, 'आम्हाला तुमची टायटल्स दाखवता येणार नाहीत. कारण त्या वेळात प्रायोजकाच्या जाहिराती दाखवायच्या आहेत'. ऐकून मला धक्का बसला.... मृत झालेल्या कलाकाराला श्रद्धाजली अर्पण करणार आणि त्याला तुम्ही प्रायोजक आणणार ? अहो आमचा मित्र गेला आणि तुम्ही त्याचाही धदा करणार ? काय ही हावरी वृत्ती ? फिल्म तुमच्या मालकीची. मी काही बोलू शकत नाही. पण फार दुख झाल.।

# तुमचा टीव्ही गणला जातो बॅण्ड-३ मध्ये.

# मग त्याला बूस्टरही असाच हवा, जो खास बॅण्ड-३ साठीच बनवलेला आहे.

सादर आहे डायमंड एलएन् ५१२.

तुम्हाला कदाचित माहित असेल, ५ ते १२ ह्यामधील चॅनेलवर चालणारे सर्व टीव्ही बॅण्ड-३ मध्ये गणले जातात.

मग अर्थात् जो बूस्टर बॅण्ड-३ साठीच काम करतो, तोच तुम्हाला दूरचित्राचा सर्वोत्तम दर्जा देणार !

साहजिक, डायमंड एलएन ५१२ बूस्टर अर्थात तुमच्या टीव्हीला पूर्णपणे योग्य.

कारण तो आहे खास बॅण्ड-३ साठीच बनवलेला.

आणि म्हणूनच इतर कोणत्याही सर्वसाधारण बूस्टरपेक्षा खात्रीनं अचूक काम देणारा.

पण ह्याखेरीजही काही ठळक कारणे आहेत, ज्यामुळे तुम्ही डायमंड बूस्टरच घ्यावा.

एकतर प्रमाणाबाहेर कमी-जास्त होणाऱ्या व्होल्टेजमुळे हा इतर बूस्टर्ससारखा जळून जात नाही. तर संरक्षणाची अंगभूत सोय ह्यात आधीच केलेली असते.

दुसरं, त्याच्या विशेष सर्किट डिझाइनमुळे दूरचित्राची अस्पष्टता आणि धूसरता तर पार निघून जाते.

इतकेच नाही, ह्यांतील 'गेन कंट्रोल' मुळे तुम्ही स्वतःही टीव्हीवर दूरचित्राचा अव्वल दर्जा लावून घेऊ शकता.

आणि का नाही ?

तुम्हाला इतका अप्रतिम दर्जा द्यायला डायमंड बूस्टर कितीतरी कठोर चाचण्यांतून गेलेला असतो. वेळोवेळी तंत्रज्ञांनी त्याची गुणवत्ता पारखलेली असते आणि शेवटी ती परदेशी उपकरणांवर कसूनही पाहिलेली असते.

गुणवत्तेचा हा आत्मविश्वास असतो, म्हणून तर डायमंडचे सर्व बूस्टर्स तुम्हाला देतात पूर्ण १२ महिन्यांची हमी !




उत्पादक : प्लासस्टार्ट इलेक्ट्रॉनिक्स प्रा. लि. १४२३, शुक्रवार पेठ, पुणे : ४११ ००२. फोन : ४३४७९३

QUIKSEL/88115

# लोकांसाठी, लोकांनी सादर केलेला - 'ज्ञानदीप'



**टीव्हीच्या कार्यक्रमाद्वारे विधायक उपक्रम चालविले जातात. माणसं एकत्र येतात. काही नवं करु पाहतात. भारतीय दूरदर्शनचा हा विधायक प्रैलू. तो उजळवणारे 'ज्ञानदीप'चे निर्माते आकाशानंद यांची शरद कर्णिक यांनी घेतलेली मुलाखत.**

मुंबई दूरदर्शन केंद्रावरुन गेली दहा वर्षे नियमितपणे प्रसारित होणारा कार्यक्रम म्हणजे 'ज्ञानदीप'. या कार्यक्रमाविषयी आणि त्याचे निर्माते 'आकाशानंद' यांच्या विषयी नेहमीच कुतुहल वाटत आले आहे. 'अेक तर कोणताही कार्यक्रम सातत्याने लोकप्रिय ठेवणे ही अेक अवघड कला आहे. दुसरे म्हणजे दूरदर्शनवरच्या अनेक कार्यक्रमांच्या भाऊ-गर्दीतला एक कार्यक्रम आणि त्या कार्यक्रमाचा निर्माता यांचे अतूट नाते निर्माण होणे हे क्वचितच होते. आकाशानंदांनी ही किमया साधली आहे. सतत काही नवे सादर करुन त्यांनी त्यांच्या कार्यक्रमाची लोकप्रियता टिकवून धरली आहे. अेवढेच नव्हे तर 'ज्ञानदीप' म्हटले की लोकांना आकाशानंद आठवतात ही सहजासहजी साध्य होणारी बाब नाही.

टीव्हीवरचे कार्यक्रम हे फक्त स्वस्थ बसून पाहायचे आणि नंतर विसरुन जायचे, फार तर त्यावर घरातल्या घरात थोडी रिकामपणाची चर्चा करायची अेवढ्यासाठीच असतात असा सर्वसामान्य समज आहे. तो बहुतांशी खरा असेल. मात्र 'ज्ञानदीप' यापैकी नाही. या कार्यक्रमाचे प्रेक्षक तो बघून नुसते स्वस्थ बसत नाहीत किंवा त्यावर निष्क्रिय चर्चा करीत नाहीत. तर ते छोटी छोटी 'ज्ञानदीप' मंडळे स्थापन करतात, त्यांच्या आपापसात भेटी - गाठी होतात व काही विधायक कार्यक्रम हाती घेतात, यथाशक्ती राबवतात. सर्व मंडळी अेकत्र येवून त्यांचा महासंघ स्थापन होतो. ''ज्योत अेक सेवेची'' सारखे अेक मुखपत्र चालविले जाते आणि या सर्वांची टीव्हीवरच्या अेका कार्यक्रमाभोवती गुंफण घातली जाते.

दूरदर्शनच्या माध्यमातून लोकांशी संपर्क साधून अशाप्रकारे त्यांना बाहेरच्या जगात कार्यप्रवृत्त करणे ही अत्यंत कठिण गोष्ट आहे. आपला प्रेक्षक नेमका कोण, त्याची सामाजिक परिस्थिति, आर्थिक कुवत, सांस्कृतिक पातळी कोणत्या प्रकारची आहे. कशाप्रकारे आवाहन केल्यास त्याच्यातील सुप्त गुणांना, मानवी मूल्यांना हळुवारपणे फुंकर घालणे शक्य आहे हे सर्व ठरविणे निश्चितच सोपे नाही. कोणतीही संकल्पना माणसांच्या मनावर ठसविणे आणि त्यांच्याकडून हवा असलेला प्रतिसाद मिळविणं ही गोष्ट संपर्कशास्त्रात अतिशय अवघड समजली जाते.

'ज्ञानदीप'ची आजपर्यन्तची वाटचाल पाहिल्यास असे दिसते की, आकाशानंदांना त्यांचा प्रेक्षकवर्ग नेमका ओळखता आलेला आहे. जो सांगावा त्यांना द्यायचा आहे, जो प्रतिसाद मिळवायचा आहे त्यासाठी समाजातील निष्क्रिय, बुद्धिवादी अुच्चभ्रू वर्ग त्यांनी खड्यासारखा वगळून बाजूला ठेवलेला दिसतो. समाजाच्या अशा घटकाशी त्यांनी संवाद साधला आहे की ज्याच्याकडून काही विधायक समाजोपयोगी अुपक्रम व्यावहारिक पातळीवर हाताळले जाणे शक्य आहे.

हा सर्व विषयच विचाराला चालना देणारा असल्यामुळे आकाशानंद या व्यक्तीशी बातचित करुन त्यांना प्रश्न विचारुन त्यांच्याकडून हे सर्व त्यांनी कशाप्रकारे साध्य केले हे समजावून घ्यावे असे वाटले म्हणून त्यांची भेट घेतली. त्या भेटीतील प्रश्नोत्तरे.

**'आकाशानंद' हेच टोपण नाव आपण घेण्याचे काही खास कारण ?**

**माझं संपूर्ण नाव आनंद बालाजी देशपांडे.** हेच नाव घेण्याचे खास कारण म्हणजे 'विवेकानंद' हे नाव व व्यक्ती यामुळे लहानपणापासून मी भारावून गेलो होतो. शिवाय माणसाने सर्वोच्च ध्येय गाठण्याचा प्रयत्न करावा अशी लहानपणापासून घरची शिकवण होती. त्यामुळे माझ्या 'आनंद' या नावाच्या मागे आकाश ही विश्वातील सर्वोच्च संकल्पना मी जोडली. या गोष्टीला आता ३० - ३५ वर्षांचा काळ लोटला आहे. याच नावाने मी लेखन केले - प्रथम नागपूरच्या दै. तरुण

भारत मध्ये आणि नंतर अितरत्र. त्यानंतर आकाशवाणी आणि दूरदर्शन या दोन्ही प्रसार माध्यमासाठीही मी हेच नाव सातत्याने वापरले आहे. सर्वोच्च शिखर गाठण्याचे ध्येय मात्र अद्याप पुरे झालेले नाही.

**दूरदर्शनच्या पडद्यावर येण्याआधीची तुमची वाटचाल सांगाल ? व्यवसाय, नोकरी, शिक्षण, प्रशिक्षण. वगैरे कोणत्या विषयाशी संबंधित होते ?**

मॅट्रिक होताच मी शिक्षकाची नोकरी करु लागलो. एम्. अे. (मराठी साहित्य) पर्यन्तचे माझे सर्व शिक्षण खाजगीरित्या शिक्षक अुमेद्वार म्हणून परीक्षेला बसतच पूर्ण झाले. सोबतीला लिखाण होतेच. नागपूर रेडिओवरील बालविहारसाठी मी लिहीत असे. पुढे रेडिओत नोकरीच मिळवली.

१ फेब्रुवारी १९५९ ते १० जुलै १९७२ पर्यन्त नागपूर नभोवाणी केन्द्रात मी विविध कामे सांभाळली. लेखनाव्यतिरिक्त, कार्यक्रमात सहभागी होणे मला फार आवडायचे. अनेक चरित्रेरेखा मी सादर केल्या. त्यातली ग्रामीण कार्यक्रमातली 'आबा' ही व्यक्तिरेखा लोकप्रिय झाली. माझ्याबरोबर दत्तोपत देव हे खंडुजीचे पात्र अुभे करीत. ग्रामीण विभागाच्या दौऱ्यात आम्हा दोघांना पाहण्यासाठी झुबड अुडायची, कारण त्यावेळी दूरदर्शन नव्हते. आपल्या आवडीच्या आवाजाची माणसे दिसतात कशी यां बद्दल खूप कुतुहल असे लोकाना. रेडिओत असताना माझा अनेक मान्यवर व्यक्तींशी सबध आला. त्यात साहित्यिक, कवी, पत्रकार चित्रकार वगैरेंचा समावेश होता. ''आनंद बाल - वाचन'' नावाची सस्था मी चालवीत असे. 'अेका आजोबानी मुलांसमवेत अेक तास घालवायचा असा 'आजोबाचे आशीर्वाद' हा कार्यक्रम चालू केला होता तो लोकप्रिय झाला. रेडिओ न्यूजरीलच्या प्रशिक्षणासाठी दिल्लीला जावे लागले तेथे वृत्त निवेदक मेलविल डिमेलो याचे मार्गदर्शन मिळाले. अेकूणच अनुभवविश्व विस्तारले. माझ्या अेकूण व्यक्तिविकासावर व कार्यपद्धतीवर कायमचा ठसा अुमटवणाऱ्या मात्र तीनच व्यक्ति ठरल्या. सीताकात लाड, अिदुमती शेंवडे आणि पुरुषोत्तम दारव्हेकर.

---

**''ज्ञानदीप माणसातल्या चांगुलपणाला आवाहन करतो. त्या संघटित करुन कार्यशील होण्याची प्रेरणा देतो... लोकांचा सहभाग होण्याच्या किमयेतच ज्ञानदीपचे यश आहे.''**

---

पुढे रेडिओतून मी दूरदर्शनमध्ये आलो, कोणीही 'गॉड फादर' नसताना ६ महिने इंग्लडला आणि प्रत्येक दोन अडीच महिने पाकिस्तान व मलेशिया येथे प्रशिक्षणासाठी मी कसा काय बोलावलो गेलो हे अेक कोडेच आहे. दरवेळी प्रत्येक देशात मी चाचणी परीक्षेत पहिला आलो. काही वर्षे मी 'अेशियन अिन्स्टिट्यूट फॉर ब्रॉडकास्टिंग डेव्हेलपमेंट' या सस्थेत प्रशिक्षक म्हणून कामही केले. १९७७ पासून 'ज्ञानदीप'च्या शकासमाधान या सदरातून आणि पुढे सप्रेम नमस्कार मधून मी पडद्यावर येत असलो तरी तत्पूर्वी काही टेलेफिल्मस् मध्ये मी अभिनय केला होता.

**'ज्ञानदीप' आपल्या हाती कसा आला ? त्याची सुरुवात कशी झाली ?**

मुंबई शहर शिक्षण समितीने 'अैसी अक्षरे मेळवीन' या प्रौढशिक्षणाच्या प्रकल्पानंतर दुसरा अनौपचारिक शिक्षणाचा कार्यक्रम दूरदर्शनच्या सहकार्याने ऑक्टोबर १९७७ मध्ये राबविण्यास सुरुवात केली. या कार्यक्रमाचे 'ज्ञानदीप' हे नाव दूरदर्शनच्या वतीने मीच ठेवले. शिक्षण समितीने हा कार्यक्रम सहा महिने चालविला. निर्माता मीच होतो. त्यानंतर समितीने अग काढून घेतले, व 'ज्ञानदीप' पूर्णत दूरदर्शनच्या आणि पर्यायाने माझ्या झोळीत येअून पडला. तेव्हा पासून आजतागायत माझ्या सकल्पनेनुसार मी 'ज्ञानदीप'ला आकार देत आलो आहे.

**कार्यक्रमाच्या स्वरुपात तुम्ही काही बदल केलेत का ? कशा स्वरुपाचे ?**

सुरुवातीला 'ज्ञानदीप'चे स्वरुप फक्त २० मिनिटाची समस्याप्रधान नाटिका अेवढेच होते. नाटिकेची सहिता, लेखनाची जबाबदारी शिक्षण समितीकडे आणि निर्मिती दूरदर्शनकडे अशी कामाची विभागणी होती. पहिले सहा महिने कार्यक्रमाची भाषा गिरणगावतली, समस्याही, त्याच्याच आणि त्यावरील अुत्तरही नाटिकेतच असे. हेतू हा की लोकानी हा कार्यक्रम पाहून स्वतःच्या जीवनात परिवर्तन घडवून आणावे. आठवड्यातून दोन समस्याप्रधान नाटिका मला सादर कराव्या लागत. शालेय चित्रवाणीचे आठवड्याला तीन - चार पाठ आणि शिवाय या दोन नाटिका तयार करणे म्हणजे फार मोठी कसरत होती. पण आपण काही नवीन करीत आहोत या जिद्दीने अमाप श्रम घेतले.

कार्यक्रम सपूर्णपणे 'दूरदर्शन'कडे आल्यानंतर त्यात बरेच बदल केले गेले. सगळे बदल प्रेक्षकानी पत्रे पाठवून करणे भाग पाडले. पहिला बदल भाषेत. भाषा साधी सोपी मराठी असावी असे ठरले. भाषेला कोणताही प्रादेशिक मुलामा नसावा. दुसरे, हा कार्यक्रम सपूर्ण कौटुबिक स्वरुपाचा असावा असा आग्रह लोकानी धरला. सर्व वयाच्या स्त्री - पुरुषाचा यात अतर्भाव आवश्यक ठरल्यामुळे काही लोकाना त्याचे स्वरुप थोडेसे बाळबोध वाटले. कार्यक्रम सर्वसमावेशक व्हावा हीच कल्पना त्याला जबाबदार होती.

आणखी महत्त्वाचा बदल म्हणजे शिक्षण समितीने अग काढून घेतल्यावर 'युनेस्को'च्या मदतीने गिरणगावात स्थापन झालेली १०० मडळेही रद्द झाली, त्यामुळे नवीन मडळे स्थापन करण्याची जबाबदारी अुचलावी लागली. पहिले 'ज्ञानदीप मडळ' माझ्या पत्नीने आमच्याच घरी अेप्रिल १९७८ मध्ये स्थापन केले. 'ज्ञानदीप' मधून मी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद म्हणून महिन्याभरातच ११० मडळे मुबई - पुणे - गोवा परिसरात स्थापन झाली. ही सर्व मडळे मध्यम वर्गीयाची होती. त्यामुळे त्याच्यासाठी कार्यक्रमात काही बदल करणे आवश्यक वाटले. नाटिका, मुलाखती, चर्चा, अेकपात्री, लोकनाट्य, कीर्तने हे प्रकार लोकप्रिय होअू लागले.

**रंजक कार्यक्रमांच्या द्वारे लोकशिक्षण अेवढेच सूत्र मुळात होते की लोकांना कार्यप्रवृत्त करण्याचे, त्यांचा सहभाग घेण्याचे आधीच ठरले होते ?**

'ज्ञानदीप'चे कार्यक्रम रजक व्हावे यासाठी सशोधन बरेच करावे लागले लोकाच्या आवडी - निवडी समजावून घ्याव्या लागल्या.

**विषय ठरण्यापूर्वी त्याचे अुद्दिष्ट आणि कार्यक्रम झाल्यावर प्रेक्षकांमध्ये कोणते परिवर्तन अपेक्षित होते आणि प्रत्यक्षात काय होत आहे हे पाहणेही आवश्यक होत गेले.**

परन्तु अेक गोष्ट मला मान्य केलीच पाहिजे. ती म्हणजे आमची 'ज्ञानदीप मंडळे' सेवाभावी अुपक्रम राबविणारे चैतन्याचे झरे ठरतील हे मात्र माझ्या स्वप्नातही आले नव्हते. अेका ज्ञानदीप मंडळानेच माझ्या डोळ्यात झणझणीत अंजन घातले. डॉ. गोविंद खरे यांनी सादर केलेलं 'मरणोत्तर नेत्रदान' या विषयावरील कीर्तन अैकल्यावर पुण्याच्या 'तेजस' ज्ञानदीप मंडळाने वीस दिवसांनी पत्र पाठवून 'आम्ही दहा सदस्यांनी घरोघरी फिरुन दोनशे फॉर्म्सवर सह्या गोळा केल्या व ते फॉर्म्स ससून हॉस्पिटलच्या नेत्रपेढीला नेऊन दिले. डीन साहेबांचे पत्र सोबत जोडले आहे असे कळविले.

या घटनेनंतरच कार्यक्रमाविषयी माझी संकल्पना जास्त स्पष्ट होत गेली. मंडळांनी कार्यक्रम पहायचे, त्याबरहुकुम सेवा कार्य करायचे व 'ज्ञानदीप' कडे सचित्र अहवाल पाठवायचा वगैरे सुरु झाले. अशा प्रकारे शिक्षण समितीची रंजक कार्यक्रमाद्वारे लोकशिक्षण साधण्याची मूळ कल्पना बदलून या कार्यक्रमात लोकांचा सहभाग घेतला जावू लागला त्यांना त्यांच्या कामात मार्गदर्शन देण्यात येवू लागले. या सर्वाचे श्रेय मी रेडिओवरच्या अनुभवाला देतो. नभोवाणी शेतकरी मंडळ चालवतानाही लोकांसाठी - लोकांचा कार्यक्रम हे सूत्र होते.

**ज्ञानदीप मंडळाची आजची सभासद संख्या किती ? ही संख्या वाढविण्याचा प्रयत्न केला जातो का ?**

ज्ञानदीप मंडळांची आजची संख्या महाराष्ट्रात आठशे आहे. त्याखेरीज दिल्लीवरील हिंदी ज्ञानदीपाला संलग्न ३००, अशी अेकूण ११०० मंडळे अस्तित्वात आहेत. या ज्ञानदीप मंडळांचे २२ संघ अस्तित्वात असून त्यांचा अेक महासंघही आहे. ढोबळ मानाने सभासद संख्या पंधरा हजारांच्या घरात आहे. ही संख्या वाढविण्याचा प्रयत्न मुळीच केला जात नाही. ज्ञानदीप मंडळांच्या कार्याचे सचित्र अहवाल पाहून जागोजागी मंडळे स्थापन करण्याची प्रेरणा मिळते. दूरदर्शन मार्फतही कोणतेही खास प्रयत्न केले जात नाहीत. कारण त्यांची आवश्यकताही नाही. स्थापन झालेले मंडळ टिकून रहाण्यासाठी मात्र जरुर प्रयत्न केले जातात. दूरदर्शनदेखील मदत करते.

**ज्ञानदीप मंडळाचे काम स्वतंत्रपणे चालते की दुसऱ्या अेखाद्या संस्थेशी संलग्न राहून ?**

मंडळांनी कोणते कार्य करावे याचे स्वातंत्र्य त्यांना असते. अेखादा कार्यक्रम दुसऱ्या अेखाद्या सेवाभावी अव्यापारी संस्थेच्या सहकार्याने मंडळाने आयोजित केल्यास त्यास हरकत नसते. मात्र अशा कार्यक्रमांना टीव्हीवरुन सचित्र प्रसिद्धी देताना निर्मात्याला फार जागरुक रहावे लागते.

**केवळ ज्ञानदीप मुळेच सुरु झालेल्या काही अुल्लेखनीय कामाबद्दल थोडक्यात सांगता येईल का ?**

ज्ञानदीप मंडळांनी यशस्वीरित्या हाताळलेली कामे असंख्य आहेत. त्याची अेक दोन अुदाहरणे देतो.

लोणावळ्याच्या 'कलोपासक ज्ञानदीप मंडळाने' डोंगरवाडी व कुसगाववाडी या दोन आदिवासी खेड्यातील मुलांसाठी शाळा बांधल्या




**ज्ञानदीप मंडळांचे असेही उपक्रम**

आहेत. श्रीमती भोंडे यांनी अेक संपूर्ण टेकडीच शाळेला जागेसाठी दान म्हणून दिली. शिवाय १०० जोडप्यांनी घरोघरी हिंडून निधी गोळा केला. हां हां म्हणता पन्नास हजार रुपयांचा निधी गोळा झाला.

दर वर्षी वर्षप्रतिपदेला सायंकाळी जुहू चौपाटीवर अेक वेगळ्या प्रकारचा सत्यनारायण आम्ही साजरा करतो. मनातील सत्य आणि मावळत्या सूर्यनारायण यांच्या साक्षीने घातलेली सत्यनारायणाची शपथ म्हणजेच हा वेगळ्या प्रकारचा सत्यनारायण. या सत्यनारायणाच्या पूजेची दक्षिणा मंगल कलशात साठवून ती दुष्काळांसारख्या आपत्ती निवारणार्थ देणगी दाखल दिली जाते. गेल्यावर्षी सव्वादोन हजार रूपयांचा निधी महासंघाच्या अध्यक्षांनी आणि कोषाध्यक्षांनी मुख्यमंत्र्यांच्या निधीस प्रत्यक्ष जाऊन दिला. या सत्यनारायणाचे आणखी अेक वैशिष्ट्य म्हणजे सर्व जातीधर्माचे लोक यात सहभागी होतात.

आणखी अेक अुल्लेखनीय कार्यक्रम म्हणजे ज्ञानदीप मंडळ महासंघातर्फे अेक ट्रस्ट स्थापन करण्यात येवून १९८२ पासून ''ज्योत अेक सेवेची'' नावाचे मासिक मुखपत्र प्रकाशित होते. मी या मासिकाचा संस्थापक– संपादक आहे. आजवर अेकही महिन्याचा खंड न पाडता ७५ हून अधिक अंक प्रसिध्द झाले आहेत. टीव्हीवरील अेखाद्या कार्यक्रमाच्या प्रेरणेने स्थापन झालेल्या प्रेक्षकांच्या संघाने अशा प्रकारचे टीव्हीवरच्याच सेवाभावी, अेक पैशाचीही मदत न घेता कार्यक्रमाची (ज्ञानदीपची) प्रसिध्दी करणारे असे दुसरे मासिक जगात असेल असे मला वाटत नाही. लोकांनी अुस्फूर्तपणे पुढे येवून चालविलेल्या ह्या अुपक्रमाविषयी मला निश्चितच आभिमान आहे.

या खेरीज, 'गाव तेथे आरोग्य सेवा' रक्तदान, नेत्रदान, साक्षरता प्रसार, कुटुंब– नियोजन वगैरे विविध विषयावर ज्ञानदीप मंडळे शिबिरे

घेत असतात. शिवाय, वृध्दसेवा, रूग्णसेवा, कुष्ठरोग सेवा, सहकार, हुंडाविरोध राष्ट्रीय अेकात्मता, अंधश्रद्धा निर्मूलन अित्यादी कार्यक्रमात मंडळे अुत्साहाने सहभागी होतात.

**'ज्ञानदीप' सारखे कार्यक्रम भारतातील अितर दूरदर्शन केंद्रावरून दाखविले जातात का ?**

मुंबई केंद्राच्या 'ज्ञानदीप' वरून स्फूर्ती घेऊन माझ्याच मार्गदर्शनाखाली १५ मार्च १९८५ पासून दिल्ली दूरदर्शन वरून हा कार्यक्रम - हिंदीमध्ये प्रसारित केला जातो. त्यासाठी 'ज्ञानदीप' चाच 'अेम्ब्लेम' वापरला जातो. संगीतही ज्ञानदीपचेच वापरतात.

हे सर्व कसे घडले हे सांगण्यासारखे आहे. मुंबईच्या 'ज्ञानदीप' ची प्रशंसा लंडनहून प्रसिध्द होणाऱ्या 'मीडिया' या ब्रिटिश कौन्सिलच्या मासिकात आली. टिम लाँग या लेखकाने छायाचित्रासह छापलेली ती गौरवगाथा नभोवाणी मंत्रालयाचे चिटणीस श्री.गिल यांच्या वाचण्यात आली. त्यांच्या मनात हा कार्यक्रम कार्यक्रम दिल्ली केंद्रावरूनही प्रक्षेपित व्हावा असे आले. त्याच सुमारास बी.बी सी. लंडनच्या अेक जेष्ठ निर्मात्या श्रीमती अेलिझाबेथ स्मिथ भारतात आल्या होत्या. त्यांनी 'ज्ञानदीप' चे कार्य पाहण्याची अिच्छा प्रदर्शित केली. प्रत्यक्ष काम पाहून त्या खूपच प्रभावित झाल्या. या भेटीवर आधारित रूपक त्यांनी बी.बी.सी. वरून प्रसारित केले. अशाप्रकारे 'ज्ञानदीप' ची कीर्ति भारता बाहेर पोहोचली. त्यानंतर श्री. गिल यांनी दिल्ली आणि मुझफ्फरपुरचे चार निर्माते माझ्या मार्गदर्शनाखाली 'ज्ञानदीप' चे प्रशिक्षण घेण्यासाठी पाठवले. त्यानंतर दिल्ली केंद्रावरून 'ज्ञानदीप' प्रसारित होअू लागले.

**ज्ञानदीपच्या यशाचे गमक नेमके कशात आहे असे तुम्हाला वाटते ?**

अगदी थोडक्यात सांगायचे तर असे म्हणता येईल की या कार्यक्रमाचे स्वरूप लोकांचे, लोकांसाठी आणि लोकांनीच लिहून, सहभागी होअून सादर केलेला कौटुंबिक समस्या हाताळणारा कार्यक्रम असे असल्यामुळे प्रेक्षकांना तो आपलासा वाटतो. शिवाय 'ज्ञानदीप' माणसातल्या चांगुलपणाला आव्हान करतो. लोकांना संघटित करून कार्यशील बनण्याची प्रेरणा देतो. अशा प्रकारे लोकांचा सहभाग घेण्याची जी किमया या कार्यक्रमाने साधली आहे तिच्यातच 'ज्ञानदीप' च्या यशाचे रहस्य दडलेले आहे असे मला वाटते.

ज्ञानदीपचे सर्व कार्यक्रम प्रायोजित असतात. कार्यक्रमांच्या लोकप्रियतेचा क्रम लावणाऱ्या वेगळ्या संस्था आहेत. त्यांच्या संशोधनाच्या आधारे जाहिरातदारांना कार्यक्रमाची लोकप्रियता कळत असते. व त्यानुसार ते कार्यक्रम प्रायोजित करतात. हिम्मतलाल जसराज, आयुर्वेद संशोधनालय, पेनजॉन, रूपसंगम अित्यादींनी ज्ञानदीपचे कार्यक्रम प्रायोजित केले आहेत. शिवाय 'ज्ञानदीप' करिता स्पॉट जाहिराती करणारे बरेच आहेत. त्यात महाराष्ट्र राज्य लॉटरी, लिज्जत पापड, कैलास जीवन अशी अनेक नावे असतात. हे सर्व सांगण्याचे कारण ज्ञानदीप किती लोकप्रिय झाला आहे हे यावरून कळते.

**ज्ञानदीप मंडळांनी अंगिकारलेले कार्य दूरदर्शनच्या पाठबळाखेरीज पुढे चालू राहील असे तुम्हाला वाटते का ? भविष्य काळात त्यांचे नेतृत्व करण्याच्या काही योजना तुम्ही आखल्या आहेत का ?**

'ज्ञानदीप' आणि 'ज्योत' या दोन्ही परिवारांनी दूरदर्शनवरील कार्यक्रमाच्या कुबड्या वापरून चालण्याचे सोडून द्यावे असे मी त्यांना अलिकडे वारंवार बजावीत असतो. माझ्या नंतर 'ज्ञानदीप' हा कार्यक्रम चालू राहील की नाही हे मला ठाअूक नाही. चालू राहिला तरी मी माझ्या परिवारातल्या प्रत्येक लहान –मोठ्या सभासदाचे जे कोडकौतुक पुरवण्याचा प्रामाणिक प्रयत्न गेली १०– ११ वर्षे करीत आलो आहे, तो वारसा पुढे चालविला जाअीलच याची मला खात्री नाही. म्हणून मी माझ्या मंडळांना संतत सांगत असतो. तुम्ही आता स्वयंप्रकाशित व्हा. तुमचीच पणती, तुमचीच वात आणि तुमचाच स्नेह. म्हणजेच तुम्ही टिकून रहाल. 'ज्ञानदीप' या नावाशी आता केवळ दूरदर्शनवरचा अेक कार्यक्रम निगडीत राहिलेला नाही, तर या झेंड्याखाली अेक मोठी समाज सेवा संघटना आकारात आहे.

समाजाच्या या घटकांचे किंवा या संघटनेचे नेतृत्व करण्याचा विचार माझ्या मनात कधी आला नाही. कारण माझा मुळातला पिंड वेगळा आहे. मी अेक माध्यमाचा माणूस आहे. मग ते माध्यम शब्दाचे असो, रेडिओचे दूरदर्शनचे की चित्रपटाचे असो. 'ज्ञानदीप' चा आणि 'ज्योत' चा मी अेक ज्येष्ठ सभासद आहे असे मी मानतो. आता वाढीला लागलेला 'ज्ञानदीप' चा परिवार असाच वाढत रहावा. यासाठी मी मार्गदर्शन जरूर करीत राहीन. पुढच्या पिढीला 'ज्ञानदीप' चे मानवतेच्या सेवेचे काम हे महाराष्ट्रातच नव्हे तर भारतात आणि जगभर पसरलेले दिसावे असावे असे माझे स्वप्न आहे.

○ ○ ○


**Hotel Raviraj**

**Ideal both for the active executives and leisurely lodgers**

- SPACIOUS AIR CONDITIONED ROOMS WITH MODERN AMENITIES.
- **SURYAMAHAL:** AIR CONDITIONED RESTAURANT WITH CONTINENTAL, CHINESE, TANDOORI DISHES.
- **SUNSET PALACE:** A PLACE YOU WOULD LOVE TO STEP IN
- **SNEHAL:** COFFEE SHOPPE WITH DELICIOUS SNACKS.
- AIR CONDITIONED CONFERENCE HALL WITH ALL AMENITIES FOR CONFERENCES, SEMINARS AND BOARD MEETINGS
- **GARDEN RESTAURANT/TERRACE** WHERE YOU CAN ENJOY BANQUETS




SETU 88

Raviraj

**Hotel Raviraj**

790, Shivajinagar,
Bhandarkar Institute Road, Pune-411 004.
Phone : 59581-2-3-4

दूरदर्शननं आपल्याला
खूप काही दिलं.
असं वाटत असतानाच
खुद्द टीव्ही निर्मात्यालाच
या माध्यमाची
दुसरी बाजूही
जाणवायला लागते.
टीव्हीच्या दूरगामी
परिणामांबद्दल
एक प्रांजल आत्मनिवेदन -



'अपराधी कौन' मालिकेत विनय धुमाळे

# थिजवून टाकणारा टीव्ही

**विनय धुमाळे**

१९६८-६९ चा काळ होता. मी महाविद्यालयात शिकत होतो. युवकांच्या प्रश्नांबद्दल तेव्हा महाविद्यालयीन मुलांमधे तशी जागरुकता होती. महाराष्ट्र टाइम्समधे मी त्याबद्दल लिहित होतो. श्री केशव केळकर यांनी आकाशवाणीवर युववाणी नुकतीच सुरु केली होती. त्या युववाणीचे चारपाच सूत्रसंचालक ठरलेले होते. त्यातलाच मी एक होतो. केशव केळकरांना मा. कार्यक्रम आवडले. काही सामाजिक विषयावर इंडियन एक्सप्रेसमधेही मी लिहिले होते. बांगला देशच्या निर्वासित छावणीमधे माना मुक्कामी जाऊन राहिलो होतो. तो एक विलक्षण अनुभव होता. त्यावर लिहिले. कधी कधी पुस्तक-परिक्षणे लिहिली. एकदोन लेख काफ्फावर लिहिले होते. त्यामुळे सार्वजनिक क्षेत्राशी माझं नांव महाविद्यालयात असल्यापासूनच तसं संबंधित होतं. १९७१ मधे मी बी.एस्.सी. झालो. आधी खरं म्हणजे मेडिकलला जायचे ठरवून मी 'बी' ग्रुप घेतला. नंतर लक्षात आलं, की मला काही हे आवडत नाही. नऊ महिन्यांनी मी मॅथेमॅटिक्सला आलो. मला इंजिनियरींगला प्रवेश मिळाला. पण भावाचा इंजिनिअरींगचा व्याप मी पहात होतो. मला वाटलं, माझ्याच्यानं हे होणार नाही. मग मी पुन्हा रुळ बदलले. अर्थशास्त्र आणि संख्याशास्त्र घेऊन १९७१ मधे मी बी.एस्.सी झालो. १९७२ मधे दूरदर्शनवर नोकरीला लागलो.

दूरदर्शनच्या नोकरीवर मी अगदी अपघाती लागलो. ते वातावरण, तो स्टुडिओ कोणीही थ्रिल होईल असंच ते सगळं होतं. हल्ली कसं, खूपजणं कॅमेरा घेऊन हिंडत असतात. मालिकांचं चित्रीकरण चालू असतं. आता त्याची फारशी गंमत राहिली नाही. पण १९७२ मधे संपूर्ण भारतात दोनच दूरदर्शन केंद्र होती. दिल्ली आणि मुंबई. अद्ययावत् स्टुडिओ. वातानुकुलीत थंड वातावरण. त्या कॅमेऱ्यांच्या हालचाली! प्रकाशझोत येतो-जातो! हे सगळं रोमांचकारी होतं. ते दिवस दूरदर्शनच्या घडणीचे होते. त्यामुळे त्यात एक विलक्षण आनंद होता. एक अगदी नवीन असं वातावरण निर्माण होत होतं. काय असतं, बँकेत नोकरी केली, वर्तमानपत्रात केली तर त्या ठिकाणी आधी एक साचा तयार झालेला असतो. भारतात हे माध्यम इतकं नवीन होतं की दूरदर्शनचा असा साचा नव्हता. म्हणून ते वातावरण अगदी रोमँटिक वाटलं. मला अजूक प्रत्येक बारीकसारीक तपशील आठवतो. एप्रिल १९७२ पासून दूरदर्शनचं काम सुरु झालं. ऑक्टोबरमध्ये अुद्घाटन झालं. आम्ही सगळे तरुण लोक होतो. डायरेक्टर कृष्णमूर्तीचं आम्हाला सर्व प्रकारे प्रोत्साहन होतं. ते जर नसते तर आज आम्हाला जे काही मिळवल्यासारखं वाटतं आहे ते मिळालं नसतं. माझ्या आयुष्यावर ज्या काही लोकांचा परिणाम झाला, त्यातले कृष्णमूर्ती हे एक. अत्यंत हजरजबाबी आणि विनोदी माणूस होता. एखाद्याला ओझं लादल्यासारखं वाटू न देता त्याच्याकडून काम कसं करून घ्यावं याची कृष्णमूर्तींना जाण होती. स्वतः ते अुत्तम कलावंत आणि माणूस म्हणूनही दिलदार होते. माझ्या वाटचालीत दोनतीन लोकांचं स्मरण करावसं वाटतं. श्री. कृष्णमूर्ती, श्री. केशव केळकर आणि श्री वीरेंद्र शर्मा. ते अगदी कमालीचे सहकार्य देणारे, मदत करणारे होते. त्यांच्यामुळे दूरदर्शनचं वातावरण सुंदर झालं होतं. तेव्हा माझ्या लक्षात आलं, माणसाला जर सक्ती केली तर तो दहा ते पाच काम करतो. आणि माणसाला त्याच्या तारेत सोडला तर तो सकाळी सात ते रात्री दहापर्यंत काम करतो. आमचा सगळा गट सकाळी आठ ते आडेआठला हजर

ROPLAS

# The perfect body

## A Roplas creation

**STALLION**
A macho body kit for
MM 540/440 Jeeps



**CHIEFTAIN**
3 door for CJ 500 D 91"
& 101" W.B. Jeeps



**HIRIDER DELUXE**
More comfort & Luxury for CJ 640 D.P.
104.5" W.B. Jeeps Multipurpose.



**HIRIDER**
Luxurious, 5 door for CJ 640 D.P.
104.5" W.B. Jeeps



The perfect blending of colour & class Light weight & might, makes the Jeep bodies extremely durable and an enjoyable experience to drive. Roplas has more than 20 years of experience and expertise backed by an extremely well equipped R & D centre (Approved by the Dept. of science & Technology) Roplas' tough and durable bodies, when rarely require maintenance can be serviced by the nationwide sales & service centres.

**ROPLAS (INDIA) LTD.**
145, BOMBAY-POONA ROAD, PIMPRI, PUNE 411 018 ● TEL.: 83915, 83916

**HIGHLANDER**
Luxurious, 5 door on CJ 500 D
101" W.B. Jeeps



**ASHWINI**
3 door for CJ 640 D.P.,
104.5" W.B. Jeeps



**TRUCK CABIN**
Sturdy & Herculean on
Tata 1210 SE Truck



AD MISSION

होत होता आणि रात्री दहापर्यंत काम करीत होता. या पद्धतीन १९७९ पर्यंत आम्ही काम करीत होतो.

सुरवातीला वीरेंद्र शर्मांना मी हिंदी युवदर्शनसाठी मदत करीत होतो. नंतर सुहासिनी मुळगांवकरांचा सहाय्यक होतो. तेव्हा नाट्यसंगीत, रंगशारदा, नाट्यरंग हे कार्यक्रम संगीताच्या आवडीने केले. कामगार विश्व केलं. शेतीचे कार्यक्रम केले. श्री. लेले यांच्याबरोबर 'गजरा' केला. श्री. केळकरांबरोबर दोन वर्षं 'प्रतिभा आणि प्रतिमा' केल. बातम्यात मात्र मी कधीच नव्हतो. १९७६ मधे मी निर्माता झालो. निर्माता झाल्यावर १९७९ पर्यंत ''प्रतिभा आणि प्रतिमा'' हा कार्यक्रम मी केला. निर्माता आणि असिस्टंटच्या कामात खूप फरक होता. असिस्टंटला सामग्री मिळवावी लागते. निर्मात्याला सामग्री काय काय लागेल याचा अदाज करावा लागतो. एकदम निर्माता म्हणून नोकरीत घेतलं जातं. पण मला वाटतं चागला निर्माता होण्यासाठी आधी असिस्टंटच्या कामाचा अनुभव हवा.

कार्यक्रमासाठी व्यक्ती कोणत्या निकषावर निवडल्या जातात हे जाणून घेण्याची अनेकाना अुत्सुकता असते. खरे म्हणजे निश्चित असे निकष नाहीत. ते कार्यक्रमाच्या स्वरुपावर ठरत युवादर्शनच्या कार्यक्रमात एखाद्या विचाराला किंवा एखाद्या व्यक्तीला केंद्रबिदू ठरवून कार्यक्रमाची बाधणी होते. कुणी गिर्यारोहण करणारे. कुणी समुद्रात खोल जाणारे. त्या त्या गटाला भेटायच. त्याच्याबरोबर हिंडायच. एकदा 'गडदेचा बहिरी' म्हणून अवघड गुहेत आम्ही गेलो होतो. तिथ पोहोचेपर्यंत दीड दिवस लागला. सगळ्या पाऊलवाटा होत्या. त्या ठिकाणी चित्रीकरणाच सामान घेअून गाडीन गेलो. अधिकाऱ्याच्या शिव्या खाल्ल्या. तीस चाळीस मुल होती. मस्त कार्यक्रम केला. आम्ही निरनिराळ्या लोकाच्या सपर्कात होतो. त्यातून योग्य वाटतील त्या व्यक्ती घेत होतो. निवडीचे काही खास निकष नव्हते. नाट्यसगीत म्हटल की १९७२ मधे एक पचवीस तीस जणाचा गट होता. त्यातलेच आलटूनपालटून लोक बोलवायचे.

## प्रतिभा व प्रतिमा

मराठी साहित्याची मला आवड. मराठी सस्कृतीबद्दल मला आस्था. त्यामुळे निरनिराळ्या क्षेत्रातील मराठी लोकाच्या कर्तृत्वाची माहिती होती. 'प्रतिभा आणि प्रतिमा'. कार्यक्रमासाठी सुदैवाने ही सगळी मोठी माणस आम्हाला मिळाली. वसतराव देशपाडे, मोगूबाई कुर्डीकर, हिराबाई बडोदेकर, मल्लिकार्जून मनसूर, चित्रकार हेब्बर सगळे ''प्रतिभा आणि प्रतिमा'' मधे येअून गेले. आठवणी खूप आहेत. किती सागू! ही सगळी माणस जवळून पहायला मिळण, त्याच्याशी बोलणं, त्याच्या व्यक्तीमत्त्वाच्या छटा टिपण, त्याच्या व्यक्तीमत्त्वाचे पैलू लोकापुढे सादर करण हे सगळ किती सुदर होत! It was a big fun एकदा द वा. पोतदार आणि न. र. फाटक याची मुलाखत एकत्रच घ्यायच मी ठरवल. दोघानाही एकाच स्टुडिओत एकदम बोलावलं. दोघानाही पारपारिक पोषाख करायला सागितले होते. पगडी, लाब कोट, अुपरण धोतर पुणेरी जोहे अस सगळं करून दोघेही आले. दोघाच नात गमतीशीर होत. मी दोघाना मेक-अप रुममधे घेअून गेलो. ही दोन माणस मेक-अप साठी बसण हेच किती गमतीशीर होत. फाटक प्रथमच दूरदर्शनवर येत होते. आधी आमच्या चार पाच भेटी झाल्या होत्या. मेक-अप रुममधे फाटक मला म्हणाले, ''हे तूं काय नाटक चालवल आहेस?'' मी म्हणालो, 'प्रकाशात उठाव येण्याकरता थोडा मेक-अप करावा लागतो.' फाटक म्हणाले, 'ही असली नाटकं मला नकोत. ते पोतदारला कर. त्याला हौसही आहेच. त्याला बर दिसतं.' मी फाटकाना म्हटल, 'पोतदाराना सागू का तुम्हा काय म्हणालात ते?' तर ते म्हणाले, 'साग- सांग. मी काय घाबरतो का? त्याला अशा गोष्टी आवडतात हे ऐतिहासिक सत्य आहे.' मी पोतदाराकडे गेलो म्हणालो, 'दादा, फाटक म्हणतात तुम्हाला ही नाटक आवडतात.' पोतदार म्हणाले, 'त्याला जाअून साग मेक-अप लावायला चेहरा मुळात तेजस्वी लागतो.' त्या दोघाचं नात फार सौहार्दाच होतं.

## उत्तुंग माणसं

काही बिगर मराठी लोकही ''प्रतिभा आणि प्रतिमा'' मधे मी आणले. थोड्या लोकाची नाराजी झाली. पण ही अुत्तुग माणस मराठी माणसाला परिचित व्हावीत अस वाटलं म्हणून मी त्याना आणल. पुराणवस्तुशास्त्रज्ञ आणि मानववशशास्त्रज्ञ श्री. डॉ. ह.धी.साकलिया याना मी आणल होत. इरावतीबाई त्याच्या शिष्या होत्या. साकलिया बोलताना म्हणायचे, 'आ तो रिसेंट बात छे'। त्याची 'रिसेंट बात' म्हणजे तीन हजार वर्षांपूर्वीची. ज्या घरात ते राहत होते तेथेंच त्यानी अुत्खनन केल. मग त्याच्या लक्षात आल हा मुळा मुठेचा प्रवाह पूर्वी कोठे होता आणि आता कसा बदलला. त्याच्या घराजवळच त्याना खूप पुरावे सापडले. त्याच्यावर त्यानी एक सुदर पुस्तक लिहिले त्याच नेवाशाचं अुत्खनन किंवा जोर्वे इथ अुत्खनन जगात मान्यता पावल. जागतिक पुराणवस्तुशास्त्र सभेचे ते अध्यक्ष होते. काही तरी चित्तवेधक अस मला दाखवाव म्हणून एकदा ते त्याची ट्रंक धुडाळत होते तर लाल फीत असलेली कागदाची गुडाळी मला दिसली. हे त्याच्या पदवीच प्रमाणपत्र वगैरे असेल म्हणून मी ती गुडाळी अुघडली. तर ती त्याची ''पद्मभूषण'' पदवी होती. त्याना जेव्हा आधी मी विचारल होत, की तुम्हाला पदव्या- मानसन्मान कोणते मिळाले तेव्हा त्यानी मला अुत्तर दिल होतं, ''मी जे काम करतो त्याच माझ्या अचिवमेंट्स.

**''ही सगळी माणसं जवळून पहायला मिळणं, त्यांच्याशी बोलणं, त्यांच्या व्यक्तिमत्वाच्या छटा टिपणं.... हे सगळं किती सुंदर होतं.''**

**''महानगर' मालिका हिंदीत असली तरी शक्य तो मराठी लेखकांच्या मथा मी घेणार आहे. कलाकार, तंत्रज्ञसुध्दा शक्य तितके मराठीच असावेत...''**

बाकी विचारच मी केला नाही.' अशा माणसाच इतक्या जवळून दर्शन हा फार मोठा आनद होता

श्री ना पेंडसे याचा कार्यक्रम चालू होता. श्रोत्यामधून एक स्त्री अुठली आणि व्यासपीठाच्या जवळ जाअून अुत्स्फूर्तपणे अुत्कटपणे पेंडसे याच्याशी बोलली. तो क्षण आमच्या कॅमेराने टिपला. लेखक-वाचक याचा साद- प्रतिसाद आम्ही आमच्या प्रेक्षकाना साक्षात् दाखवला

न्यायमूर्ती छगलाची एक आठवण सागतो. 'माणूस' साप्ताहिकाकरिता छगलाच्या Roses in December या पुस्तकाचा अनुवाद मी केला होता त्यामुळे त्याच्या व्यक्तीमत्त्वाबद्दल कुतुहल मनात जाग झाल होत. ''प्रतिभा आणि प्रतिमा'' कार्यक्रमासाठी मी त्याच्याकडे विचारायला गेलो. ते म्हणाले, "I will come to you on one condition that you are not to censor my speech." मी म्हटल, "definitely" तेव्हा जनता पक्षाची राजवट सुरु होती. तसा काही प्रश्न येणार नव्हताच. 'तुम्ही बोलाल ते आम्ही प्रक्षेपित करू' असे आश्वासन मी दिल. ''प्रतिभा आणि प्रतिमा'' साठी त्याची मुलाखत ठरली इग्लिशमधे ती मुलाखत झाली. न्यायमूर्ती रेगे, एम् व्ही कामथ आणि दुर्गाबाई भागवत यानी मुलाखत घेतली त्याच्या कायदा क्षेत्रातील कर्तृत्वाबद्दल श्री रेगे यानी प्रश्न विचारले त्याचे सामाजिक विचार, सामाजिक बाधिलकी आणि व्यक्तिमत्वाचे इतर पैलू दाखविणारे प्रश्न कामथ आणि दुर्गाबाईंनी विचारले मुलाखत रगली पण मुलाखत पूर्ण झाल्यावर एकच प्रश्न आमच्यासमोर अुभा राहिला बोलण्याच्या ओघात श्री छगला म्हणाले होते, "I do not believe that Indira was daughter of Jawaharlal Nehru." जवाहरलाल नेहरू जसे लोकशाहीवर निष्ठा असलेले आणि अुदारमतवादी होते तशा इदिराबाई नाहीत असा छगलाच्या बोलण्याचा अुद्देश होता. पण दूरवर पसरलेल्या आमच्या एखाद्या प्रेक्षकाला हा अुद्देश न समजून गैरसमज होण्याची शक्यता या वाक्यात होती. तसा तो होअू नाही अशी इच्छा होती मी आणि आमचे डिरेक्टर काळजीत पडलो. तुमच्या मुलाखतीत आम्ही कुठेही कात्री लावणार नाही हे वचन आम्ही आधीच दिल होत. आता हे वाक्य कापण आवश्यक आहे, अस जर आम्ही म्हटल आणि काहीतरी निमित्त पुढे करून इदिराजींच्या सदर्भामुळेच आम्ही ते गाळू इच्छितो या अर्थान जर छगलानी ते घेतल तर ? सगळच मुसळ केरात ! ते एक वाक्य सोडल तर बाकीची मुलाखत दृष्ट लागावी अशी सुदर

दुपारी दोन अडीचचा सुमार होता मी छगलाकडे गेलो. बाजूलाच त्याचा मुलगा बसला होता मी म्हणालो, 'मुलाखतीतल्या एका वाक्याबद्दल तुमच्याशी चर्चा करायची आहे.' ते म्हणाले, "I know You want to cut something. Mind, my son is there to help me." त्याचा मुलगा अुत्तम वकील. मी म्हटल, ''काही हरकत नाही.'' आम्ही आत गेलो. अिकबाल होताच. छगला म्हणाले, "What is the problem?" छगलाच व्यक्तिमत्त्व हे इतक सुदर, रसील आणि कमालीच सुसस्कृत की समोरच्या माणसाला क्षणभर प्रश्न पडायचा की आपल्यात या माणसान काय पाहिलं म्हणून हा इतका ऋजुतेन बोलतो, वागतो ! तुमच्या मनात जो काही थोडाफार अहकार असेल तो त्याच्यासमोर पूर्णपणे वितळायचा ! आर पार सुदर, देखण, सत्यवादी तितकच सुसस्कृत व्यक्तिमत्व होत त्याचं. त्याच्या प्रश्नावर मी माझी समस्या सांगितली पहिली प्रतिक्रिया त्याच्या मुलाची आली, "Papa, as I told you, they are not going to allow you to criticise Mrs. Gandhi" श्री. छगला म्हणाले, "This can't happen. Sentence will go ahead like that." मी त्याना म्हणालो, ''या वाक्याचा अर्थ स्पष्ट आहे ज्या सदर्भात तो आला आहे तो सदर्भही स्पष्ट आहे तरीसुद्धा अडाणी माणूस- शभरातला एखादा अडाणी माणूस त्यातून चुकीचा अर्थ घेण्याची शक्यता आहे. तसा चुकीचा अर्थ घेतला तर तो थोडासा below the belt होईल आणि वैयक्तिक होईल. तुमच्या कार्यक्रमात अस व्हाव अस आम्हाला वाटत नाही.'' एकदोन मिनिट चेहऱ्यावरून हात फिरवत छगल स्वस्थ बसले नतर आपल्या मुलाला म्हणाले, इकबाल, What he is saying is for a point." माझ्याकडे वळून त्याच्या हायकोर्टाच्या भाषेत म्हणाले, "Ruled! (जस एखाद पीटीशन असेल तर म्हणतात ruled किंवा dismissed) I agree with this young man. You cannot allow even one person to misunderstand what I had said" आमचा प्रश्न सुटला छगलाच्या मोठेपणाची कल्पना आली आणीबाणीमधे श्रीमती गांधींच्या धोरणावर तीव्र टीका करणारे जे लोक होते त्यात छगला हाते परतु एखाद्या व्यक्तिच्या धोरणाला त्याचा विरोध असला तरी त्या व्यक्तिबद्दल वैयक्तिक गैरसमज होअू नाही याची काळजी त्यानी घेतली.

## स्वतःचीच भीती

''प्रतिभा आणि प्रतिमा'' या कार्यक्रमाला अपयश आल नाही. प्रत्येक कार्यक्रम सुदर रगत गेला तरीही १९७९ मधे दूरदर्शनची नोकरी मी सोडली. या चाकोरीतून बाहेर पडाव अस अनेक कारणानी वाटू लागल होत एक तत्कालिक कारण घडल आणि मी नोकरी सोडली माणसाला स्टुडिओत बसवून मुलाखती रगविण्यात माझ काही कर्तृत्व, कौशल्य होत. मुलाखत सुविहित पाहिजे. रोचक पाहिजे प्रवाही पाहिजे. निरनिराळ्या प्रकारच्या प्रेक्षकाना रस वाटला पाहिजे. वैचारिक खाद्य हव, करमणूक हवी हे सगळ साधताना सकलनाच कौशल्य, सपादनाची प्रतिभा लागते तरी देखील कार्यक्रम करताना आरसा घेअून आपण अुभे आहोत अस वाटायच. केशकर्तनालयात कस केस कापताना, कापून झाले की मागे आरसा दाखवतात तस मला वाटायला लागल. आणि याच्या मोबदल्यात मिळणार वलय इतक प्रचड होत की मला वाटू लागल या क्षेत्रात आपण राहिलो तर पचाईत अशी होईल की स्वत च्या पायावर मला कधी अुभच राहता येणार नाही. दूरदर्शनला तेव्हा इतक महत्त्व होत, अजूनही आहे पण आता प्रायोजित कार्यक्रमामुळे दूरदर्शनच्या माणसाच महत्व खूप कमी झाल आहे. मक्तेदारी गेली. त्या काळात आम्ही कुणालाही फोन लावत होतो. मग तो मत्री असो, मोठा लेखक असो, बडा दिग्दर्शक असो! आम्ही कुणालाही म्हणत होतो, '' परवा रेकॉर्डिंग आहे Would you be interested?" लगेच तो म्हणायचा, "Why don't you come for tea or dinner?" यात दूरदर्शनच्या माणसाच्या व्यक्तिमत्वाला सूज येते. फोन फिरवला की त्याच कोणतही काम होअून जात – मग ते कार्यक्रमाच्या सदर्भातल असो किवा नसो– दूरदर्शनवर नोकरीला आलेला माणूस एका रात्रीत सर्वांना माहिती होतो.

मग स्वत·विषयी त्याच्या वेगवेगळ्या कल्पना निर्माण होऊ लागतात. आपण कोणीतरी मोठे आहोत असा त्याचा ग्रह होऊ लागतो. कुठूनतरी विरोध झालाच नाही तर त्याची झिंग येते. एवढ्या साठी मला वाटत हे सगळ सोडाव. न झगडता मिळालेल्या गोष्टींच अगावर सहज मास चढतं. हा धोका टाळण्याकरीता मला वाटू लागल नोकरी सोडावी. तरीही या प्रकारची नोकरी सोडायला काही तरी धक्का बसावा लागतो कमालीच मानसिक समाधान देणारी नोकरी होती. दहा वाजता कार्यक्रम करून तुम्ही साडेदहावाजता बाहेर पडलात की त्या क्षणापासून सगळ्या बाजूनी कार्यक्रमावर प्रतिक्रिया ऐकायला येऊ लागात. निर्मात्यासाठी ही चैन आहे ही चैन सोडायला तीव्र आघात व्हावा लागतो.

डॉ एन. डी. दिवाण यांच्यावर 'दुर्दम्य' नावाची फिल्म आम्ही 'प्रतिभा आणि प्रतिमा' कार्यक्रमासाठी केली श्री गोवारीकर यानी तो विषय माझ्याकडे आणला होता श्री. दिवाण हे लष्करातले कॅप्टन त्याच्या सैनिकी कारकिर्दीत अचानक त्याना पॅरालिसीस झाला. पाय लुळे पडले तरीही जिद्दीने कार्य करण्यासाठी ते अुभे राहिले त्याना हृदयविकाराचे तीन झटके येअून गेले. कॅन्सर झाला होता त्याही अवस्थेत त्याच हसण फार विलोभनीय होत ते विलोभनीय हास्य, आम्ही किती प्रकारे टिपल. त्या वर्षी त्या फिल्मला 'जानकीनाथ गौड अॅवार्ड' मिळालं. हे पारितोषिक Best Television Documenting किंवा Best Television programme अस कशाला तरी त्याच वर्षी सुरू झाल होत ते पहिल पारितोषिक 'दुर्दम्य' या दिवाणाच्या फिल्मला आणि मला मिळाल त्यानतर म टाइम्समधे माझ्या विरूध्द काही पत्र प्रसिध्द झाली त्याच्या मते एका व्यक्तिच श्रेय मी मूद्दाम त्या व्यक्तिला दिल नाही 'श्री. विनय धुमाळे याची चलाखी' असा खोडसाळ मथला म.टाइम्सने पत्राना दिला होता. वास्तविक एक फोन करून म टाइम्स मला खुलासा विचारू शकत होता पण त्यानी तसा विचारला नाही ती पत्र वाचून मला धक्का बसला. आम्ही दिवाण याच्या आत्म्यावर फिल्म केली होती. त्या माणसाकडून इतक शिकण्यासारख होत आणि पत्र अशा काही पध्दतीने लिहिली गेली होती की मला अुबग आला निर्मिती सहायक किवा निर्मिती सहयोग या नावाबद्दल काहीतरी घोटाळा होता. "प्रतिभा आणि प्रतिमा" कार्यक्रम झाला तेव्हा श्रेयनामावली बरोबर होती परतु अवार्ड मिळाल्यावर ती फिल्म पुन्हा दूरदर्शनवर दाखवली. तेव्हा श्रेय नामावलीत काहीतरी गडबड झाली मी दिल्लीला होतो इकड काय झाल याची कल्पना नव्हती. आणि गैरसमजावर आधारीत असे आरोप करणारी पत्र मला वाचायला मिळाली. म टाइम्सला मी माझ उत्तर लिहिल काही मित्राना पत्र पाठवली वाटल आता हे सगळ बद करून टाकाव, ताबडतोब राजीनामा लिहून डायरेक्टरकडे पाठवला. यानतर सबधित माणस माझ्याकडे आली आमचा गैरसमज झाला होता म्हणाली मी त्याना एवढच म्हटल, 'पाचदहा मिनिटाच्या अतरावर घर आपली तुम्ही मला विचारू शकत होतात समजगैरसमजाबद्दल नोकरी सोडावी अस मला वाटतच होत ती सोडायला हे प्रकरण तात्कालिक कारण झाल हे नाही तर दुसर काहीतरी कारण मला मिळाल असत

नोकरी सोडताना पुढे काय करायच ते माझ्या नेमक डोळ्यासमोर नव्हत. दृश्य माध्यमातच काहीतरी कराव अस वाटत होत प्रायोजित मालिका तेव्हा सुरू झाल्या नव्हत्या त्या १९८३ मधे सुरू झाल्या १९७९ते १९८३ हा काळ तसा कठीण गेला. अस होणार याची कल्पना होती. मी अस ठरवल होत की कुणाकडेही काम मागायला जायच नाही. नशिबाने माझ्याकडे इतके कार्यक्रम, योजना येत राहिल्या की माझा अुदरनिर्वाह होअू शकला या काळात मुबई विद्यापीठाची सव्वातासाची फिल्म मी केली. या काळात प्रसिध्दीच्या झोतापासून दूर गेले

दूरदर्शनची नोकरी सोडली यांचा पश्चात्ताप झाला का असा प्रश्न तुम्ही विचारता आहात पश्चाताप कशाला होईल ? मी तर जाणूनबुजून ही नोकरी सोडली होती अमीरखाँची एक फिल्म मी पाहिली होती. ती या सदर्भात आठवते. जिन्यावरून वर चढत जातानाचा लो अँगलने घेतलेला तो शॉट होता त्यात ते त्याच्या कुठल्यातरी मैफिलीतून नुकतेच आले होते टाळ्याचा कडकडात होत होता. याच्यानतर अमीरखा दोन दोन तीन तीन दिवस जगलात जायचे रियाझच करायचे नाहीत एकदा एका मुलखातकाराने विचारले, "इतक्या लोकाची चाह सोडून तुम्ही जगलात जाता, हे.करता ते करता कस काय ? त्यानी अुत्तर दिल, 'भैया, कब तक तालिया बजवाते रहोंगे ? कुछ काम भी तो करना हैं।' त्यानी जे सागितल ते सगळ्या क्षेत्रातल्या लोकाना लागू आहे माझ्या मनावर ते वाक्य कोरल गेल. जे जे काम येत होत ते मी रस घेअून करीत होतो. मुबई विद्यापीठाच्या फिल्मसाठी. एका मोठ्या व्हॅनमधून मुलाबरोबर निरनिराळ्या ठिकाणी हिंडत होतो काही मुल रस्ते बाधत होती. काही विहिरी खणत होती कोणी शाळा चालवत होती कोणी मेंटल हॉस्पिटलमधे काम करीत होती. फिल्म बनवताना दिवस छान गेले. एक फिल्म GCL (गुजराथ कम्युनिकेशन इलेक्ट्रॉनीक कॉर्पोरेशनसाठी) केली होती केलेल्या सगळ्याच फिल्म मला आठवत नाहीत लोकापर्यंत त्या म्हणण्यासारख्या पोहोचल्या नाहीत कधीतरी कोणत्या तरी थिएटरमधे एखाद्या वेळी लागल्या असतील मला सवत लाच त्या आठवत नाहीत तर लोकाना कुठून आठवणार ?

## लोकांना काय आवडतं ?

१९७९ नतर चिमणराव गुड्याभाऊ मालिकेच दिग्दर्शन मी केल होत. त्याला चागला प्रतिसाद मिळाला पण त्याच विषयावरचा

**"दूरदर्शनवरचा माणूस एका रात्रीत सर्वांना माहीत होतो. मग स्वत:विषयी त्याच्या वेगळ्या कल्पना निर्माण होऊ लागतात. आपण कुणीतरी मोठे आहोत असा ग्रह होतो... त्याची झिंग येते."**

चित्रपट मात्र चालला नाही. माझ्या लक्षात आल, फीचर फील्म या माध्यमाच तत्र आणि एकदर योजना याच्या ज्ञानात अजून मला परिपक्वता आलेली नाही यात एक महत्तवाचा निर्णय असतो, लोकाना काय आवडत ? सध्या काय चालत ? आपल्याला काय निर्माण करायच आहे लोकाना काय आवडत ते आपण देअू शकू का ? आपण जे देअू ते लोकाना आवडेल का ?

''मालिकेमध्ये कुठलीही चांगली गोष्ट करता येते. फक्त त्याला करमणूक मूल्य पाहिजे.... मात्र सामाजिक महत्वाचं असं- त्याला व्यापारी जगात स्थशन नाही.''



यांचा समन्वय दशकातनं एखादा कलाकार घालू शकतो. शांतारामबापूंचे 'माणूस' कुंकू' हे या दृष्टिने उत्तम चित्रपट. चिमणरावनंतर फीचर फिल्मचा प्रयत्न मी केला नाही. नॅशनल नेटवर्क नव्हतं. तेव्हा गजलांची मालिका 'मॉडेला गजल' म्हणून सादर केली. ती पहिली प्रायोजित मालिका असं आम्ही सगळेच आता म्हणू. दिल्ली- मुंबई- जालंदर या केंद्रावरुन ती दाखवली जायची. तेवीस मिनीटांचा कार्यक्रम असायचा. पहिल्या काही कार्यक्रमांचं सूत्रसंचालन श्री. विनोद पांडे यांनी केले. नंतर सरिता सेनने केले. अनूप जलोटा, कविता कृष्णमूर्ती, पंकज अुदास गाअून गेले. १९८४ मधे 'अपराधी कौन' ही भारतातील पहिली गुन्ह्याची मालिका मी सादर केली. त्यातील पहिल्या गोष्टीत तनुजा आणि नाना पाटेकर होते. त्यावेळी प्रायोजक मिळणं मुळीच कठीण नव्हतं. जाहिरात कंपनी वाट पहात असायची. 'अपराधी कौन ?' ला मंजुरी मिळाल्यावर पंधरा मिनिटात प्रायोजकाशी व्यवहार ठरवून स्वाक्षऱ्या केल्या. या माध्यमाची ताकद लक्षात आल्यावर खूप बडे लोक प्रायोजक म्हणून पुढे आले. नंतर मी ज्या मालिका दिल्या त्याला आता म्हणजे तीन वर्षानतर मंजुरी मिळाली. 'महानगर' आणि 'लहरे' या माझ्या दोन हिंदी मालिका येणार आहेत. 'कुंपणापलिकडचे शेत' ही मराठी मालिका येणार आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर शहरं बेसुमार बदलली. जगण्याचा दृष्टिकोन बदलला. काही वेळा हा जीवनकलह अधिक धीट, जीवनसन्मुख झाला तर कधी विकृत झाला. गाडगीळ, गोखले यांच्या कथांत याच प्रतिबिंब अुमटलं आहे. अशा कथा 'महानगर' या मालिकेत घेणार आहे. मालिका हिंदी असली तरी शक्यतो मराठी लेखकांच्या कथा मी घेणार आहे. कलाकार, तंत्रज्ञसुध्दा शक्य तितके मराठी असावेत असा माझा आग्रह आहे. 'लहरे' ही मालिका जॉन स्टॅन्डर्डच्या कादंबरीवर आधारित आहे. कादंबरी इंग्लिश असली तरी आपल्या वातावरणाप्रमाणे अनेक बदल आम्ही करणार आहोत. 'कुंपणापलीकडचे शेत' या पुस्तकाच्या आधाराने ती मालिका होणार आहे. मराठी लोकांनी परदेशातल्या अनुभवावर लिहिलेल्या या कथा आहेत. परदेशात जाअून आम्ही या मालिकेचे चित्रीकरण करणार आहोत.

## प्रायोजक व दूरदर्शन

दूरदर्शनवरच्या नोकरीत असताना कार्यक्रम करणे आणि मालिका तयार करणे यात परिस्थितीचा खूप फरक आहे. मालिका तयार करताना प्रायोजक एकगठ्ठा पैसा देतात. तो कसा वापरायचा हे निर्णय आमचे असतात. दूरदर्शनच्या नोकरीपेक्षा इथं पैसा आणि सुविधा इतक्या जास्त आहेत की दोन्हींची तुलनाच होअू शकत नाही. आता मला जर एखाद्याला दिल्लीहून आणायचं असेल तर विमानानं जाअून मी लगेच त्याला घेअून येअू शकतो. दूरदर्शनच्या नोकरीत दिल्लीला माणूस पाठवायचा म्हणजे डायरेक्टर जनरलची आधी sanction पाहिजे. sanction यायला आठ दिवस लागणार किंवा येणारच नाही तोपर्यंत कामाची वेळ निघून गेलेली असते. हे असे निर्णय घ्यायला फार मोठी ताकद लागते असं नाही. It is question of resources. शासनाच्या यंत्रणेत त्यांना अधिक खर्च करता येत नाही. प्रायोजित मालिकेत सगळंच स्वातंत्र्य.

मालिकेमधे कोणतीही चांगली गोष्ट करता येते. फक्त त्याला करमणूक मूल्य पाहिजे - करमणुकीची जनतेची मागणी काय आहे हे जाणून घेण्यासाठी जाहिरात कंपन्या, प्रायोजक यांचे सतत मार्केट रिसर्च चालले असतात. त्यांचे रिपोर्ट बाहेर दिसणार नाहीत. पण त्यांच्या नफ्यातोट्याचा प्रश्न असल्यामुळे हे रिपोर्ट अतिशय चोख असतात. कार्यक्रम यशस्वी होत असला की प्रायोजक- निर्माता- दिग्दर्शक सगळ्यांचे संबंध सुरळीत असतात. आणि Failure is always orphan. प्रायोजकांच्या मार्केटिंग डिपार्टमेंटमधे खूप तज्ज्ञ जाणकार माणसं आहेत. सर्वसाधारण मार्केटिंग डायरेक्टरशी आमचा संबंध येतो. They know the job very well. ते तुमच्याबरोबर डाव खेळत असले तरी तुम्हाला नाअुमेद करणार नाहीत. कुठल्या कार्यक्रमाला प्रेक्षकवर्ग कसा असतो याचे त्यांचे काही मूलभूत अंदाज तयार असतात. त्यांनी कार्यक्रमाच्या केलेल्या श्रेणी खूप कलात्मक असतात असं नाही. पण शास्त्रशुद्ध असतात. त्यांना जागतिक बाजाराची कल्पना असते. **त्यांच्याबरोबर काम करताना एक मात्र जाणवतं. सामाजिक महत्त्वाचं असं काही सांगावसं वाटलं तर त्यासाठी या व्यापारी जगात स्थान नाही. दूरदर्शनवर असताना चित्रकार हेब्बर यांच्यावर मी माहितीपट काढला होता तसा काढण्याची आता मला संधी नाही. अजून दहा वर्षांनी कदाचित मिळूही शकेल.**

दूरदर्शन या माध्यमाचा जनमानसावरचा प्रभाव त्या प्रभावाच्या अनुकूल प्रतिकूल बाजू तुम्हाला पाहिजे आहेत. दूरदर्शनभोवती असलेल्या वलयाचा फायदा दूरदर्शनचे निर्माते अुठवतात म्हणजे दूरदर्शनवर कोणाला आणण्यासाठी त्यांच्याकडून भेटी घेणं, त्या मिषाने मुलींशी संबंध जोडणं असं तुम्ही ऐकलं आहे त्याविषयी मी बोलावं अशी तुमची इच्छा आहे. याबद्दल मी एवढंच म्हणतो. This is quite possible. असं होअू शकत असेल. पण पुरावा नाही. मला कोणाची कल्पना नाही. मी ज्यांच्यावर कार्यक्रम करीत होतो त्या दुर्गा भागवत, श्री. ना. पेंडसे यांच्याकडून मी काय घेणार ? काय मागणार ! या नाही त्या प्रकारे दूरदर्शनवर येअू इच्छिणारी माणसं मला भेटली नाहीत. केळकरांनी आम्हाला धडा घालून दिला होता. कोणाबद्दल कोणतेही राग लोभ तुमच्या मनात असोत, तुम्ही दूरदर्शनचे निर्माते असताना न्यायाधीश असलं पाहिजे.



दूरदर्शन या माध्यमाचा जनमानसावरचा प्रभाव याविषयी मात्र मला खूप काही सांगावसं वाटतं. दूरदर्शन हे एक निश्चितपणे धोकादायक माध्यम आहे असं मी म्हणतो. माणसाच्या शरीराच्या कोणत्याही भागाचा तुम्हाला अंदाज घ्यायचा असेल तर हल्ली probing instruments तयार झाली आहेत. तसं माणसाच्या मनाचा ठाव घेणारं एक विलक्षण यंत्र दूरदर्शनच्या रुपानं निर्माण झालं आहे. खरं सांगायचं म्हणजे या यंत्राचा राज्यकर्त्यांनी खूप खोलात जाऊन अभ्यास केला असावा म्हणून ते दूरदर्शनची व्याप्ती वाढवत आहेत. दूरदर्शन माणसाला केवळ समोर येईल ते स्वीकारणारा (पॅसिव) बनवतो. वाचनात टेनिस खेळण्यासारखी लेखक- वाचक जुगलबंदी होत वाचक पुढे जातो. लेखकाच्या सांगण्यातले पदर वाचक शोधीत जातो. काय सांगितलं नाही त्याचाही विचार करीत जातो. **टीव्ही वेगानं तुमच्यावर मारा करतो. सशाच्या डोळ्यावर रात्री बॅटरी मारली तर तो थिजून जातो त्याप्रमाणे प्रेक्षकाला थिजवून टाकण्याचं सामर्थ्य टीव्हीमधे आहे. एकाच 'रेडिअंटमधे' तुम्ही विशिष्ट किरणोत्सर्गाचं 'बंबार्डमेंट' करता तसा टीव्ही हा किरणोत्सर्ग आहे असं माझं प्रामाणिक मत आहे.** मी माझ्या परीनं यात भर घालतो आहे. म्हणून माझं बोलणं दांभिकपणाचं ठरु शकेल. तरी मला वाटतं दूरदर्शनाच्या या परिणामाचा विचार व्हायलाच हवा. म्हणून बोलतो. सध्या शासनाला त्याचे इतके प्रचंड फायदे दिसतात की असं वाटतं प्रचंड प्रमाणावर फसवणूक चालली आहे. आपल्या इथेच असं नाही तर, कम्यूनिस्ट राजवटीच्या देशांमधेही चांगल्या म्हणाव्या अशा पद्धतीनं टीव्ही वापरला जातो आहे.

चीनमधे त्याचा इतका प्रसार आहे की राज्यकर्त्यांना संध्याकाळी सहा ते नऊ काहीही करण्याची आवश्यकता नाही. फक्त टीव्ही चालू. सकाळी सात ते संध्याकाळी पाच माणूस आपल्या पोटामागे धावत असतो. उरलेल्या वेळात दूरदर्शन देईल ते तो स्वीकारतो. **'प्लगिंग द ड्रग'** या पुस्तकाच्या लेखिकेने दूरदर्शनचे दुष्परिणाम दाखवले आहेत. ती म्हणते हे माध्यम माणसाला पॅसिव बनवतं. छायागीतातले कॅबरे पाहून समाजाचं नुकसान होतं हे कोणालाही कळतं. परंतु गुणात्मकतेच्या दृष्टीने चांगले असलेले कार्यक्रमसुद्धा अंती माणसाच्या मनावर दुष्परिणाम घडवितात. दूरदर्शनवर काम करणाऱ्या प्रत्येक माणसानं हे पुस्तक बायबल समजून वाचावं असं माझं ठाम मत आहे. मधे मी असं ऐकलं की पश्चिम जर्मनीमधे दूरदर्शनचे तास कमी करण्याची सूचना आली. पण जनतेच्या इतका तीव्र विरोध झाला की राज्यकर्ते म्हणाले, 'सोडून देऊ, नसता विरोध कशाला घ्यायचा?' जर्मनीमधलीच वाचलेली गोष्ट आठवते. आजोबांनी नातवाला सांगितलं 'शेजारचा अमका माणूस मरण पावला' नातवानं आजोबाला विचारलं, 'त्याला कोणी गोळी घातली?' म्हणजे नैसर्गिक मृत्यू हा

नातवाला माहितीच नाही. नेहमी पिस्तुलानेच मृत्यू ही कल्पना. **वयाच्या चवदाव्या वर्षापर्यंत अमेरिकन मुलाने दूरदर्शनवर सात ते आठ हजार खून पाहिले असतात. त्यामुळे मानवी जीवनाबद्दलच्या कल्पना सर्वस्वी भिन्न असतात. यासाठी मला वाटतं, कोणत्या प्रकारचे कार्यक्रम दाखवायचे यावर नियंत्रण हवं. किती वेळ दाखवायचे यावर नियंत्रण हवं.** आपल्याला जेवण आवश्यक असतं. पण दिवसभर तुम्ही जेवत बसलात तर दुष्परिणाम आहेतच. तुम्ही दिवसाचा एक तास बघाल तर अगदी सुंदर असं हे माध्यम आहे. जगाच्या काना कोपऱ्यात काय चाललं आहे ते तुम्हाला कळेल. त्याला तोड नाही. पण समतोल बिघडला की पंचाईत. दूरदर्शन दिवसात जास्तीत जास्त दोन तास असावं.

आयुष्यातल्या सगळ्या चांगल्या गोष्टी एका रात्रीत करता येत नाहीत. 'वॉर अॅन्ड पीस' वाचायचं तर शांतपणानंच वाचला पाहिजे. 'तुंबाडचा खोत' एका तासात संपवला येणार नाही. दूरदर्शननं नेमकं या वेळाला ग्रहण लावलं आहे. प्रगल्भता येण्यासाठी, विचार वाढण्यासाठी जेवढा वेळ आवश्यक असतो तेवढा वेळ दूरदर्शन देत नाही. 'पण लक्षात कोण घेतो', 'हिंदोळ्यावर', 'कळ्यांचे निःश्वास' या सामाजिक विषयांवरच्या कथा कादंबऱ्यावर वर्षानुवर्ष चर्चा चालल्या. परिसंवाद झाले. आता जर ''कळयांचे निःश्वास'' ही मालिका दूरदर्शनवर आली, तर ती संपल्याबरोबर दुसरी मालिका तयार. पुढच्या आठवड्यात 'कळ्यांचे निःश्वास'' ही मालिका दूरदर्शनवर आली, तर ती संपल्याबरोबर दुसरी मालिका तयार. पुढच्या आठवड्यात 'कळ्यांचे निःश्वास' विसरली जाईल. एखाद्या कलाकृतीला विसरणं न विसरणं, महत्त्वाचं नाही. पण तिच्या पचनाला अवसर मिळत नाही. समोर आलेलं नुसतं भसाभस खायचे.

दूरदर्शनचे दुष्परिणाम टाळण्यासाठी प्रेक्षक मंच असावा, त्याच नियंत्रण दूरदर्शनच्या कामावर असावं असं मला वाटतं. पण यातून निश्चित काही साध्य होईल याची खात्री नाही. मला हल्ली अशा संघटनात्मक कार्याची भीती वाटते. सुरवातीला दहा लोक प्रामाणिकपणे मंच करतील. पण जसजसे त्या मंचाला अधिकार येतील, त्याच्या मताला महत्त्व येईल त्या वेळेला परत ऱ्हास सुरु. मंचाच्या निवडणुका होतील, निवडून येणाऱ्यांचा हेतू काय राहील याची खात्री नाही. कुठलीही संस्था भ्रष्ट झाल्याशिवाय चालते असं वाटत नाही. विघटनाची बीजं फार झट्कन् रोवली जातात. संस्था सुरु होते तेव्हाच पाचव्याच वर्षी बंद करण्याची तयारी चालू होते.

आज जे सगळे लोक दूरदर्शन पाहत होते ते सगळे पूर्वी वाचन करत होते असं नाही. ते बरोबर आहे. दूरदर्शनचे बरेच प्रेक्षक म्हणतील वाचन आम्हाला पचणारं, परवडणारं नव्हतंच. मग दूरदर्शनचा वेळ कमी करुन त्यावरुन मिळणाऱ्या ज्ञानाला आम्हाला का वंचित करता? एका मर्यादित अर्थानं हे खरं आहे. पण त्याचे दूरगामी परिणाम या प्रेक्षकांच्या लक्षात येत नाहीत. दूरदर्शनमुळे स्थानिक वैशिष्ट्यें लयाला जातात.

पुन्हा एका इंग्लिश पुस्तकाचा संदर्भ आठवतो. जागतिक कीर्तीला पोचलेला लेखक पुन्हा आपला प्रदेश बघायाला निघतो. ज्या सॅलिनस व्हॅलीचं वर्णन त्याने आपल्या कादंबऱ्यात ठिकठिकाणी केलं असतं ती बघायला तो अुत्सुकतेनं जातो. पण त्याच्या लक्षात येतं, दूरदर्शनमुळे सॅलिनस व्हॅलीचं रुपच बदलून गेलं आहे. इथे पूर्वी घराघराच्या रचनेचं वैशिष्ट्य होतं. घराघरातून निरनिराळ्या चवी होत्या. वास होते. दृश्यं होती. ते सगळं लोप पावून स्टॅंडर्ड चॉकलेट संस्कृती आली आहे. माल खपतो टीव्हीच्या जाहिरातीप्रमाणे. लोकं वेषभूषा करतात टीव्ही जाहिरातीच्या मॉडेलप्रमाणे. आपल्याकडे तर नॅशनल नेटवर्कमुळे स्थानिकता लोप पावण्याची शक्यता अधिक आहे. नॅशनल नेटवर्क पंचेचाळीस मिनिटांपेक्षा अधिक नको. दिल्लीचं वर्चस्व मुंबईला नको. त्याबरोबर हेही लक्षात ठेवलं पाहिजे मुंबईचं वर्चस्व महाराष्ट्रातल्या इतर खेड्यांवर नको. जितक्या स्थानिक पातळीपर्यंत दूरदर्शनला पोहोचता येईल तितकं बरं असं मी म्हणतो. पण एका बाजूला मला प्रश्न पडतो स्थानिकतेला महत्व द्यायला आपण कोणासाठी सांगायचं? एकदा अुस्मानाबादच्या मुलाला मी विचारलं, 'तुला कोणता कार्यक्रम आवडतो? तो म्हणाला, ''बुनियाद'' ''यही है जिंदगी'' त्याला मराठी कार्यक्रम नको होता. दूरदर्शनच्या मालिकेत इतकं श्रीमंती वातावरण असतं की सर्वसामान्य व्यक्तीच्या वाट्याला ते येत नाही. पण त्या त्या ग्रामीण भागातल्या मुलाला ते आवडतं. त्याचं स्वतःचं जीवन बघायचा त्याला कंटाळा येतो. Unless you have got definite mind to appriciate cultural values given to the piece of art त्या ग्रामीण मुलाला स्वतःभोवतालच्या वास्तवावरील कलाकृती कळत नाही. झुंबर खाली पडतं, खाड्कन काचा फुटतात. कोणाचा तरी खून होतो हे त्याची करमणूक करतं. तर असा हा सगळा गुंता आहे.



**''...दूरदर्शननं नेमकं या 'वेळा'ला ग्रहण लावलं. प्रगल्भता येण्यासाठी, विचार वाढण्यासाठी जेवढा वेळ आवश्यक असतो, तेवढा वेळ दूरदर्शन देत नाही... समोर आलेलं नुसतं भसाभस खायचं.''**

दूरदर्शन केंद्रावरचे माझे दिवस सुंदर गेले. कोणाही तरुणाला विकसित व्हायला पोषक असं ते वातावरण होतं. अजूनही दूरदर्शन केंद्र हा माझा विरंगुळा आहे. मी तिथं जातो. पण हल्ली जेव्हा मी तिथं जातो तेव्हा केंद्रावरची माणसं मला फार असमाधानी दिसतात. पूर्वी कॅमेरा पट्कन मिळायचा. हल्ली वेळ लागतो. वातावरण फार बदललं आहे. पण मला माझ्या आयुष्यात दूरदर्शननं खूप काही दिलं. खूप काही शिकवलं.

शब्दांकन - **विनया खडपेकर**

# दूरदर्शनला प्रतिभावंतांची गरजच नाही

**दूरदर्शनवर
हौसेने रमलेला
एखादा निर्माता
ते माध्यम सोडून जातो.
का ?
भारतीय टीव्हीवरच्या
गुण - अवगुणांचा
एका अनुभवी निर्मात्यानं
घेतलेला आढावा**

**विनय आपटे**

मला नाटकांची आवड. महाविद्यालयीन शिक्षण संपल्यावर मी नाटकं करण्यात रंगलो हातो. साराभाईमधे नोकरीला होतो. तेथील कॅम्प्युटर प्रोग्रॅमिंग वगैरेची कामं हा माझा पिंड नव्हता. परंतु माझ्या कामाबद्दल रिपोर्टस चांगले होते. एका बाजूला महाविद्यालयीन एकांकिकांचं दिग्दर्शन मी करीत होतो. १९७२ मधे माझ्या ''मेन विदाऊट शॅडोज'' या नाटकाला राज्य–नाट्य स्पर्धेत दोन पारितोषिकं मिळाली. नाटकाच्या कर्तृत्वाच्या जोरावर जुलै १९७४ मधे कॅज्युअल प्रॉडक्शन असिस्टंट म्हणून मी दूरदर्शनवर नोकरीला लागलो. माझ्या साराभाईच्या ऑफिसमधे दूरदर्शन केंद्रावरून फोन आला आणि दीड तासात साराभाईची नोकरी मी सोडली. साराभाई मधल्या लोकांना म्हटलं, 'दूरदर्शनवर कॅज्युअल बेसिसची नोकरी आहे, समजा चार महिन्यात ती नोकरी सुटली तर काय करू ?' मॅनेजर सहस्त्रबुध्दे आणि असिस्टंट मॅनेजर खत्री म्हणाले, 'इथे परत ये. वुइ विल अकोमोडेट यू. तुझ्या कामाबद्दल कोणाची तक्रार नाही. आम्ही तुला प्रोग्रॅमर म्हणून ट्रेंड करणार होतो.' हे आश्वासन मिळाल्यावर मी तेथून बाहेर पडलो आणि संध्याकाळी चार वाजता दूरदर्शन केंद्रावर केशव केळकरांच्या समोर जाऊन बसलो. हे आश्वासन मिळालं नसतं तरी ती नोकरी मी सोडली असती. कारण फिकीर करण्याचं वय नव्हतं. मी तेवीस वर्षाचा होतो. दुसरी नोकरी मिळवणं सहज शक्य होते.

सुरवातीला काम करताना दूरदर्शन या माध्यमाचा मला काहीही थांगपत्ता नव्हता. सर्वसामान्य माणसाला दूरदर्शनबद्दल जे कुतूहल, आकर्षण होतं तसंच ते मला होतं. या माध्यमात आपण किती अुड्या मारू शकू ते माहिती नव्हतं. १९७४ मधे दूरदर्शन केंद्राचं वातावरण अुत्साही होतं. सगळे निर्माते जिवाच्या आकांताने काम करीत होते. या सगळ्यांबरोबर राहून काम करताना या माध्यमात दोन–अडीच महिन्यात खूप रस वाटायला लागला. इथे आपण खूप काहीतरी करू असं वाटायला लागलं. अडचणी खूप होत्या. पण अुत्साहही अुदंड होता. दर आठ दिवसाला नियम बदलत होते. कॅज्युअल्सना चुकांना जबाबदार धरता येत नाही त्यामुळे त्यांना निर्मिती करता येत नसे. काही कॅज्युअल्स स्वतंत्रपणे निर्मिती करायला समर्थ होते. पण एकदा परिपत्रक निघाल्यावर सगळेच भरडले गेले. मला वाटलं मी केव्हा कायम होणार ? आपली इथली भूमिका बघ्याचीच राहणार का ?

१९७५ सुरवातीपर्यंत ही स्थिती होती. पण कसं कोणास ठाऊक, एक दिवस आट्यापाट्यावर फिल्म करायला श्री. केशव केळकरांनी मला पाठवलं. रूपारेलच्या मैदानावर कॅमेरा घेऊन आम्ही चित्रीकरणासाठी गेलो आणि परत आल्यावर फिल्म पाहिली. चक्क बरी झाली होती. युवदर्शनसाठी तो कार्यक्रम होता. ती फिल्म पुढे यशवंतराव चव्हाणांनी पाहिली. त्यांना आवडली वगैरे. स्वतंत्रपणे तू जा आणि शूट कर असं सांगितलेला हा माझा पहिलाच कार्यक्रम. त्यानंतर 'ज्ञानदीप' साठी छोटे–छोटे कार्यक्रम मी केले. हा स्वतंत्रपणे काही करू शकतो हे कळल्यावर ज्या निर्मात्यांबरोबर मी काम केली त्यांनी कधीही मला कॅज्युअल प्रॉडक्शन असिस्टंट म्हणून वागवलं नाही.

**''वरच्या अधिकाऱ्यांना तुम्ही कशा प्रकारे पटवून देऊ  शकता यावरही मिळणारं सहकार्य अवलंबून असतं. मी एखादी गोष्ट मागितली, की मिळाली नाही असे कधी  झाले नाही.''**

दूरदर्शनच्या कामाचे धडे मी केळकराकडून घेतले. कार्यक्रमाच्या आखणीपासून अमलबजावणीपर्यंत आणि कार्यक्रम झाल्यानतर पार पडण्याच्या गोष्टी याच जुजबी ज्ञान, सखोल ज्ञान, माध्यमाची ताकद हे सगळ मी केळकराकडून शिकलो  शिकवणी–उपदेश या स्वरूपात त्यानी कधी शिकवल नाही. जेवणाच्या टेबलाशी गप्पा मारता मारता शिकवल. मी स्वतत्रपणे निर्मिती करीत होतो. तरी कायम होत नव्हतो. सहा वर्ष मी 'कॅज्युअल' होतो  एक पायरी अशी होती की तेव्हा मी भारतातला सगळ्यात सिनियर मोस्ट कॅज्युअल होतो  मला इथ भविष्य नाही अस कधी कधी वाटत असे. युनियन बँकेच्या नोकरीत लेखी परीक्षेत मी पहिला आलो होतो. मुलाखतीसाठी गेलो होतो  निवडही झाली होती  घरीदारी अनेकजण सागत होते, दूरदर्शनवर पर्मनट होत नसशील तर बँकेत जा. पण मला वाटत होत, दूरदर्शनवर जे शिकायला मिळत आहे ते शिकून घ्याव  बाहेर स्वतत्रपणे निर्मिती करण्याची सधी नव्हती. मला हाताशी धरुन मी तुला सिनेफोटोग्राफी शिकवतो, माध्यम शिकवतो अस बाहेर कोणी म्हणण्याची शक्यता नव्हती. राज्य नाट्य स्पर्धेत नाव मिळाल होत तेवढ्यावर महाविद्यालयीन पातळीवर काही करु शकत होतो तेवढच. आमच्या सस्थेकडे पैसे आहेत, माणस आहेत. तू येऊन नाटक दिग्दर्शित कर अस कधी कोणी म्हटल नव्हत त्यामुळे मला वाटत होत बाहेर जी असिस्टटशिप केली असती ती दूरदर्शन केंद्रावर केली म्हणून ही इथली वर्षं फुकट जात आहेत अस मला कधी वाटल नाही  १९८० मधे मी पर्मनट झालो.

दूरदर्शनवर सधी खूप होती. मनात आणल तर आठवड्याला एक प्रयोग करता येत होता. कार्यक्रम करताना मला कधी नियमाचा काच झाला नाही. वीस कलमी कार्यक्रमासाठी परिपत्रक आल होत. परतु हा युवदर्शनचा विषय नव्हे म्हणून मी कधी २० कलमीवर कार्यक्रम केला नाही. माझ्यावर कोणी जबरदस्ती केली नाही. मी योजलेला कार्यक्रम करू नको अस मला माझ्या अधिकाऱ्यानी कधीही म्हटल नाही. मी ज्ञानेश्वरावर कार्यक्रम केला  मराठी 'पॉप' केला  माझ्या डोक्यात थिएटर होत. थिअेटरचे प्रयोग मी दूरदर्शनवर केले  निरनिराळ्या गटाना बोलावून, त्याना विषय देअून गटाच्या अुत्स्फूर्त अभिनयाचा कार्यक्रम केला. त्यावेळी रामन राघव हा 'हॉट' विषय होता. तुमच्या घरावर मध्यरात्री दारावर थाप पडते असा विषय आम्ही अुत्स्फूर्त अभिनय कार्यक्रमातही दिला. पधरा मिनिट विचार करायला वेळ. सात मिनिटाचा अभिनय-खेळ (Performance). याचे मूल्यमापन करायला माधव वाटवे, दत्ता भट याच्यासारखे तज्ज्ञ बोलावले होते. दूरदर्शनवर मी एकाकिका स्पर्धासुद्धा घेतल्या.

दूरदर्शनवर नित्याचे कार्यक्रम साभाळून दर सोमवारचा आठ वाजताचा युवदर्शन कार्यक्रम करून हे अधिक काम आम्ही केल आहे. त्यासाठी नित्याच्या कार्यक्रमात कोणी सवलत दिली नाही. वरचे अधिकारी गुणाची कदर करणारे होते, त्यामुळे कार्यक्रमाला सहकार्य मिळत होत. श्री. पी.व्ही. कृष्णमुर्ती, श्री  व्ही एस्. शास्त्री हे आमचे अधिकारी मुळात कलाकार होते. त्यामुळे आमची दुःख त्याना पट्कन समजू शकत होती. तातारी स्वत: पुस्तक लिहिणारे होते. कविता, गझल करणारे होते. त्यानी काही एकाकिका लिहिल्या होत्या. त्यामुळे त्यानी दडपणं लादली नाहीत. वरच्या अधिकाऱ्याना तुम्ही कशा प्रकारे पटवून देऊ शकता यावरही मिळणार सहकार्य अवलबून असत. मी एखादी गोष्ट मागितली आणि मला ती मिळाली नाही अस कधी झाल नाही. चार मिनिटाच्या शूटिंगसाठी मी मोडकसागरला गेलो आहे. त्यासाठी लागणाऱ्या परवानग्या, वाहन सगळं मला मिळाल. स्टेशन डिरेक्टरन त्यासाठी कार्पोरेशनला फोन केले होते. नाटकात इतके विषय मी हाताळले पण अमुक विषय करू नको अस कोणी म्हटलं नाही. 'गजरा'मध्ये विषय वेगळे घेतले. वेगळ्या पद्धतीनं सादर केले. त्यालाही कधी कोणी विरोध केला नाही. दारु प्यायलेली दाखवायची नाही अस कोणी सागितल नाही. कार्यक्रम प्रक्षेपित झाल्यावर प्रतिकूल अभिप्राय आले म्हणून मला कधी मेमो मिळाला नाही. मी जी शेड्यूल दिली ती पास झाली. 'या माणसाऐवजी तो अधिक ठीक वाटेल का ?' 'त्या लेखकाकडून गजरा लिहून घेता येईल का ?' अशी विचारणा असायची; पण आज्ञा नव्हती.

निर्माता हा कार्यक्रमाचा सर्वेसर्वा असतो. कार्यक्रमासाठी कधीकधी लेखकाकडून कल्पना येतात  लिहिणारी माणसं प्रचड असतात. ती त्याच्या कल्पना घेऊन येत असतात. ज्याचा कलाक्षेत्राशी सबध नाही, फक्त गणेशोत्सवात नाटक करतो असा माणूससुद्धा एखादी मस्त कल्पना सुचवून जातो. नतर लेखकाशी त्या कल्पनेवर चर्चा होते. लेखन तयार होतं. माणस जमा केली जातात. पुढच्या तीन महिन्यात तुम्ही काय करणार याची रुपरेषा आधी द्यावी लागते. 'हा माझा 'गजरा'; ही या गजऱ्याच्या विषयाची व्याप्ती,' हे आधी द्याव लागत. मग माणस गोळा करायची, तालमी घ्यायच्या, सेट डिझाइनरशी चर्चा, प्रकाश-योजना, कॅमेऱ्याच्या जागा याबद्दल सबधित व्यक्तींशी चर्चा हे सगळ करत भाग घेणाऱ्या व्यक्तींचे पैसे देऊन लॉगबुकला एन्ट्री होईपर्यंत निर्माता गुतलेला असतो. पुढे जाअून प्रक्षेपण होअून कार्यक्रमाला मिळणाऱ्या प्रतिसादाला तो जबाबदार असतो  त्या कार्यक्रमावर जी चर्चा होते, एखाद्या कार्यक्रमाला समीक्षकान झोडलेल असल तर हे बघायला लागत की हे समीक्षकाच मत आहे की सर्वसामान्य मत आहे !

१९८० मधे मी निर्माता झालो. स्वतत्र कार्यक्रम करू लागलो. १९८१ ते १९८५ I really enjoyed. नाटक, गजरा, सप्रेम नमस्कार जेवढे प्रतिष्ठेचे कार्यक्रम होते ते सगळे माझ्याकडे होते  'सप्रेम नमस्कार' जोखमीच. मी वेळ निभावू शकेन असा विश्वास असला पाहिजे म्हणूनच ते काम मला दिल. प्रत्येक कार्यक्रमावर प्रचड पत्र येतात. महाराष्ट्र

नेटवर्क नव्हतं तेव्हासुद्धा प्रत्येक कार्यक्रमाला हजार ते पंधराशे पर्यंत पत्र येत होती. काही पत्रं तुमचे स्वर्गातले पितर उतरवणारी. काही पत्रं आमच्या घरी जेवायला या अस कौतुक करणारी. काही. पत्र कार्यक्रमाच्या लेखकाकडून प्रायोजित झालेली. sponsred - unsponsred पत्रं लगेच वेगळी कळतात. ज्ञानदीप, चित्रगीत, [illegible], फीचर फिल्म या सगळ्या ठिकाणी मी काम केलं. फक्त बातम्यामध्ये नव्हतो.

माझा एक अनुभव आहे की काहीतरी नवीन आव्हान मिळाल की भोवतालचे अुत्साहान मदत करतात. एका 'गजऱ्या'च उदाहरण सागतो. कॉम्प्युटरचा 'गजरा' मी केला होता. त्यात आत्माराम भेंडे, आशा भेंडे होते. घरात कॉम्प्युटर येतो आणि बोलतो. मॉनिटरवर वाघाचं चित्र लावलं होतं. कॉम्प्युटर बोलायला लागला की audio waves यायच्या. ही तात्रिक सुविधा मला देण्याकरता इजिनियरन जिवाच रान केल. त्यासाठी त्याना शभर तात्रिक गोष्टी बदलाव्या लागल्या पण त्यानी त्या बदलल्या. एक 'गजरा' मी लाइव्ह टेलेमॅचचा केला होता. इजिनिअर आणि प्रॉडक्शन याच्यात तस नेहमी भाडण. पण पचेचाळीस मिनिटाचा 'लाइव्ह प्रोग्रॅम' म्हटल्यावर इजिनिअर्सची टीमच्या टीम त्या दिवशी फ्लोअरवर हालत होती. स्टेशन इजिनिअर जाताना सर्व ठीक आहे का म्हणून विचारून गेला. असिस्टट स्टेशन इजिनिअर कार्यक्रम होईपर्यंत थाबला.

कॅमेरामनच्या दोन दोन जोड्या होत्या. कारण या कार्यक्रमाला प्रेक्षकवर्ग प्रचड आणि बुद्धी खाद्य मिळाल तर ते सगळ्याना हवच असत रोजचच जेवण जेवायच असेल तर कोणाला रस नसतो. सगळेजण पाट्या टाकतात. दिवाळीला सई पराजपे याचा 'गजरा' करायचा होता. दिवाळी - कालची, आजची, उद्याची. सामानाची मोठी यादी मी डिरेक्टरना दिली. त्यात बैलगाडीच चाक, गॅस मास्क, रोबो अस काय काय होतं. बघितल्यावर डिरेक्टर हैराण झाला. 'तुम क्या बनाता है? चालीस मिनिटका प्रोग्रॅम, लोग सिर्फ एक बार देखेंगे और भूल जाएगे!' मी म्हटल, 'एक बार देखेंगे लेकिन कई बार याद रखेंगे.' अस म्हणून मी हसलो आणि त्याच्यासमोरच्या खुर्चीत बसलो. त्याने सगळ्या वस्तु मजूर केल्या. शेवटी म्हणाला, 'गॅस मास्कच काय करायच?' मी म्हटल, so simple फायर ब्रिगेडला फोन करा.'' त्याने माझ्याकडे बघितल आणि म्हणाला, ''कोण आहे ब्रिगेडीयर ?'' मी म्हटल, ''माझ्या ओळखीचे आहेत. पण तुम्ही फोन करा.'' त्यानी फोन केला. निकम होते. निकमना सागितल, विनय असा असा गजरा करतो आहे आणि निकमनी चक्क ब्रीदींग अॅपरेटस व्हॅन पाठवली. दोन अधिकारी लावायच कस वगैरे माहिती द्यायला बरोबर होते. चित्रीकरण पूर्ण होईपर्यंत ते थाबले होते. पूर्ण झाल्यावर ऑक्सिजन सिलिडर व्हॅनमधे घालून निघून गेले. सिलिडर पाच सेकदसुध्दा तेथे नसतील, पण सिलिडर जर तेथे नसते तर त्या सगळ्या वातावरणाची गमत निघून गेली असती. पाच सेकदासाठी सिलिडर हवे होते आणि आम्ही ते मिळवले.

सुरूवातीचे तीन 'गजरे' लोकानी मला अुभा आडवा झोडपला. गणपतीचा 'गजरा' मी केला होता. अगदी वेगळा होता. त्यात बालेलोकाचा नाच होता. इतर बऱ्याच गोष्टी होत्या. अरुण जोगळेकरनं सूत्रसचालन केल होत. गणपती हे सूत्र पकडुन नाटकाचे छोटे छोटे तुकडे केले होते. लोकाना नाही आवडले. एक पत्र अस होत की 'लोकमान्य टिळकानी महाराष्ट्रात गणपती उत्सव सुरू केला आणि विनय आपटे यांनी तो बद पाडला.' नतर 'दृष्टिकोन' नावाचा गजरा केला. व.पु. काळे येऊन गेले. एकदा जयवत दळवींचा गजरा केला. मग लोकाना वाटल, 'हा आता थडावला' चार कार्यक्रम लोकाच्या मनाप्रमाणे केले की मी पुन्हा काहीतरी प्रयोग करीत असे.

## यंत्रणेतच दोष

कार्यक्रम सादर करताना अनत अडचणी येत असत. ताण बरेच होते. पण काही कलात्मक करायला अडचणी येत नसत. सिस्टिममधे दोष होते त्यामुळे अडथळा यायचा. एखाद्या चित्रीकरणासाठी समजा महाबळेश्वरला जाण आवश्यक आहे तर नियमाचे सोपस्कार पार पाडता पाडता माझी प्रक्षेपणाची तारीखही निघून जाअू शकते. मला अमूक एक माणूस हवा आहे; पण तीनशेच रुपये देऊ शकतो. हजार रुपये दिले तर तो मिळणार आहे. मला एक अमुक एका शॉटला क्रेन हवी आहे. पण हवी आहे म्हटल्यावर दुसऱ्या दिवशी ती मिळू शकत नाही. क्रेन टेंडर मागवून आणेपर्यंत पधरा दिवस लागतात. 'दूरदर्शन' म्हणजे काही फीचर फिल्म नाही की माझ्या हाताशी चार महिने आहेत. हे वेगवान माध्यम आहे. ज्या ठिकाणी निर्मात्याना आठवड्याला एक कार्यक्रम द्यायचा आहे त्या ठिकाणी त्याने मागितलेल्या वस्तु फटाफट अुपलब्ध करून दिल्या पाहिजेत. खरं म्हणजे सुव्यवस्थित निरनिराळे विभाग हवेत. निर्मितीच्या तयारीसाठी एक टीम. दुसरी प्रत्यक्ष निर्मिती करणारी. तिसरी व्यवस्थापन आणि पैशाचे व्यवहार. प्रत्येक वेळेला स्वतच्या घरातील मुलाची मुज असल्यासारखं, लोकाना विनवीत बसायला लागतं - 'यार ऐसा मत करो!' मग मी याला अमुक गोष्ट देअू शकतो म्हणून त्याचा अहकार. जी सही करायला त्याला पाच मिनिटे लागणार नाहीत, तीच सही करायला तो पंधरा मिनिट घेअू शकतो. या सगळ्याच कारण ही यत्रणा (सिस्टिम) दोषी आहे. माणूस दोषी नाही. दूरदर्शनची खूप माणस मरमर काम करतात. यात एक म्हणजे निर्मितीच समाधान अभिप्रेत असत. आणि दुसरं म्हणजे कार्यक्रमाच्या 'निर्माता' वगैरे जी श्रेयनामावली असते त्याची चाड असलेली माणस काम करतात. काही लोक असं म्हणणारे असतात की 'अरे काम करतो म्हणजे काय मेहेरबानी करीत नाही. त्याच नाव

**''ज्या पध्दतीनं ए.जी.चं, इन्कमटॅक्सचं ऑफिस चालवतात, त्याच बांधील नियमांनी ते दूरदर्शन केंद्र चालवतात. वातावरण बदललं होतं. स्टाफचं कार्यक्रमावरचं लक्ष उडालं होतं....**




असतं कार्यक्रमाबरोबर म्हणून काम करतो. मी त्याला ज्या ज्या सुविधा अुपलब्ध करुन दिल्या त्याबद्दल माझं कुठं नाव येतं ?

या अडचणींची सवय झाल्यावर काही वाटेनासं होतं. मग आपल्याला काय काय मिळू शकणार आहे याचा अंदाज घेअूनच कार्यक्रम आखला जातो. कित्येकदा मध्यमवर्गीय माणसाचं घर, श्रीमंताचं घर, अतिश्रीमंताचं घर यात काही फरकच दाखवता येत नाही. घरातले शो पीस, ॲश ट्रे सगळं सारखंच. याला आमचा नाइलाज असतो. जे आमच्याजवळ असतं त्यात आम्ही सगळं बसवतो. खरं म्हणजे आठ दिवस आधी नाटकाची- कार्यक्रमाची तालीम घ्यायला हवी. पण ते शक्य होत नाही. दीडशे दोनशे रुपये कलाकारांना आम्ही देणार; त्यात काय काय अपेक्षा करायची. ऑफिस - टाइममधे तालीम करायला जागा नसते. सहाच्या नंतर तालीम करायची. एका गटाची तालीम चालू असली की दुसऱ्या गटाला बाहेर थांबून रहावं लागतं, किती अडचणी. सरकारी खात्यात फक्त एक बरं असतं; वेळेला चित्र हाललं की मग कोणाची फारशी तक्रार नाही. गुणवत्ता वगैरे सगळे नंतर ! लोक एवढं कुठे बारीकसारीक पहातात ?

असं निर्मिती करणाऱ्यांपैकी काहींना वाटतं. पण माझा मात्र अनुभव आहे प्रेक्षक प्रत्येक बारीकसारीक तपशील टिपत असतात, प्रेक्षक चांगले असतात. सहकारी मदत करतात. माझा राग सरकारी यंत्रणेवर आहे, ज्या पध्दतीनं ते ए.जी.चं, इन्कमटॅक्सचं ऑफिस चालवतात त्याच बांधील नियमांनी ते दूरदर्शन केंद्र चालवतात. हे सर्वथैव चूक आहे. या माध्यमाच्या गरजा निराळ्या आहेत. हल्लीचं मला माहिती नाही. पण पूर्वी दूरदर्शन केंद्रावर आम्ही रात्री नअू - नअू दहा - दहा वाजेपर्यंत काम केली आहेत. अधिक वेळाचे पैसे नाहीत. अशा माणसांना तुम्ही सकाळी मस्टर कसं ठेवता ? मी कधीही मस्टरवर सही केली नाही. आठवड्याला चाळीस तास काम करायचं असेल तर मी साठ तास काम करतो. माझा जो कार्यक्रम आहे तोच माझा मस्टर. तो वाईट झाला तर मला झोडा. दूरदर्शनमधे मी व्यवस्थापन विभागात (Administrative Section) Transport - in - charge सुद्धा होतो. आता नाटक निर्मिती करणाऱ्या माणसाला Transport - in - charge करायचं का ? त्याला makeup - in - charge करायचं का ? हा व्यवस्थापनाचा भाग आहे. कलानिर्मितीचा नाही. पण अशा पध्दतीनं अनेक गोष्टी तिथं चालू असतात.

**तुझा प्रश्न आहे यंत्रणेला संबधित मंत्री जबाबदार आहेत का ? कोणी एक मंत्री जबाबदार असतो असं मला वाटत नाही. माझ्या चौदा वर्षाच्या नोकरीत अकरा मंत्री झाले. आमच्या खात्यात त्यामुळे कोणताही बदल झाला नाही. मला एक असे मंत्री माहिती आहेत की ते म्हणाले,** "I tried to change the system but system tried to change me" **ही जर मंत्र्याची स्थिती असेल तर दूरदर्शनचा निर्माता काय करणार ! केंद्राचा डायरेक्टर दिल्लीच्या टेलेक्सप्रमाणे इथलं केंद्र चालवतो. गुणवत्तेचा प्रश्न आला की आम्हाला** BBC, German TV **यांची अुदाहरणं दिली जायची. आणि सुविधा देण्याचा प्रश्न आला की** They aimply forget BBC or German TV

आम्ही असं ऐकलं आहे की त्या ठिकाणी प्रत्येक निर्मात्याला स्वतंत्र कॅमेरामन असतो. फिरण्यासाठी एक गाडी दिलेली असते. एका नाटकाचे चित्रीकरण करायला ते सात आठ स्टुडिओ राखून ठेवू शकतात. ते तीन महिन्यातून एक नाटक करतात. निर्माता त्याच्या कॅमेरामनला घेऊन कुठेही जाऊन चित्रीकरण करून येअू शकतो. म्हणून "Yes Minister" सारखी मालिक होअू शकते. सुविधांचा प्रश्न आल्यावर एकदा आपले एक मंत्री म्हणाले, ''कशाला हव्यात फॅसिलीटीज ? बी- बी- सीच्या एका निर्मात्यानं मुलाखतीत सांगीतलं की एक चांगली कल्पना त्याला संडासच्या कमोडवर बसला असताना सुचली. अशा पद्धतीनं सिस्टिम जर दूरदर्शनच्या निर्मात्याशी वागणार असेल तर मी म्हणतो निर्मात्याला बसायला खुर्ची तरी कशाला देता ? एकेक कमोड द्या प्रत्येकाला !

या यंत्रणेला कंटाळून आमच्याकडे काही जणांनी सात आठ महिन्यात नोकऱ्या सोडल्या. काहींनी काही वर्षात नोकऱ्या सोडल्या. नोकऱ्या सोडणाऱ्यांमधे कॅमेरामन, सेट डिझाईनर, ग्राफीक आर्टिस्ट, इंजिनिअर सगळ्या जागांवरचे लोक आहेत. अजित वाच्छानी, प्रदीप भिडे असेच टीव्हीवरच्या नोकऱ्या सोडून गेले आहेत. एक इंजिनिअर दुसऱ्याच्या निरोपसमारंभाच्या भाषणात म्हणाला, "In Govt's medium horses and asses are treated in same fashion. So it is always better to the horse to walk out of this medium. And such and such gem is walking out of the premises. We wish him all the best. आम्ही हे सोडत नाही कारण आमच्यात गट्स नाहीत. आमचा आमच्या बुद्धीवर विश्वास नाही. '' नोकरी सोडून बाहेर गेलेल्या माणसांचं भलं झालेलं पाहिलं की पुष्कळदा मला वाटायचं, हरकत नाही नोकरी सोडायला. पण नोकरीत माझं नुकसान नव्हतं. शिवाय दुसरं काय करायचं हेही डोळ्यासमोर स्पष्ट नव्हतंच. एका कंपनीत अकाअूंटन्ट असलेला माणूस दुसऱ्या कंपनीत अकाअूटन्ट म्हणून जाअू शकतो. दूरदर्शनचा निर्माता दुसरीकडे कुठे जाणार ? नाटकांची स्थिती फारच वाईट. चित्रपटामधे काम मिळवणे हेही वाईट कामच. एक फिल्म

डिव्हिजनमधे नोकरी मिळाली तर ! मुख्य म्हणजे नोकरी सोडावी असं मला तीव्रतेनं कधी वाटलंच नाही. अडचणी कितीही असल्या तरी माझे कार्यक्रम मी चोखपणे, अुत्साहाने पार पाडत होतो. ते मला जमून गेलं होतं. प्रेक्षकांचा प्रतिसाद प्रचंड होता.

## माध्यमाची मोहिनी

किती मोहिनी आहे लोकांवर या माध्यमाची ! किती प्रकारे लोक धडपडतात दूरदर्शनवर येण्यासाठी ! त्यांना तोंड देणं हे एक भयंकर काम आहे. आपला चेहरा दूरदर्शनवर दिसावा याचं जबरदस्त वेड सर्वसामान्य माणसालाच असतं असं नाही. मोठमोठ्या सरकारी अधिकाऱ्यांना, प्रायव्हेट फर्ममधल्या मॅनेजिंग डिरेक्टरना, औद्योगिक क्षेत्रातले कारखाने चालविणाऱ्या बड्या लोकांना ते वेड आहे. प्रत्येकाचे प्रयत्न करण्याचे मार्ग वेगळे. कारकून, अधिकारी स्वतःहून येतात. 'बघा जमलं तर काही चान्स द्या'' असं सांगणाऱ्यांची एक जात आहे. अमूक शूटिंगसाठी मी तुम्हाला जागा देतो. तुम्ही तमूक माणसाला संधी द्या अशी सूचना होते. पैसे देण्याचा प्रयत्न होतो. समोरचा माणूस पैसे घेणारा नसेल तर कोणात्या पद्धतीनं त्याला अुपकृत करावा याचा विचार होतो. भांडवलशहा खेळांचे अुपक्रम योजतात. त्या अुपक्रमाला, चेंबर ऑफ कॉमर्सच्या मिटींगला कव्हरेज द्या म्हणतात. आपल्या बँकेचं नाव दूरदर्शनवर यावं म्हणून कितीजण धडपडतात !

कारण तिथल्या प्रसिद्धी खात्यातल्या माणसाच्या दृष्टीनं टीव्हीकव्हरेज हा त्याच्या टोपीतला तुरा असतो. त्यामुळे तो जीव खाअून बँकेचं नाव टीव्हीवर आणण्यासाठी प्रयत्न करतो. हा प्रयत्न करताना तो बँकेच्या चार सुविधा दूरदर्शनच्या लोकांना देतो. बातम्यांमधे चेहरा दिसावा म्हणून कॅमेरामनला पैसे देणारे लोक आहेत. हा घाणा वर्षानुवर्षे चालू आहे. चालू राहणार. हा व्यवहार म्हणजे देवघेव - barter exchange. मी तुला संधी देतो. तू माझ्या मुलाला नोकरी दे. मी तुला लोकेशन देतो तू मला संधी दे.

लोक येअून आम्हाला म्हणतात, 'आम्हाला अभिनय शिकवा, लिहायला शिकवा, मग आम्ही करु.' अरे, हे इतकं वेगवान् माध्यम आहे की शिकवण्याइतका वेळच आम्हाला नसतो. जे तयार आहे ते आम्ही घेतो. अुत्तम लिहू शकणाऱ्या प्रस्थापित लेखकांना स्क्रिप्टसाठी मागे लागून मी दमलो. चाळीस मिनिटांचं स्क्रिप्ट लिहायला त्यांना दोन दोन वर्ष लागणार असतील तर या वेगवान माध्यमात मी दर आठवड्याला लोकांना काय देअू ? मी फक्त नाचून दाखवू शकतो ! कोणीतरी माणूस काही काही लिहून आणतात. त्यांच्या दृष्टीनं त्यानं खांडेकर, पु.ल. देशपांडे यांच्याइतकं चांगलं लिहिलं असतं. तो काही ऐकून घ्यायला तयार नसतो. या सगळ्याला तोंड देणं फार भयानक होतं. म्हणून, मी काय करीत होतो, माझ्या इथं लिहून ठेवत होतो, '१ मार्च १९८६ पर्यंत कोणी स्क्रिप्ट आणू नयेत.' १ मार्च १९८६ ला तेथे १९८७ करायचे. एकदा एक तबलेवाला माझ्याकडे आला. म्हणाला मला तबल्याचा सोलो आयटम् करायचा आहे. मी म्हणालो, 'तबल्याचा सोलोशो आम्ही करीत नाही. तो म्हणाला, ''तुम्ही खोटं बोलता. दीड महिन्यापूर्वी मी टीव्ही वर सोलो शो बघितला.'' ''कोणाचा ?'' ''झाकीर हुसेनचा'' 'परिचय' कार्यक्रमात मोहन गोखलेनी झाकीर हुसेनची मुलाखत घेतली होती. तेव्हा त्यांचे आठ मिनिटांचे तबलावादन झाले होते. मी म्हणालो, ''झाकीर हुसेन हे झाकीर हुसेन आहेत. तू तू आहेस. मी त्यांचा तबला करणार आणि तुझा नाही करणार.'' तो म्हणाला, ''मी मिनिस्टरकडे जाईन -'' मी अुत्तर दिलं, ''जा. माझ्या डाव्या खिशात राजीनामा नेहमी तयार असतो'' असे अनंत प्रकार असतात. तुम्ही काही मागितलं नाही तरी लोक पैसे घेअून तयार असतात- हे घ्या आणि आम्हाला कार्यक्रम द्या. मराठी चित्रगीत माझ्याकडे होतं, तेव्हा एका चित्रनिर्मात्यानं मला सांगितलं की तो चेक तुमच्याकडे ठेवा. मी त्याला मारायला अुठलो ऑफिसमधे, तर म्हणाला, 'मला वाटलं हे इथं असणारच.' एकंदरीत सरकारी खातं इतकं बदनाम आहे की त्या पद्धतीनंच लोक इथं वागतात. असे किस्से अनेक. दर दिवाळीला मिठाईचे पुडे यायचे. माझ्या टेबलावर मी ते मांडून ठेवत होतो. जो कोणी येईल त्याला देअून टाकत होतो. एकही पुडा घरी नेला नाही.




## वातावरण बदललं

१९८० नंतर दूरदर्शनवरचं वातावरण बदलू लागलं. माझ्या कार्यक्रमांच्या जबाबदाऱ्यात मी गर्क होतो तरी वातावरण बदललेलं जाणवत होतं. स्टाफचं जे कार्यक्रमावर लक्ष होतं ते अुडालं. 'अमूक माणूस तमक्याशी काय बोलला, हे असलं सरक्युलर आलं आहे, मग आपण कशाला झक मारायला कार्यक्रमासाठी रक्त आटवायचं ! दहा ते पाच नोकरी करावी. की बसं !' या प्रकारची बोलणी सगळीकडे सुरु झाली. दिल्लीहून राष्ट्रीय कार्यक्रम सुरु झाले आणि मुंबईच्या दूरदर्शनने केंद्रातल्या लोकांना एक धक्का बसला. कारण लोक ज्या वेळात दूरदर्शन मुख्यतः पाहतात तो वेळ राष्ट्रीय कार्यक्रमांनी व्यापून टाकला. आपण जीव आटवून कार्यक्रम तयार करायचे आणि ते कमी प्रेक्षकांपर्यंत पोहोचायचे; यामुळे निर्मात्यांचा अुत्साह कमी झाला. १९८३ मधे प्रायोजित मालिका सुरु झाल्या. दूरदर्शन निर्मात्यांपुढे आणखी समस्या निर्माण झाल्या. प्रायोजक एकवीस मिनिटांच्या कार्यक्रमासाठी जेवढ्या सुविधा देअू करतात, त्याच्या निम्म्या सुविधा दूरदर्शनच्या निर्मात्यांना

चाळीस मिनिटाच्या कार्यक्रमासाठी मिळतात पैसा, सुविधा, अुत्तम कलाकार सगळच प्रायोजकाच्या हातात.

**दूरदर्शनच्या कार्यक्रमांना प्रायोजित कार्यक्रमांशी स्पर्धा करणं केवळ अशक्य! हे म्हणजे हातात तलवार घेअून समोरच्या तोफ असणाऱ्या माणसाशी लढणं आहे. समोरचा माणूस पाचशे यार्डावरुन ठणकन् गोळी मारणार आहे, आपला टिकाव लागणार नाही हे माहिती असून तरी आपली हातातली तलवार फिरवायची एवढंच! दूरदर्शन निर्मात्याच्या हातात बदूक देणार कोण? सिस्टिमने ती द्यायला पाहिजे. पण सिस्टिम कधीही बंदूक देणार नाही. सिस्टिमला हे मेडिओकर माध्यम म्हणूनच चालवायच आहे की काय अशी शका येते. या ठिकाणी माणूस कल्पनेच्या फार भराऱ्या घेअू लागला की सिस्टिमला त्रास होअू लागतो. माध्यमाचा वापर करुन हा माणूस स्वत मोठा होत चालला तर सिस्टिमला दु:ख होतं की काय असा विचार करण्याची वेळ आता आली आहे.**

मालिकाचा पर्याय अुपलब्ध झाल्यावर दूरदर्शनवरच्या बऱ्याच लोकानी धडाधड नोकऱ्या सोडल्या. ते मालिकेत गेले इतकी वर्ष बहुतेक ते घुसमटत काम करीत होते. कारण नोकरी सोडून बाहेर पडल्यावर किराणा सामानाच दुकान घालून काही ते बसू शकत नव्हते साअूड रेकॉर्डिस्ट, कॅमेरामन, सेट डिझाईनवर अनेकानी नोकऱ्या सोडल्या आता मालिकामध्ये काम करणारा अमृत पाल पूर्वी दूरदर्शनवर सेट डिझाईनर होता हल्ली वन् झीरो झीरो दिग्दर्शित करणारा डी. पी. सिधू दूरदर्शनवर कॅमेरामन होता.

वास्तविक पहाता दूरदर्शनच्या निर्मात्याची प्रतिभा जिवत ठेवण ही सिस्टिमची जबाबदारी आहे. ज्याची प्रतिभा जिवत राहू शकत नसेल त्याना वेळप्रसगी काढून टाकण हे सिस्टिमच कर्तव्य आहे त्यासाठी सिस्टिममधे काही योजनाबद्ध बदल सुचवता येतील प्रत्येक निर्मात्याचा पाच वर्षाचा करार करायचा हे माध्यम निर्मितीक्षम प्रतिभेला फार मोठ आव्हान आहे. हे आव्हान पुर करताना निर्माता हरतो. चार वर्षात २०८ युवदर्शनाचे कार्यक्रम निर्माता करतो ही चेष्टा नाही माध्यम निर्मात्याला खाअून टाकत मग तो ठरीव साच्याचे कार्यक्रम देअू लागतो दहावीच्या परीक्षेत कोणीतरी पहिल येणारच. अुन्हाळ्यात कोणीतरी कुठेतरी चालत जातोच कोणी ट्रेकिंगला जातो. चल चार कार्यक्रम झाले 'छद आगळा' हे शीर्षक द्यायच, चार टाळकी जमवायची आणि कार्यक्रम करायचा अस जेव्हा व्हायला लागत तेव्हा आपण सपलो याची जाणीव निर्मात्याला होते त्या क्षणी त्यान त्या जागेवर राहू नये पण जागा सोडण्याचा निर्णय त्याला घ्यायचा असेल तर त्याच भविष्य काय? म्हणून वर्षाला एक लाख रुपये त्याला मिळाले पाहिजेत 'जगायच कस'? या प्रश्नाने त्याला भेडसावू नये पाच वर्षात पाच लाख रुपये मिळाले तर अठरा दराने त्याचे दर महिन्याचे वेतन मिळू शकेल आणि शिवाय ती रक्कम त्याची होईल हे सहज शक्य आहे

माझ्या 'सहज' या शब्दावर तू आश्चर्य व्यक्त केलस पण मी अस


ज्ञानाने जीवनाला ''अर्थ'' येतो
''अर्थानें'' जीवन समृध्द होते.
समृध्द जीवनासाठी आमच्या विविध लाभदायी
ठेव योजनेत सहभागी व्हा.
महाराष्ट्रात ३३ शाखा आणि ३ एक्स्टेन्शन
कौंटर्ससह आपले सेवेसी

# - जनता सहकारी बँक लि., पुणे -

१४४४, शुक्रवार पेठ, थोरले बाजीराव पथ, पुणे - ४११ ००२

ह.ना. कुंदेन
कार्यकारी संचालक

वि.न. साठे
कार्याध्यक्ष



**इधर - उधर : अशा संपन्न मालिकांसमोर दूरदर्शनची निर्मिती म्हणजे ताफेसमोर तलवारीच.**

म्हणतो यात कठीण काही नाही. मनात आणलं तर ते सहज शक्य आहे. दर दहा सेकंदाला सत्तर हजार रुपये हा दूरदर्शनचा जाहिरातीचा दर आहे. मुद्रण माध्यमाशी तुलना करता हा दर तसा कमी आहे. दूरदर्शनवरुन प्रक्षेपित झालेली जाहिरात कुठकुठल्या खेड्यातील निरक्षर लोकांपर्यंत पोहोचते. वर्तमानपत्रातून एवढ्या लोकांपर्यंत जाहिरात पोहोचवायची म्हटली तर एका इंचासाठी तीन लाख रुपये पडतात. शिवाय त्यासाठी साक्षरतेची आवश्यकता असते. दूरदर्शनवरुन कमी पैशात हालतं-बोलतं (audio-visual) चित्र गिऱ्हाईकापर्यंत पोहोचतं. त्यामुळे दूरदर्शनला प्रचंड जाहिराती मिळतात. तो सगळा पैसा सरकारी तिजोरीत जातो. त्याचा अुपयोग दूरदर्शनवरून कार्यक्रम सादर करणाऱ्यांना का होअू नये ? शिवाय बोनस मिळाला पाहिजे. प्रत्येक कार्यक्रमाच्या आधी जाहिराती असतात. जो कार्यक्रम अधिक लोकप्रिय होतो त्या कार्यक्रमाला अधिक जाहिराती मिळतात. कोणता कार्यक्रम लोकप्रिय आहे ते जाहिरात एजन्सी त्यांच्या मार्केट रिसर्चवरून ठरवतात.

**कार्यक्रम लोकप्रिय करण्यामधे निर्माता आणि त्याचे सहकारी यांचे श्रम असतात. त्यामुळे त्या कार्यक्रमाच्या जाहिरातींपासून दूरदर्शनला जे अुत्पन्न मिळतं त्यातील काही टक्के भाग कार्यक्रमाचा निर्माता आणि त्याचे सहकारी- लेखक, तंत्रज्ञ, कामगार यांना मिळावा. यातून निर्मिती करणाऱ्यांना प्रोत्साहन मिळेल आणि त्यांच्यामधे एक निरोगी स्पर्धा वाढून कार्यक्रमाचा दर्जा चांगला राहू शकेल.**

माझ्या एका 'गजरा' कार्यक्रमाच्या आधी बत्तीस जाहिराती आल्या होत्या. त्या कार्यक्रमासाठी मी आणि माझ्या सहकाऱ्यांनी महिनाभर मरमरून काम केलं होते. तेव्हा ही कल्पना मला सुचली. निर्मात्यांचे कार्यक्रम आळीपाळीने बदलावेत. एका निर्मात्याने बारा 'गजरे' केले की त्याला 'आरोग्यसंपदा' ला पाठवायचं. म्हणजे निरनिराळ्या निर्मात्यांना सगळे कार्यक्रम करून दाखविण्याची संधी मिळेल. शेती आणि शालेय चित्रवाणी या विभागासाठी विशेष अभ्यासाची आवश्यकता आहे. बाकीच्या विभागातले निर्माते सहज इकडून तिकडे बदलता येतील. दूरदर्शनच्या निर्मात्यांच्या अडचणींची, येथे नोकरी करणाऱ्यांच्या अडचणींची वर्तमानपत्रातून जाहीर चर्चा होत नाही हे वाईट. थोडेबहुत कधीतरी काहीतरी लिहिलं जातं त्यात गैरसोई, मर्यादा सांगितल्या जातात. परंतु त्यावर अुपाय सुचवले जात नाहीत.

## दूरदर्शन का सोडलं

आता दूरदर्शनची नोकरी मी का सोडली ते सांगतो. कोणत्याही अडचणी असू देत, सिस्टिममधले दोष जाणवू देत. पण दूरदर्शनवरची नोकरी माझी आवडती होती. मला त्यात समाधान होतं. आनंद होता. १९८५ पर्यंत नोकरी सोडण्याचा मी विचार केला नाही. १९८५ मधे माझी नागपूरला बदली झाली. तडकाफडकी बदली झाली. बदलीचं कारण अधिकृतपणे काहीच दिलं नाही. पण ते मला आणि भोवतालच्या लोकांनाही माहित आहे.

दूरदर्शनची पूर्व-परवानगी न घेता मी बाहेर 'अफलातून' हे नाटक दिग्दर्शित केलं. त्याबद्दल मला कडक मेमो आला. या पूर्वीही परवानगी न घेता मी बाहेर नाटकं केली होती. 'कमला' नावाच्या इंग्लिश नाटकात कामही केलं होतं. ऑफिसमधले बरेच लोक ते बघायला आले होते. त्यावेळी काहीही बिनसलं नव्हतं. यावेळी बिनसलं. तांत्रिक दृष्टीने पहायचं तर वर्तमानपत्रात जाहिरात आल्यावर मला मेमो पाठवला गेला. मेमो आल्यावर मी परवानगीसाठी पत्र पाठवलं की बुवा परवानगी मागायची राहून गेली, त्यासाठी हे पत्र- नाटक १९ डिसेंबरला झालं. जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात मला पत्र मिळालं की Permission has not been granted. तोपर्यंत पहिला प्रयोग होअून गेला. मग ते प्रकरण चिघळत गेलं. माझी भूमिका अशी होती (१) दूरदर्शनवर काम करणाऱ्यांनी बाहेर काम केलं पाहिजे. थिएटरचं काम मी करतो याचं कारण कलाकार म्हणून जिवंत राहण्याचं ते दुसऱ्या प्रकारचं साधन आहे असं मला वाटतं. (२) बाहेर जाण्याने ताजेपणा येतो आणि तिकडचा अनुभव इकडे अुपयोगी पडतो. (३) व्यक्तिगत संपर्क वाढतो.

मिळायला कठीण असलेल्या गोष्टी दूरदर्शनसाठी या व्यक्तिगत सपर्कातून मिळवता येतात. (४) बाहेरच्या स्पर्धात्मक क्षेत्रात दूरदर्शनचा निर्माता जेव्हा काम करतो तेव्हा तो किती खोल पाण्यात आहे ते कळू शकतं. (५) बाहेर नाटक करतो म्हणून मी दूरदर्शनच्या कार्यक्रमांच काही नुकसान केल आहे का ? दिलेल काम मी पूर्ण करतो. हे सगळं स्पष्टीकरण मी लेखी दिलेलं होत. परतु व्यक्तिगत सपर्क वगैरे तर त्यांनी मान्य केलाच नाही. कठीण गोष्टी मिळवण वगैरे त्याच्या मते It is part of your job यापूर्वीही परवानगी न घेता मी नाटक केलं होत यावर 'That time you were saved असं अुत्तर मिळाल. त्यानतर माझी नागपूरला बदली झाली. मी आरडाओरडा करण्यासारख यात काही नव्हत. नियम सोडून मी वागलो हे तर खरच होत. मी निर्दोष आहे असं छातीठोकपणे म्हणू शकत नव्हतो. प्रश्न एवढाच होता की जो नियम आधी दाखवला नव्हता, तो नतर का दाखवला ? पण अशा प्रकारचा मुद्दा अुपस्थित करण म्हणजे रामन राघवन 'मी दहा खून केले तेव्हा का नाही पकडलं, आत्ताच का पकडलं ?' अस विचारण्यासारख होत. असल्या बोलण्याला मेमो देणाऱ्यानी किंमत देण्याच कारण नव्हत. शिवाय बदली ही अधिकृतपणे शिक्षा नाही. आम्ही कुठही जाअू अस आमच्या नोकरीच्या करारात स्पष्ट लिहिलेल असत. त्यामुळे ते म्हणू शकतात: 'क्या नागपूरमें लोग नहीं है। We are sending you to strengthen that centre' त्यामुळं काही भाष्य करणं मूर्खपणाच होत. मूळात आपलीच चूक. शिवाय बदलीही नोकरीमधल्या अटींच्या विरुद्ध नाही. माझी चूक मला मान्य आहे. नोकरी सोडल्यावरसुद्धा मी तिच कोणत्याही प्रकारे समर्थन करू इच्छित नाही. इतकच म्हणता येईल की ही चूक ते पोटात घालू शकले असते. जो माणूस नियमावर बोट ठेवून त्याच पालन करायला लावतो तो स्वतःच्या नियमाप्रमाणे वागत नसतो पण एकदा एखाद्याच नियमबाह्य वर्तन दाखवायच म्हटल तर दोनशे पॉईंट्स सापडतील. म्हणून माझा सिस्टिमवर राग आहे. सगळ्या क्षेत्रात पुढे जाणाऱ्याचे पाय खेचणारी माणस असतात. तशीच ती दूरदर्शनवर आहेत. बाहेर काम केलं म्हणून मागेही एका माणसावर केस झाली होती. त्यावेळी डायरेक्टरन त्याचा बचाव केला होता कुठपर्यंत-तर मी त्याला बाहेर काम करण्याची परवानगी दिली, कारण बाहेरच्या स्पर्धात्मक क्षेत्रात आमचा निर्माता कुठ अुभा राहतो हे बघण्याची मला सधी होती अस समर्थन त्या डायरेक्टरनं केलं. तो डायरेक्टर माझ्या वेळेला नव्हता आणि नियमावर बोट ठेवून बदली करणारा डायरेक्टर माझ्या वेळेला होता हे माझ दुर्दैव. तुझी शका आहे 'अफलातून' प्रकरणामुळे झालेली बदली हा आधीच्या अनेक रोषाचा क्लायमॅक्स असू शकेल ? असू शकेल. राजकारण आधीपासून शिजत असेल. मी त्याबद्दल फार गाफील राहिलो असेन.

नागपूरला निभाव लागणार नाही हे लक्षात आल्यावर मी मुंबईला परत आलो. रजेचे अर्ज पाठवायचे. नागपूरला दोन दिवस जाअून पुन्हा मुंबईला यायच अस दीड दोन वर्ष चालल होत. कुतरओढ होत होती. सगळी पगारी रजा सपली. धड बाहेरची काम स्वीकारता येत नव्हती. धड नोकरीच्या आशेवर राहता येत नव्हत. नागपूरची नोकरी मी कधी गृहित धरली नव्हती. कारण नोकरी पाहिजे म्हणून मी दूरदर्शनवर नोकरी केलीच नव्हती. नाहीतर साराभाईकडची नोकरी सोडण्याच कारण नव्हत. काही प्रयोगाच्या अपेक्षेने मी दूरदर्शनवर नोकरी धरली होती.

**''.... हे सगळं ऐकलं की वाटतं, सिस्टिमला या माध्यमासाठी प्रतिभावंतांची गरजच वाटत नाही.''**

**वर्षाला एक लाख रुपये निर्मात्याला मिळायला हवेत. जगायचं कसं हा प्रश्न त्याला भेडसावू नये.---- हे सहज शक्य आहे.''**

ते जर मिळणार नसेल तर राहण्यात काही अर्थ नव्हता. तरी सोडायला धीर नव्हता. **त्या वास्तुशी मी भावनेनं जखडलो होतो. माझा दूरदर्शनवरचा एकही क्षण वाया गेला असं मला वाटत नाही. माध्यमानं मला खूप काही दिलं. नाटक करून एवढी प्रसिध्दी मिळवायला, शिकायला मला पंचवीस वर्ष लागली असती. ते इथं पाच दहा वर्षात मिळून गेले. त्यामुळे** I do not regret my being television guy अुमेदीची चौदा वर्ष मी जिथ घालवली ती वास्तु तोडणं म्हणजे नाळ कापण्यासारखं वाटत होत.

रोज रात्री मित्र-मित्र मिळून चर्चा करीत होतो- काय करायच ? नोकरी सोडतो म्हटल की कुठून तरी बातमी यायची - मुबईला बदली होते आहे म्हणून. मग पुन्हा महिनाभर वाट पहाण. काही झालं नाही की पुन्हा नोकरी सोडण्याचा निर्णय. मी बदलीची वाट पाहिली. पण त्यासाठी हात जोडून कोणापुढे लोटागण घातली नाही. बदल्या तशा अनेकाच्या झाल्या. दिल्लीला मुंबई केंद्राला शिस्त लावण्याची इच्छा झाली असावी. बदल्या काहींनी स्वीकारल्या. काहींनी नोकऱ्या सोडल्या. मी परत मुबईला बदली मिळते का याची वाट पहाण्यात काळ घालवला. अखेर one fine morning decision was taken, so this guy was out. माझी जर बदली झाली नसती तर बहुतेक मी नोकरीत असतो. आणि ही मुलाखत दिली नसती.

आता दूरदर्शन केंद्रावर जातो तेव्हा कॅरिडॉरमधून हिंडतानाच केवढा फरक जाणवतो. जुने लोक भेटले तर म्हणतात आता पहिली मजा अुरली नाही. परवा एक इजिनिअर मुलगी भेटली तेव्हा म्हणाली, ''विनय तुम गया, चासकर भी गया। अभी हमारे अुपर चिल्लानेवाला कोई नहीं है। हम जैसा लाईट देते है वैसा लेते है''

हे सगळ ऐकल की वाटतं, सिस्टिमला या माध्यमासाठी प्रतिभावताची गरजच वाटत नाही. आकाशवाणीपेक्षा दूरदर्शन स्वतत्र होत. सिस्टिम दूरदर्शनला आकाशवाणीच्या मार्गावर नेण्याचा व्यवस्थित प्रयत्न करीत आहे. कोणे एके काळी आकाशवाणीवरचं वातावरणही अुत्साहवर्धक होत अस मी ऐकल आहे. आज आकाशवाणीच वातावरण मृतवत् आहे. इथले लोक निर्मिती करू शकतात असही वाटत नाही. ही प्रक्रिया दूरदर्शनवरही चालू आहे. वेळीच आळा घातला गेला नाही तर अजून पाच दहा वर्षात दूरदर्शनची आकाशवाणीच होईल.

शब्दांकन - विनया खडपेकर

# प्रायोजित मालिकांचा प्रवास...

### पटकथा

कोणत्याही मालिकेची सुरुवात पटकथेपासून होते. बहुतेक वेळा निर्मात्याच्या डोक्यात विषय घोळत असतो. अेखाद्या लेखकाकडून तो लेखन करून घेतो. क्वचित् प्रसंगी लेखकाला चांगला विषय सुचलेला असतो व तो निर्मात्याला भेटतो, विषयाची चर्चा करतो. नंतर पटकथेच्या पहिल्या भागाचे संपूर्ण संवाद आणि पुढच्या भागांचे थोडक्यात रेखाटन तयार केले जाते, लिहून काढले जाते. ते दूरदर्शनच्या 'मंडी हाऊस' (दिल्ली) मधील ऑफीसकडे मंजूरीसाठी पाठविले जाते. दूरदर्शन होकार / नकार निर्मात्याला कळविते.

### पहिला भाग

दूरदर्शनकडून मालिकेला संमती - पत्र मिळाल्यावर निर्माता पहिल्या भागाचे चित्रीकरण, दिग्दर्शक, तंत्रज्ञ, कलाकार यांना अेकत्र आणून स्वखर्चाचे पूर्ण करतो; कारण प्रायोजक सहसा स्वतःचे पैसे आधी अडकवण्याचे धाडस करीत नाही. आणि तेही बरोबरच आहे; अेखादा बुनियाद सारखा अपवाद सोडल्यास (दिग्दर्शकाच्या नावामुळे) ज्या मालिकेला दूरदर्शनकडून पक्की मंजुरी मिळालेली नाही अशा प्रकल्पावर प्रायोजकाने पैसे तरी कशाच्या आधारे घालायचे ?

### पहिल्या भागाला मंजुरी

चित्रीकरण पूर्ण झाल्याबरोबर दिग्दर्शक पहिला भाग दिल्लीला मंजुरीसाठी पाठवतो. दूरदर्शन, अेकतर त्या चित्रीकरणाला, कोणतेही बदल न सुचविता मंजूरी देणे किंवा काही बदल सुचविते. ते सर्व बदल लक्षात घेअून निर्मात्याला परत चित्रीकरण करावे लागते. मालिकेला संमती - पत्र दिलेले असले तरी पहिल्या भागाचे चित्रीकरण पाहिल्यानंतर दूरदर्शन सर्व मालिकाच नामंजूर करु शकते.

### प्रायोजक

अशाप्रकारे पहिल्या भागाचे चित्रीकरण आणि मालिकेची अेकूण आखणी यांना दूरदर्शनकडून मंजुरी मिळाल्यावर निर्माता प्रायोजकाच्या शोधात असतो. निरनिराळ्या जाहिरात अेजन्सीज किंवा जाहिरातदारांना तो ही मालिका काय आहे ते समजावून सांगतो. अेखाद्या जाहिरातदाराने मालिका प्रायोजित करण्यासाठी विकत घेतली की १३ भागांचे (दूरदर्शन अेकावेळी १३ भागांनाच मंजुरी देते) कंत्राट केले जाते. त्यानुसार निर्मात्याला खर्चापोटी ५०% अॅडव्हान्स रक्कम प्रायोजकाकडून मिळते. या पैशातून निर्माता चार भागांचे (दूरदर्शनकडे चार भाग सुपूर्त केल्याशिवाय मालिका सुरु होअू शकत नाही.) चित्रीकरण पूर्ण करतो व ते दूरदर्शनकडे प्रसारणासाठी पाठवितो.

### प्रसारणास मंजुरी


पहिले चार भाग हातात आले की दूरदर्शनचे अधिकारी ते सर्व भाग पाहतात. आधी मंजूर केलेल्या पहिल्या भागाप्रमाणेच पुढील भाग सेन्सॉरच्या चौकटीत बसणारे आहेत ना याची खात्री करतात. त्यांचे समाधान झाले नाही तर बदल सुचवितात किंवा क्वचित् प्रसंगी सर्व मालिका नामंजूरही करु शकतात. अशा वेळी निर्मात्याला चित्रीकरण परत करून प्रसारणास मंजूरी मिळवावी लागते.

### प्रसारणाची निश्चित वेळ

दूरदर्शनच्या अधिकाऱ्यांचे पूर्ण समाधान झाल्यावर निर्मात्याला त्याच्या मालिकेच्या प्रसारणाची निश्चित् वेळ दिली जाते. निर्मात्यास किंवा प्रायोजकास ती वेळ पसंत नसेल तर बदलून घेण्यासाठी प्रयत्न करावे लागतात. परन्तु वेळेत बदल करणे न करणे दूरदर्शनच्याच हातात असते.

### मालिका टीव्ही च्या प्रकाशझोतात

वरील सर्व सोपस्कार होअून मालिका टीव्हीच्या पडद्यावर आली आणि प्रेक्षकांपर्यन्त पोहोचली की विक्रीच्या किमतीपैकी अुरलेली ५०% रक्कम निर्मात्याला मिळते.



'इंतजार' सारख्या एका मालिकेचा भाग म्हणजे लाख - दोन लाख खर्च

# प्रायोजित कार्यक्रमांचे अर्थशास्त्र

अवघ्या चार - पाच वर्षांपूर्वी
आलेल्या 'प्रायोजित' सीरियल्सनी
भारतीय टीव्हीचं
रूपच बदलून टाकलं आहे.
हे प्रायोजित कार्यक्रम
तयार होतात तरी कसे ?
त्यांच्या मागे कुठल्या शक्ती,
कोणते हेतू असतात ?
शरद कर्णिक यांनी
संकलित केलेला आढावा

'प्रायोजित कार्यक्रम' किंवा 'स्पॉन्सर्ड प्रोग्रॅम्स्' हे शब्दप्रयोग दूरदर्शनच्या संदर्भात वापरात येअून अजून ४-५ वर्षांचा कालावधीही लोटला नाही पण अितक्या थोड्या अवधीत हे शब्दप्रयोग किती झपाट्याने सर्वांच्या परिचयाचे झाले आहेत! प्रायोजित कार्यक्रम फार वेगाने लोकप्रिय झाले; उचलले गेले, असे जरी असले तरी प्रायोजित कार्यक्रम तयार होअून आपल्यापर्यंत येईपर्यंतची स्थित्यंतरे काय असतात हे किती जणाना माहित असते! या कार्यक्रमात कुणाकुणाचा कशा प्रकारचा सहभाग असतो, कुणाला किती पैसे खर्चावे लागतात कुणाला किती मिळतात, अेकूण अर्थव्यवहार कसा हाताळला जातो, मालिकाचे विषय कोण निवडत, लेखकाकडून पटकथा-सवाद कोण लिहून घेत, अभिनय करणारे त्याच प्रमाणे तत्रज्ञ कोण असावेत वगैरे कोण ठरवत, जाहिरातदाराला ही मालिका प्रायोजित करण्यासाठी कोण भेटत, दूरदर्शन कडून समती कोण मिळवत, वगैरे सबधी कुतूहलच असत. ही माहिती कोण देऊ शकेल अशी चौकशी करीत असता, मकरद ब्रह्मे हे नाव समोर आले. त्याचप्रमाणे टीव्ही अँड व्हिडिओ वर्ल्ड हे मासिक व इतर काही सदर्भ मिळाले. त्यावर आधारित- सकलित ही माहिती.. .

दूरदर्शनचे व्यापारीकरण झाल्यापासून अितर माध्यमासारखेच जाहिरातीचे माध्यम म्हणून ते वापरले जाऊ लागले. टीव्हीचे कार्यक्रम घराघरातून बघितले जात असल्यामुळे कौटुबिक वापरातल्या वस्तूंच्या (अुदा. साबण, टूथपेस्ट, कपडा, शीतपेये वगैरे) जाहिराती मुख्यत्वेकरून टीव्हीवर केल्या जातात अशा जाहिरातींसाठी दूरदर्शन पैसे आकारते. त्याचे दर ज्या कार्यक्रमाबरोबर जाहिरात केली जाते त्याची वेळ व लोकप्रियता यावर अवलबून असते. प्रेक्षकाची सख्या जितकी जास्त तितकी वस्तूला प्रसिध्दी जास्त. त्यामुळे जाहिरातीचे दर जास्त असे ते गणित आहे. सध्या दूरदर्शनच्या कार्यक्रमाचे तीन प्रकार करण्यात आले आहेत. पहिला प्रकार 'सुपर-अे' दुसरा 'अे' आणि तिसरा 'बी'. साधारणपणे रात्री ९ वाजता प्रसारित होणारे कार्यक्रम पहिल्या म्हणजेच 'सुपर-अे' या प्रकारात मोडतात कारण ते राष्ट्रीय स्तरावरचे असतात (म्हणजे भारतातील सर्व केन्द्रावरून प्रसारित होतात.) रात्रीचे नअू ही वेळ सर्वांच्या दृष्टिने सोयीची असते त्यामुळे बहुसख्य टीव्ही सेटस् त्या वेळी चालू असतात. परन्तु या वेळेव्यतिरिक्तचेही अितर काही कार्यक्रम 'सुपर-अे' या प्रकारात बसतात. अुदाहरणार्थ छायागीत, रामायण, क्रिकेट, विबल्डन टेनिस स्पर्धा अित्यादी. त्याचा प्रेक्षक वर्गही मोठा असतो. - वेळ निराळी असली तरीही. या कार्यक्रमासाठी दूरदर्शनने ठरविलेले सध्याचे दर असे.

| प्रकार | जाहिरातीचा वेळ | दर |
|---|---|---|
| सुपर-अे | १० सेकद | रु ७०,०००/- |
| अे | १० सेकद | रु. ४०,०००/- |
| बी | १० सेकद | रु. २५,०००/- |

या दरात जाहिरात तयार करण्यासाठी लागणाऱ्या खर्चाचा समावेश नाही. 'छायागीत' सारख्या कार्यक्रमाबरोबर अेका वेळी २५-३० जाहिराती दाखविल्या जातात असे म्हटले तर दूरदर्शनला किती अुत्पन्न मिळते याची कल्पना करा!

### प्रायोजित कार्यक्रम

अशा प्रकारच्या १० सेकदाच्या (spot) जाहिरातींखेरीज दुसऱ्या अेका प्रकाराने जाहिराती स्वीकारण्यास दूरदर्शनने १९८३-८४ पासून सुरुवात केली आहे. त्याचे थोडक्यात स्वरुप असे. या जाहिराती ज्या कार्यक्रमाबरोबर दाखविल्या जातात तो कार्यक्रमच जाहिरातदाराने प्रायोजित (sponsor) करायचा. म्हणजे तो कार्यक्रम तयार करण्यासाठी येणारा खर्च जाहिरातदाराने सोसायचा. त्या बदल्यात जाहिरातदाराला त्याच्या मालाची जाहिरात करण्यासाठी काही वेळ दिला जातो.. 'सुपर-अे' कार्यक्रमाबरोबर ६० सेकद, 'अे' कार्यक्रमाबरोबर ९० सेकद आणि 'बी' कार्यक्रमाबरोबर १२० सेकद जाहिरात दाखविण्याची सुविधा प्रायोजकाला या नव्या प्रकारामुळे अुपलब्ध झाली आहे

### सोप ऑपेरा ?

आपण केलेली जाहिरात जास्तीत जास्त लोकानी परत परत पहावी असे जाहिरातदाराला नेहमीच वाटत असते त्यामुळे प्रायोजित कार्यक्रम सर्वसाधारणपणे मालिकाच्या स्वरुपाचे असतात आणि शिवाय ते करमणूक प्रधान आणि कौटुबिक असतात. साबणासारख्या रोजच्या वापरातल्या आणि लवकर सपणाऱ्या वस्तूची जाहिरात जास्त दिवस चालावी असे वाटल्यामुळेच करमणूकप्रधान आणि बरेच महिने चालणाऱ्या मालिका साबणाच्या निर्मात्यानी मोठ्या प्रमाणात प्रायोजित केल्या. म्हणून त्याना अिंग्लिशमध्ये 'सोप ऑपेरा' म्हणण्याचा प्रघात पडला असे म्हटले जाते

दहा सेकदाच्या स्पॉट जाहिरातींशी तुलना केल्यास प्रायोजित जाहिरातींना खर्चही थोडा कमी येतो. प्रायोजित मालिकेचा अेक भाग तयार करण्यास साधारणत दीड-दोन लाख रुपयापर्यन्त खर्च येतो तो 'सुपर-अे' च्या वेळी प्रसारित करण्यासाठी दूरदर्शनला दीड लाख रुपये द्यावे लागतात. या कार्यक्रमाबरोबर ६० सेकदाची जाहिरात विनामूल्य करता येते याचाच अर्थ १० सेकदाला सत्तर हजार रुपयाच्या हिशेबाने होणारी

## काही बोलके आकडे

| मालिका | निर्मात्याचा अेका भागाचा अदाजे खर्च | जाहिरात अेजन्सीला पडलेली किंमत | जाहिरातदाराने अेजन्सीला दिलेली किमत |
|---|---|---|---|
| १. मॉडेला गझल प्रोग्रॅम | १४ ते १७ हजार रुपये | - | २० ते २२ हजार रुपये |
| २. नटखट नारद | ९५ हजार ते १ लाख ५ हजार रुपये | १ लाख २५ हजार रुपये | १ लाख ३५ ते १ लाख चाळीस हजार रुपये. |
| ३. कश्मकश | १ लाख ७५ हजार ते २ लाख रुपये. | २ लाख ५० हजार रुपये | ३ लाख रुपये. |
| ४. हमलोग | ८० हजार ते १ लाख रुपये. | - | ८० हजार ते १ लाख पचवीस हजार रुपये. |
| ५ ये जो है जिंदगी | ९० हजार ते १ लाख साठ हजार रुपये | - | ९० हजार ते १ लाख ६० हजार रुपये. |

चार लक्ष वीस हजार रुपयाची जाहिरात तीन-साडेतीन लाख रुपयात होते. शिवाय मालिकेशी निगडित असल्यामुळे अशा जाहिराती लोकाच्या जास्त लक्षात राहतात. चागल्या कार्यक्रमाशी आपल्या कपनीचे नाव जोडले गेल्यामुळे जाहिरातदाराला अितरही फायदे होतात कपनीचे नाव अुजळ होते, त्यामुळे शेअरबाजारात कपनीची पत वाढते. शिवाय कपनीच्या मालाची लोकाच्या मनातील प्रतिमा अुजळ होते. 'ये जो है जिदगी' बरोबर 'विको' कपनीचे किवा 'रजनी' बरोबर गोदरेजचे नाव किती ओघानेच लोकाच्या लक्षात राहिले

## दूरदर्शनचा लाभ

दूरदर्शनच्या बाजूने विचार केल्यास असे लक्षात येते की, करमणूकप्रधान कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर अुपलब्ध होण्यासाठी 'प्रायोजित' कार्यक्रमाचा दूरदर्शनला फारच चागला अुपयोग झाला. शिवाय अुत्पन्नात वाढ झाली ती वेगळीच.

टीव्हीचे कार्यक्रम तयार करण्यास वेळ आणि पैसा दोन्ही फार मोठ्या प्रमाणावर लागतात २० मिनिटाच्या दूरदर्शनवरील प्रसारणासाठी ३० माणसाच्या युनिटचें आठ शिफ्टसूचे काम (चार प्रत्यक्ष चित्रीकरणासाठी आणि चार त्यावरील प्रक्रियेसाठी) लागते. याचाच अर्थ ३० माणसानी आठ दिवस खपून आणि लाखो रुपये खर्चून तयार केलेला कार्यक्रम टीव्ही नावाचा राक्षस केवळ २० मिनिटात फस्त करतो, पुढचा कार्यक्रम मागत राहतो प्रायोजित कार्यक्रम सुरु करण्यामागे दूरदर्शनची ही अडचण आणि त्यातून काढलेला सुटकेचा मार्ग असणे अगदी स्वाभाविक आहे प्रायोजित कार्यक्रमामुळे दूरदर्शनचा दुहेरी फायदा झाला. अेकतर अत्यत तातडीने हवे असलेले तयार कार्यक्रम आयते आणि फुकटात मिळाले. प्रसारणासाठी म्हणून ठरविलेले पैसे मिळाले शिवाय चागल्या कार्यक्रमाबरोबर येणाऱ्या १० सेकदाच्या जाहिरातींचे अुत्पन्नही वाढले

दूरदर्शनला कार्यक्रम हवे होते, अुत्पन्न हवे होते, जाहिरातदाराना थोड्या कमी खर्चात आपल्या पसतीचे जास्त दिवस चालू राहणारे मालिकाच्या स्वरुपाचे कार्यक्रम हवे होते. ज्या कार्यक्रमाबरोबर आपल्या मालाची जाहिरात दाखवायची तो कार्यक्रम निवडण्याचे स्वातत्र्य हवे होते. अिथपर्यन्त सर्व गोष्टी अेकमेकाच्या गरजा भागविण्याऱ्या होत्या. पण नतरचा प्रश्न होता असे कार्यक्रम तयार कोण करणार? 'मॉडेला' गीत गझल आणि छायागीत हे पहिले प्रायोजिक कार्यक्रम. ते मुबईच्या 'कन्सेप्ट अॅडव्हर्टायझिग' च्या शोभा डॉक्टर यानी सादर केले. त्यातील 'छायागीत' हा कार्यक्रम (टोपाझ ब्लेडस्, एस् कुमार वगैरे त्याचे प्रायोजक होते) अितका लोकप्रिय झाला की दूरदर्शनने त्याचे थोड्याच दिवसात राष्ट्रीयीकरण केले व त्या कार्यक्रमाबरोबर केल्या जाणाऱ्या जाहिरातींवर अमाप पैसा मिळविण्यास सुरुवात केली. या कार्यक्रमाला भरमसाठ जाहिराती मिळू लागल्या. कार्यक्रमाची लोकप्रियता हेच अेक कारण त्यामागे होते.

## खासगी निर्माते

अशाप्रकारे प्रायोजित कार्यक्रमाचे यश पाहिल्यावर जाहिरातदारानी मोठ्या प्रमाणावर प्रायोजित कार्यक्रमासाठी पैशाची तरतूद करण्यास सुरुवात केली. परन्तु असे कार्यक्रम तयार कोण करणार ही अडचण होतीच जाहिराती करणाऱ्या व्यावसायिक जाहिरात अेजन्सीज जवळ असे कार्यक्रम तयार करण्याची यत्रणा नव्हती. आवश्यक असलेले कौशल्यही नव्हते यातूनच खाजगी निर्मात्याचा जन्म झाला. रगभूमी, चित्रपट किंवा दूरदर्शनमधील टीव्ही फिल्मसृच्या निर्मितीची पार्श्वभूमी असलेले निर्माते पुढे आले. त्यानी चागल्या लेखकाकडून अुत्तम दर्जाच्या पटकथा-सवाद लिहून घेतले (खानदान, हमलोग, बुनियाद वगैरे आठवून पहा) नव्या कलाकाराना पुढे आणले, नवे तत्रज्ञ तयार केले. या शिवाय आपल्या मालिकेला दूरदर्शनची समती मिळविण्याचे कामही ते करू लागले. त्यासाठी पहिल्या भागाचे चित्रीकरण करून दाखवावे लागे. (पायलट एपिसोड) अशाप्रकारे सर्व जबाबदारी स्वीकारणारे निर्माते ही अेक त्यावेळची गरज होती आणि खाजगी निर्मात्यानी पुढे येअून ती भागविली देखील.

जाहिरातदाराना प्रायोजित कार्यक्रमाचा असा तयार घास फक्त गिळायचा होता. त्यामुळे खाजगी निर्माते मागतील ती किमत द्यायला त्याची तयारी होती. त्याच्याजवळ अेकच फूटपट्टी होती आणि ती म्हणज १० सेकदाच्या हिशेबाने होण्याऱ्या किंमतीच्या आत खर्च बसला पाहिजे

**कलावंत व तंत्रज्ञांना भरपूर कामे मिळू लागली. मागणीपेक्षा पुरवठा कमी पडू लागला. दुय्यम कलामारांच्या तारखा मिळणेही अवघड झाले.**

## कोणाला काय मिळाले

सर्व सबधिताना सोयिस्कर आणि मान्य होणारी ही परिस्थिती होती परन्तु या सर्व प्रकारात कुणी कसा पैसा मिळविला हे पाहण्या - घेण्यासारखे आहे.

अगदी ढोबळ मानाने असे म्हणता येईल की निर्मात्याला अेखाद्या कार्यक्रमासाठी दोन लाख रुपये खर्च आला तर तो अडीच लाखाला जाहिरात अेजन्सीला विकतो आणि अेजन्सी आपल्या क्लायटला म्हणजे जाहिरातदाराला तो कार्यक्रम तीन लाखाला विकते. ह्या सर्व रक्कमा केवळ अुदाहरण द्यायचे म्हणून घेतल्या आहेत खऱ्या रक्कमा तशा कधीच कळत नाहीत त्या गुलदस्तात असतात. याचा अर्थ अेवढाच की कोणताही प्रायोजित कार्यक्रम प्रेक्षकापर्यन्त येईपर्यन्त बऱ्याच जणानी पैसे मिळविलेले असतात खाजगी निर्माता, जाहिरात अेजन्सी, दूरदर्शन वगैरे अनेकाचा त्यात समावेश असतो

या सर्व प्रकरणात खूप मोठ्या प्रमाणावर पैशाची अुलाढाल होत असल्यामुळे सहाजिकच असख्य निर्मात्याचा ओघ तिकडे वळला कलावत आणि तत्रज्ञांना भरपूर कामे मिळू लागली मागणीपेक्षा पुरवठा कमी पडू लागला दुय्यम दर्जाच्या (बी ग्रेड) कलावतानाही अितकी मागणी आज आहे की त्याच्या देखील तारखा मिळणे अवघड झाले आहे.

दूरदर्शनने सर्वांनाच दरवाजे सताड अुघडे केल्यामुळे खाजगी निर्मात्याचे पेव फुटले आहे कुणीही अुठतो आणि अेखादी मालिका तयार करायला घेतो. तिच्या पहिल्या भागाचे चित्रीकरण करुन येन केन प्रकारे दूरदर्शन कडून समतीचे पत्र मिळवतो आणि मग जाहिरातदाराच्या (प्रायोजकाच्या) शोधात असतो परन्तु कुणीही सोम्या गोम्या निर्माता होअू लागल्यामुळे कार्यक्रमाचा दर्जा घसरु लागला वाईट कार्यक्रमाना प्रेक्षक कमी झाल्यामुळे जाहिरातदार सावध झाले,

मालिकेच्या अेका भागाच्या खर्चाची विभागणी ढोबळमानाने खालील प्रमाणे असते.

| | |
|---|---|
| पटकथा लेखक | रु. ३००० |
| दिग्दर्शक | रु. ५००० |
| सह- दिग्दर्शक- १ | रु. ३००० |
| सह- दिग्दर्शक- २ | रु. २००० |
| कॅमेरामन | रु ४००० |
| सहा. कॅमेरामन | रु. २००० |
| ध्वनिमुद्रक | रु ४००० |
| सहा. ध्वनिमुद्रक | रु. २००० |

| | |
|---|---|
| कलाकार- ५००० X ६ | रु. ३०,००० |
| अेका दिवसाचा प्रत्यक्ष निर्मिती खर्च १५००० X ३ दिवस | रु. ४५,००० |
| निर्मिती नतरचा खर्च | रु. १२,००० |
| सामानसुमान, पोशाख | रु. १०,००० |
| सगीत (शीर्षक सगीतासह) | रु. १५,००० |
| स्टुडिओ भाडे- २,५०० X ३ दिवस | रु. ७,५०० |
| वाहन व प्रवास खर्च ५०००X ३ दिवस | रु. १५,००० |
| दिल्लीच्या वाऱ्या टेलिफोनस् अि. | रु. २५,००० |
| एकूण | १,८४,५०० |

ते कार्यक्रम घेअीनासे झाले आज अशी परिस्थिती आहे की दूरदर्शनने मजूर केलेले कार्यक्रम प्रायोजक नाहीत म्हणून पडून आहेत. पूर्वी दूरदर्शनकडून प्रक्षेपणाची निश्चित वेळ (Time slot) मिळवणे अवघड होते आता परिस्थिती बदलली आहे

## दर्शकच खरे प्रायोजक

हे सर्व पाहिल्यावर असे म्हणावेसे वाटते की लोकानी काय पहावे ही बाब जरी दूरदर्शनने म्हणजेच सरकारी यत्रणेने स्वतःच्या अखत्यारीत ठेवली असली तरी, कोणते कार्यक्रम बघायचे नाहीत हा अधिकार लोकाच्याच हातात आहे. दूरदर्शनच्या निवड समितीतल्या पाच व्यक्ती आणि मार्गदर्शक तत्त्वे ठरविणारी सल्लागार समिती देशातील ५० कोटी लोकानी (दूरदर्शनच्या राष्ट्रीय प्रक्षेपणाची झेप आता तिथपर्यन्त पोहोचली आहे असे म्हणतात) काय पहावे हे ठरवीत असल्या तरी शेवटी जाहिरातदार असेच कार्यक्रम प्रायोजित करणार की ज्याना मोठ्या प्रमाणावर प्रेक्षकवर्ग आहे. नाहीतर त्यानी खर्च केलेल्या भरमसाठ पैशाचा मोबदला (विक्री वाढ) त्याना कसा मिळेल ?

याचाच अर्थ प्रायोजित कार्यक्रमामुळे अेका दृष्टिने लोकाच्या हातात सत्ता आली आहे काय दाखवायचे हे जरी दूरदर्शन ठरवीत असले तरी काय पहायचे हे लोक ठरवीत असल्यामुळे प्रायोजकाना जनमानसाचा विचार अधिक करावा लागतो; कारण तो त्याच्या धद्याचा भाग असतो. या बाबतीत आणखी अेक लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे चागला कार्यक्रम- मग तो कुणीही तयार केलेला असो- त्याला जर प्रेक्षकवर्ग असेल तर जाहिरातदार तो प्रायोजित करायला तयार असतो. कार्यक्रम खाजगी निर्मात्यानी निर्माण केला आहे की दूरदर्शन निर्मात्याने या बद्दल त्याला काही घेणे नसते. अुदाहरणार्थ, 'आमची माती, आमची माणसे' किंवा 'ज्ञानदीप' हे दूरदर्शन निर्मित कार्यक्रम काही विवक्षित प्रेक्षकासाठी असल्यामुळे आणि त्यांची संख्या खूप मोठी असल्यामुळे- त्यांना प्रायोजक मिळणे अवघड जात नाही थोडक्यात प्रायोजित कार्यक्रमाच्या सदर्भात शेवटी 'प्रेक्षक' हाच मध्यबिदू ठरतो; मग तो कार्यक्रम कुणीही तयार केलेला असो आणि कुणीही मजूर केलेला असो !

## दूरदर्शनच निर्माते ?

शासनाच्या विचाराधीन असलेल्या अेका महत्त्वाच्या धोरणात्मक बदलाचा अुल्लेख येथे येणे आवश्यक आहे. वर म्हटल्याप्रमाणे दूरदर्शनला आत्तापर्यन्त चागल्या प्रायोजित कार्यक्रमाची जरूरी होती. जाहिरातदाराजवळ किंवा त्याच्या ॲडव्हर्टायझिंग अेजन्सीज जवळ असे कार्यक्रम तयार करण्यासाठी असणारी यत्रणा नव्हती वेळ नव्हता आणि कौशल्यही नव्हते, आणि त्यातूनच खाजगी निर्मात्याचा जन्म झाला. त्याची अेक जमातच अस्तित्वात आली. कारण या धद्यात पैसेही चागले मिळत होते; अजूनही मिळतायत.

ही परिस्थिती लक्षात घेअून दूरदर्शनला आता आपणच स्वतः असे कार्यक्रम तयार करून प्रायोजकाना का विकू नयेत ? असे वाटू लागले आहे. खाजगी निर्मात्याना पैसे मिळण्याअैवजी ते सरकारी तिजोरीतच का जावू नयेत ? असा नवा विचार डोके वर काढू लागला आहे. सरकारच्या अधिकृत धोरणात त्याचा समावेश करण्यात आला आहे. त्या दृष्टिने काही हालचालीही सुरु झाल्या आहेत नव्या पद्धतीत आजच्यासारखे कुणीही कुठलेही प्रोजेक्ट मजुरीसाठी पाठवावे; सर्वांना मुक्तद्वार ही परिस्थिति रहाणार नाही. निर्मात्याना त्याच्या वैयक्तिक पात्रतेसबधी, पूर्वानुभवासबधी दाखले देवून दूरदर्शनकडे, त्याच्या सलग्न निर्मात्याच्या यादीत येण्यासाठी अर्ज करावे लागतील. त्यातून साहित्य, सगीत, क्रीडा, माहिती, शिक्षण, करमणूक वगैरेपैकी कोणत्या विषयात विशेष नैपुण्य कुणाजवळ आहे, हे पाहिले जाईल. दूरदर्शन अशा व्यक्तिना कार्यक्रम तयार करायला सागेल. त्यासाठी लागणारा खर्चही करेल आणि असे तयार कार्यक्रम प्रायोजकाना अुपलब्ध करून देईल. कोणत्या कार्यक्रमासाठी किती पैसे घ्यायचे हे दूरदर्शन ठरवील.

म्हणजे निर्मात्याचे जे दोन प्रकार आज आहेत ('खाजगी' आणि दूरदर्शनचे) त्या अैवजी दूरदर्शनने स्वतः तयार केलेले व बाहेरून तयार करून घेतलेले असे प्रकार राहतील खाजगी निर्मात्याच्या स्वातत्र्यावर आणि हवे तसे पैसे मिळविण्याच्या मनमानीवर निर्बंध येतील. अशी ही सर्व योजना करण्यात आली आहे परन्तु हा सर्व विषय अमलबजावणीच्या दृष्टिने अवघड वाटतो. कोणत्याही कलानिर्मितीला स्वातत्र्य असावे लागते. बदिस्त चौकटीत सृजनशीलतेची गळचेपी होते ती कोमेजते

अेक मजेशीर गोष्ट म्हणजे दूरदर्शनवरील सर्वात खास वेळ, 'सुपर-अे'- टाअिम म्हणजे रात्री ९ वाजताच्या कार्यक्रमाची आज तरी दूरदर्शनने तयार केलेला अेकही कार्यक्रम या वेळी दाखविला जात नाही ? अशा परिस्थितीत लोकाना आवडतील असे सर्वच कार्यक्रम दूरदर्शन स्वतःच कसे काय करू शकणार आहे ? हा अेक यक्ष प्रश्न आहे. शिवाय नव्या धोरणाच्या अमलबजावणी नतर दूरदर्शनची सर्वच यत्रणा अवाढव्य आणि न पेलणारी होण्याची आणि त्यामुळे तिच्यात अनेक दोष येण्याची शक्यता नाकारता येत नाही.

० ० ०

# 'दूरदर्शन'ची वाटचाल

**जीवनाच्या प्रत्येक अंगाशी भिडत चाललेलं दूरदर्शन. भारतीय टेलिव्हिजनची सुमारे तीस वर्षांची सर्वांगानं झालेली वाटचाल. सगळंच काही टाकाऊ नव्हतं हे प्रत्ययाला आणून देणारी**

**नर्मदा शहाणे**

यदिहास्ति तदन्यत्र
यन्नेहास्ति न तक्त्वचित

(जे इथे आहे ते इतरत्र आहे आणि जे इथं नाही ते इतरत्र नाही)

असं महाभारताचं केलेलं वर्णन आज दूरदर्शनबद्दल वापरलं तर मुळीच वावगं ठरणार नाही. जीवनाच्या प्रत्येक अंगाशी अगदी जवळचं नातं असलेला दूरदर्शन सर्वव्यापी आहे यांत शंका नाही.

इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रांतील तांत्रिक प्रगतीमुळें भारतासारख्या खंडप्राय देशाचा ७० टक्के भाग दूरदर्शनच्या कक्षेत आला आहे. भारतासारख्या बहुप्रांतीय, बहुधर्मीय आणि बहुभाषीय देशातील ७० कोटी लोकांशी समन्वय साधायचा असेल, तर दूरदर्शनाशिवाय पर्याय नाही. ३६ टक्के साक्षर असलेल्या लोकांना 'शिक्षण, माहिती व करमणूक' द्यावयाची असेल तर दूरदर्शन हाच सर्वांत प्रभावी उपाय आहे.

हे सर्व ध्यानात घेऊनच भारत सरकारने दूरदर्शनच्या विस्ताराची योजना केली आहे. लक्षद्वीपमध्ये सुरु केलेल्या प्रक्षेपकाबरोबर भारतातील प्रक्षेपकांची संख्या २३८ होत आहे व सुमारे तो ७० टक्के लोकांपर्यंत पोहोचत आहे. ऐवढ्या प्रचंड दूरदर्शनसंकुलाची (TV Network) सुरवात मात्र अत्यंत लहान स्वरुपात झाली.

१५ सप्टेंबर १९५९ या दिवशी राष्ट्राध्यक्षांच्या हस्ते या वृक्षाचे बीजारोपण झाले. युनेस्कोच्या सहकार्याने सुरु झालेल्या दूरदर्शन केंद्राच्या स्थापनेबरोबरच भारतीय दूरदर्शनचा जन्म झाला. हे प्रक्षेपण प्रायोगिक होते व आठवड्यांतून दोनदा एक तासाच्या कार्यक्रमापुरते मर्यादित होते. विषयही सामाजिकच असत. या छोट्या बीजांतून आजच्या भारतीय दूरदर्शनचा विराट वृक्ष तयार झाला आहे. देशांत दोनशेच्यावर लहानमोठे प्रक्षेपक आहेत. १८ पूर्ण केंद्रे आहेत, त्यापैकी आठ केंद्रांची रिले (सहक्षेपण) केंद्रे आहेत, तर सहा INSAT केंद्रे आहेत. जन्मापासूनच्या जवळपास तीस वर्षाच्या कालखंडात दूरदर्शनने ही गरुडझेपी भरारी मारली आहे आणि यामुळे देशातील अनेक ग्रामीण आणि दूरदूरची ठिकाणे एकत्रित आली आहेत.

१९५९ ते १९७१ या काळात दूरदर्शनची प्रगती फारच संथ होती. १९६१ साली विज्ञान गणित व भाषा हे विषय माध्यमिक व उच्च शालेय शिक्षणाच्या थरावर शिकवण्याचे प्रयोग यशस्वी झाले. एवढेच नव्हे तर या प्रयोगांची युनेस्कोच्या तंत्रज्ञांकडून प्रशंसा झाली. त्यानंतर एप्रिल १९६५ मध्यें साधारण स्वरुपाची दूरदर्शनची सेवा सुरु झाली. आठवड्यातून चार दिवशी रोज १ तास असे हे प्रक्षेपण होते. १५ ऑगस्ट १९६५ पासून ही सेवा दैनिक (Daily) करण्यात आली. श्रीमती इंदिरा गांधी त्यावेळी माहिती व प्रसारण खात्याच्या मंत्री होत्या. त्यांच्या कारकीर्दीतच दूरदर्शनच्या विस्ताराची सुरवात झाली. जानेवारी' ६७ पासून 'कृषिदर्शन' हा शेतीविषयक कार्यक्रम सुरु झाला. शेतीविषयक नवीन तंत्राची माहिती ग्रामीण जनतेला करुन देणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश.

भारतातील दुसरे दूरदर्शन केंद्र- मुंबई येथे तयार होईपर्यंत दूरदर्शनची प्रगती फारशी लक्ष्यवेधी नव्हती. नंतर मात्र प्रगतीचा वेग वाढला. मुंबई दूरदर्शन केंद्र १९७२ मध्यें सुरु झाले तर श्रीनगर १९७३ मध्ये सुरु झाले आणि नंतर थोड्याच अवधीत कलकत्ता, मद्रास. लखनौ, अमृतसर आणि जालंधर येथे दूरदर्शन केंद्रे स्थापन झाली. तसेच मसुरी येथे दिल्लीचे, पुणे येथें मुंबईचे, कानपूर येथे लखनऊचे आणि बंगलोर येथे मुंबई व मद्रासचे अशी रिले (सहक्षेपण) केन्द्रे सुरु झाली.

### शिक्षणाचा कार्यक्रम

दूरदर्शनच्या प्रगतीतील पहिला महत्वाचा टप्पा म्हणजे SITE (साइट) हा एक वर्षाचा प्रयोग होय.

(Satelite Instruction and Television Experim-ent) उपग्रहाद्वारे शैक्षणिक कार्यक्रम प्रक्षेपित करणारा प्रयोग. AT- s 6 हा उपग्रह अमेरिकेच्या 'नासा' सस्थेने भारताला एक वर्षापुरता उपलब्ध करून दिला. हा प्रयोग १ ऑगस्ट १९७५ ला सुरु करण्यात आला. या उपग्रहामार्फत चार भाषात चार तासापर्यंत शैक्षणिक कार्यक्रम सहा राज्यातील २४०० खेड्यात दाखविण्यात आले. ही सहा राज्ये म्हणजे आन्ध्र, बिहार, कर्नाटक, मध्यप्रदेश, ओरिसा आणि राजस्थान होय. या राज्यात खास दूरदर्शन सच उपलब्ध करून दिले होते. आरोग्य, कुटुब नियोजन, शेती, सामाजिक बदल इत्यादी विषयांवर हे कार्यक्रम असत. एक वर्षाचा प्रयोग झाल्यानतर रायपूर, जयपूर, मुझफ्फरपूर, गुलबर्गा, हैद्राबाद व सबळपूर येथे प्रक्षेपक (Transmitter) बसविण्यात आले. याशिवाय 'इसरो' (Indian Space Research Organisation) या सस्थेने पिज् येथे सुरु केलेला अल्पशक्ति (Low- Power) प्रक्षेपक दूरदर्शनने उपग्रहामार्फत शिक्षणाकरिता पुढे चालविण्याकरता ताब्यात घेतला.

मार्च १९७६ पर्यंत दूरदर्शन आकाशवाणीच्या अखत्यारीत होते. एप्रिल ७६ पासून दूरदर्शनकरिता वेगळे सचालनालय सुरु करण्यात आले. '५९' ते '७९' या दोन दशकात दूरदर्शनचा प्रसार जास्तीत जास्त क्षेत्रात झाला. महत्वाच्या राष्ट्रीय आणि आतरराष्ट्रीय घटनाचे थेट प्रक्षेपण उपलब्ध होऊ लागले.

## रंगीत दूरदर्शन

दूरदर्शनच्या इतिहासातील दुसरा महत्वाचा टप्पा म्हणजे १९८२ हे वर्ष ह्या वर्षी रगीत प्रक्षेपण सुरु झाले. मुख्य म्हणजे सहाव्या पचवार्षिक योजनेत अतर्भूत नसलेले वीस नवीन अल्पशक्तिचे प्रक्षेपक (Low Power Transmitters) बसविण्यात आले. त्या योगे देशातील प्रत्येक राज्यात व केन्द्रशासित प्रदेशाच्या राजधान्यात दूरदर्शन सुरु झाले आणि देशातील ५३,८८४ खेडी दूरदर्शनच्या टप्प्यात आली या सर्व प्रक्षेपकामुळे ९ व्या आशियाई क्रीडास्पर्धांचे प्रक्षेपण दाखविता आले. या सधीमुळे दूरदर्शनच्या तत्रज्ञाना व्यावसायिक कौशल्याच्या दृष्टीने फार मोठा अनुभव आला.

SITE च्या यशामुळे स्फूर्ती घेऊन भारताने आपला बहुद्देशीय उपग्रह Insat- 1 A १० एप्रिल १९८२ रोजी कार्यान्वित केला. १५ ऑगस्ट १९८२ रोजी पतप्रधान श्रीमती इदिरा गाधी यानी लाल किल्ल्यावरून जनतेस उद्देशून केलेल्या भाषणाबरोबरच उपग्रहातर्फे वीस केंद्रावर प्रदर्शित होणाऱ्या कार्यक्रमाना सुरुवात झाली आणि त्याबरोबर राष्ट्रीय कार्यक्रमानापण सुरुवात झाली इन्सॅट - १ ए हा उपग्रह ४ सप्टेंबर १९८२ पर्यंत चालू होता. मायक्रोवेव्हने जोडल्यामुळे दूरदर्शनला महत्वाचे आतरराष्ट्रीय प्रसग व घटना आपल्या प्रेक्षकाना दाखविता आल्या उपग्रहतत्र आणि मायक्रोवेव्ह याच्यामुळे ९ व्या आशियाई क्रीडास्पर्धा (नोव्हें ८२) अलिप्त राष्ट्र शिखरपरिषद (७ ते १२ मार्च ८३) तसेच चोगम् - (२२ ते २८ नोव्हें. ८३) याचे प्रक्षेपण शक्य झाले आणि ह्यामुळेच इन्सॅट- १ ए या उपग्रहाच्या यशामुळे प्रेरित होऊन दूरदर्शनने त्याच्या दुसऱ्या (इन्सॅट - १ बी) द्वारे INSAT सेवा देशाच्या आन्ध्र, ओरिसा, महाराष्ट्र, गुजराथ, बिहार आणि उत्तरप्रदेश या सहा राज्यात सुरु केली. इन्सॅट १ बी हा उपग्रह ऑगस्ट ८३ ला सुरु झाला. आपल्याला रोज दिसणारे हवामानविषयक दृश्य इन्सॅट १ बी पासून प्राप्त होते.

## सर्वांगीण विस्तार

१९८३ मध्ये दूरदर्शनच्या सर्वांगीण विस्तारासाठी ६८ कोटी रुपयाची योजना मान्य झाली. या योजनेखाली देशाच्या निरनिराळ्या भागात एकशे ऐशी प्रक्षेपक (१० किलो वॅट, १०० वॅट, हाय - पॉवर व लोपॉवर) सुरु करण्यात आले. या योजनेमुळे १ जुलै ८४ पासून चार महिन्यापर्यंत जवळजवळ रोज एक प्रक्षेपक सुरु केला जात होता. इन्सॅट १ बी द्वारा दाखविले जाणारे कार्यक्रम या केन्द्रामार्फत सहक्षेपित केले गेले.

र ग्रीज दूरदर्शनने दिल्ली, मुबई व कलकत्ता येथे सेकड चॅनल सुरु केले. दिल्ली येथे सप्टें' ८४ त, तर मुबईला मे' ८५ त व कलकत्त्याला नोव्हेंबर' ८७ ला सेकड चॅनेल सुरु झाले. मद्रासला सेकड चॅनेल सुरु करण्याची योजना मान्य झालेली आहे.

दूरदर्शनची 'इन्टेक्स्ट' (Intext) सेवा नोव्हेंबर' ८५ ला सुरु झाली. या सेवेद्वारे प्रेक्षकाना बातम्या, रेल्वे आणि विमानसेवाच्या वेळा व हवामान वगैरेबद्दल माहिती मिळते.

दूरदर्शनच्या विकास योजनेला अनुसरून १९८६ पासून दूरदर्शनने प्रक्षेपणाची त्रिस्तरीय पद्धत सुरु केली. या उपक्रमाची सुरुवात मुबईला ऑगस्ट १९८६ ला तर हैद्राबादला १३ जाने. १९८७ ला सुरु झाली. यामुळे खुद्द मुबई आणि महाराष्ट्रातील कोणत्याही प्रक्षेपकाचे कार्यक्रम मुबईला एकदम प्रक्षेपित करणे शक्य झाले. १३ जाने. ८७ पासून आन्ध्र प्रदेशातील प्रक्षेपक हैद्राबाद येथून प्रक्षेपित झालेले कार्यक्रम उपग्रहाद्वारे दाखवितो. १९८७ मध्येच कोडाइकनाल- मद्रासशी व बेरहमपूर

### प्रगतीची दूरदर्शनी पाऊले

| | | | |
|---|---|---|---|
| राष्ट्रपतींच्या हस्ते प्रायोगिक दर्शन | १५.९.५९ | 'हमलोग' या प्रायोजित मालिकेची सुरुवात | ५ ७ ८४ |
| शालेय कार्यक्रमाचे प्रक्षेपण. | २४ १०.६१ | अुच्चशिक्षणाच्या प्रक्षेपणास सुरुवात | १५ ८ ८४ |
| एका तासाचे दैनिक प्रक्षेपण. | १५.८.६५ | दूरदर्शनची रजत-जयती | १५.९ ८४ |
| कृषी दर्शन | २६ १ ६७ | दिल्लीचा दुसरा चॅनेल | १७ ९ ८४ |
| मुबईत दुसऱ्या दूरदर्शन केन्द्राचे उद्घाटन. | २ १० ७२ | मुबईचा दुसरा चॅनेल | १.५ ८५ |
| सॅटेलाइट प्रक्षेपित | १ ८.७५ | इनटेक्स्ट कार्यक्रमाची सुरुवात | ११.११ ८५ |
| शिक्षणात्मक टेलिव्हिजन प्रयोग (SITE) | १.१ ७६ | इन्टेक्स्ट कार्यक्रमाचे डिकोडर शिवाय प्रक्षेपण | १ १२ ८७ |
| जाहिरातीचा चचु प्रवेश | १.४ ७६ | जमिनीवर रोवलेल्या ट्रान्स्मीटर्सची महाराष्ट्रात सुरुवात | ९.८ ८६ |
| दूरदर्शनची आकाशवाणी पासून फारकत | १ ४ ७६ | सौरउर्जेवरील अतिनिम्न शक्ती (VLPT) ट्रान्स्मीटर्सची सुरुवात | ४.१ ८७ |
| सॅटेलाइट प्रक्षेपित शिक्षणात्मक टेलिव्हिजन प्रयोगाची सागता | ३१.७ ७६ | प्रातःकालीन प्रक्षेपणाची सुरुवात | २३.२ ८७ |
| सॅटेलाइट प्रयोगानतरचे जयपूरचे पहिले दूरदर्शन केंन्द्र | १.१.७७ | सिनेमाचे रात्रीचे प्रक्षेपण | ७.४.८७ |
| नवव्या अेशियाडचे प्रक्षेपण | १९ ११.८२ | मूक-बधिरासाठी बातमीपत्र | १५ १०.८७ |
| इन्सॅट १-बी कार्यरत | १५.१०.८३ | आयु.टी एम.ए ची पत्रिका | १५ ३ ८८ |

कलकत्त्याशी मायक्रोवेव्हमुळे संलग्न झाले.

२३ फेब्रुवारी ८७ पासून सकाळचे प्रक्षेपण सुरु झाले. हे ४५ मिनिटांचे असते.

### कार्यक्रमांचे वैविध्य

दूरदर्शनचा विस्तार केवळ संख्यात्मक नसून गुणात्मक आहे हे दूरदर्शनच्या कार्यक्रमांवरुन स्पष्ट होते. मंडी हाऊस नवी दिल्ली येथील दूरदर्शन संचलनालय इतर दूरदर्शन केन्द्रावरुन दाखविले जाणारे व राष्ट्रीय कार्यक्रम यांचे नियंत्रण करते. या कार्यक्रमांद्वारे भारतातील जनतेला 'माहिती, शिक्षण, व करमणूक' पुरवणे हा मुख्य उद्देश.

भारतीय राष्ट्रीय उपग्रह कार्यान्वित झाल्यामुळे आणि पी अॅन्ड टी मायक्रोवेव्ह दुवे उपलब्ध झाल्यामुळे सर्व दूरदर्शन केंद्रांवर एकच कार्यक्रम एकावेळी दाखविणे शक्य झाले. १५ ऑगस्ट ८२ पासून दीड तासाचे राष्ट्रीय कार्यक्रम सुरु झाले. या कार्यक्रमांचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे राष्ट्रीय एकात्मता वाढीस लावणे आणि दूरदर्शनवरील कार्यक्रमांचा दर्जा सुधारणे. एक इंग्रजी आणि एक हिंदी वार्तापत्रांशिवाय संगीत, नृत्य, नाट्य, चालू-घडामोडी, क्रीडा वगैरे कार्यक्रम दाखवले जातात. या कार्यक्रमात देशात होणारी सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक प्रगति दाखविणे, विषमतेतून समतेचा संदेश देणे यावर भर दिला जातो. इतर भाषांतील कार्यक्रमांचाही राष्ट्रीय कार्यक्रमात समावेश होतो; पण भर दृश्यांवर दिला जातो.

भारतीय दूरदर्शन जन्मकथा - विस्तार गॅली नं ३

सध्या हे कार्यक्रम संध्याकाळी साडेआठ पासून रात्री साडेअकरा पर्यंत किंवा खचित् जास्त वेळ पण चालतात.

### शैक्षणिक कार्यक्रम

दूरदर्शनचा पहिला शैक्षणिक (ETV) कार्यक्रम ऑक्टोबर १९६१ मध्ये सुरु झाला. सध्या ज्ञानसंवर्धनात्मक तसेच पाठ्यपुस्तकावर आधारित कार्यक्रम दूरदर्शनची सर्व केंद्रे दाखवितात. ऑगस्ट ८४ पासून विद्यापीठ अनुदान मंडळाच्या वतीने विद्यापीठाकरिता कार्यक्रम प्रक्षेपित केले जातात.

### प्रायोजित कार्यक्रम

दूरदर्शनच्या कार्यक्रमांत् विविधता आणण्याच्या दृष्टिने १९८४ मध्ये प्रायोजित कार्यक्रमांची सुरुवात झाली. हे कार्यक्रम अत्यंत लोकप्रिय ठरले आहेत. 'हम लोग' हा सर्वात लोकप्रिय ठरलेला 'सोप ऑपेरा'. सामाजिक हित, अहित आणि सामाजिक मूल्ये लोकांच्या निदर्शनास आणण्यासाठी सुरु केला. त्याचप्रमाणे 'यह जो है जिंदगी', 'अन्वेषण', 'खानदान', 'इधर उधर', 'मालगुडी डेज' 'अडोस पडोस', 'नुक्कड', 'इंतजार' 'बुनियाद' इत्यादि कार्यक्रम प्रक्षेपित करण्यात आले. केवळ मनोरंजनच हा हेतू डोळ्यापुढे न ठेवता जाता जाता सामाजिक समतेचा संदेश देणारे 'नुक्कड' व 'इन्तजार', स्त्रियांच्या सामर्थ्याची व अधिकाराची जाणीव करुन देणारे 'स्त्री', 'अधिकार', निराशाग्रस्त अयशस्वी लोकांना 'और भी हैं राहे' असे असंख्य कार्यक्रम करमणूकप्रधान व बोधप्रद आहेत.

### चित्रपट आणि त्यावर आधारित कार्यक्रम

प्रायोजित कार्यक्रमांच्या आधीपासून निर्विवाद लोकप्रिय ठरलेले कार्यक्रम म्हणजे चित्रपटावर आधारित कार्यक्रम. दर रविवारी दाखविले जाणारे हिंदी चित्रपट, दुपारी दाखविले जाणारे पारितोषिक विजेते प्रादेशिक चित्रपट, चित्रहार, 'फूल खिले है गुलशन गुलशन', 'आरोही' हे चित्रपटावर आधारित कार्यक्रम होत.

चित्रपटाखेरीज दूरदर्शनने खास दूरदर्शनकरिता चित्रपटांची निर्मिती केली. सत्यजित रे यांनी दिग्दर्शित केलेला 'सद्गति' हा पहिला दूरदर्शन चित्रपट. तेव्हापासून अनेक दूरदर्शन चित्रपट दाखविण्यात आले. काही मान्यवर चित्रपट दिग्दर्शकांना उदा. श्याम बेनेगल, मृणाल सेन, सई परांजपे यांना कार्यक्रम निर्मितीकरता बोलावण्यात आले. उत्कृष्ट विदेशी चित्रपट तसेच जुने कृष्णधवल दर्जेदार चित्रपट ही रसिकांना मेजवानीच असते

दूरदर्शनतर्फे परकीय चित्रपटनिर्मिती संस्थांबरोबर कार्यक्रमाची देवाणघेवाण करण्याचे करार केले जातात व त्यानुसार कार्यक्रमांची देवघेव होते. आतापर्यंत सोव्हिएट युनियन रशिया, जर्मन गणतंत्र, युगोस्लाव्हिया तसेच मध्यपूर्व देशांशी करार करण्यात आले आहेत.

दूरदर्शनने राष्ट्रीय फिल्म विकास निगम (NFDC) या संस्थेच्या सहकार्याने चित्रपटनिर्मितीला सुरुवात केली आहे. ह्या योजनेतील पहिली फिल्म म्हणजे सुधीर मिश्रा दिग्दर्शित 'मै जिंदा हूं' ही होय. सुधीर मिश्रांच्या 'यह तो वो मंझिल नही है' ला इंदिरा गांधी पुरस्कार ८६ साली मिळाला आहे. या चित्रपटाचे प्रमुख कलाकार आहेत- बुनियाद प्रसिद्ध आलोक नाथ, दीप्ति नवल व करमचंद फेम पंकज कपूर.



'चल बंबई चल' या चित्रपटातील एक दृश्य

तसेच दूरदर्शन- चॅनेल ४, राष्ट्रीय फिल्म विकास निगम व मीराबाई फिल्मस् यांच्या सहकार्याने 'चल बम्बई चल' हा चित्रपट पुरा झाला आहे. या चित्रपटाचे कलाकार आहेत- नाना पाटेकर, अनिता कंवर, रघुवीर यादव व मुम्बईतील झोपडपट्टीतली मुले. मीरा नायर या दिग्दर्शिका आहेत. हा चित्रपट नुकत्याच झालेल्या कान् चित्रपटमहोत्सवात 'दिग्दर्शकांचा पंधरवडा' (Directors' Festival) या विभागात दाखविण्यात आला.

देशात घडत असलेल्या घटनांबद्दल जनतेत जाण निर्माण व्हावी या हेतूने हे कार्यक्रम प्रक्षेपित

-: ट्रान्समीटर द्वारा दूरदर्शनची क्षेत्रव्याप्ती आणि लोकसंख्या .-

| वर्ष | क्षेत्रफळ | लोकसंख्या (लाखात) | | वार्षिक अवलोकन |
|---|---|---|---|---|
| इ.स. | ०००क्स्वे.कि.मी. | शहरी | ग्रामीण | एकूण |
| १९५९ | ३०.७० | ८८.१५ | १०२ ४५ | १९० ६० |
| १९७२ | ४९.६० | १८७.५२ | १३६ ०८ | ३२३.६० |
| १९७३ | ९५.१४ | २२६.१८ | २१४ ८८ | ४४१.०६ |
| १९७५ | १६५.६४ | ३९५.५३ | ४३९ ०८ | ८३४.६१ |
| १९७६ | १७५.३९ | ३९९ ७६ | ५११ ८५ | ९११.६१ |
| १९७८ | ३४१ ०९ | ५१८.६० | ८४९ २९ | १३६७ ८९ |
| १९७९ | ३९२.०९ | ५६६.३५ | ९८९.६१ | १५५५ ९६ |
| १९८१ | ४३५.२९ | ६०९.१७ | १०५९.३१ | १६६८.४८ |
| १९८२ | ५८८.७९ | ६९९ ४९ | १३२९ ९५ | २०२९.४४ |
| १९८३ | ६०५.७९ | ७४१ १६ | १३५८ ८६ | २१०० ०२ |
| १९८४ | ११०९ ५६ | १२७६ ०८ | २४७०.७६ | ३७४६ ८४ |
| १९८५ | ११६२ २१ | १३००.११ | २६५२ ७५ | ३९५२ ८६ |
| १९८६ | ११८५.७४ | १३०८.८४ | २६९१.९१ | ४०००.७५ |
| १९८७ | १२३४.०४ | १३२६.७९ | २७६०.९७ | ४०८७.७६ |

(आय. टी. एम्. ए. ची पत्रिका - १५-३-८८)

केले जातात एक हिंदी व इग्लिश अशी दोन बातमीपत्रे आणि सकाळी व सध्याकाळी राष्ट्रीय आणि आतरराष्ट्रीय बातम्या पुरवतात. बातम्यामधील दृश्ये दूरदर्शनला उपग्रहाद्वारे मिळतात १ नोव्हे. ८४ पासून दूरदर्शन Asia VISION या सस्थेचा सदस्य झाल्याने APBU (एशियन पॅसिफिक ब्रॉडकास्टिग युनियन) च्या सभासदाच्या देशातील बातम्याची दृश्ये दूरदर्शनला मिळतात. 'न्यूजव्ह्यूज' किंवा 'समाचार विचार' यासारख्या कार्यक्रमातून देशात घडत असणाऱ्या प्रचलित घटनावर वृत्तपत्राचे विचार चर्चेद्वारे कळतात

### क्रीडा-

वर्ल्ड ऑफ स्पोर्टस् हा राष्ट्रीय कार्यक्रमात अतर्भूत कार्यक्रम दर रविवारी दाखविला जातो या खेरीज प्रुडेन्शियल कप स्पर्धा, ऑस्ट्रेलियन चषक, भारत-श्रीलका, भारत-पाकिस्तान क्रिकेट कसोटी मालिका इत्यादिचे थेट प्रक्षेपणही केले गेले

याखेरीज, 'सच की परछाईयाँ', 'जनवाणी', 'बियाँड टुमारो' हे कार्यक्रम जनजागृतिसाठी असून विविध प्रश्नावली स्पर्धा आणि राष्ट्रीय प्रज्ञा स्पर्धा तरुणामध्ये जिज्ञासा आणि स्पर्धेचे चैतन्य निर्माण करतात.

हे माध्यम अत्यत प्रभावी असल्यामुळे त्याचा वापर करण्यात खूप जागरुकता हवी या कामी दूरदर्शनला सल्ला देण्याकरता प्रसारमाध्यम, समाजशास्त्र इत्यादि विषयातील तज्ज्ञाच्या समित्या नेमलेल्या आहेत. कार्यक्रमाची योग्य निवड आणि योग्य आखणी करता यावी म्हणून प्रेक्षकाच्या मताची पहाणी केली जाते. हा अभ्यास प्रेक्षकाशी (दर्शक) प्रत्यक्ष बोलून, पत्राद्वारे प्रश्नावली पाठवून तसेच प्रेक्षकाच्या पत्रावरुन आणि वृत्तपत्रातील लिखाणावरून करुन कार्यक्रमाचे विश्लेषण केले जाते. उत्कृष्ट कार्यक्रमाना उत्तेजन मिळावे म्हणून दूरदर्शन सर्वोत्कृष्ट कार्यक्रमाना दरवर्षी पारितोषिके देते.

### दूरदर्शनचं उत्पन्न

दूरदर्शनची लोकप्रियता रुपये, आणे, पैसे यात मोजायची तर प्रचडच आहे. या दृष्टीने दूरदर्शनच्या उत्पन्नाचे आकडे बोलके आहेत दूरदर्शनवर जाहिराती जाने १९७६ पासून दिल्ली, मुंबई, कलकत्ता, मद्रास, जालधर केन्द्रातून दाखवल्या जाऊ लागल्या. हैदराबादमधून जानेवारी ८३ पासून सुरु झाल्या. जाहिराती सुरु झाल्यापासून आणि विशेषत खाजगी उद्योजक प्रायोजित कार्यक्रमाचे प्रायोजक झाल्यापासून दूरदर्शनच्या उत्पन्नाची वाढती कमान आहे. १९७६ मध्ये ते उत्पन्न ६५ कोटींपासून ते ८५-८६ मध्ये ९८ कोटीवर गेले आणि एप्रिल ८७ ते जाने ८८ पर्यंत ते ११६ कोटींवर जाईल असा अदाज आहे.

भारतासारख्या खडप्राय देशातील, शहरी, ग्रामीण व दूरवर्ती भागाना एकत्र आणणाऱ्या दूरदर्शनला तत्रज्ञ आणि कलावताची नित्य गरज असते. त्या करिता दूरदर्शनच्या कर्मचाऱ्याना प्रशिक्षित करण्याकरता दिल्लीला १९७१ मध्ये टेलिव्हीजन ट्रेनिंग सेंटर सुरु केले ७४ साली पुणे येथील फिल्म अॅन्ड टेलिव्हीजन इस्टिट्यूट ऑफ इडियाच्या आवारात अद्ययावत् स्टुडिओ सुरू झाल्यानतर हे केन्द्र पुण्याला आले ते इस्टिट्यूटचे टेलिव्हीजन विग (कक्षा) म्हणून ओळखले जाऊ लागले आतापर्यंत २९ प्रशिक्षण क्रमातून हजाराच्या वर लोक प्रशिक्षित झाले आहेत हे शिक्षण तूर्तास दूरदर्शनच्या कर्मचाऱ्यापुरते मर्यादित आहे

दूरदर्शनचा विस्तार, त्याची गति आणि लोकशिक्षणाचे प्रभावी माध्यम या सर्वाचा विचार करुन दूरदर्शनकरता सहाव्या पचवार्षिक योजनेत सुमारे ७०० कोटी रुपयाची तजवीज केली आहे

O


कलावंत आहेत,
जाणकार अधिकारीही आहेत,
वाट पाहणारे
रसिक प्रेक्षकही आहेत.
तरीही
नागपूर दूरदर्शन
रंगतच नाही.
चांगल्या गोष्टीचं वावडंच
ही तिथली खासियत!

**आशा बगे**

# दूऽऽर दर्शन...

दूरदर्शन संबंधी लेखबिख लिहिण्याचे आमच्या मित्रांचे पत्र आले नि माझ्या घशात आवंढाच आला. आमचं दुर्दैव संपादकांना काय माहीत हो! आमचे नागपूर दूरदर्शन नि त्याचे प्रेक्षक आम्ही दोघंही अगदी बिच्चारे आहोत. यातल्या ''च्च'' वर कितीही जोर दिला नं तरी अपुराच आहे ---- दूरदर्शनबद्दलची आम्हा लोकांची क्रेझ अजूनही गेलीच नाही. जाणार कशी? दूरदर्शनने आम्हाला नेहमी दू ऽऽ रच ठेवले ना! मुंबई दूरदर्शन आपले नाही. तिथे आपली पोंच नाही म्हणून दूर- आणि नागपूर दूरदर्शनने आम्हा रसिकांना दूरच ठेवले म्हणून दूर --- नशीब एकेकाचे!

नव्याने खरेदी केलेआपण लहानपणी तर काय मोठेपणीही हळवेच असतो. हळूहळू त्याचा नवेपणा ओसरतो. ती वस्तू आपल्याला मग नव्हाळीची रहात नाही. पण आमचे नाही तेवढे नशीब! आपल्याला न मिळणाऱ्या किंवा नवसानेच मिळालेल्या वस्तूसंबंधी भावना असाव्यात तशा आम्हा नागपूरकरांच्या दूरदर्शनसंबंधी आहेत. पण फक्त मुंबई दूरदर्शन हं! उगाच गैरसमज नको. दिल्लीच्या कार्यक्रमांची सुद्धा आम्हाला इतकी अपूर्वाई नसते तितकी मुंबईच्या कार्यक्रमा संबंधी असते. विशेषतः मुंबईचा एखादा चांगला कार्यक्रम जेव्हा नेमका नागपूरच्या ग्रामगाथेत (ज्याला आम्ही रसिक प्रेक्षक भक्तीने घाणगाथा म्हणतो) साडेसात ते आठ या वेळात दाखवला जातो, तेव्हा तर आमच्या दुःखाला पारावार नसतो. मुंबईच्या कार्यक्रमांना आम्हीच कां वंचित असावे? आम्ही नागपूरकर म्हणजे काय अगदी हे लागून गेलो का? इ. गोष्टी आम्ही खूप आवेशाने मुठी आपटून पण मनातल्या मनात म्हणतो. आमच्या मनासारखी विशाल जागा आमच्या या आवेशाला कोंडून ठेवायला पुरते हं. क्वचित स्थानिक पेपरमध्ये वाचकांच्या मनोगतात आमच्या रागाला वाचा फुटते पण हे फडतूस मनोगत वाचतंय कोण? ज्यांच्या पर्यंत आमची हांक पोचायला हवी त्यांच्यापर्यंत मुळी पोचतच नाही. मग आम्ही बायका (पुरुषांचे नाही माहित) कीर्तन ऐकता ऐकता वाती वळून टाकाव्यात तशा ग्रामगाथेच्या वेळेत आपला स्वयंपाक उरकून टाकतो. हो, नंतरचे मुंबईचे कार्यक्रम म्हणजे प्रत्यक्ष देवदर्शनच! उगीच स्वयंपाकाच्या वेळेत ते निसटून जायला नको. मुंबई दूरदर्शन म्हणजे साक्षात परमेश्वरी अवतार! कुणाचा सूर लागो न लागो आम्हाला ते चालते. 'राधाधर मधुमिलिंद जयजय' या सौभद्रच्या पदाची कुणी अगदी मिळमिळीत कविताच करून म्हणून टाकतात ते खपते. तरूण उपवर कोवळ्या रूक्मिणी ऐवजी थोराड 'वय निघून गेले' अशा रूक्मिणीचे दर्शनही आम्हाला सुसह्य होते. कारण ते मुंबई दूरदर्शनने घडवले असते नं! असतो एकेकाचा योग! आम्ही अकोल्याला होतो तेव्हा टीव्ही आमच्याकडे आला. तेव्हा टीव्ही चा सुळसुळाट नव्हता झाला. शेजारी पाजारी लहान पिल्लावळ सगळी रविवार नि गुरूवार पिक्चरला येऊन बसायची. पुन्हा दर दोन दोन मिनिटाला 'आंटी टीव्ही लगाऊ? आंटी कलका पिक्चर एकदम हीट!' आमच्याच व्हरांड्याच्या खिडकीतून आम्ही सिनेमा पहायचो. (पडदा सरकवून) तेव्हा 'लाईट येतो डोळ्यावर. पडदा ओढा---' प्रेक्षकातून हुकूम सुटायचे. पुन्हा पिक्चर संपलं की आठवी नववीतलं शेंबडं पोरही (शेंबूड नसलेलं) बोलून जायचे, 'या तुमच्या ब्लॅक अँड व्हाईट टीव्हीत काही दम नाही. रंगीत घ्या. डायनोरा नाहीतर सोनी. टॉप दिसतं पिक्चर'




----हळूहळू आमच्या कॉलनीत सगळीकडे टीव्ही आले. घरची गर्दी ओसरली. आता टीव्ही ची नव्हाळी ओसरायला हरकत नव्हती. ओसरलीही असती. अकोल्याहून तेव्हा 'दिल्ली' दिसत होती. पण आम्ही नागपूरला आलो. मराठी कार्यक्रम आता मनसोक्त पहायला मिळतील असे स्वतःला वारंवार बजावत गेलो. पण नागपूरला आलो तर मुंबई दूरदर्शन दूरवर गेलं.------ मग मुंबईच्या कोणत्याही कार्यक्रमाचं अप्रूपच झालं. सगळे चांगले कार्यक्रम नेमके घाणगाथेच्या वेळेतच. गंधर्वगौरव साडेसात ते आठ नेमके. नादपुत्र हा पं. भीमसेन जोशीं बद्दलचा कार्यक्रम त्याचवेळी. आम्हीसुद्धा रसिक आहोत म्हटलं! गंधर्वाबद्दल आम्हालाही प्रेम वाटतंच की! पण हे जाणतंय कोण? पुन्हा आजकाल या ग्रामगाथेमुळं आमची अभ्यास न करणारी पोरं सुद्धा त्या वेळेत पुस्तकं उघडून बसतात नं! मग नेमका त्याचवेळेस कशाला न दाखवायचा चांगला कार्यक्रम---! आणि एखादी गोष्ट नाही मिळत म्हटली की जास्तच चेव येतो. तसं झालंय आमचं. एकदाचे दाखवून द्यावे साडेसात ते आठ मुंबईचे कार्यक्रम! हळूहळू मग आम्ही होऊ थंड! मग अगदी शहाण्यासारखे जे दाखवाल ते मिटमिट बघून घेऊ. संधी तर द्या आम्हाला.

मुंबई टीव्ही वरून एकदा मराठी रहस्यप्रधान नाटक दाखवले गेले. कथानकाने बरी पकड घेतली होती. नाटकाचे नाव नाही आठवत. पण किशोर प्रधानने काम केले होते. (किशोर प्रधान पूर्वी आमच्या नागपूरचेच). आम्हाला नाटक पूर्ण दाखवलेच नाही. झाले काय! क्लायमॅक्सच्या वेळेसच अगदी सात वीसच्या बातम्या सुरु झाल्या. नाटक रहस्यप्रधान होते त्यामुळे आम्ही सगळे बातम्या संपेतो श्वास आवरुन बसलो होतो. बातम्या सुरु झाल्या तर होवो बापड्या! त्याबद्दल नाही आमची तक्रार! पण बातम्यानंतर अर्धे राहिलेले नाटक सुरु होईलसे वाटले. पण कसचे काय! बातम्या सुध्दा मधेच तोडून टाकून ती ग्रामगाथा विजयी मुद्रेने आम्हाला वाकुल्या दाखवत सुरु झाली. आमच्या वेळेत लुडबूड करता काय बच्चमजी! या अविर्भावात. त्या ग्रामगाथेचे ते पिपाणीसारखे ठराविक कर्कश म्युझिक आणि अनाऊन्सरची ती घोषणा---- 'बँड तीन चॅनेल सात वरून आम्ही बोलत आहोत' 'मंजुळ' स्वरात सुरू झाली. आमचे चेहरे पडले. कधी नव्हे तो ग्रामगाथा मधीच संपेल नि रहस्याची उकल होईल म्हणून आम्ही संपूर्ण ग्रामगाथा एखादे धार्मिक कृत्य करावे तशी पाहिली. पण आठ वाजून बारा मिनिटे दोन सेकंदानी मुंबई सुरु झाली तो नाटकाची श्रेयनामावली सुरु! आपलं रहस्य आपल्याच उदरात सामावून घेऊन आमच्याकरता नाटक संपलेले! दुसऱ्या दिवशी अकोल्याला रहाणाऱ्या माझ्या मैत्रिणींना पत्र पाठवून विचारलं की कोण गं करतं खून? तिचं पत्र येईतो ज्याला त्याला तोच प्रश्न की कोण करतं खून? पंधरा दिवस माझ्या डोक्यात तोच प्रश्न की खून कोण करतं?

एकदा तर खुद्द माझ्याच कथेवर नाटक होतं. मला वाटतं टीव्हीवर, तेही मुंबई टीव्हीवर होणारं माझं पहिलंच नाटक असावं. मीच काहीतरी मोठी गोष्ट केली आहे अशा थाटात मी आमच्या बंद टीव्हीसमोरुन दोन चार चकरा मारल्या. मुलं गालातल्या गालात हसायला लागली, तेव्हा मग मी स्वतःला आवरलं. सात वाजेपर्यंत स्वयंपाक आवरला. सगळ्यांना घरी रहा म्हणून बजावलं. पिक्चर बघायला किंवा नाटकाला गाण्याला जावं तसं तयार होऊन टीव्ही समोर बसलो. सात वाजताच टीव्ही लावून ठेवला. पण सात वाजून चाळीस मिनिटांनी सुरु झालेलं माझं बिच्चारं नाटक मला सव्वा आठला दिसलं न दिसलं तोच फट्कन संपलंही. सूचकतेत सौंदर्य असतं. पूर्णपणे कोणतीही गोष्ट समोर येऊ नये हे आम्हा नागपूरकरांना कळलंच पाहिजे म्हणून असं होत असावं. तशी मराठी माणसं गरीबच बिचारी. त्यांना फक्त आपल्या हाताखालच्या लोकांवरच रुबाब खिचता येतो. (आमच्याकडे आमचे आजोबा आजीवर, आजी आई नि काकूंवर, आई - काकू आपापल्या नवऱ्यांवर, ते नवरे नोकरांवर, आणि आमचे नोकर गाई म्हशींवर आवाज चढवायचे) पाहिजे तिथे आपला विरोध नाही बिचारे दाखवू शकत! असतं कुणी कुणी दुबळं! त्याला कोण काय करणार? आणि आपण मनातल्या मनात मारे आवाज चढवला तर ऐकतो कोण?

नागपूर दूरदर्शनची पुन्हा एक खासियत आहे. चांगल्या गोष्टींचं तिथे जरा वावडंच! वेळही बिचाऱ्यांना फक्त अर्धातास. त्यातच गाणे, नाटक, लहान मुलांचे कार्यक्रम, फॅमिली प्लॅनिंग, सतरा गोष्टी कोंबायच्या. आजकाल मंगळवारी वेळ वाढवून मिळाला आहे वाटतं. मिळो बिचारा! आपल्याला तर त्याचा काही फायदा नाही. कलावंत आहेत, जाणकार अधिकारी आहेत. आमच्या सारखे वाट बघणारे रसिक प्रेक्षकही आहेत. तरीही रंग जमतच नाही. खूप दिवसांपूर्वी मी कसा कोण जाणे एक पडदा भरला. बाई होती. हातात फुलांची परडी घेऊन. तो भरताना नाही कळले. पण लावल्यावर समजले त्या बाईचे डोके, हातातली परडी हे सगळे खाली झाले होते नि पाय वर---- हे कसे झाले? ते मला आजतागायत कळलेच नाही. तसेच आहे. सगळे रंग मौजूद आहेत पण त्यांचे एकजीव असे सुरेख रसायनच जमत नाही त्याला कोण काय करणार?

इथे सुरात गाण्याचं तर फारच वावडं! नागपुरात काही कलावंतांची वाण नाही! पण हे आपले कुठून कुठून गाणारे पकडून आणतात देव जाणे! पु.लं. च्या 'अंमलदार' मधला डॉ. रोंगे (नाव नक्की स्मरत नाही) दवाखान्यात पेशंट म्हणून बाहेरचे लोक धरून आणतो व रिकाम्या जागा भरतो. त्याची आठवण होते. सुरांशी नातं न ठेवण्याची

काही प्रतिज्ञाच असली तर आपण काय करणार? एखादेवेळी मात्र कुणी चागल गाऊन जातो. पण असा योग विरळाच. एकच चेहरा एकच गझल गात असलेला ओळीने आठही दिवस दिसला तरी आश्चर्य वाटायला नको. आश्चर्यविश्चर्याच्या आमच्या सवेदना आता सवयीने मेल्याच हो! एकादे वेळेला सुरेख कविसमेलन होते मग आम्ही तेच खूप दिवस घट्ट धरून ठेवतो. मधून मधून चागले दाखवले तरी चालते आम्हाला! रोजच साजुक तुपाचे हवे असा असा आमचा हट्ट नाही काही! रोजचे नागपूरचे चेहरे जर कधी मुबईहून झळकले तर आम्हाला खूपच आनद होतो. घरातल्या सगळ्याना गोळा करतो आम्ही. तेच चेहेरे नागपूर दूरदर्शनवर पाहिले तर आम्हाला काही वाटत नाही. त्याला आमचाही नाईलाजच आहे न?

एकदा एका सस्कृत समुहगीताच्या स्पर्धेची परीक्षक म्हणून गेले होते. छोट्या मुलामुलींनी उच्चारासह एका आवेशात सगळी गीते फार सुरेख गायिली लय, ताल स्वराचे शब्दानी विणलेले एक सुरेख गोड मोहक रुप मनात साठवून घरी परतले. टीव्हीवरही समूहगीतच होते, मोठ्या माणसाचे. पण फक्त शब्दाचे. त्या शब्दाचे स्वराशी, लयीशी काही नातेच नव्हते. इतके कोरडे शब्द तेही गीतातले आयुष्यात नसतील ऐकले. समुहगीतालाही त्याचा स्वत:चा एक आवेश, सूर चेहरा असतो याचे भानच नव्हते. आवाज चागला होता सान्याचे तरीही चित्र उमटत नव्हते त्यापेक्षा स्पर्धेतल्या मुलाचा बालसुलभ आवेश, वर खाली होणारे हात, पायनी हलकेच धरलेला मद ठेका, त्याने हळूहळू झोका घेत गाणे म्हणणारी चिमुकली सेना, नि सगीतातले प्राणतत्वच घालवून बसलेले हे गीत --- लग्नात विहिणीच्या पगतीत माडवात कोपऱ्यात एक सनईवाला बसतो. त्याच्या वाजवण्याकडे कोणाचे लक्षही नसते, विहीणींची पगत बसली की त्याला हुकूम सुटतो 'वाजवा'---- तो सुरु करतो. त्याने आपली पिपाणी सुरु केली की विहीणीच्या पगतीतला भारावून जाण्याचा 'तो' क्षण उडूनच जातो. कापरासारखा मग त्याला कुणीतरी मधेच थाबवतो. कुणीतरी कापऱ्या आवाजात विहीण सुरु करत. गाण हा प्रकार इतक्या थट्टेन घेतला गेलेला मी प्रथम लग्नाच्या माडवातच पाहिला. नि दुसरा नागपूर दूरदर्शनवर. मला वाटते शनिवारी मुबई दूरदर्शन वरुन दाखवण्यात येणारा मराठी सिनेमा नि नागपूर दूरदर्शन याचे जवळचे नाते असावे. कधीतरीच याचा सूर लागणार! असेल आमच्या नशिबात तर----

आमच्या लहानपणी आमच्या घराजवळ एक माणूस रहायचा, तो 'मूर्तीमत भीती उभी' हे शारदेतल पद 'मजसमोर' हा तिय्या दणक्यात घेऊन म्हणायचा. पण फक्त एकच ओळ म्हणायचा. नुसती. नतर गाणे न म्हणता ती ओळ पेटीवरच वाजवायचा. ते झाल की पेटीच्या लाकडावरच त्या गाण्याचा ताल वाजवायचा गाणे म्हणणे, पेटी वाजवणे व ताल देणे या तीनही क्रिया एकदम झाल्या तर त्यातून काही आनद मिळू शकतो हे त्याच्या गावीही नसायचं. नागपूर दूरदर्शनची गतही हीच आहे. सगळे काही जवळ असूनही त्याच एकजीव, अभिन्न रसायन मात्र होत नाही. गाणारा गाऊन जातो, बोलणारा बोलून जातो, नाटकाचा एखादा प्रवेश काय नाटकही सपते---- पण उमटत मात्र काहीच नाही. असो बापड! सगळे दिवस काही सारखे नसतात! आमचेही दिवस पालटतील. आमचे आणि नागपूर दूरदर्शनचेही----- तोपर्यंत आहेच दूऽऽर दर्शन!

○

## दूरदर्शन नव्हे, जाहिरातदर्शन!

जाहिरातींच्या वाढत्या प्रतिसादामुळे दूरदर्शनचे अुत्पन्नही वेगाने वाढते आहे. या संदर्भात २४ फेब्रुवारी १९८८च्या बुधवारी प्रसारित झालेल्या चित्रहार कार्यक्रमाच्या अुत्पन्नाचे आकडे पाहणे मनोरजक ठरेल. त्या दिवशी स्थानिक केन्द्रातर्फे १३, दिल्ली जोडल्यावर तिथल्या २५ आणि गाण्याच्या मध्येच ६ अशा अेकूण ४४ जाहिराती दाखविण्यात आल्या. शिवाय प्रायोजक पानपरागची जाहिरात. अेकूण १६ मिनिटाची जाहिरात जत्रा प्रेक्षकाना बघायला मिळाली. कार्यक्रमाबरोबर दाखविलेल्या १० सेकदाच्या अेका जाहिरातीचे ७० हजार रुपये, त्याचप्रमाणे गाण्याच्या मध्येच दाखविण्यात येणाऱ्या प्रत्येक जाहिरातीचा ८० हजार पाचशे असे दर; शिवाय प्रायोजनासाठी ३ लाख २५ हजार असा सगळा हिशेब केला तर या अेका कार्यक्रमाने दूरदर्शनला किती अुत्पन्न मिळवून दिले असेल याची कल्पनाच केलेली बरी! थोडक्यात, हळूहळू दूरदर्शनचे स्वरुप जाहिरातदर्शन असे तर होत नाही ना?

महाराष्ट्र टाअिम्स् दि. ११-४-८८.


## अभिरुची

अक विनामूल्य दुर्मिळ अक विनामूल्य दुर्मिळ अक विनामूल्य दुर्मिळ अक

**आमची अडचण ही तुमची सुवर्णसंधी ठरू शकते**

**पण सप्टेंबर संपण्यापूर्वी हातपाय न हालविल्यास तुम्ही ती कायमची हुकवूदेखील शकता!**

**(पत्ता मागे पहा)**

अभिरुची'चे ६६पासूनचे गाजलेले १८ खास अक (अश्लीलता, अस्तित्ववाद, गडकरी, सपादकाचे आत्मवृत्त, अभिजात चावट साहित्य, आतरराष्ट्रीय बालकवर्ष, परामानसशास्त्र, सदानद रेगे, रौप्यमहोत्सव, पानवलकर, नवचित्रपट, विवेक राजापुरे; तसेच, दिवाळी '६६, '७०, '७१, '७२, '७३, '८४ व वर्षाच्या बाधीव अकाचे सच तुम्ही विनामुल्य मिळवू शकता -

२वर्षाची रु. ६८ वर्गणी भरून कोठलाही १ खास अक, ३ वर्षाची रु. १०० भरून २ खास अक (किंवा एका वर्षाचा सच) व आजीव रु. ३०० भरून ६ खास अक किंवा ३ सच.

अकाच्या वाढत्या दुर्मिळतेमुळे (१) किमान २ पर्याय देणे व (२) सत्वर म.ऑ. / ड्राफ्ट पाठविणे - चेक नको - तुमच्या फायद्याचे ठरेल.

★ अंक साठविण्याची जागा रिकामी करण्याची निकड आमची - तर दुर्मीळ अक मिळवण्याची (बहुधा शेवटची) सुवर्णसधी तुमची!

पत्ता ६९, पांडुरंगवाडी गोरेगाव (पूर्व) मुंबई - ४०० ०६३

# पुन्हा आदिमतेकडे -

**अक्षरं, लिपी, छपाई, पुस्तकं**
**या माध्यमांनी**
**माणसाचं विचारविश्व**
**थिटं, संकुचित केलेलं आहे**
**आदिम मानवाप्रमाणं**
**सर्वस्पर्शी अनुभवापासून**
**आपण दूर गेलो आहोत.**
**टेलिव्हिजन व इलेक्ट्रॉनिक युग**
**पुन्हा आपल्याला त्या**
**गूढ, सर्वस्पर्शी, आदिम**
**संवेदनेकडे नेत आहेत**
**परिपूर्णतेकडे नेत आहेत.**
**Medium is Messege**
**हा सुप्रसिध्द सिध्दांत मांडणारे**
**प्रख्यात कॅनेडियन माध्यमतज्ञ**
**मार्शल मॅक्लुहन यांच्या**
**वादग्रस्त विचारांची ओळख.**

**संजय संगवई,**

'हा टेलिव्हिजन आला काय अन् सगळचं उलटपाल्टं झालंय. आधीच भगभगीत दिव्यांमुळे संध्याकाळ - रात्र यांची जाणीवच गेली, रंगाची दुनिया हरवली, रात्रीच्या आकाशातली सूक्ष्मता, ताऱ्यांची आकाशवेल, त्यांची गूढ धूसरता गेली. अंधाराच्या छटाही गेल्या. आता या टेलिव्हिजननं आमची संध्याकाळ, रात्रच काढून घेतली. काळाच्या सीमारेषाच नष्ट झाल्या. उरले फक्त घड्याळातले आकडे, कार्यक्रमांच्या वेळा दाखवणारे. पोरं हातातली ताटं घेऊन समोर पाहत बसतात, त्यातलं काही संपलंय याची जाणच नसते. अन्न नुसतं चिवडतात; कशाबशा पगारातून रहावं - तर या जाहिराती पोरींच्या - बायकांच्या डोळ्यात येऊन थांबतात. कार्यक्रम संपल्यावर सुन्नपणं एकमेकांकडं बघत उठतात. कुणीच बोलायच्या मन:स्थितीत नसतात. पुस्तक - मासिकं क्वचितच असतात. असलीच तर ती पोरांसाठी कॉमिक्सची चित्रमालिका असलेली पानं अन् बायकांसाठी - आमच्यासाठी चित्रं - सिनेमांची मासिकं. खरं सांगू फार गढूळ - बकाल वाटतं सगळं. खूप काहीतरी बिनसल्यासारखं. सूक्ष्म सुंदर जगणंच गेलंय बघ.'

दूरवरच्या एखाद्या गावात, घराच्या गच्चीवर वारं खात एखादा मित्र, नातेवाईक तुम्हाला हे सांगेल. देगलूरपासून ते पिंपळनेरपर्यंत हीच स्थिती. शिरूरकडल्या पोरापोराला आता छायागीत / चित्रगीत / चित्रहार यांच्या वेळा, त्यातले बदल सहज सांगता येतात. संध्याकाळचं जग मंदिरातच - टीव्ही, दर्शनासाठी. काही महिन्यापूर्वी या इमारतीला मध्यभागी असलेला रामभक्त हनुमान साग्रसंगीत बाजूला काढला न् त्याच्याजागी टीव्ही ठेवला. रामायण पाहण्यासाठी. 'काय करावं. सारंच बदललंय' हा सूर पुन्हा येतो.

अशा अनेक अस्वस्थतांच्या कथा. टीव्ही आल्यानंतर दहा - एक वर्षात आमचं भावविश्वच बदलत आहे. नेमकी हीच अवस्था तीस चाळीस वर्षापूर्वी पश्चिम युरोप, अमेरिकेत सुरु झाली होती. या अस्वस्थतांचं विश्लेषण करण्याचा फार मोठा प्रयत्न तिथं झाला. मार्शल मॅकलुहन या माध्यम - तज्ञानं त्यात स्वत:चं एक स्थान निर्माण केलं. आतापर्यंत छपाई, रेडिओ, चित्रपट, नाट्य इत्यादी अनेक माध्यमातून माणसानं स्वत:ला व्यक्त केलं आहे. या प्रत्येक प्रसंगी माणसाची जाणीव अधिक प्रगट होत गेली. त्यांचं ज्ञान, त्याचा अनुभव समृध्द होऊ लागला. आज इलेक्ट्रॉनिक युगातल्या या टेलिव्हिजननं आपल्याबद्दल नेमकं काय केलं ? एकीकडे अस्वस्थताही आहे, दुसरीकडे आपणच त्याचे बळी होतो - हा प्रकार काय ? या व अशा टेलिव्हिजनच्या अनेक कोड्यांना उत्तरं देताना मॅकलुहन यांनी एक व्यापक सिध्दांतच मांडला . त्या सिध्दान्ताच्या वाद - विवादांचे पडसाद

आपल्याला आजही ऐकू येतात.

ते मूळचे कॅथलिक पंथीय, कॅनेडियन. त्यानी इग्लडच्या केंब्रिज विद्यापीठातून संशोधन केलं. १९३० - ३५ च्या काळांत रेडिओ, टेलिव्हिजन यासबधी बरीच प्रगती होत होती. पहिल्या महायुध्दानतर इलेक्ट्रॉनिक युगान पहिली क्राती आणली ती सदेशवहनात, दळणवळणात. त्यानतर शस्त्रात्र, वाहन, रोजच जीवनमान, उद्योगधदे यात बदल सुरू झाले. कॉम्प्युटरयुग आलं, टेलिव्हजनचा जमाना आला. पूर्वीची मूल्य बदलली; हा झझावात अडवून अडणारा नव्हता. पूर्वीच्या गोष्टींबद्दल, स्थिर - सुखी, मानवतेन परिपूर्ण वगैरे जीवनाबद्दल टिप गाळली जाऊ लागली. मॅकलुहन या सुमारास अमेरिकेत स्थयिक होते. टेनिसन, जेम्स जॉइस, टी एस. इलियट यासारख्या जीवनवादी साहित्यिकाचा त्याच्यावर प्रभाव होता. जी. के. चेस्टरटनसारख्या आधुनिक यात्रिक युगाच्या विरोधात असलेले आणि माणसाच्या भावविश्वाला महत्व देणारे निबधकार मॅकलुहन याना आदर्श वाटत होते. अगदी गावाकडच्या मित्रान सागितल्याप्रमाण चेस्टरटनही म्हणत होते की, 'एकवेळ यत्रसंस्कृतीचा साबण नसला तरी चालेल, पण आम्हाला आमची माणस - समाज हवा आहे. त्यासाठी बेहत्तर जुन्या ग्रामसमूहाकडं जाव लागेल. साध्या मद्याच्या अड्ड्यावर सगी - सार्थीच्या बरोबर सुखदु:खाच्या गोष्टी करण्याच्या अर्ध्या तासासाठी आमची सगळी यत्र, वायर्स, चाक, भौतिक विज्ञान, पैसा सर्वांवर पाणी सोडाव लागल तरी चालेल.' अस म्हणणाऱ्याचं शिष्यत्व मिरवत मॅकलुहन यानी दुसरीकडे टीव्हीची सतत तरफदारी केली. किती विसगत वाटत हे चित्र ?

पण मॅकलुहन म्हणतात, 'तुम्ही अस म्हणता याला कारण तुम्हाला टीव्ही कळलाच नाही. ही माध्यमं काय करु शकतात त्याची अजूनही आपल्याला कल्पना नाही.'

प्रख्यात कवी एडगर पो याची एक सागरीवादळावरची कविता आहे. भरसमुद्रात प्रचड झझावातानं जहाजाच्या चिध्या होतात. त्यातच एक खलाशी एका फळकुटीला धरून कसाबसा ते थैमान पहायला जिवत असतो. त्याच्या जिवाचा आकात होतो. लाटेवरून फेकला जातो. तो हातपाय झाडतो. लाटापासून वाचण्याचा प्रयत्न करतो. पण जाणार कुठं. हळूहळू त्याला जाणवत या तुफानाशी उगीच झगडून, त्याला घाबरून इतस्तत: धावण्याला अर्थ नाही. त्याच्या भीतीची जागा आता कुतुहलान घेतली. लाटा येतात कशा, कुठून येतात, त्याच्या दाढात असलेले जहाजाचे अवशेष, त्याची हालचाल, आकाश - पाणी - वारा... असे अनेक आडाखे तो बाधू लागला. झुजणं किंवा भयाकूल होण यापेक्षा निरीक्षण करण्यात आपली 'सुटका' आहे हे त्याला जाणवल.

माणसाच्या जगण्यावरचं हे भव्य रुपक आहे. मार्शल मॅकलुहन त्यातल नीतीतत्व आजच्या वेगवान इलेक्ट्रॉनिक युगाला लागू करतात. तात्रिक - वैज्ञानिक प्रगतीच्या वेगान भोंवडून जाऊन हताश कशाला व्हायच. त्याऐवजी कवितेतल्या नाविकाप्रमाणच या प्रवाहाच निरीक्षण कराव. नव्यान आलेल्या इलेक्ट्रॉनिक युगान नवीन काय आणल ते पहा. तात्रिक युगान माणसाच माणूसपण घालवल, त्याची जाणीव, भावना अत्यत खुज्या - तुटक केल्या. तार्किकता, ढोबळपणा, सकुचितपणा एकरेषीय विचार याचा जबरदस्त पगडा त्याच्यावर बसला आहे. त्यामुळ सग्रम भावविश्व त्याच्या अनुभवालाच येत नाही. जगात केवळ तार्किकता, तात्रिकता यापेक्षाही बरच काही असत. आज प्रगत औद्योगिक राष्ट्रातला जाणता माणूस या मर्यादित यात्रिक जीवनाविरुध्द लढत आहे. यत्रयुगान त्याला फार लहान केल आहे. माणसा - माणसातले बध तोडले; खुद्द माणसातली समृध्द जाणीवेची दुनिया कोती करून टाकली. याच कारण तरी काय आहे ? मॅकलुहन म्हणतात - आपण स्वत:ला ज्यात व्यक्त करतो ती आणि ज्यातून आपल्यापर्यंत काही सदेश पोचतात ती माध्यम (Medium) यामुळ आपली ही जीवनदृष्टी बनत जाते. इथ मॅकलुहन याच्या सिध्दाताची सुरूवात होते -. Medium is the Messege

**वैज्ञानिक प्रगतीच्या वेगानं भोवडून जाऊन हताश होण्यापेक्षा नव्यान आलेल्या युगाचं तटस्थ निरीक्षक व्हावं. भीतीऐवजी कुतूहल हवं.**

## माध्यम हाच आशय.

'टेलिव्हिजनमुळ आपली मुल पुस्तकच वाचू शकत नाहीत. घरात टीव्ही आला की घराचा व्हीटी होतो'. असं समोरचे वक्ते सागत होते. खरंच, पोरग टीव्हीत अडकल की खाण्यापिण्याची शुध्द नसते. त्याला उचकटून काढावं लागत. आणि आमची मुल आता पुस्तकच वाचत नाहीत. मुलांचच काय - सगळ्या समाजाचच तसं आहे. ही आपली नेहमीची ओरड. अशावेळी - 'मॅक्लुहन साहेब' बाजूलाच उभे असतात. म्हणतात, 'महाराजा, कसं शक्य आहे ? अरे, या पुस्तकानी तुमची आयुष्य बदिस्त करून टाकली. तुम्हाला चाकोरीबध्द विचार करायची सवय लावली. टीव्हीमध्ये तुम्ही हरवून जाता. त्यातले सगळे प्रसग तुमचे असतात. टीव्ही मध्ये तुम्ही सहभागी असता. ते गुंतलेपण सपवून त्या पुस्तकाकड कस येता येईल. ओळीमागे ओळ - अक्षरामाग अक्षर. तर्कटीपणा नुसता. एकाच सपाट रेषेत जाणारी ही अक्षर.'

मॅक्लुहन इथ सागतात की आपली जाणीव, समझदारी ठरते ती या वेगवेगळ्या माध्यमावरून. म्हणजे पुस्तक - चित्रपटात, टेलिव्हिजन नाटकात 'काय' सागितल आहे त्यामुळे आपण, आपली मतं घडत जातात - अस नाही. त्या पुस्तकात काय सागितल, टेलिव्हिजनमधून ती माणस काय बोलतात - यामुळे आपली जाणीव घडत जाते अस म्हणण वेडगळपणाच आहे. हा तर केवळ 'मजकूर' आहे. हा 'आशय' आणि हे तत्र - अशी विभागणीच मुळी विपरीत आहे. एखाद चित्र पहाताना त्यातही पिकासोची, 'क्यूबिझम्' आकारातली चित्र पाहताना तुम्ही काय करता ? सगीताची सुरावट ऐकताना रचना हाच आशय असतो ना ? पुस्तकातला आशय म्हणजे त्यातली मत नाहीत. टीव्ही फिल्मचा आशय हा 'स्टोरी' नव्हे या माध्यमातून तुमच्या विचाराची रचनाच बदलते. एकच गोष्ट पुस्तक, नाटक, टीव्ही, चित्रपट यातून वेगवेगळ्या प्रकारे येते. तुमच्या विचारविश्वाची, जाणीवेची पातळीच बदलून टाकते. मोटारी - विमानानी माणसाच्या परस्पराच्या सबधाची रचनाच बदलली नाही का ? तसच या माध्यमाचा आशय म्हणजे त्यानी माणसाच्या व्यवहारातली गती, रचना कशी बदलली ते होय [The messege of any medium or technology is the change of scales or pace or pattern that it introduces in human affairs.]

टीव्ही पाहणार मूल अक्षरं वाचण्यात का टाळाटाळ करत'! हा दोन माध्यमानी तयार केलेल्या मनोवृत्तीचा आहे. इथ ते अक्षर - सस्कृतीवर तुटून पडतात. 'आम्हा घनशब्दाचीच रत्ने' वगैरे गोष्टींची पत्रासच ते बाळगत नाहीत. या अक्षरानी माणसाची दृष्टीच बाधून टाकली. त्याना आठवते ती आदिम माणसाची वृत्ती - आणि जाणीव त्यावेळी लिपी नव्हती. छपाई तर दूरच. माणस ऐकू येणाऱ्या शब्दानी स्वत:ला व्यक्त करतात. हे श्राव्य माध्यम कितीतरी समृध्द असत! माणस बोलू लागली म्हणजे त्याना काय म्हणायच, त्या भावना, कोणते शब्द महत्वाचे वाटतात, त्या मागच्या भावना हे सर्व स्पष्ट होत. नुसत्या निर्जीव अक्षरानी ते काय कळणार आहे? अक्षरपूर्व (Pre- literate) समाजात हा 'श्राव्य' व्यापार, हावभाव, चेहेऱ्याच्या, हातापायाच्या, शरीराच्या हालचाली याच्यासह येत असे हा शब्द आसपासच्या वातावरणासकट, रुप - रस - गध - स्पर्शासकट येत असे आणि तसाच तुम्ही ऐकत- किंवा अनुभवत असता. नुसती पोथी वाचण, छापील कीर्तन वाचण, स्तोत्र वाचण, त्याचा अभ्यास वगैरे करण यातून काय कळणार? आपली आजी, कातरवेळी तुळशीसमोर, किवा देव्हाऱ्यातल्या दिव्याच्या प्रकाशात दुर्गे दुर्घट भारी म्हणते, देवळात ज्ञानेश्वरी पारायण, कीर्तन होतात- ती कितीतरी सागून जातात. तुमचा अनुभव समृद्ध होतो. तोच फरक बोलण- ऐकण आणि वाचण याच्याबाबतीत आहे. लिहिण, छपाई येत नसताना माणस या सध्याकाळच्या, दिव्याच्या प्रकाशातल्या, उदबत्तीच्या झोतातून, आजीच्या चेहऱ्यावरच्या छायाप्रकाशातून ऐकू येणाऱ्या शब्दानी सगळ वातावरण अनुभवतात. आदिम माणसाच्या देवदेवस्की, नृत्य- गीताना, भाडणाना, प्रेमालापाला वातावरणाची उब होती. श्राव्य शब्दामुळ सर्व जाणीवाचा सघात (Sensorium) जागा होतो. जाणीव सर्वस्पर्शी होती सतत्वाची जाणीव अशी परिपूर्ण रुपात येत होती.

सुसस्कृत माणूस लिहू लागला. 'भाषा' वाचिक न राहता दृष्टिचा विषय झाली ती लिपीबद्ध झाली. सर्वस्पर्शी, सूक्ष्म, नादमय अनुभव अक्षरात निबद्ध झाला. रुप, रस, गध, स्पर्शाची दुनिया कापरासारखी उडून जाते. समुद्राच्या पाण्यासारखा परस्परात गुफलेला अनेक पातळ्यावरचा समिश्र अनुभव आता उथळ ओहोळातल्या प्रमाण क्रमाक्रमान, तुटकपण एकामागोमाग जाऊ लागला एकाच वेळी जाणवणार हे विश्व, परस्परसबध, भावना- आता एक- रेषीय झाल्या. एका शब्दाबरोबर एक अनुभव सपतो, त्यानतर दुसरा अनुभव ठेवायचा. तो सपल्यावर तिसरा. आणि अशी त्याची विनाकारण क्रमवार सगती लागत जाते. एकानतर एक सुट्या अनुभवाची मालिकाच तयार होते आपल्याला नको असलेला अर्थ लागत जातो. एकरेषीय बुद्धिवादी (Linear Rationality) अस त्या अनुभवाच विकृतीत रुपातर होत.

या गोष्टी पराकोटीला जातात त्या छपाईमुळ हा तुटकपणा, अपुरेपणा अधिकच साचेबद्ध होतो.

> सुसंस्कृत माणूस लिहू लागला. भाषा वाचिक न राहता दृष्टीचा विषय झाली. सर्वस्पर्शी सूक्ष्म, नादमय अनुभव अक्षरात बांधला गेला. रुप, रस, गंध स्पर्शाची दुनिया कापरासारखी उडून जाते. सुट्या, एकरेषीय अनुभवाची मालिका तयार होते. लिपीनं या विश्वातल्या गूढ गहनतेलाच संपवलं. सगळं कसं उघडं- लख्ख झालं, लिपीने आणले सरळसोट रस्ते, वास्तुकला, शहरं, शिस्तबद्ध सैन्य अन् नोकरशाहीची उतरंड... आणि व्यक्तिवाद.

हातानी लिहिण्यात निदान घाटणी तरी दिसते! शब्द लेखी असले तरी थोड्याफार प्रमाणात मनोवृत्ती, धारणा व्यक्त करतात. (प्रेमिक, विद्वान, डॉक्टर, याची हस्ताक्षर!) छपाईन तर ही अधुक शक्यताच मारुन टाकली. आता माणसाच जग या एकाच प्रकारच्या, छापील मजकुरात गारठून पडत. Printing is a ditto device अस सागून मॅक्लुहान त्याच्या हेलपाटून टाकणाऱ्या शैलीत म्हणतात,

''लिपी येईस्तोवर माणूस ऐकू येणाऱ्या शब्दाच्या जगात होता. हे जग अनेक आयाम असलेल, क्षितिजपार, अनिर्बन्ध, मुक्त अस होत जाणिवेच्या अतस्तलापर्यंत, माणूस जाऊ शकत असे. तो आपल्या आदिम सवेदनेन, अतप्रेरणेतून (Intuition) जगत होता. बोलण हा त्या intuition चा एक आविष्कार होय. लिपीन या सर्वांचा पार अत केला. तिन या विश्वातल्या गूढ- गहनतेलाच संपवल सगळ कस लख्ख- नागडउघड झाल. लिपीन आणली वास्तुकला नि शहर; तिन आणले सरळसोट जाणारे रस्ते शिस्तबद्ध सैन्य आणि उतरडीची नोकरशाही. गूढ अधाऱ्या गुहेतून लख्ख- झगझगत्या जाणीवाकडे नेल. त्यानतर ही छपाई. साचेबद्ध अक्षर, भाषा या आता अनुभूतीचा भाग राहिल्या नाही. त्या झाल्या निर्जीव- सुट्या काढता येतील अशा 'वस्तू'. कितीही त्पादन करा. जगातली ही एकामागोमाग निर्विक पण पुढ सरकत जाणारी अशी ही पहिली 'असेब्ली लाइनच' सुरु झाली. छपाईन आणल पुस्तक. ते ही असच. एकट्यान कुठेही घेऊन जाऊन खाजगीत वाचण्याजोग. या छपाईन आणलेली पुस्तक माणसाचा खासगी 'दृष्टीकोन' तयार करु लागली स- अक्षरता आणते तुटकपणा, अलगता .'

या अक्षरानी आणखी एक वाईट केल त्यानी 'दृष्टीकोन' नावाची चीज बनवली अक्षर, लिपी, छपाई यामुळ समग्र अनुभव तुटक झाला. त्याला एका तार्किक चौकटीच एकारलेपण आल. सर्वस्पर्शी अनुभव येण आणि विशिष्ट दृष्टीकोन single point & view) होण यात फरक आहे मॅक्लुहन याना कलावत, दार्शनिक या लोकाना येणारा गूढ अनुभव अधिक भावतो तो अधिक खरा. माणस तर्कशुध्द, (तर्कदुष्ट) गोष्ट माडतात तेंव्हा 'एका वेळी एक' हा मर्यादित साचा त्याना मान्य असतो. पण प्रत्यक्ष अनुभव येताना आपण एकावेळी एक अस काही अनुभवत नाही. साध रोजच जीवन- सकाळी दूध आणण्यापासून तो रात्री वाऱ्याच्या झुळकी ऐकत वाचत पडण,- यातही किती विविध पदरी अनुभव असतो.' तुमचे अनुभव, मनोवृत्ती काही एकामागोमाग ठेवल्याप्रमाण येत नाहीत वरवर सबध नसलेल्या अशा अनेक गोष्टी आपल्या जाणीवेत येतच असतात. रस्त्यावरून जाताना आपण आपल स्वत च भावविश्व, आठवणी, काही माणसाची बोलणी, वाहनाची वर्दळ, असबधित सदर्भ, भाज्या वास, मोपेडवरून जाणाऱ्या मुलींच्या हसण्याचे आवाज, नव्या मोटरसायकलवरन सुसाट जाणारे जेम्स बॉंड, आपली मागची स्मृती, पुढची दिवास्वप्न, दुकानातले ओळीन लावलेले टीव्ही, बाधकामाच सामान घेऊन जाणाऱ्या बैलगाड्या, त्याच्या मागे खोळबलेल्या बसेस, फुटपाथवरची वाळू, मधूनच लागणार अधारलेल दुकान, सध्याकाळच उदासीसारख दोन माणसाच बोलणं, शिवसेनेची पोस्टर्स, बकुळी-मोगऱ्याचे वास, कालच्या व्याख्यानातला मुद्दा, वसतरावाच्या गाण्यातली लकेर, एकदम आठवणारे त्याचे डोळे, मित्राच्या-



समव्यावसायिकांच्या संबंधातले तणाव, इ.इ. कितीतरी तुटक, असंबंधित वाटण्याच्या गोष्टींनी, एक- एक क्षण- क्षणांचा तुकडा बनतो. एखाद्या जिगसॉपझल सारखं पिकासोच्या चित्रातल्याप्रमाणं असंबंधित वाटणारं पण वास्तव. हा साधाच पण समग्र अनुभव (simultaneity) आपण अक्षरात बसवू शकतो ? फार तर 'या पलीकडं काहीतरी अनाम' एवढं म्हणू शकतो. लिपी- छपाईनं या गुंतागुंतीच्या पसरलेल्या सूक्ष्म अनुभवाला आपण साचा देतो, तर्क देतो, दृष्टीकोन बनवतो. यामुळे आपण मूळ संवेदनेकडून किती दूर जातो.

छपाई युगाची ही साचेबंद पध्दती तार्किक (Rational), यांत्रिक(Technical) व व्यक्तिवादी युगाशी मिळतीजुळती आहे. छापील पुस्तकांनी व्यक्तिवाद आणला, तांत्रिक ज्ञानातील सरधोपट एकानंतर–एक असा बुध्दिवादी क्रम आणला. हा त्या माध्यमाचा 'आशय' आहे. छपाईनं माणसाचं जग असं एकरेषीय, एकमार्गीय, साचेबंद केलं. उलट 'श्राव्य'माध्यम, (शब्द) माणसाचं भावविश्व समृध्द करतं, त्याच्या अनेक संवेदनातून व्यक्त होतं– आणि अनेक संवेदना, जाणीवा जागृत करतं. अक्षर आणि शब्द यातील ही लढाई आहे. सध्या अक्षरांचा जमाना आहे. त्यांचीच सत्ता आहे. पण वास्तवता तशी नाही. वास्तवता ही अशा अनेक अनुभवांची–गूढ वाटणारी गोष्ट आहे. ही Myth (गूढता) खरी समग्र जाणीव करून देते... For myth is the instant vision of a Complex process that ordinarily extends over a long period गूढता ही एकरेषीय – हार्दिक नसते. म्हणून त्यांना जाहिराती आणि आधुनिक चित्रकला, पिकासोची चित्र अनुभवाच्या अधिक जवळ जाणारी वाटतात.

## मोझाइक इमेज

वृत्तपत्र, मासिकं, चित्रपटातल्या जाहिराती पहाव्या. निळ्याशार समुद्राच्या लाटा, भरार वारा, सुसाट धावणारा, आयाळ लहरवणारा काळा–तगडा घोडा, त्याच्याबरोबर मुक्त आनंदात धावणारी युवती आणि रेझर ब्लेडचं पातं. किंवा गार्डन वरेलीची तरूणी, नेपाळची दृश्य, तिला पाहणारा लहान मुलगा, आणि– बस. एवढंच. वरवर पाहता गैरप्रकार वाटणाऱ्या या प्रतिमा. त्यातून आपल्या संवेदनांच्या प्रयोगशाळेत, म्हणजे मेंदूत –पटापट दिवे लागत जातात. संबंध जोडले जातात– आणि अर्थ आकळला जातो. हे तुकड्या–तुकड्यांचं कोलाज –त्यातून ध्वन्यर्थानं–आतून – मुळातून एक भाव तुमच्यापर्यंत पोचवला नाही. केवळ अक्षरातनं ते होतच नाही. मॅकलुहन यांच तेच म्हणणं आहे. आपलं बोलणं, वागणं, समजणं–सर्व असं असंबध वाटणाऱ्या कृती– उक्तींची जंत्री असते. पण त्या बहुविध अनुभवातून आपलं काहीतरी मांडत असतो. या विश्वातल्या आपल्या अनुभवांचं तसंच आहे. आपण काही अक्षरबंध, पुस्तकी, तर्कसुसंगत वाक्य जगत नसतो. एक प्रसंग 'सांगताना', अनुभवतानाही आपण किती विविध पातळ्यात जगत असतो, स्वत:ला व्यक्त करत असतो. अगदी आपल्या गावाकडची माणसं, आपली आजी (किंवा खुद्द आजही आपणच) एखादी मागची घटना, अनुभव कसा सांगतो ते आठवून पहावं. गोष्टीच्या मूळ सूत्रापेक्षा कितीतरी रंग–पोत, गंध त्यात असतात. अशी ही बहुविध–प्रतिमांची जंत्री (Mosaic image) **हीच वास्तव** असते. अक्षरपरंपरेने त्यालाही चूड लावली. या अक्षरपरंपरेविरूद्ध बंड करून उठण्याच्या प्रयत्नांची चुणूक 'क्यूबिझम' या चित्रकलेच्या परंपरेत आहे. जाहिरातींनींही ही मोझाइक इमेज आणली. साहित्याच्या प्रांतात अमूर्त नाट्य किंवा अगदी अमूर्त कविता- कथा यातूनही हे अक्षरी तार्किकतेचे, साचेबंदपणाचे साखळदंड तोडण्याचा प्रयत्न आहे हे मॅक्लुहन सविस्तरपणं, रंगवून सांगतात. जाहिरातीतल्या तरूणीच्या पोटऱ्या व पायमोजे; स्केटिंग करणारं जोडपं, भारीभारीच्या वस्तू आणि सिगरेट; मधाळ डोळे आणि विदेशी मद्याचा ब्रँड- यांची वाद्यवृंदातल्या स्वरमेळाप्रमाणं आपोआप संगती लागते. 'क्यूबिझम' मुळे एका विशिष्ट कोनातून चित्र काढण्याचा (Pespective Painting) काळ गेला. एखादं चित्र खालून-वरुन, बाजून- आतून- बाहेरुन 'पाहता' येतं. एकदम ती अनुभूती येते. ही समग्रता, Mosaic image पुन्हा आदिम समाजातल्या माध्यमांशी, आविष्काराशी मिळतीजुळती आहेत. मॅक्लुहन यांनी त्याचं वर्णनही केलं- imaginative discontinuities of pre- logical thought! किंवा Free association of ideas on the basis of mutual analogical affinities (अंर्तीनहित सारखेपणामुळं जमणाऱ्या जोड्या). मॅक्लुहन यांचा अक्षरांना-छपाईला विरोध या पातळीवर जातो. भाषेतली गूढता, विरोधाभास ('पन') वरकसीची अबाकलनीयता विविधरंगी अनुकयांचा मेळा- ही आस लिखित भाषेतून पूर्ण होतच नाही. इथं ते पुन्हा खोल पाण्यात, 'हॉट अँड कोल्ड' पाण्यात जातात.

## 'मीडिया' हॉट ॲण्ड कोल्ड'

कधी आपण प्रामाणिक उत्तरं दिली तर- आपल्याला वाद्यांच्या भरपूर वापरापेक्षा साधी चाल असलेलंच पण सुरेल गीत आवडतं, 'सर्व रंग दाखवणाऱ्या छायाचित्रापेक्षा कृष्ण- धवल छायाचित्रं अधिक आपली वाटतील, सुरांचं वैभव दाखवणाऱ्या आजच्या गायकांपेक्षा गंगूबाई हनगल, अमीरखाँ, पन्नालाल घोष, पलुस्कर आपले वाटतात, तपशीलवार- आलंकारिक- सर्वच दाखवणाऱ्या वाङ्मयापेक्षा एखादा हेमिंग्वे, मॅथ्यू अर्नाल्ड, चक्रधर, कबीर, भास आवडतो, चकाचौंध गोष्टींपेक्षा साध्या वाटणाऱ्या 'रामायणा'त माणसं रमून जातात, साध्या कादंबऱ्या, गोष्टी- वर्षानुवर्ष टिकतात; इमारतींपेक्षा अक्षरं, अक्षरांपेक्षा शब्द, शब्दांपेक्षा सूर हे पूर्वीपासून चालत आलेले आहेत. का ? साधी-

बाळबोध 'क्लासिक्स' तरी का आजही वाचली जातात? विद्वानं माणस म्हणतात की या सर्व 'क्लासिक्स' मध्ये, किंवा वर सांगितलेल्या सर्व बाबतीत ऐकणाऱ्याला, पाहणाऱ्या वाचणाऱ्याला, रसिकाला, ग्रहण करणाऱ्याला (Reciever) स्वतःच अस काहीतरी भरता येत., भाव, बहलावे,, (मुरक्या) लख्ख पुढे आणून 'दिल्या' जातात. मात्र *अख्तरी बेगमची गजलच का घायाळ करते?* तिच्यात फक्त सूचन असत, बाकीचा मधला फासला मी भरायचा असतो. गगूबाईचा सुवर्णतप्त आवाज विलासखानी तोडीतली एक सुरावट सुचवतो, बाकी बहुतेक काम तानपुऱ्याबरोबर ऐकणाराच करतो. तो राग असा गायक-रसिकाच्या हृदयसवादातून पुढ जातो. काव्यातल्या 'ध्वनि' सिद्धात सागणाऱ्या आनदवर्धन-अभिनवगुप्तांनी साहित्याबाबत तेच सागितलं. 'ओल्ड मॅन-' मध्ये हेमिंग्वेबरोबर आपणही त्या समुद्रात म्हाताऱ्याबरोबर असतो. 'क्लासिक्स' फक्त सूचन करतात, रुपरेषा देतात. बाकी आपला अनुभव आपण त्यात भरतो.

आणि हेच सगळ लख्ख, स्पष्ट, तपशीलवार, भरजरी स्वरुपात आपल्यासमोर ठेवल तर? त्यात आपण कुठ असू? सवाद- सपर्क (कम्युनिकेशन) प्रक्रियेत असा प्रेषक- ग्रहणकर्ता या दोघाचा सहभाग हवा. काहीतरी ऐकत- पाहत असताना माझाही अर्थ मी त्यात भरायला हवा. सहजपण. तरच त्या सवादात मी गुतून राहू शकतो.

मॅक्लुहनच्या सूचक रेषांच्या चित्रालाच 'कोल्ड मीडिया' म्हणतात. पुस्तक, अक्षर- ही सगळ्याच गोष्टी इतक्या झगझगीतपण पुढ माडतात- त्यात *वाचकाला स्वत सहभागी व्हायला वावच नसतो.* ही High- definition data ची माध्यम म्हणजे 'हॉट मीडिया'. पुस्तक, छपाई, फिल्म हे ''हॉट मीडियम'' तर रेडिओ, टेलिग्राफ इ इ कोल्ड आणि टीव्ही ते थड माध्यम'. फिल्म आणि टीव्ही याना समान मानू नका असा इशारा ते देतात. फिल्ममध्ये सर्वच गोष्टी इतक्या तपशिलान, सूत्रबद्ध रितीन माडल्या जातात की प्रेक्षक त्यात सहभागीच होऊ शकत नाही. फिल्मचा कॅमेरा (Tyranny of Camera) काहीच गूढ राहू देत नाही. भरलेल्या ताटासारख सगळच देतो. फिल्मची रचनादेखील चौकटीतून सूत्रबध्द रितीन पुढ सरकणारी असते. त्यातली 'कथा' ही घटनाक्रमासारखीच असते रेषीय. क्रमागत. त्यात नसतो अनेक अनुभवाचा कोलाज; नसते गूढता; नसतो सोस काहीतरी जाणवून घेण्याचा. तिथ असत सगळच उघड

हा हॉट व कोल्ड माध्यमाचा निकषच मॅक्लुहनच्या सिद्धाताचा केंद्रबिंदू आहे. त्याना हवी आहेत 'थड' माध्यम. ही गूढ, अस्पष्ट, धूसर, समग्र आणि जाणीवेच्या विविध तुकड्यानी बनलेली असतात. रिसीव्हर (श्रोता / प्रेक्षक / ग्रहणकर्ता) स्वत. त्यात सहभागी होतो. म्हणजे एकाच वेळी समग्र जाणीव आणि सहभाग असा *दुहेरी लाभ त्या माध्यमातून मिळतो.* *याउलट 'हॉट'* माध्यम तुम्हाला ठरीव साच्याची, एकरेषीय लख्ख उत्तर देत हे खर जीवन, खरी जाणीव- सवेदना अशी नसतेच. आदिम, अक्षर- पूर्व व तर्कपूर्व *(Pre- Literate, Pre- logical) समाजाला त्याच्या* बोलण्याच्या- श्राव्य शब्दाच्या माध्यमातून परिपूर्ण अनुभव मिळत असे. आणि या छापील. अक्षरी तात्रिक (Technical, Mechanical) युगानतर येणार इलेक्ट्रॉनिक युगही या आदिम जाणीवाशी नात सागत. आजच तुमच टीव्ही पाहणार मूल टीव्हीत गुतत, टीव्हीला नाक लावून बसत, ते पुस्तक वाचत नाही, ते गभीर असत- का?

## टीव्ही : सहभाग व समग्रता

१९६० च्या सुमारास अमेरिकेत रिचर्ड निक्सन व जॉन केनेडी याच्यात अध्यक्षपदासाठी चुरस होती. दोन्ही अध्यक्षीय उमेदवार नेहमीप्रमाण टीव्हीवर आपली बाजू माडत होते. निक्सन याच व्यक्तिमत्व अधिक प्रभावी, त्याची रुपरेखा अधिक निश्चित, विषय माडण्याची पद्धतही ठाम होती. त्याउलट केनेडी हे बावरणारे, सामान्य दिसणारे, बोलण्या- चालण्यात अनिश्चित, रग नसलेले, ठाशीवपणाचा अभाव- असे होते. मात्र टीव्हीवरुन *लोकाच्या मनात ठसते ते केनेडीच निक्सन नाही.* तोच प्रकार निकिता ख्रुश्चेव या रशियन नेत्याबाबत. लेनिन, स्तालिन किंवा लष्करप्रमुख बेरियाप्रमाण ख्रुश्चेवला प्रभावी, ठाशीव व्यक्तिमत्त्वच नव्हत *दिसायला अतिशय सामान्य दहाजणात खपून* जाईल अस रुपरग, डीलडौल. तरीही हा माणूस टीव्हीवरुन घराघरात लोकप्रिय झाला. याला कारण पुन्हा मागचच टीव्ही पाहणारा प्रेक्षक स्वत त्यात अर्थ भरत असतो. धूसर प्रतिमामध्ये स्वतचा अनुभव घालून, स्वतःपुरती प्रतिमा निर्माण करतो.

'. anybody whose 'appearance' strongly declares his role and status in life is wrong for TV Anybody who looks as if he might be a teacher, a doctor, a businessman or any of a dozen other things all at the same time is right for TV When the person presented looks classifiable, as Nixon did, the TV viewer has nothing to fill in. He feels uncomfortable with his TV image"

तात्पर्य सामान्य वाटणाऱ्या, दहाजणात खपून जातील अशी माणसच टीव्हीतून लोकाच्या मनात जाऊ शकतात! मॅक्लुहन तर सुदर स्त्रियानाही टीव्हीची दार बद करतात कारण तिथ सगळ इतक स्पष्ट आहे, की त्या प्रेक्षकाला स्वत त्यात भरच घालता येत नाही. म्हणून ती प्रतिमा त्याच्यापर्यंत पोचतच नाही. मग आपल्या दूरदर्शनच्या निवेदिका का लोकप्रिय होतात याचं कारण अगदी स्पष्ट आहे म्हणायच? इंदिरा गाधींपेक्षा राजीव गाधींची प्रतिमा टीव्हीसाठी अधिक योग्य आहे? [व्यक्तिमत्त्वाभावात् इति!]

मॅक्लुहन याची आणि आपली आजच्या *ज्ञानाची फारकत इथून स्पष्टच सुरु होते. त्याच्या मते* टीव्ही व फिल्म दोन्ही माध्यमं पूर्णपणे वेगळी. फिल्म व छापील अक्षर ही माध्यम समान. ही दोन्ही माध्यम 'दृश्य' आहेत अक्षर आपण 'पाहतो'- ओळी पाहून, *त्याचा क्रम पाहून आपली मनोवृत्ती* घडते. फिल्म तसच. ही दोन्ही माध्यम हॉट (high defination). तर टीव्ही हे माध्यम low-defination- 'कोल्ड'. का? तर त्यातल्या

---

वाद्यांच्या भरपूर वापरापेक्षा साधी चाल आवडते; सुरांचं वैभव दाखवणाऱ्या गायकीपेक्षा गंगूबाई हनगल, अमीरखाँ, पलुस्कर आपले वाटतात; साधी, बाळबोध वाटणारी 'क्लासिक्स' हवीशी वाटतात; अख्तरी बेगमची गज़ल घायाळ करते - सामान्य वाटणारी, दहाजणात खपून जातील अशी माणसंच टीव्हीतून लोकांच्या मनात जाऊ शकतात. इंदिरा गांधींपेक्षा राजीव गांधीची प्रतिमाच टीव्हीला अधिक योग्य आहे.

इलेक्ट्रॉनिक लहरी अतिवेगवान, सर्वव्यापी असल्यानं टीव्हीवरून आपली जाणीव अनेकांगी बनते. वास्तवाची 'एकसमयावच्छेदे' करून जाण येते.

---

प्रतिमा धूसर असतात. त्यात फिल्म इतकी स्पष्टता नसते. त्या दृश्य नसतात तर Audio–tactile (म्हणजे श्राव्य व स्पर्श संवेदना असलेल्या!) या प्रतिभेला तुम्ही स्पर्श करता. मनानं. म्हणजे काय ते नीटसं त्यांनी स्पष्ट केलेलं नाही.

मात्र १९५०- ६०च्या काळात अमेरिकेतल्या टेलिव्हिजनवरच्या प्रतिमा धूसर, अंधाऱ्या- गूढ होत्या- या तांत्रिक बाबीवर त्यांनी एक सिद्धांतच रचला. ही प्रतिमा अस्पष्ट व 'फिल्मइतकी' स्पष्ट नसल्यानं टीव्हीतल्या दृश्यातले अनेक भाग आपण मनानं भरतो. म्हणून प्रेक्षक त्यात उपस्थित असतो. म्हणूनच निक्सनपेक्षा केनेडी आपला वाटतो. सामान्य माणसंच टीव्हीसाठी योग्य असतात. मॅक्लुहन निश्चित प्रतिमा म्हणतात तेंव्हा त्यात टीव्हीवरच्या गोष्टींची बाह्य- शारीरिक प्रतिमा आणि त्यांची आंतरिक तयारी, मुद्देसूदपणा, हुशारी, चटपटीतपणा हा देखील त्यांना अभिप्रेत आहे. तर अशा लोकांना टीव्हीवर 'चान्स' नाही. तर जे शरीर व व्यक्तिमत्वाने धूसर आहेत, त्यांनाच टीव्हीप्रेक्षक स्वीकारतो! प्रेक्षकांच्या अशा गाढ सहभागाची- Plunge into depth experience- टीव्हीनं सवय लावली. म्हणून टीव्हीवरची माणसं, कार्यक्रम ही सर्व अतिशय सर्वसामान्य कुवतीची, दैनंदिन व्यवहारातली वाटली पाहिजेत. टीव्हीच्या साधारण स्वरुपांचं, ल.सा.वि. स्वरुपाचं विवेचन दुसरे तज्ज्ञ वेगळ्या अंगानं करतात. टीव्ही जनसामान्यांत जातो, म्हणून या सामान्यांची बुद्धीची एक सरासरी काढून तसे कार्यक्रम द्यावेत असं इतर म्हणतील. पण मॅक्लुहनच्या सामान्य व्यक्ती व कार्यक्रमांची तरफदारी वेगळ्याच भूमिकेतून आहे. हे 'कोल्ड मीडिया'च्या भावनेतून विश्लेषण!

आणि आता समुच्चय प्रतिमा (Mosaic image) हा आणखी एक गुणविशेष. टीव्हीतल्या प्रतिमा या फिल्मसारख्या किंवा अक्षर- ओळींसारख्या सलग, क्रमागत, एकसाची नसतात. आधुनिक कलेप्रमाणंच टीव्हीत देखील परस्परांवर आलेल्या, एकरेषीय क्रमवार नसलेल्या (Non- Linear, discontinuous, skew, mosaic) समुच्चय प्रतिमा असतात. टीव्हीसारखं इलेक्ट्रॉनिक माध्यम, आधुनिक भौतिकशास्त्र, आधुनिक कला यांच्या अशा विविधरंगी अनुभवांच्या तुकड्यांतून बनणाऱ्या प्रतिमा- सिद्धांत असतात. त्यात तुम्ही गुंतूनच पडता. अलिप्ततेला तिथं वाव नसतो. ते म्हणतात, "... mosaic form of TV image demands participation and involvement in depth of the whole being, as does the sense of touch. Literacy, on the other hand, by extending the visual power to the uniform organization of time and space; psychically and socially, conferred the power of detatchment and non- involvement."

इलेक्ट्रॉनिक लहरी अतिवेगवान, सर्वव्यापी असल्यानं टीव्हीवरुन आपल्याला सर्वस्पर्शी प्रतिमा मिळतात. एका क्षणालाच काय कुठं चाललं ते 'एकसमयावच्छेदे' कळतं. म्हणजे आपली जाणीव, ज्ञान- हे सुटं, अर्धवट, तार्किक- एकरेषीय राहत नाही. ती एक समांतर अनुभवांची, जाणिवांची समुच्चय होते. म्हणजे श्राव्य- संवादात जी परिपूर्णता होती- तीच वातावरण,- माहिती,


झगमगत्या यशस्वी योजना

सुशिक्षित बेरोजगारांना नवीन उद्योगधंदा सुरु करण्यासाठी बीज - भांडवल योजना

स्वतःचा नवीन उद्योग / व्यवसाय सुरु करण्यासाठी १० ते २२½ टक्के बीज भांडवल कर्जरुपाने केवळ ४ टक्के व्याजाने दिले जाते.

एकत्रित सवलतींची योजना

'बी,सी व डी' झोन मध्ये येणारे विकसनशील व अविकसित भागांमध्ये उद्योजकांना उद्योगधंदे सुरु करण्यास सुलभ व्हावे म्हणून, विक्रीकर सवलत, जकातकर अनुदान आणि भांडवल गुंतवणूकीत सवलत देणारी ही योजना आहे.

लीना मेहेंदळे
व्यवस्थापकीय संचालक

उल्हास पवार
अध्यक्ष

पश्चिम महाराष्ट्र विकास महामंडळ मर्यादित
(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय)
'कुबेरा' चेंबर्स, २ रा मजला, डॉ. राजेंद्रप्रसाद पथ, पुणे ४११ ००५. दूरध्वनी - ५५३२४, ५५३२५, ५५३२६

व्यक्तिमत, सदेश- अशा सर्व अगाची समग्र जाणीव टीव्हीमुळ येते.

टीव्हीमुळ सर्व जग आता आपल्या सवेदनेच्या कक्षेत आल आहे प्रत्येक घरात टीव्ही आल्यान एका राष्ट्रातील माणस, त्याचे प्रश्न, त्यांची सुखदुख आपल्यापर्यंत येतात, आपण त्यात सहभागी होतो. सर्वांना सामायिक अशा अनुभवात आपण भागीदार असतो. या इलेक्ट्रॉनिक जाळ्यान माणसाला पुन्हा आदिमतेकड नेल आहे. छपाई, युगातल्या व्यक्तिवादी, सघर्षशील, रॅशनालिस्ट अशा परपरेपासून सुटून आपण आता global village- 'वसुधैव कुटुबकम' अशा अवस्थेकडे चाललो आहोत. त्यात आदिम- वर्तमान, औद्योगिक- व्यापारी, निरक्षर, साक्षर अशा सर्व सस्कृती परस्परात विलीन होत आहेत इलेक्ट्रॉनिक युगान आदिम एकरुपत्व, अविच्छिन्न अस्तित्वाच्या, सेंद्रिय (organic) ऐक्याच्या कल्पना पुन्हा रुजवल्या

बैरुत, गाझा पट्टी, लॅटिन अमेरिका, हॉलिवूड, अलाहाबाद, दुष्काळ, चद्र- मगळाचा शोध, गुजरातेतल उत्खनन- अशा सर्व पातळ्यावरचा, उभ्या- आडव्या प्रतलाचा (Planes) अनुभव एका जाणीवेच्या रसायनात विलीन होत आहे आपण 'सर्वत्र' आहोत, सर्वचजण 'आपण' आहोत- ही सहभागाची, एकरुपत्त्वाची पौर्वात्य कल्पना मूळ धरत आहे. गूढ, समग्र, परस्परनिगडित, सहभागीत्वाची सकल्पना या इलेक्ट्रॉनिक युगामुळे येत आहे. मात्र पाश्चात्य माणस अजूनही साक्षर- यात्रिक- व्यक्तीवादी जगातच राहत आहेत टेलिव्हिजन, इलेक्ट्रॉनिक माध्यम याविषयी पाश्चात्यात गैरसमज आहेत, त्याच मुख्य कारण हा विसवाद हेच आहे कोरड्या बुद्धिवादी, तुटक, एकरेषीय साचेबदतेकडून आदिम, अफाट, क्षितिजपार, समग्र, - एकसध अशा पौर्वात्य गाढ अनुभूतीकडे आपण जात आहोत- आपल Retnb- alisation होत आहे टीव्हीमुळ.

पाश्चात्य कवी, चित्रकार व कलावत याना ही समग्र सवेदनेच (synesthesia- unified sense of imaginative life) जीवन हव होत अठराव्या शतकातल्या सुशिक्षित- साक्षर जगातल तुटकपण, परात्यभाव यामुळे पाश्चात्य माणसाच भावविश्वच दरिद्री झाल होत. म्हणून 'For good or ill, the TV image has exerted a unifying synesthetic force on the sense life of there intensely literate populations' या माहितीच, सबधाच अस आकुचन होत. समग्रतेमुळ या इलेक्ट्रॉनिक

छपाईनं समग्र दृष्टिकोनच सपवला. एका तार्किक चौकटीचं एकारलेपण आल. गुंतागुंतीच्या, पसरलेल्या, सूक्ष्म अनुभवाला आपण साचा देतो, तर्क देतो- मूळ संवेदनेपासून दूर जातो.

इलेक्ट्रॉनिक युगानं आदिम एकरुपत्व, सेंद्रिय ऐक्याच्या कल्पना पुन्हा रुजवल्या आहेत... तुकड्या तुकड्यात विखुरलेलं जग पुन्हा जुळून येत आहे.

इलेक्ट्रॉनिक युग, म्हणजे माणसाच्या चेतासंस्थेचा बाह्य अविष्कार आहे.

मॅक्लुहनचे सिध्दांत म्हणजे १८ - १९व्या शतकातल्या यांत्रिक संस्कृतीविरुध्दचं बड आहे. कोरड्या बुध्दिवादाविरुध्द, एकमार्गी संकुचित जाणिवेविरुध्द युध्द आहे. सवेदनाशील तरल जाणिवावर आधारित नवी मनोधारणा आहे.

युगात दृष्टिकोन नावाची चीज इतिहासजमा होत आहे.

तुकड्या तुकड्यात विखुरलेल जग पुन्हा जुळून येत आहे. आमच्या युगातल्या समग्रतेच्या, सहानुभावाच्या व गाढ जाणीवेच्या प्रेरणा सध्याच्या इलेक्ट्रॉनिक युगाशी अपरिहार्यपणे निगडित आहेत. प्रत्येक युगात माणसाच्या जाणीवाची रचना बदलत जाते. अड आधी की कोंबडी आधी हा खुळचट प्रश्नच इथ नाही. अधिक अडी मिळवण्यासाठी अड्यानाच कोंबडीची गरज असते असा 'समग्र' दृष्टिकोन आता येत आहे.

टीव्हीमुळ तुम्ही घरात बसून जगाशी सबध जोडता. तुमच्या विचारविश्वाचा जग हे भाग होत. इराण-इराक युद्ध किंवा गाझापट्टीतले मोर्चे रोज सकाळी-सध्याकाळी पाहिल्यावर आपल्या विचार विश्वाचा तो भाग होतो जग हे एक कुटुबच होय अशी भावना तुमच्यात येते. ग्लोबल व्हिलेज म्हणजे हेच आजपर्यन्त प्रत्येक माध्यम माणसाच्या कोणत्या ना कोणत्या अवयवाच बाह्य- व्यापक स्वरुप होत म्हणजे पायाच बाह्यरुप (Extension) चाक, कानाच बाह्यरुप शब्द-श्राव्य-उच्चारण- डोळ्याच एक्टेन्शन म्हणजे लिखित छापील अक्षर. आणि हे नव इलेक्ट्रॉनिक युग म्हणजे माणसाच्या मेंदू व चेतासस्थेचा (Nervous system) बाह्य आविष्कार होय.

मक्लुहनची भाषा, कशातूनही काहीही निष्कर्ष काढण्याची त्याची कल्पकता, वक्तृत्वाचा आवेश, पुन्हा पुन्हा तीच गोष्ट ठसवण यामुळ माणूस चक्रावून जातो माध्यमाचा विचार करताना ते अनेक गोष्टींचा विषयाचा 'मोझाइक' (समुच्चवय) कोलाज ठेवतात. आदिम चित्रकला, बीथोव्हनच सगीत, क्यूबिझम, ली व्होर्फ याचा भाषासिध्दात, टेनिसन–पो याचा साहित्य, माणसाच्या मेदूची रचना, इलेक्ट्रॉनिक प्रवाहाच विश्लेषण, वैज्ञानिक –तात्रिक यातला फरक, चेस्टरटन– लॉक याच लिखाण, सोफिस्ट व सॉक्रेटिस याची तुलना, शेक्सपियरची वचन, पिकासोची चित्र. अशा अनेक विमानाची या तळावर जा ये चालू असते. एका प्रतालावरून दुसऱ्या प्रतलावर, एकदम वगळ्या वाटणाऱ्या गोष्टींच Juxtaposing, या धूसर, गूढ आवर्तात, पुराकथेसारख्या वातावरणात वाचकाला सोडून देण– ही त्याची वैशिष्ट्य. किंबहुना या प्रकारानीच जाणीवा, सवेदनाचा सघात जागा होतो असा त्याचा होरा असावा. त्याच्या सर्वच सिध्दाताचा कडाडून प्रतिवाद झाला आहे. 'मिडियम इज मेसेज ही घोषणा तर अत्यत धोक्याची आहे. त्यामुळे प्रस्थापिताचच फावत. माध्यमातून आपण काय सदेश देतो त्याला वेगळ वैशिष्यच नसते का? टीव्हीवरच्या कार्यक्रमाना म्हणून स्वत:च असे वैशिष्ट्य नसत का? त्यातला सदेशही पुरोगामी, प्रतिगामी, राष्ट्रवादी, साम्यवादी, कलावादी असा कोणत्यातरी रगाचा असतोच ना! त्याचाही काहीतरी परिणाम होतो. नव्हे असा सदेशच हा मुख्य आहे. माध्यम म्हणजे केवळ साधन होत. ही दुसरी फळी आता पाश्चात्य . पौर्वात्य विचारवतात तयार होत आहे. मॅक्लुहनवर टीका होते ती या अगान वस्तुत एका अखड अनुभवाची आस असणाऱ्या, प्रामाणिकता(authenticity) चा ध्यास असणाऱ्या मॅक्लुहन याच्यावर सर्वात मोठा प्रहार होतो तो अस्तित्ववादी म्हणवणाऱ्या माध्यमतज्ज्ञाकडून वस्तुत: अस्तित्ववाद्याना हव असणार सहभाग, कमिटमेंट इत्यादी तत्व ते मान्यच करतात. तरीही त्याची प्रतिभा वेगळी का व्हावी? त्याच मूळ हे मॅक्लुहन याच्या सदोष माध्यमविषयक विचारात आहे.

जोनाथन मिलर या अमेरिकेतल्या माध्यमतज्ज्ञानं मॅक्लुहन याच्या सर्वच गृहितकावर हल्ला चढवला. अक्षरामुळे माणूस मर्यादित होतो. अक्षर म्हणजे 'दृश्य' आहे ऐकू येणारा/ शब्द हा 'दृश्यापेक्षा' अधिक जिवत असतो हा काय

**सर्वंकष संवेदनेच्या, पौर्वात्य मनोवृत्तीच्या दिशेकडे आपली वाटचाल सुरु आहे. लिपी- छपाई यांनी पाश्चात्यांची जाणीव सुटी, एकांगी करुन ठेवली. टीव्हीमुळं अनुभवांना संवेदनेला परिपूर्णता येईल.**

प्रकार ? अक्षर वाङमय समग्रजाणीवा देऊ शकत नाही का ? कविता, अमूर्तता, अस्तित्ववाद, असे विविध वाङमय प्रकार Synesthesiaच्या दृष्टीनच येतात ना! आणि टीव्हीमुळे 'वसुधैव कुटुबकम' साध्य होत ही तर अत्यन्त विपर्यस्त गोष्ट आहे. म्हणजे तुमच्या दिवाणखान्यात बसून बेरूतमधला रक्तपात पाहणार ! यात कुठला आला सह–अनुभव ? मिलर म्हणतात की सहानुभाव म्हणजे आपण सर्व एकाच स्थितीत जगतो, आपले लागेबाधे, आपल्या सस्था (कुटुब,गाव,राज्य) हे एकाच प्रकारचे असले तरच तो सहानुभव ठरतो.

या टीव्हीमुळ आपल्या समोर किती गोष्टी परकेपणान येऊन जातात आफ्रिकेतला दुष्काळ, हॉलिवूड, फिलिपीन्सची क्राती, लॅटिन अमेरिकेतल गृहयुध्द, ओस्कर पुरस्कार, जेस–जॅक्सन, ब्रिटनमधल सेक्स–स्कॅंडल, जागतिक बँक, राजकपूर, अण्वस्त्र नियत्रण, डेंग, झिथ,शिवसेना, बालगधर्व, शकरराव चव्हाण– असा सतत मारा होत असतो. या सर्वांविषयी आपल्याला आपलेपणा कसा निर्माण होईल ? उलट इतक्या घाऊक प्रमाणावर सर्व माल मिळत असतो तेंव्हा त्याबद्दलची आसक्तीच संपून जाते. आणि आपण पुन्हा आपल्या मर्यादित कोशात जाऊन दडतो. एकाच पडद्यावर एकामागोमाग असे सर्व रगाचे प्रसग येतात. आपले डोळे आणि ती परकी चित्र यात मानवाच्या जाणीवा जागृत होण्याचा काय सबध ?

हे सर्व असतानाही टीव्ही हेच जीवनाला परिपूर्णता देण्याच माध्यम आहे अस मॅक्लुहन म्हणतात. त्याना टीव्हीमध्ये सध्याच्या तथाकथित प्रगतीपासून वाचणारा अक्सीर इलाज मिळणे.

माणूस जसा प्रगत होत आहे, तशा आपण आपल्या पारपरिक वैज्ञानिक कल्पनाचा फेर विचार करत आहोत. या जगाच्या सर्व समस्या जशा आपल्या आयुष्यात येत नाही. तसे आपण प्रतिक्रियावादी(Reactionary)होत जाऊ.

विज्ञानामुळ जग आकळत जाईल अस आपल्याला कळायला लागेल की हे दृश्य जग तेवढ खर अस नाही. आपल्या दृष्टीपलिकडच जग म्हणजे स्वतन्च असही नाही. आज या 'प्रगती'मुळ आपण झपाट्यान पौर्वात्य मनोधारणेकडे चाललो आहोत. पुन्हा एकदा आदिम रात्रीच्या सर्वव्यापी काळोखविलीन होत आहोत.

अठरा–एकोणिसाव्या शतकात आलेल्या यात्रिक सस्कृतीविरूध्दचं हे बड आहे. या यात्रिकतेने माणूस–समाज व हे विविध अनुभवाचं जग याच नातच तोडल आहे. एक गाढ, सर्वांकष जाणीव नष्ट होऊन माणूस सुटा– अलग विचार करतो. तसा वागतो. अतप्रेरणा जाऊन कोरडा बुध्दिवाद आला Human integrityजाऊन सॉक्रटिसच्या युक्तिवादासारखा एकमार्गी, हार्दिक आग्रह झाला. हत्ती व सात आधळ्याच्या गोष्टीसारख मॅक्लुहन याना त्याच्या कॅनडातल्या कृषीआधारीत नीतिवाद्याच्या भूमिकेच आकर्षण वाटल होत. शेतीसस्कृतीतली हृदयगम परिपूर्णता, परस्परसबध, निसर्ग व माणूस, माणूससमाज याचे सबध– याची ओढ वाटत होती. दुसऱ्या महायुध्दानतर युरोपात आधुनिक यात्रिक सस्कृतीसबधी दुरावा वाढत चालला होता. ज्ञान, अनुभव, कृती या सर्वच बाबतीत वैज्ञानिक बुध्दिवादानं माणसाच्या समग्र जाणीवा मारून टाकल्या. माणस 'रोबो' झाली. त्यासाठी एका नव्या सवेदनशील, तरल भावना- जाणीवावर आधारित, समष्टी व निसर्ग याचा सेंद्रिय भाग असलेली नवी मनोधारणा हवी अस वाटू लागल.

मॅक्लुहन याना पडलेला पेच हा दुसऱ्या महायुध्दानतर सर्वच सामाजिक– नैसर्गिक शास्त्राना पडलेला पेच आहे. ज्ञानाची समग्रता, परिपूर्ण जाण याचा प्रत्येकजण आग्रह धरत आहे. १९५०–६० च्या सुमारास अमेरिकेत सामाजिक शास्त्रानीbehaviouralism, systems theoryअशा वैचारिक साधनाचा उपयोग सुरू केला. अरिस्टॉटलपासून ज्ञानशाखा वेगवेगळ्या झाल्या. त्याच्या स्वतत्र वाढीसाठी ते इष्ट होत. मात्र त्यामुळ 'सर्वकष' 'ज्ञान' हीट नव्हत १९५० च्या सुमारास प्रत्येक ज्ञानशाखेत ही जाणीव होऊन नव सामाजिक् शास्त्र उदयास आल. राज्यशास्त्रातल्या सिध्दांतात आता मानववशशास्त्रापासून साहित्यापर्यंतच्या मुद्याचा परामर्श घेतला जातो. विज्ञान–तत्रज्ञान व सामाजिक शास्त्र परस्परांजवळ येत आहेत. ज्ञानाची परिपूर्णता होण्याची ही प्रक्रिया सुरू आहे.

मॅक्लुहन याच्यावरच्या टेनिसन, इलियट, चेस्टरटन, जॉइस, इझरा पाऊड याच्या व कृषिसस्कृतीच्या सपूर्णवादाच्या अभावाचा



परिणाम व्हायचा तोच झाला. त्यानाही या तात्रिक युगाची शिसारी आली. त्याच्या मर्यादा जाणवतात. मात्र ते तेवढ्या पुरतेच मर्यादित राहिले नाही. केवळ गतगोष्टीत रममाण झाले नाही. खेड्याकड परत चला असही ते म्हणत नाहीत. एडगर पो च्या कवितेतल्या प्रमाण विक्राळ लाटाच ताडव येत असतानाही घाबरून हताश होण्याऐवजी त्या रौद्र स्थितीचीच अलिप्ततेने समीक्षा करायची– त्याचाच एक भाग होऊन– हे त्याना पसत होत म्हणून नव्या जगाच्या नव्या लाटामध्ये जाऊन त्यातून काही मिळत का हे त्याना पहायच होत यात्रिक युगान जरी एक 'सपूर्ण' मानव नष्ट केला तरी येणार इलेक्ट्रॉनिक युग पुन्हा या समग्र मानवाची प्रतिष्ठापन करणार आहे हा त्याना विश्वास वाटतो– नव्हे ते त्याना हवच आहे. या Wishful thinkingमधून त्यानी टीव्हीला परिपूर्ण जाणीवेसाठी वापरल. मॅक्लुहन याची उद्दिष्ट स्पष्टच आहेत मात्र त्याच्या परिपूर्तीसाठी त्यानी जे माध्यम वापरल ते कितपत विश्वासार्ह होत. हा प्रश्नच आहे मॅक्लुहनं याच्या सर्व अपेक्षा आजच्या टीव्हीनं खोट्या ठरवल्या आहेत. एक स्पष्ट आहे, टीव्ही आला, नव तत्रज्ञान आल म्हणून घाबरून रडत बसण त्याना मजूर नसावे त्यानी

---

पुस्तकाचा आशय, टीव्हीचा आशय म्हणजे त्यातली 'स्टोरी' नव्हे. या माध्यमानी आपल्या आकलनशक्तीत काही बदल घडवले असतात. तोच त्याचा 'संदेश'.

---

विज्ञानविरोधी भूमिका घेतली मात्र हे विज्ञान कालबाह्य झाल अशा अगान ते बोलतात. नव इलेक्ट्रानिक युग व जुन विज्ञान याच वैरच आहे त्यातून येणारी जीवनदृष्टीच वेगळी असा त्याचा दावा आहे.

ज्ञानशास्त्राच्या क्षेत्रात असलेली नवी जाणीव, समष्टीवाद, समाजवाद, कृषि– सस्कृतीची मनोवृत्ती, गाढ जाणीवा याच्या मिश्रणातून मॅक्लुहन याचा माध्यमविषक सिध्दात ठरतो. त्याचा टीव्ही या गोष्टींची पूर्तता करण्यासाठी ते वापरतात. आता टीव्हीच त्याला मान्यता देत नाही. त्यामुळे मॅक्लुहन साहेबाना हवा तसा टीव्ही कसा निर्माण करता येईल ? की टीव्ही तसा नसतोच ? असे अनेक प्रश्न मॅक्लुहन यानी सतत निर्माण केले आहेत. त्याचे कट्टर विरोधक जोनाथन मिलरही शेवटी म्हणतात

**'१९६० च्या आसपाच पहिल्यांदा मॅक्लुहन वाचताना मी भारावून गेलो, थरकावून गेलो. त्यातलं एकही निरीक्षण, तत्व आज मला खरं वाटत नाही, एकही सिध्दांत टिकला नाही. मात्र मॅक्लुहन वाचल्यानंतर मी छापील मजकुराकडं लक्षपूर्वक पाहू लागलो. टेलिफोन संबधी सज्ञा तपासू लागलो. छायाचित्राबद्दल, त्यांच्या स्वयंभू शक्तीबद्दल सजग झालो. रेडिओच्या संकल्पना वेगळ्या रितीनं समोर आल्या. नंतर टेलिव्हिजनच्या उद्योगात पडल्यावर मॅक्लुहननं या माध्यमाचा ज्या प्रकारे विचार केला- मी त्या माध्यमाकडं आता नवीन दृष्टीनं पाहतो. एवढं सगळं असूनही त्याच्यातून मला काहीच गवसत नाही. मॅक्लुहननं काल्पनिक गोष्टींच जगडव्याळ जाळं विणून सत्याची शक्यता निर्माण केली असच मला जाणवत आहे.'**

**मॅक्लुहनला तेच पाहिजे ! एक सर्वस्पर्शी धूसर जाणीव !**

O


## -: पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, मर्यादित, पुणे. :-

मुख्य कार्यालय : ८५५, बुधवार पेठ, लक्ष्मी पथ, पुणे ४११ ००२ प्रशासकीय कार्यालय : प्लॉट न. इ. १, गुलटेकडी, मार्केट यार्ड, पुणे ४११ ०३७
फोन नबर : ४४५९१५. तारेचा पत्ता · ''सेन्को बँक''

× ७० वर्षांची अभिमानास्पद परपरा
× कुशल नेतृत्व / सेवाभावी सेवक वर्ग
× व्याजाचा आकर्षक दर
× चालू / बचत / आवर्तक / मुदत ठेव आपोआप मुदतवाढ / मासिक उत्पन्न ठेव /पुनर्गुंतवणूक ठेव या बचतीच्या आकर्षक फलदायी योजना

× शेती उत्पादन/लघुउद्योग/बिगर शेती व्यवसायासाठी कर्ज पुरवठ्याची सोय.
× टीव्ही/ फ्रीज/ मोटार सायकल इत्यादिसाठी कर्ज व्यक्तिगत कर्ज पुरवठा
× सामाजिक गरजाशी निगडीत नियोजन
× राष्ट्रीय योजनाना प्राधान्य
× बँकींगच्या सर्व सुविधा उपलब्ध

× सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय [मुख्य कचेरीसह ४३ शाखा]
× सोनेतारण कर्ज व्यवहाराची सोय. [मुख्य कचेरीसह १४६ शाखा]
× उपसा जलसिचन/ पाणीपुरवठा दीर्घ मुदत/ मध्यम मुदत कर्ज पुरवठ्याचे योजनाना प्राधान्य
× जीप/ ट्रॅक्टर/ ट्रक/ रिक्षा/ टेम्पो इत्यादी वाहतूक साधनासाठी कर्ज पुरवठा

**श. सं. धुमाळ**
प्रभारी व्यवस्थापक
**नारायणराव म. हिंगे**
उपाध्यक्ष
**अशोकराव ना. मोहोळ**
आमदार, अध्यक्ष

× पुणे जिल्ह्यात एकूण १६७ शाखासह समाजाचे सर्वांगीण उन्नतीसाठी कार्यरत असणाऱ्या बँकेची मुख्य कचेरी अगर नजिकचे शाखेत गुतवणूक करुन, राष्ट्रीय कार्यास हातभार लावा.

सर्वसामान्य जनतेच्या विश्वासाची व जिव्हाळ्याची एक अग्रगण्य जिल्हा बँक.




**टीव्हीमुळं सांस्कृतिक अस्मिता, भिन्नता लोप पावत आहे. आपण दिवसेंदिवस मोनोकल्चरकडे चाललो आहोत.**

शेजारच्या वाड्यात एकच टीव्ही होता. वाड्यातली सगळी तरुण मुलं - मुली दाटीवाटीनं एकाच खोलीत बसायची. ते थांबवण्यासाठी कितीतरी जणांनी टीव्ही घेतला.

**टीव्हीचा प्रेक्षक- निरक्षरांपासून- सुशिक्षितापर्यंत, कफल्लकांपासून श्रीमंतांपर्यंत. जाहिराती मात्र अशा की ज्या वस्तू फक्त ०.०१ टक्के लोक घेऊ शकतात.**

टीव्हीमुळं वाचनाचा आनंद कमी होईल असं नाही. पण टीव्हीमुळे कल्पनाशक्ती मात्र मारली जाते. कारण सगळंच स्पष्ट करून दाखवलं जातं.


टीव्ही आपल्याकडे अगदी नवीन होता तेव्हाचं वातावरण मला स्पष्ट आठवतंय. कॉलनीत आमच्या घरापासून दोनतीन घरं टाकली की तीन मिनिटांच्या अंतरावर एकाकडे टीव्ही आला. एका दिवसात बातमी सगळीकडे पसरली. मी तेव्हा शाळेत होते. ज्यांच्याकडे टीव्ही आला होता त्यांची आणि आमची फारशी काही ओळख नव्हती. तरी आम्ही त्यांनी न बोलवता टीव्हीची वेळ झाली की त्यांच्याकडे जायचो. छायागीत आणि सिनेमा यांचं तर प्रचंड आकर्षण असायचं. छायागीताच्यावेळी त्यांचा छोटासा हॉल भरलेला असायचा. त्यातले बरेचसे ओळखीचेसुद्धा नसायचे. छायागीतापायी कितीतरीजणांनी त्या काळी आई- वडिलांची बोलणी खाल्ली असतील. मी सुद्धा त्यातलीच होते. संध्याकाळी मैत्रिणी भेटल्या की आमचं ठरायचं- 'आज येणार ना छायागीत बघायला ? जाताना मला हाक मार!' कोणीतरी घरी बोलवायला आलं की कुणी काही म्हणत नाही माहीत होतं. सिनेमाचंही तसंच. कितीतरी वाईट- वाईट सिनेमे तेव्हा टीव्हीवर अगदी मन लाऊन पाहिले. कलात्मक आनंदासाठी वेगळे सिनेमे असतात हे तेव्हा जरा जरा कळायला लागलं होतं. म्हणून टीव्हीवर 'भुवनशोम' दाखवला तेव्हा टीव्हीसमोरच्या तुरळक गर्दीत मीपण होते. 'आपण हा सिनेमा बघायलाच हवा' या जबाबदारीनं थोडा वेळ पाहिला. मग कंटाळा आल्यावर घरी लवकर जायचंय सांगून हळूच सटकले. आराधना, आनंद, मिली, अभिमान, आपकी कसम असले धोधो रडायला लावणारे सिनेमेच तेव्हा आवडायचे. ते टीव्हीवर असले की प्रचंड गर्दी असायची.

छायागीत आणि सिनेमाच्या आकर्षणात पुढे जाहिरातींची भर पडली. कारण मैत्रिणीच्या घरीच टीव्ही आला. त्यामुळे तासंतास टीव्हीपुढे बसणं शक्य झालं. जाहिराती मला तेव्हा भयंकर आवडायच्या.

जाहिरातींचाच एक कार्यक्रम का असू नये असं



## सतीश आळेकर
## सदा डुंबरे
## मुकुंदराव किर्लोस्कर
## सुजाता बजाज
## मंजू पराडकर
## अनिल भागवत
## भास्कर चंदावरकर



**टेलिव्हिजनविषयी अनेक प्रतिथयश साहित्यिक, विचारवंत पत्रकारांच्या विचारांचा**



# कॅलिडोस्कोप

**मेधा राजहंस**

वाटायचं. क्रिकेटची आवड निर्माण व्हायला आणि टीव्हीवर थेट प्रक्षेपण दाखवायला योगायोगानं एकच वेळ आली. टीव्ही आपल्याकडे पायजेच असं वाटायला लागलं ते तेव्हा. टीव्हीची कॉमेंट्री तेव्हा रटाळ असायची. टीव्हीवरची दृश्यं आणि रेडिओची कॉमेंट्री असं कॉंबिनेशन व्हायचं. मॅच सुरु व्हायच्या आधी चांगली जागा पकडून बसायचं. मग लंचच्या वेळी लंच, टीच्या वेळी टी असं करत पाच दिवस केव्हा जायचे कळायचं नाही. माझी मैत्रीण क्रिकेट खेळायची. तिच्यामुळे आणि बघून बघून ग्राऊंड पोझिशन्स वगैरे व्यवस्थित कळायच्या. मुलींना क्रिकेट कळलेलं आणि आवडलेलं बहुतेक मुलांना आवडत नाही. त्यामुळे आम्ही जेव्हा प्लेसिंग असं हवं, तसं पाहिजे होतं असं म्हणायचो तेव्हा आमच्याकडे कुणी लक्ष द्यायचं नाही. टीव्हीच्या त्याच छोट्या पडद्यावर पुढे नादियाचा ऑलिंपिक्समधला थक्क करणारा परफॉर्मन्स बघितला. बोर्ग आणि मॅकेंन्रोची जीवघेणी लढत बघितली. मी बोर्गच्या बाजूनं होते. तो जिंकावा म्हणून जागा न बदलता पाच सेट बघितले. माझ्या विलपॉवरमुळे तो जिंकला असं तेव्हा वाटलं. पुढच्या वर्षी बोर्ग- मॅकेन्रो मॅच बघायला आम्ही खास एका मित्राकडे गेलो. दरम्यान आमच्याकडे टीव्ही आला होता पण त्याच्याकडे कलर टीव्ही होता. प्रक्षेपण अतिशय सुंदर होतं. पण बोर्ग हरलाच. पुढे केव्हातरी घरी रंगीत टीव्ही आला. पण टीव्हीचं आकर्षण मात्र कमी कमी व्हायला लागलं. बुनियाद, नुक्कड, मालगुडी डेज सारख्या मालिका, क्वचित चांगले प्रादेशिक सिनेमे, क्वचित न्यूज रिपोर्ट आणि टाईमपास म्हणून कधी छायागीत- हिंदी सिनेमा- अशी आवडीची वळणं बदलली. जाहिरातींचं आकर्षण मात्र बरंच टिकून राह्यलं.

मधल्या काळात आणखी एक बदल झाला. एखाद्या कार्यक्रमावर ज्याप्रमाणे लेखक- दिग्दर्शक- कलाकाराची छाप असते तशी टीव्ही कार्यक्रमांवर प्रायोजकांची पकड बसायला लागली. खऱ्या अर्थानं एका व्यावसायिक माध्यमाची सुरवात झाली. या व्यावसायिक लाटेला छेद देणारी 'तमस' सारखी मालिका आली आणि टीव्ही माध्यमातून दिल्या जाणाऱ्या 'मेसेज' चा जनमतावर खरंच किती आणि कसा परिणाम होतो याचा विचार करण्याची वेळ आली. टीव्ही हे सरकारी माध्यम असावं की स्वायत्त ? सेन्सॉर बोर्ड असावं की नसावं ? कलाकारांच्या स्वातंत्र्याच्या मर्यादा कोणत्या असाव्यात ? यासारख्या प्रश्नांची जरा गंभीर चर्चा व्हायला सुरुवात झाली. तोवर रामायण येऊन धडकलं होतं. मग कसल्या चर्चा आणि कसले प्रश्न ! जो तो साडेनऊची वेळ गाठण्यासाठी धडपडू लागला. रामायण सुरु झालं आणि मनोरंजनाचं एक वेगळंच दालन उघडलं. सामाजिक- राजकीय मूल्यांचा ऱ्हास आज ज्या झपाट्यानं होतोय त्याच वेगानं रामायण मालिका लोकप्रिय झाली. आपल्या संस्कृतीतून व्यवसाय

कसा करावा हे रामानंद सागरनी भल्याभल्यांना शिकवलं. आदर्शाची कणभरही चाड नसणारे कोट्यावधी भारतीय भक्तिभावानं दर रविवारी टीव्ही समोर बसतात. रामायण बघितलं म्हणजे आपोआपच आपल्यां थोर संस्कृतीचं जतन होतं असं अनेकांना वाटतं. रामायण न आवडणाऱ्यांवर 'शिष्ट बुद्धिवंतां'चा शिक्का मारला जातो. 'रामायण' हा आज टीव्हीवरचा सर्वाधिक लोकप्रिय, प्रायोजकप्रिय कार्यक्रम आहे, एकदा फॉर्म्युला सापडला की या व्यवसायातले अनेकजण सरसवून पुंढे येणार आहेत आणि प्रत्येक एपिसोड 'एकच प्याला' म्हणत लाखो सर्वसामान्य बघत राहणार आहेत.

टीव्ही माध्यम आज एका महत्त्वाच्या वळणावर आहे. एका बाजूनं तांत्रिक प्रगतीनं टीव्हीचं जाळं लहानातल्या लहान खेडोपाड्यांत पाण्याच्या आधी पोचणार आहे. आणि दुसऱ्या बाजूला या माध्यमातून कोणता 'संवाद' साधला जावा याचा विचार न करता सरकार प्रायोजकांवर भिस्त ठेऊन टीव्हीच्या पडद्यातून वाटेत ते दाखवत राहणार आहे.

टीव्हीच्या आजच्या स्वरुपाबद्दल, या माध्यमाबद्दल विचार करणाऱ्या वेगवेगळ्या आठ लोकांशी बोलले. ते टीव्ही बघतात का ? कोणते कार्यक्रम बघतात ? टीव्हीचं धोरण कसं वाटतं ? कसं असायला हवं ? कोणते कार्यक्रम दाखवले जाऊ नयेत ? आपल्या समाजजीवनाचं, संस्कृतीचं प्रतिबिंब टीव्हीतून दिसतं का ? टीव्हीमुळे एक वेगळी संस्कृती निर्माण होते आहे का ? या प्रश्नांच्या निमित्तानं सतीश आळेकर, सदा डुंबरे, भास्कर चंदावरकर, सुजाता बजाज, मुकुंदराव किर्लोस्कर, शांताबाई शेळके, मंजू पराडकर आणि अनिल भागवत अशा वेगवेगळ्या क्षेत्रातल्या लोकांशी गप्पा मारल्या. त्यावरुन हा परिसंवाद -



## सतीश आळेकर

**(नाटककार; अध्यक्ष, थिएटर ॲकॅडमी)**

**'टीव्हीचा उपयोग मला कलाकार म्हणून खरा झाला ते व्हीसीआर घेतल्यावर.'**

टीव्ही हे आपल्याकडचं करमणुकीचं नवं माध्यम आहे. त्यामुळे कलाकार आणि प्रेक्षक दोघांनाही या माध्यमाबद्दल अनावर उत्सुकता आहे. परदेशात टीव्ही नवीन होता तेव्हा तिकडेही आपल्यासारखंच टीव्हीचं ग्लॅमर होतं. नवीन माध्यम आलं की तिकडे कलाकार आकृष्ट होतात. रेडिओ आल्यावर संगीतातले / नाटकातले सगळे कलाकार तिकडे वळले आणि रेडिओवर प्रेशर आलं. रंगीत दूरदर्शनबद्दल असंच कुतूहल आज आपल्याकडे आहे.

आपल्याकडे टीव्हीचं ग्लॅमर वाढतंय कारण नोकरी करणारा शहरी वर्ग. त्याला करमणुकीची गरज आहे. टीव्हीमुळे त्याचा करमणुकीवर सारखा खर्च होत नाही. एकदाच खर्च. बटन दाबलं की चित्र. टीव्हीचं हे अर्थकारण लोकांना आकृष्ट करतं. मी टीव्ही अलिकडे घेतला. कारण टीव्हीसारख्या तंत्रज्ञानापासून सुटका करुन घेता येत नाही. त्याला सामोरंच जायला पाहिजे. टीव्ही हे अभिव्यक्तीचं साधन जेव्हा होईल, एखाद्या कलाकाराला आपली कला जेव्हा याच माध्यमातून अभिव्यक्त करावीशी वाटेल तेव्हाच त्याची ताकद कळेल. माध्यमाबद्दलचं कुतूहल जोवर संपत नाही तोवर त्यातून काही सकस तयार होणार नाही.

आजचे प्रायोजित कार्यक्रम बघितले तर त्यावर जाहिरात माध्यमाचाच पगडा दिसतो. 'प्रॉडक्ट सेलिंग' हा एकमेव उद्देश असतो. अशा जाहिरातदाराचं भांडवल जेव्हा क्रियाशील कलाकाराला मिळतं, तेव्हा त्याचं दडपण कलाकारांवर येतंच. याला अपवाद म्हणजे, नुक्कड, इंतजार, तमस, बुनियाद यासारख्या मालिका. या कार्यक्रमांवर जाहिरातदारांचा पगडा दिसत नाही. प्रायोजित कार्यक्रमांच्या बाबतीत भांडवल पुरवणारे लोक कोण आहेत हे महत्त्वाचं. प्रॉडक्ट तयार होण्याआधीच भांडवलदार मधे आले तर जाहिरातदारांच्या मनोवृत्तीचा परिणाम निर्मात्यावर होतोच. सिनेमात असं होत नाही कारण भांडवलदार आणि निर्माता एकच असतो.

नवीन लोकांनी टीव्हीसाठी लिहावं असं वाटत असेल तर जशी राज्य नाट्य स्पर्धा असते, किंवा संगीत नाटक ॲकेडमीकडून वेगळ्या नाटकांसाठी मार्ग उपलब्ध असतातच तसे दूरदर्शनकडे उपलब्ध असायला हवेत. काही ठराविक वेळ नवीन प्रयोगशील लोकांसाठी द्यायला पाहिजे. कलाकार नंतर माहीत होतात. 'नुक्कड' सारख्या मालिकेमुळे अजय वढावकर, सुरेश भागवत सारखी माणसं माहीत झाली आणि मेन स्ट्रीम (Main Stream) सिनेमात कामं करायला लागली.

टीव्ही मालिकांपैकी मी 'बुनियाद', 'मालगुडी डेज', 'तमस' सगळं पाहिलं. या कार्यक्रमांच्या सगळ्या संवेदना पॉप्युलर सिनेमाच्या होत्या. कलाकारांचा दर्जा फार चांगला कायम ठेवला होता. संहिता– अभिनय या दृष्टीनं 'मालगुडी डेज' मला सगळ्यात चांगलं वाटतं. त्यांना अर्ध्या तासाचं गणित कळलं होतं. त्यातल्या कॅरॅक्टर्स ही हाडामासाची माणसं वाटली आणि त्यांच्याबद्दल प्रेक्षकांना सहानुभूती वाटली. आंतरराष्ट्रीय स्तरावर सगळ्यात चांगली विकली गेलेली मालिका 'मालगुडी– डेज' आहे.

'तमस' मालिका मला आवडली होती. 'तमस' बद्दल झालेल्या गदारोळाबद्दल मला वाटतं, निर्मितीत कलाबांह्य विचारांचं दडपण यायला नको. नाहीतर नंतरच्या प्रकारांना तोंड द्यायला पाहिजे. अशा कलेत तुमचा प्रामाणिकपणा दिसतो. त्या कलाकृतीनं तुम्ही स्तिमित होता. टीव्ही मी फारसा बघत नाही. 'रामायण' कधीतरी पाहिलंय. तो राम– रावण, गमंत वाटते. माझ्या आवडीचे कार्यक्रम टीव्ही फारसे नसतात. रविवारचा दुपारचा प्रायोजित सिनेमा दाखवायचा ही टीव्हीनं चांगली सुरवात केली. 'जैत रे जैत' चा संदर्भ परवा कर्नाटकात मिळाला. प्रादेशिक, राष्ट्रीय आणि पॅनोरमा मधे चांगली निवड करून सिनेमे दाखवायला पाहिजेत. हल्ली रविवारी संध्याकाळी बाहेर खपणार नाही असा सिनेमा दाखवला जातो, हीसुध्दा चांगली सुरवात आहे. सद्‌गती, पार, अंगुठाछाप, दामूल असे कितीतरी चांगले सिनेमे त्यामुळे बघायला मिळाले. रात्रीचे सिनेमे हीसुध्दा चांगली कल्पना होती. अजून यात चांगली निवड केली जात नाही. प्रौढांसाठी वेगळे खास प्रादेशिक

असे सिनेमे नेहमी दाखवायला पाहिजेत.

टीव्हीचा उपयोग मला कलाकार म्हणून खरा झाला ते व्हीसीआर घेतल्यावर. झोर्बा द ग्रीक, गॉडफादर, हिचकॉकचे सिनेमे, शेक्सपियरवरची कॅसेट अशा कितीतरी गाजलेल्या कृती बघायला मिळाल्या.

टीव्हीसाठी मला नवीन टेलीप्ले करायला आवडेल. 'झूलता पूल' टीव्हीसाठी करायचं होतं. निर्मितीसाठी मी पाच लाख रुपये मागितले. तर अडीच लाखात बसवा असं सांगितलं. मला कमी खर्चात करायचं नव्हतं. नाहीतर तडजोडी करायला लागतात. थिएटरकडून टीव्हीकडे जाताना धंद्याच्या गणितात तुमची अभिव्यक्ती बसवावी लागते. माझी आधीची नाटकं- 'महानिर्वाण', 'महापूर', 'शनिवार-रविवार' मला हिंदीत आणायची आहेत. पण अशा 'फॅमिली प्ले' ची मर्यादा असते. ही नाटकं मराठीत कौटुंबिक नाटकं समजली जातात. पण राष्ट्रीय नेटवर्क कार्यक्रमात ते करायचं म्हटलं की फार अडथळे येतात. 'महानिर्वाण' स्टेजचंच नाटक आहे.

आणखी एक मला वाटतं की, दूरदर्शन कार्यक्रम तयार झाल्यानंतर प्रायोजक पुढे यायला पाहिजे. तसं होत नाही. यासाठी दूरदर्शननं कार्यक्रम निर्माण करायला पैसे दिले तर कितीतरी नवे कलाकार पुढे येतील. आज टीव्हीकडे साधनं कमी, मोठे अद्ययावत स्टुडिओ नाहीत. १५०/१६५ कोटी जे टीव्हीला मिळतात त्यातले पैसे असे स्टुडिओ बांधायला द्यायला हवेत. ●

## सदा डुंबरे

**(पत्रकार)**



**तुमचं स्वतंत्र अस्तित्व ठिसूळ करण्याकडे माध्यमाची चाल आहे.**

मी टीव्ही खूप उशीरा घेतला. टीव्ही आपलं माध्यम नाही, आपण त्यात रमणार नाही, तो व्यत्यय होईल असं वाटलं. टीव्ही आईसाठी घेतला. तिच्यासाठी जगाची दारं उघडण्याचं प्रभावी साधन म्हणून टीव्ही घेतला. टीव्ही घेण्यामागची भूमिका वैयक्तिक, डोमेस्टिक आहे.

लहानपणापासून माहिती मिळवण्याचं, करमणुकीचं साहित्य हेच प्रमुख माध्यम राहिलं. साहित्य वाचनाचा कौटुंबिक वारसा मिळाला. वाचनाची आवड आणि सवय तिसरी- चौथीपासून लागली. फडके- खांडेकर- माडखोलकर सुदैवानं किंवा दुर्दैवानं आठवीतच वाचले होते. तीन दिवसात एक पुस्तक या वेगानं मॅट्रिकपर्यंत पुस्तकं वाचली. कॉलेजच्या कडक वेळापत्रकात मग वाचनाचा वेग मंदावला. लहानपणापासून घरी ३/४ वर्तमानपत्रं येत. आठवीपासून इंग्रजी वाचनाची आवड निर्माण झाली. पुढे जर्नालिझमला गेल्यावर वर्तमानपत्रांचं वाचन अधिक व्यापक, अधिक अॅनॅलिटिकल झालं. पुस्तकाचं वाचन सुरु झालं. घरात खूप पुस्तकं होती. त्यामुळे वाचन हेच आपलं जगाकडे बघायचं, मनोरंजनाचं माध्यम आहे असं वाटत होतं. टीव्ही घ्यायचा नाही असं माझं मत होतं त्याचं कारण हे.

टीव्ही माझ्याकडे नव्हता पण मी इतरांकडे टीव्ही मधूनमधून बघत असे. टीव्हीबद्दल माझं मत 'हे वरवरचं, थिल्लर आहे' असंच राहिलं. या माध्यमासंबंधी मी सतर्क होतो. जोशी कमिटीचा रिपोर्ट मी आधीच वाचला होता. व्हर्गिस कमिटीच्या रिपोर्टवर मी त्यावेळी मोठा लेख साप्ता. 'मनोहर'मधे लिहिला होता.

दरवर्षी वार्षिक आढाव्यांचा 'सकाळ'चा अंक निघतो. इतर अनेक विषयांबरोबर संपर्क माध्यमे हा विषय निवडला. त्याबद्दलचा आढावा मी घेत असे. म्हणजे माध्यम म्हणून टीव्हीचा खूप अभ्यास मी केला होता. या माध्यमाला माझा विरोध नव्हता आणि नाही. माध्यम म्हणून अतिशय प्रभावी पण त्याचा वापर कसा करायचा याबद्दलची राष्ट्रीय भूमिका मला चुकीची वाटते. टीव्ही हा मनात आणलं तर चालता-बोलता ज्ञानकोश होऊ शकतो.

पिकांची वाढ कशी होते ते दाखवणारी एक डॉक्युमेंटरी काही वर्षांपूर्वी दाखवली होती. आपण जमिनीत जाऊन जे बघू शकत नाही ते मला पडद्यावर इतकं सुंदर बघायला मिळालं. आपल्या शेतकऱ्याला हे बघायला मिळालं पाहिजे. ज्ञान देण्याची टीव्हीची क्षमता आपण पूर्णपणे वापरु शकत नाही. खोटे प्रश्न तयार करायचे आणि खऱ्या प्रश्नांकडे वळायचंच नाही असं आपलं धोरण आहे. आज या माध्यमाची क्षमता वापरलीच जात नाही. आर्थिक, शैक्षणिक, शेतीविषयक प्रश्न लोकांना माहीतच होत नाहीत. साधा शिक्षणाचा प्रश्न घेतला तर आज शाळांची अवस्था काय आहे? एक शिक्षकी शाळा कशा चालतात, शाळा पडलेल्या, मुलांना वह्या नाहीत हे टीव्हीवर दाखवून मग अनुकूल- प्रतिकूल धोरण ठरवायला पाहिजे.

टीव्हीचे कार्यक्रम कोणासाठी? हा एक वेगळा प्रश्न आहे. पुलंनी सांगितलेली एक गोष्ट म्हणजे; शैक्षणिक कार्यक्रम शाळांमधून दाखवले जाता तेव्हा वेगवेगळ्या प्रतिक्रिया येतात. बाई सुंदर इंग्रजी बोलतात/ सुंदर दिसतात/ ऑक्सीजन कसा तयार होतो ते कळलं/ बाईच्या चपला छान आहेत अशा वेगवेगळ्या प्रतिक्रिया आल्या. प्रेक्षकवर्ग फार वेगवेगळा आहे त्यामुळे प्रत्येकाला रस असणारे कार्यक्रम ठरवणं अवघड जातं.

अमेरिकेतला एक प्रयोग - मुलांना डॉलर दिला आणि चित्र काढायला सांगितलं. सगळ्या मुलांच्या तपशिलात साम्य होतं पण आकार वेगवेगळे होते. ही तफावत का? तर ज्यांच्याकडे पैसे खूप होते त्यांनी तो आकार छोटा काढला होता, काहींनी बरोबर आणि गरीब मुलांनी तो आकार मोठा काढला होता. हे संदर्भभान आपल्या दूरदर्शननं राखलं नाही. तुम्ही फास्टफूड / ड्रिंक्स / नूडल्स हे खात असाल तर तुम्ही या संस्कृतीचे घटक आहात हे टीव्हीनं बघणाऱ्यांच्या मनात बिंबवलं. एका राहणीमानाच्या माणसांना त्यांच्या जगात नसलेली गोष्ट दाखवायची आणि गॅप निर्माण करायची हे टीव्हीचं तंत्र आहे. माझ्या घरातल्या पिठाचं सूप कसं करायचं हे सांगितलं जात नाही. जाहिराती आणि कार्यक्रम संवेदनशील मनं वेगवेगळी करु शकत नाहीत. तुमच्याकडे पैसे आहेत म्हणून मला काहीही दाखवायचं हे मला पटत नाही. जाहिरातीतल्या कितीतरी गोष्टी माझ्या गावात नसतात. त्याबद्दल एक अभिलाषा मनात असते. माझ्या संदर्भापेक्षा काहीतरी वेगळ्या गोष्टी

मला दाखवल्या जातात आणि या तुझ्याकडे नाहीत हे बिंबवलं जातं. टीव्हीमुळं अशा लाखो लोकांना रुटलेस वाटत रहातं.

टीव्ही संस्कृतीबद्दल सर्वसामान्य माणसं विचार करत नाहीत कारण सांस्कृतिक भिन्नता आणि सांस्कृतिक अस्मिता दिवसेंदिवस लोप पावत आहेत. आणि आपण monoculture कडे चाललो आहोत. तुमचं स्वतंत्र अस्तित्व - identification ठिसूळ करण्याकडे माध्यमाची चाल आहे. एका बाजूला भेसूर वास्तव आणि जगाचं टीव्हीतून होणारं दर्शन यातली गॅप वाढत चालली आहे.

टीव्हीसारख्या लोकसंवादमाध्यमामुळे निर्माण होणारी संस्कृती तुम्हाला वेगळं राहू देत नाही. टीव्हीसारख्या प्रभावशाली माध्यमापासून तुम्ही दूर राहूच शकत नाही. मी टीव्ही बघत नव्हतो तेव्हा माझ्या मित्रांकडे टीव्ही होता. ते ज्या गोष्टींबद्दल बोलत असत त्यामुळे मला बाजूला पाडत असत. वेगळेपणाची भावना प्रत्येकाला त्रास देते. जाणीवेच्या पातळीवर जरी पटलं नाही तरी व्यवहारी पातळीवर या गोष्टी मान्य करायला लागतात. बोलायला विषय रहात नाही. जेव्हा पाच वाचणारे एकत्र येतात तेव्हा प्रत्येक स्वतंत्र व्यक्तिमत्वाचे फायदे मिळतात. देवाणघेवाणीला व्यामिश्र स्वरूप येतं पण टीव्हीमुळे सगळयांनी एकच गोष्ट बघितलेली असते. त्यामुळे पाचजणात चारविरुद्ध एक असं असंतुलन होत रहातं. टीव्ही न बघणारा वेगळा पडतो. हे टीव्हीवर जेव्हा जास्त चॅनेल सुरू होतील तेव्हा संपेल. आपल्याकडे त्रुटी म्हणजे एकच चॅनेल. वेळ मर्यादित. त्यामुळे फक्त popular गोष्टी दाखवल्या जातात. अभिजात गोष्टी दाखवण्याकडे कल नसतो. चांगल्या डॉक्युमेंटरीज् का तयार होत नाहीत? कॅमेऱ्यानेच जगाकडे बघायची स्वतंत्र भाषा का तयार होत नाही?

'न्यूजलाईन'सारखा चांगला कार्यक्रम आपल्याकडे बंद पडतो. कारण आपल्या समाजजीवनात / भावजीवनात सरकारचा हस्तक्षेप होत आहे. त्यामुळे प्रत्येक कार्यक्रमाला partial स्वरूप येतं. काही गोष्टींवरच झोत टाकला जातो. 'जनवाणी'सारख्या कार्यक्रमातून मंत्र्यांना अडचणीत आणणारे प्रश्न का नसावेत? तसं नसेल तर समाजाचं खरं दर्शन टीव्ही कधीच घडवू शकणार नाही. 'रजनी'सारख्या कार्यक्रमातून समाजस्थितीचं दिग्दर्शन खरं दिसतं पण उपाय खोटे असतात.

टीव्हीवर दाखवल्या जाणाऱ्या कला - संस्कृती - बातम्या - वगैरे कार्यक्रमांचं प्रमाण ठरलेलं नसावं. लवचिक असावं. टीव्हीसाठी काम करणाऱ्या लोकांना स्वातंत्र्य मिळालं पाहिजे. निर्मितीचा खर्च कमी व्हायला पाहिजे. जसा लेखक चार आण्याच्या कागदामध्ये छान लेख लिहू शकतो तसं टीव्हीचं होत नाही. त्यामुळे फार थोडे लोक टीव्हीसाठी काम करु शकतात. टीव्हीसाठी लिहिणं, काम करणं, निर्मिती यातला स्वाभाविक आविष्कार त्यामुळे पहायला मिळत नाही.

समाजाचं वळण बदलवून टाकणारं हे माध्यम आहे हे नक्कीच. पण आपल्याकडे लोकांपुढे जाण्यासाठी जी ढाल लागते तशी संरक्षक ढाल म्हणून आजची समाजव्यवस्था टीव्ही माध्यम वापरते. खऱ्या प्रश्नांपुढे जायला नको म्हणून. परदेशात असं संरक्षण कुणालाच मिळत नाही. ज्या व्यक्तीबद्दल, ज्या प्रश्नांबद्दल लोकांना माहिती हवी असते ती दिली जाते. ज्यावर चर्चा व्हायला पाहिजे असं लोकांना वाटतं त्यावर ती होते.

आपल्याकडे राजकीय नेतृत्व काही गोष्टींबद्दल मूग गिळून बसलेलं दिसतं. कारण मतदार दूर जातील. लोकांसमोर बेडरपणे नीडरपणे वास्तवाकडे जाण्याचं धाडस आपल्याकडे नाही. एक प्रकारचा गुळगुळीत popularism सगळीकडे दिसतो.

टीव्ही हे जसं आज सत्तेच्या हातातलं माध्यम बनलंय ते त्याचं स्वरुप बदलेल अशी शक्यता वाटत नाही. नजिकच्या भविष्यकाळात कोणत्याही राज्यकर्त्याचं टीव्हीचं धोरण बदलण्याचं धाडस होणार नाही. तात्विक दृष्ट्याच फक्त आपण ह्या गोष्टी मान्य करु शकतो. व्यवहारात नाही.

चांगल्या मूल्यात्म पातळीवर बदल करण्यासाठी आपल्याला किंमत द्यायला नको आहे आणि तरीही आपल्याला चांगला समाज हवा आहे. ●

---

## सुजाता बजाज

**(चित्रकार)**



### होनी-
### अनहोनी सारखे कार्यक्रम अजिबात दाखवू नयेत.

---

टीव्ही मी खूप वर्ष बघतेय. सुरूवातीला मालिका सुरु झाल्या तेव्हा त्याचं Standard चांगलं होतं. म्हणजे 'ये जो है जिंदगी', 'मिस्टर अँड मिसेस'. सध्याचे कार्यक्रम अजिबात चांगले नाहीत. 'चुनौती', 'नुक्कड', 'बुनियाद', 'एक कहानी' खूप आवडलं होतं. शेवटपर्यंत बांधून ठेवणारं, सुंदर स्वच्छ मनोरंजन टीव्हीनं केलं पाहिजे असं वाटतं. हिंदी नाटकांचा दर्जा जास्त चांगला वाटतो. लहान मुलं टीव्हीला चिपकून बसतात, पण त्यांना सगळे मोठ्या माणसांचे कार्यक्रम बघायला लागतात. मुलांसाठी चांगले कार्यक्रम तयार व्हायला पाहिजेत.

सगळयात जास्त बघितला जाणारा कार्यक्रम हिंदी सिनेमा. एवढे हिंदी सिनेमे निघतात. तर त्यातले चांगले सिनेमे निवडून का दाखवत नाहीत? 'तमस' ही सुंदर मालिका होती. एखाद्या सिनेमासाठी जेवढी मेहनत घेतात, तेवढी त्या कार्यक्रमासाठी घेतली होती. ''कश्मकश'चं सुद्धा नाव चांगला कार्यक्रम म्हणून घ्यायला पाहिजे. 'नुक्कड' सारख्या कार्यक्रमातून जेव्हा नवे कलाकार येतात, ज्यांच्यावर कुणाची छाप नसते ते जास्त परिणामकारक वाटतात. त्यामुळे 'इंतजार' बद्दल ते कुतुहल वाटत नाही.

'रामायण' अतिशय interesting वाटतं. या निमित्तानं आपल्या संस्कृतीतल्या गोष्टी नव्यानं कळतात.

'होनी - अनहोनी'सारखे कार्यक्रम अजिबात दाखवू नयेत. लोक शेवटचा प्रश्न समजून घेत नाहीत. त्यांच्या आधी दाखवलेला अंधविश्वास रहातो. उपदेशात्मक कार्यक्रम दाखवू नयेत, पण मनोरंजनाच्या माध्यमातून चांगले विचार सुचवायला पाहिजेत.

टीव्ही हे एक अतिशय प्रभावी माध्यम आहे याचा विचार करुनच कार्यक्रमांचं धोरण ठरवलं पाहिजे. ●



# मुकुंदराव किर्लोस्कर

(ज्येष्ठ पत्रकार, विचारवंत)

**'रामायण' बघणाऱ्यांवर माझा रोष नाही. तयार करणाऱ्यांवर आहे.**

मी टीव्ही फार थोड्यावेळ बघतो. बातम्या सोडल्या तर मी फार थोडे कार्यक्रम बघतो. साधारणपणे सामाजिक–राजकीय कार्यक्रम बघतो. करमणूकप्रधान कार्यक्रम बघण्याकडे माझा कल नाही. इतरवेळी करमणुकीसाठी मी कार्यक्रम बघत नाही. बुनियाद, हमलोग हे लोकप्रिय कार्यक्रम मी पाहिलेले नाहीत. रामायणसुध्दा मी एकदाच बघितलं. लोकं येवढं काय बघतात याचं मला कुतूहल होतं म्हणून. पण 'रामायण' सुरु झाल्यावर दहा मिनिटं सुध्दा त्याच्यापुढे बसणं म्हणजे स्वत:वर अन्याय करुन घेणं आहे असं वाटलं. माझा 'रामायण' बघणाऱ्यांवर रोष नाही. तयार करणाऱ्यांवर आहे. टीव्ही न बघण्याला रोजचं धावपळीचं जीवन हे एक कारण आहे.

टीव्हीचे मला काही फायदे दिसतात. हिंदुस्थान हा खंडप्राय देश. लोकांपर्यंत पोचणं हाच प्रश्न आहे. इंग्लंड अमेरिकेत १००/२०० मैलांच्या अंतरात देशाची सरहद्द बघता येते. भारताचं तसं नाही. लोकांपर्यंत पोचण्यासाठी टीव्ही आवश्यक साधन आहे.

आपल्या देशातला मोठा प्रश्न प्रादेशिक विभाग एकत्र रहाण्याचा. एकात्मतेची भावना निर्माण करण्याचा. सगळा देश एकत्र बांधण्याची क्षमता टीव्हीत आहे. ते त्याचा वापर करतात की नाही माहित नाही. आपल्या देशात भिन्न भिन्न सामाजिक स्तरांवर जगणारी माणसं आहेत. भाषा– संस्कृती आर्थिक स्तर भिन्न आहेत. या भिन्न स्तरांवरच्या लोकांना जेव्हा एकच करमणुकीचं माध्यम गुंतवून ठेवतं तेव्हा एक वेगळ्या प्रकारचा समाजवाद ते आणतं. या निमित्ताने दोन स्तरांवरच्या लोकांमधे संभाषणाचा मार्ग खुला राहतो. सुरुवातीला संभाषणाच्या पातळीवर हा संवाद असला तरी त्यामुळे सामाजिक चलनवलन शक्य होतं. वेगवेगळ्या गटातला कप्पेबंदपणा कमी झाला.

समाजातला फार मोठा वर्ग वृध्दांचा आहे. टीव्हीन वृध्दांना मोठा दिलासा दिला आहे. आज विभक्त कुटुंबांची रचना रूढ होत आहे. फ्लॅट संस्कृती कायम टिकणार आहे. शहराचा पॅटर्न असा की वृध्दांना फिरायला जाणं शक्य नाही. या परिस्थितीत टीव्ही नसतां तर वृध्दांचं जीवन असह्य झालं असतं.

टीव्हीसारखं माध्यम जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोचू शकतं, हे मान्य केल्यावर त्याची सर्व क्षमता वापरली जायला पाहिजे. पण सर्व कार्यक्रम सर्वांपर्यंत पोचण्यासाठी मध्यम दर्जाचे कार्यक्रम तयार होत रहातात. आणि सर्व कार्यक्रमांचा तो स्थायीभाव होऊन बसतं. बघणाऱ्यांची संख्या वाढते आणि तीच गुणवत्तेची मर्यादा बनते. त्यामुळे एक दुय्यमपणा तयार होतो.

सरकारनं हे माध्यम हाताशी ठेवलं, त्यात जाहिरातदारांचा प्रभाव मर्यादित असता तर सरकारच्या कृतीचं समर्थन झालं असतं. कार्यक्रमांचा गुणात्मक दर्जा वाढवणं हा सद्हेतू असता तर या माध्यमावरची सरकारची मालकी समर्थनीय ठरली असती. पण आज सरकारलाच जाहिरातींद्वारे मिळणाऱ्या पैशाचा मोह सोडवत नाही. जाहिरातींच्या अगडबंब प्रभावामुळे वेगळ्या प्रकारचा भोगवाद (consumerism) वाढत चालला आहे. टीव्हीचा प्रेक्षक निरक्षरापासून–सुशिक्षितांपर्यंत, कफल्लकापासून–श्रीमंतापर्यंत. जाहिराती मात्र अशा की ज्या वस्तू फक्त .०१% लोक घेऊ शकतात. त्यामुळे या वस्तू न घेणाऱ्यांमधे एक खंत तयार होत राहील.

टीव्हीने दिलेली आणखी एक गोष्ट म्हणजे समाजातलं असंख्य प्रकारचं untapped potential बाहेर आणण्याचं काम. सामान्यातला सामान्य माणूस टीव्हीवर येऊ शकतो. सामान्यातल असामान्यत्व टीव्हीनं पुढे आणलं. कोणतीही लोकविलक्षण कला असलेला माणूस टीव्हीवर येतो हा एक लोकशाहीच्यादृष्टीने पॉझिटिव्ह फोर्स आहे. चुकीच्या माणसांना अपरिपक्व अवस्थेत मिळणारी प्रसिध्दी मात्र या फोर्सची गुणात्मक वाढ होऊ देत नाही.

भारतात साक्षरता कमी, त्यामुळे छापील गोष्टींना महत्व कमी. वृत्तपत्रं, पुस्तकं या माध्यमांचा विकास असाक्षरतेमुळं झाला नाही. संगीत - नाटक - चित्रपट यांचा विकास त्यातलं आधुनिक तंत्र नसल्यामुळे नाही. त्यामुळे एका विचित्र अवस्थेत टीव्हीचं स्वरुप आहे. संगीत, नृत्य, नाट्य वगैरे माध्यम पूर्ण वाढलेली नाहीत त्याआधीच टीव्ही आला आहे. त्यामुळे इतर कलामाध्यमांची वाढ खुंटली. इतर माध्यमांचा प्रेक्षकवर्ग पक्का होण्याआधीच टीव्ही आला आहे.

टीव्ही नकळत जीवनाचा पॅटर्न बदलू बघतोय. क्रिकेटच्या वेडापायी लक्षावधी लोक टीव्हीसमोर बसतात. दिनक्रम बदलतात. त्याचा परिणाम कौटुंबिक - सामाजिक जबाबदारी टाळण्याकडे होतो. टीव्ही लोकांची मूल्यं बदलवू शकेल इतकं सामर्थ्य त्यात आहे.

टीव्हीचं आदर्शरुप कसं असावं याबद्दल दोन - तीन विचारसरणी असतील. अमेरिकेसारखं ते खुलं आणि खाजगी मालकीचं असू नये पण सरकार किंवा राजकीय पक्ष कमीतकमी ढवळाढवळ करेल असं बघावं. राजकीय सत्ता बळकट करण्यासाठी त्याचा वापर करण्याचा ज्याला मोह होणार नाही अशी माणसं टीव्हीत हवीत.

आज सत्ताधारी टीव्हीचा वापर स्वत:साठी करत आहेत. सरकारी लोकांनी स्वत:वर संयम आणि बंधनं घालून घेतली असती तर सरकारच्या सत्तेला विरोध राहिला नसता. पण ज्या उघड निर्लज्जपणानं स्वत:च्या प्रचारासाठी आजचे सत्ताधारी त्याचा वापर करताहेत ते पाहिलं की या देशातली घराणेशाही कायम ठेवण्यासाठी, लोकांची स्वतंत्र विचारशक्ती अधिकाअधिक दुबळी करण्यासाठी, विरोधकांचा आवाज दडपून टाकण्यासाठी, आपणच एकटे देशाचे तारणकर्ते आहोत असा खोटा भास कोट्यावधी जनतेच्या मनात निर्माण करण्यासाठी या माध्यमाचा वापर होण्याची मला साधार भीती वाटते. तसं झालं तर टीव्हीचं आगमन हा शापच ठरेल. ●



## मंजू पराडकर

(चित्रकार)

**जाहिरातींकडे फार गंभीरपणे बघायला नको. चांगली पुस्तकं वाचून बदल होत नाहीत तर जाहिराती बघून काय होणार ?**

करमणूक म्हणून मला टीव्ही आवडतो. बाहेर जाऊन एखादं नाटक, एखादा सिनेमा बघणं पुरत नाही. खूप वाचन, खूप मासिकं दिवसेंदिवस कमी कमी घेतली जाताहेत त्यामुळे मनोरंजनाची उणीव जाणवते. टीव्हीनं ही उणीव भरुन काढली. करमणूक हे टीव्हीचं मुख्य काम असलं पाहिजे. समाजिक प्रबोधन हा दुसरा भाग. या दृष्टीनं इंतजार, कश्मकश सारख्या मालिकांतून खरोखर समाजाला जे हवं आहे ते दिलं जातं. राष्ट्रीय एकात्मता हा 'मेसेज' वेगवेगळ्या लोकांना एकत्र आणून देता येतो जे प्रचारकी गोष्टींनी होत नाही. 'स्वामी' सारख्या ऐतिहासिक मालिका जास्त यायला हव्यात. बहादूरशहा जफर, शिवाजी सारख्या ऐतिहासिक आदर्शांपासून खूप गोष्टी शिकता येतात. 'रामायण' लोक वेडं होऊन बघतात. जसं रामायण- महाभारतातल्या गोष्टी ऐकून शिवाजी तयार होतो तसंच ते आहे. 'जाणता राजा' आजही गर्दी खेचू शकतं. आदर्श मूल्यं असावीत असं वाटतं पण ती कशी बिंबवायची ते कळत नाही.

टीव्हीतून सर्वसाधारणपणे आपल्या संस्कृतीचं प्रतिबिंब दिसतं असं वाटतं. पण नवीन पिढी जर चांगली तयार करायची असेल तर हिंसाचार, मृत्यू, बलात्कार, स्त्रीचं विकृत रुप दाखवू नये. प्रत्येक सत्य हे दाखवलंच पाहिजे' असं वाटत नाही. हिंदी सिनेमातली गाणी छायागीतात आवडत नाहीत. पण एकदा हे मास मिडियम आहे हे मान्य केल्यावर प्रत्येक वर्गाची अभिरुची त्यात येणार हे गृहित धरलं पाहिजे. दादा कोंडके आवडणारा खूप मोठा वर्ग आहेच.


जाहिरातींतून भोगवादाचं, कॉलेजमधल्या वातावरणाचं विकृत, विक्षिप्त चित्रण केलं जातं. लिम्का, थम्सअपच्या जाहिरातीत दाखवली जाणारी माणसं आपल्या वर्गाची नाहीत. पण जाहिरातींच्या प्रदर्शनाकडे फार गंभीरपणे बघायला नको. चांगली पुस्तकं वाचून बदल होत नाहीत, तर जाहिराती बघून काय बदल होणार ?

टीव्ही कार्यक्रमातून दिसणारी बाईची प्रतिमा फारशी चुकीची आहे असं नाही वाटत. लहान मुलांसाठी मात्र चांगले कार्यक्रम टीव्हीवर नसतात. लहानांचे कार्यक्रम खरे मोठ्यांचेच असतात. मुलांची कला, निर्मितीक्षमता वाढवणाऱ्या गोष्टी व्यक्तिमत्त्व विकासाची शिबिरं, उन्हाळी शिबिरं- कितीतरी गोष्टी करता येण्यासारख्या आहेत.

टीव्हीवरुन हिंसाचार मात्र नक्की हटवला पाहिजे. 'शोले' बघून संजीवकुमार तयार होत नाही, गब्बर तयार होतो हे आजचं वास्तव आहे.

## अनिल भागवत

(वास्तुशास्त्रज्ञ, लेखक) .



**सर्वसाधारण मराठी कार्यक्रम हिंदीच्या तुलनेत बेकार असतात.**

१९६८ सालापासून म्हणजे टीव्ही भारतात येण्यापूर्वीपासून पहातोय. पहिल्यांदा टीव्ही बघितला इंग्लंडमधे. '६८ मधे इंग्लंडमधला टीव्ही पंधरा वर्ष जुना होता. आज टीव्हीचं ग्लॅमर जसं आपल्याकडे आहे तसं तेव्हा तिकडे होतं. तिकडचे म्हातारे लोक उठल्यापासून दिवसभर फक्त टीव्ही बघताना दिसायचे. असे दिवसच्या दिवस त्यांचे जाताना बघितलं. ७२ अखेर परत आलो तेव्हा इथला टीव्ही बघितला. टीव्हीचं ॲडिक्शन लक्षात आलं. तेव्हा टीव्ही घ्यायचा नाही असं ठरवलं. वडिलांना टीव्ही फार आवडतो. त्यांनी पुढे कलर टीव्ही घेतला आणि जुना माझ्याकडे आणून टाकला. कितीतरी महिने तो आम्ही सुरुच केला नव्हता. मुलं क्वचित रविवारी, आजारी पडल्यावर टीव्ही बघतात. शेजारच्या वाड्यात एकच टीव्ही होता. वाड्यातली सगळी तरुण- मुलं-मुली दाटीवाटीनं एका खोलीत बसायची. ते थांबवण्यासाठी कितीतरी जणांनी टीव्ही घेतला.

आपल्या टीव्हीबद्दल मला असं वाटतं की सगळा भर करमणुकीवर असतो. टीव्हीची माफक किंमत आणि सहजी वापर हे लक्षात घेतलं तर ॲडिक्ट का तयार होतात ते लक्षात येईल. महत्त्वाकांक्षा असणारे, व्यावसायिक धडपड करणारे लोक टीव्ही विशेष बघताना दिसत नाहीत. पण यांचं प्रमाण ५% असेल. बाकीच्या ९५% लोकांना या करमणुकीची चटक लागते. टीव्हीच्या कार्यक्रमानुसार मग बाकीचे कार्यक्रम व्हायला लागतात. कौटुंबिक, ऑफिसची अशी कितीतरी कामं गाळली जातात.

टीव्ही आपल्याकडे सुरु होऊन सोळा वर्ष म्हणजे खूप वर्ष झाली. एव्हाना लोकांना टीव्ही बघण्याची सवय झालीय. आता टीव्हीचं धोरण काय असावं. याचा विचार करण्याची वेळ आली आहे. देशासमोरचे काही गंभीर प्रश्न सोडवण्यासाठी टीव्हीची खूप मदत होऊ शकेल. आपल्याकडे साक्षरतेचं प्रमाण कमी त्यामुळे वर्तमानपत्रं फार थोडे लोक वाचतात. ज्यांना प्रश्न सोडवण्याची इच्छा आहे त्यांना अडचण असते माहिती मिळवण्याची.

एखादा नवीन प्रयोग करायचा तर लोकशाही दृष्टीकोनातून त्याविषयी लोकमत हवं असतं. प्रयोग करणं, लोकमत कळणं, त्यात सुधारणा करणं, मार्ग पक्का करणं, मग राजकीय, कायदेशीर तरतुदी वगैरे होऊन अंमलबजावणी होणं यात प्रचंड वेळ जातो.

टीव्ही हे माध्यम या प्रश्नांना उत्तर म्हणून वापरलं जायला पाहिजे. टीव्हीला त्यासाठी कॉम्प्युटरची जोड हवी. तसं झालं, तर 'निवडणूका आणि निकाल' तासाभरात कळू शकेल. निरनिराळ्या ठिकाणी असणाऱ्या वक्त्यांचे परिसंवाद घेता येतील. शिरगणतीचा प्रश्न सुटेल. वधु - वर संशोधनासारखा महत्वाचा प्रश्न उत्तम तऱ्हेने हाताळता येईल. क्लोज सर्किट टीव्ही वापरायची वेळ एव्हाना होऊन गेलेली आहे. जो व्यवसाय अनेक ठिकाणी विभागलेला असतो, उदा. बांधकाम व्यवसाय. त्याला क्लोज सर्किट टीव्हीचा फार उपयोग आहे. आमचा बांधकाम व्यवसाय, भारतातला सर्वात मोठा काम पुरवणारा व्यवसाय आहे आणि सर्वात बेशिस्त, युनियन्सपासून दूर आणि सामान्य माणसाला छळणारा, कार्यक्रम आधी टेप केलेला पाहिजे. आयत्यावेळचे कार्यक्रम अजिबात नकोत. एखादा कार्यक्रम पुन्हा बघायचा असेल तर 'आपकी फर्माईश' ची सोय पाहिजे. कुठल्याही कार्यक्रमाची मागणीनुसार कॅसेट मिळाली पाहिजे. म्हणजे 'अमूक कार्यक्रम चुकला तर' ची भीती नको. राष्ट्रहिताच्या जाहिराती आणि व्यावसायिक जाहिराती यांचं प्रमाण ठरवून टाकलं पाहिजे.

टीव्हीचे कार्यक्रम मी फार क्वचित बघतो. वर्षातून एखाद दुसरा कार्यक्रम किंवा मालिका अशी असते की टीव्हीची appointment घेऊन कार्यक्रम बघावासा वाटतो. बुनियाद, रामायण निम्म्यापर्यंत गेल्यावर मग मी काय आहे एवढं ? म्हणून बघितलं. हल्ली तर फक्त सुनिल गावस्कर प्रेझेंटस् हा एकच कार्यक्रम मी डायरीत नोंद करुन बघतो.

मला वाटत नाही. टीव्ही सुरु करण्यातले मुळ हेतू चांगले होते, असले पाहिजेत असं वाटतं. राज्यकर्त्यांना अजून टीव्हीचा वापर कशासाठी केला पाहिजे हे नक्की ठरवता येत नाही. त्यामुळे ही गफलत झाली आहे. टीव्हीवरच्या जाहिरातींचं प्रमाण बघितलं तर हे लक्षात येईल. खरं तर कोणत्याही product ला खूप जाहिराती करायला लागत असतील तर त्या वस्तूत घोळ आहे. पण टीव्हीवर खूप जाहिरात केली जाते त्या वस्तू खपतात हा अनुभव आहे. देशभर पाण्याची पंचाईत असेल पण कोल्ड्रिंक्स पोचलीत.

टीव्हीचा परिणाम कुटुंबावर, कुटुंबातल्या नातेसंबंधावर होतो. यात शंकाच नाही, कारण आता तो फॅमिली मेंबर झालाय.

भाषेचा प्रश्न नसला तरी सर्वसाधारण मराठी कार्यक्रम हिंदीच्या तुलनेत बेकार असतात. हिंदीचा दर्जा त्यामानानं खूपच चांगला आहे. उदा. बुनियाद, तमस, नुक्कड, इंतजार मधून वेगळ्या संस्कृतींची ओळख होते. विरंगुळा म्हणून जर संगीत, वाचन, टीव्ही वगैरेंचा विचार केला, तर मला वाचन प्रिय आहे. तरीसुद्धा टीव्ही नको असं ●



## शांताबाई शेळके
**(कवयित्री)**

**'स्वामी' मधल्या ऐतिहासिक 'सती' घटनेकडे सरकारनं आजचे निकष लावणं मला बालीश आणि हास्यास्पद वाटतं.**

टीव्हीबद्दल मला आधी बालीश कुतूहल होतं. येवढ्याश्या पडद्यात चित्रं दिसतात कशी काय ? टीव्ही मी पहिल्यांदा दिल्लीला बघितला. कविसंमेलनाला गेले होते, तेव्हा टीव्ही बघितला आणि कुतूहल शमलं. मग मुंबईला टीव्ही आला. पहिल्यांदा दोन वर्ष टीव्हीसाठी बोलवलं नव्हतं. लोक म्हणायचे अजून तुम्हाला कसं बोलवलं नाही ? मला मात्र फार कुतूहल किंवा लालसा नव्हती. कारण रेडिओवर मी खूप कामं केली होती. आपण बोललेला, लिहिलेला शब्द लोक बोलतात, ऐकतात याचं कौतुक संपलं होतं. त्यामुळे एक माध्यम म्हणूनच त्याच्याकडे बघितलं. आमच्याकडे टीव्ही खूप वर्ष नव्हता. मी टीव्हीवर यायला लागले तरी टीव्ही माझ्याकडे नव्हता. मला परवडत नव्हता. बरं क्रिकेटचं आकर्षण मला नव्हतं पण रेडिओ, फोन या गोष्टी जशा त्याचं कौतुक शमल्यावर माझ्याकडे आल्या. तसंच टीव्हीचं झालं. वर्तमानपत्र वाचायचा मला भयंकर कंटाळा. मला बातम्यांसाठी टीव्हीचं आकर्षण होतं. अजूनही बातम्या मी न चुकता ऐकते.

मी परदेशात - अमेरिकेत टीव्ही पाहिला. दिवसभर टीव्ही चालतो. पण लोक दिवसभर बघत नाहीत. तिकडच्या व्यावसायिकतेमुळं अनेक चॅनेलस्. आपल्याकडे मात्र टीव्ही सरकारी. त्यामुळे बातम्यांमधे पक्षपात होतो असं म्हणतात. मला राजकारणातलं काही कळत नाही. पण राजीव गांधींचा चेहरा रोज दाखवतात. पण हे अपरिहार्य आहे. वाईट असलं तरी. ज्याच्या मालकीचं माध्यम आहे तो त्या माध्यमाचा उपयोग काही प्रमाणात आपल्या फायद्यासाठी करुन घेणार. पण आपल्या धोरणात एकसूत्रीपणा नाही. टीव्हीनं अंधश्रद्धा वाढवू नयेत, बुद्धीभेद करु नये असं मात्र वाटतं. 'स्वामी' मधल्या ऐतिहासिक 'सती' घटनेकडे सरकारनं आजचे निकष लावणं मला बालीश आणि हास्यास्पद वाटतं. ज्यामुळे एखाद्या गोष्टीची परिणामकारकता वाढते हे मला पटत नाही. वाचून होणारा परिणाम अनेक पटींनी वाढतो. 'स्वामी'तील सतीची घटना अनेकांनी वाचली. त्याच्या आवृत्यांवर आवृत्या निघाल्या आहेत. 'सती' दृश्य दाखवून लोक सती जातील असं नाही. जसं 'रामायण' बघून, दशरथाप्रमाणे कोणी तीन बायका करणार नाही. टीव्हीच्या धोरणात काय दाखवायचं काय दाखवू नये यात सुसंगती हवी.

टीव्हीचं धोरण 'बहुजनहिताय' असं हवं. 'ज्ञानदीप' हा कार्यक्रम मला फार आवडतो. तो सोफिस्टिकेटेड लोकांना आवडणार नाही. 'ज्ञानदीप'मधे तुम्ही काम करता का ? असं बोललं जातं. ज्ञानदीपमधे सोप्या पद्धतीनं लोकांसमोर कार्यक्रम येतात. शेतीविषयक कार्यक्रम आरोग्यसंपदा हे कार्यक्रम कॅपसूलसारखे असतात. थोड्या अवधीत खूप माहिती मिळते.

जाहिरात टीव्हीला आवश्यक असेल, मला त्यातलं अर्थकारण कळत नाही, पण जाहिरातींची विपुलता मला खटकते. पण जाहिरातीचं तंत्रच ते असतं की ज्याची तुम्हाला सुतराम आवश्यकता नसते, तेच तुमच्या मनावर बिंबवतात.

टीव्हीवरच्या साहित्य विषयक कार्यक्रमाबद्दल, मला वाटतं साधनांची कमतरता आहे. त्यामुळे

आडगावातले मोठे कलावत जे येऊ शकत नाहीत त्यांच्यावर कार्यक्रम होत नाहीत. प्रसिद्ध व्यक्तीच लोकासमोर येत रहातात. अनेक वर्ष, एखाद्या विषयासाठी तपश्चर्या करणारे वेगवेगळ्या क्षेत्रातले लोक पुढे यायला पाहिजेत. तसंच या माध्यमाची जाण असणारे लोक टीव्हीत पाहिजेत. ज्याची मुलाखात आहे त्यालाच बोलायला वाव कमी असतो एखाद्या विषयाची माहिती, ज्ञान, अभ्यास मुलाखत घेण्यासाठी किती आहे हे बघितल जायला पाहिजे टीव्हीन बोलवल, मग नाही कस म्हणायच अस वाटून माहिती नसलेल्या विषयात मुलाखती घेतल्या जातात

मला गमत वाटते की मी पहिल्यादा टीव्हीवर आले ती हिंदीतून कमलेश्वरानी मला बोलवल होत ते म्हणाले जस हिंदी येईल तस बोला मला दिसण्याबद्दल अजिबात कुतूहल किंवा कौतुक नव्हत, पद्मा सचदेव ही क्वचित तिथे होती ती फार सुदर आहे दिसायला ती फार नर्व्हस होती. मला म्हणाली, 'शाताजी, तुम यहा बैठो तो अच्छा होगा.' मी म्हटल, मी कुठेतरी बसले तरी सारखीच दिसणार. आणखी एक म्हणजे बायकानी मोत्याची माळ घालायची. मोत्याची माळ जर मी इतर वेळी कधी घालत नसले तर तेव्हाच का घालायची? तुमची जनमानसात जशी इमेज असते त्याप्रमाणेच तुम्ही टीव्हीवर जायला पाहिजे ते स्वाभाविक वाटत मला कधीकधी बरोबरच्या बायकाना सागावस वाटायच की तेवढी माळ काढलीत तर बर होईल, कितीतरी पुरुष नेहमी साधा बुशशर्ट घालणारे असतात पण टीव्हीवर यायच म्हटल की फुलाफुलाचा शर्ट घालून येतात तेच टीव्हीच्या मेकअपबद्दल, कितीतरी बायका आणि पुरुष पुन्हा पुन्हा जाऊन मेकअप करुन येतात. कितीतरी लोकाना आवाजाच नियत्रण करता येत नाही. मधे एका कुष्ठरोग्याची मुलाखत चालली होती तो मुलाखत घेणारा इतका ओरडून प्रश्न विचारत होता मी मनात म्हटल, तो काय बहिरा आहे का? पण हे आवाजाच नियत्रणसुद्धा खूप लोकाना कळत नाही बोलताना विनोदाचा फाजील उत्साह हा देखील खूप जणामधे असतो सगळेच काय पु ल. नसतात आणि विनोदी न बोलतासुद्धा चागली मुलाखत देता येते काहीजण श्रोत्याशी भयकर सलगी करतात. 'मग, काय मडळी, बघितलीत ना ही गमत?' अशा प्रकारच्या सलगीची काही आवश्यकता नसते मुलाखत घेताना समोरच्या व्यक्तीत सभ्य अतर असायला पाहिजे तसच आभार प्रदर्शन हा देखील दूरदर्शनवरचा चुकीचा प्रकार आहे टीव्हीच्या लोकानी अनेक वेळा बजाऊन देखील आभारप्रदर्शन टाळल जात नाही. ज्याना दूरदर्शनचा अजिबात अनुभव नाही अशी जयत नारळीकर, भीमसेन जोशी, मल्लिकार्जुन मन्सूर अशी कलाक्षेत्रातली प्रामाणिक माणस मात्र फास सहजपणे टीव्हीसमोर येतात हे बघण्यासारख आहे

टीव्हीवर मराठी बोलताना येणारे भारभार इग्रजी शब्द फार खटकतात गणपतीला व्ही आय पी. ऑनरेबल गेस्ट म्हणण्यात धड विनोदही साधत नाही मराठी 'भाषा' काही इतकी असमर्थ दुबळी नाही तात्रिक विषयात इग्रजी शब्द कदाचित अपरिहार्य असतील. काही लोक फार ग्राथिक बोलतात बोलण आणि व्याख्यान देण यात फरक आहे टीव्ही हे वाचायच माध्यम नाही समीक्षक, लेखक हे फारच ग्राथिक बोलतात टीव्हीच्या पाट्यावर चुकीच मराठी दाखवल जात. 'सपन्न' सारखा शब्द 'साजरा झाला' साठी वापरुन चमत्कारिक मराठी भाषा तयार होते मराठी भाषेवर दिवसेंदिवस हिंदीचा प्रभाव वाढतो आहे परिसवादात दुसऱ्यावर आक्रमण करायची वृत्ती बहुतेक लोकामध्ये असते आत्मप्रेमी माणस दुसऱ्याला बोलू न देता स्वतच सारख बोलत रहातात मुलाखतकारानी एखादा प्रश्न विचारुन त्याला चालना द्यायची असते हे आक्रमण टीव्हीवरुन संपवल पाहिजे

वृद्ध, इतर कामामुळे बाहेर पडू न शकणारे लोक याना मात्र टीव्हीचा नक्कीच फायदा होतो. माझ्यासारख्या बाईला सगीताचे कार्यक्रम बाहेर जाऊन ऐकता येत नाहीत, त्याना ही घरबसल्या करमणूक चागली आहे. बाहेरच्या राज्याचे टीव्हीवरुन दाखवले जाणारे कार्यक्रम न चुकवण्यासारखे असतात 'मालगुडी डेज' मला फार आवडली होती हिंदी कार्यक्रमाची निर्मितीमूल्य मराठीपेक्षा चागली असतात. जुने चित्रपट मधूनमधून दाखवतात, ते मला आवडतात. कधीकधी फार मोठ्या कलाकाराना बघण्याची, ऐकण्याची सधी मिळते, ज्याना आपण बाहेर जाऊन कधी बघू शकणार नाही.

*टीव्हीमुळे काही वेगळी सस्कृती निर्माण होईल,* जाहिरातींचा मध्यमवर्गीय माणसावर काही परिणाम येईल अस मला वाटत नाही. कारण या वर्गाचा माणूस शहाणा असतो. तो फक्त जाहिराती बघून काही ठरवत नाही.

टीव्हीमुळे वाचनाचा आनद कमी होईल अस मला वाटत नाही पण टीव्हीमुळे कल्पनाशक्तीमात्र मारली जाते कारण सगळच स्पष्ट करुन दाखवल जात.

बुनियाद, हमलोग चागल होत, 'रामायण' ठीक आहे फार नाही आवडल, रामायणान मला कधी हालवल नाही यात सजावट फार आहे. 'रामराज्या'तला राम किती साधा वाटतो. तरी 'रामायण' मी बघते काही लोक फार शिष्टपणे सागतात की - आम्ही रामायण बघत नाही. तस माझ नाही, पण टीव्हीला लोकाच माध्यम म्हणत आपण फार खाली येतो का? लोकाच्या अभिरुचीला आपण उगाचच कमी लेखतो का असं वाटत. ●


लहान बालकाना दात सुलभ येण्यास शक्तीवर्धक औषध
होमिओपॅथिक

**फेरो कॅलसिन**
**DENTITION TONIC**

**ओरिएन्ट होमिओपॅथिक फार्मसी**
पन्नालाल टेरेस, २८२, डॉ. भडकमकर मार्ग, मुबई - ४०० ००७
**सर्व प्रकारची होमिओपॅथिक औषधे व पुस्तके मिळतील.**
**फोन: ३९८१९६**

## भास्कर चंदावरकर :
(संगीतकार)



**'नुक्कड' ही सईद मिर्झाची विचित्र 'केस' आहे. त्या कार्यक्रमातून बाळबोध मार्क्सिझमचं स्किल दिसतं.**

मी टीव्ही साधारण सात - आठ वर्ष बघतोय, टीव्ही आपल्याकडे आल्यानंतर पहिली सात - आठ वर्ष मी टीव्ही विकतच घेतला नव्हता. त्याच्यासाठी वेळ देता येणार नाही असं वाटलं होतं कारण इतरच अनेक कामं होती. परवडेल किंवा नाही याचा अंदाज येत नव्हता. मग मुलासाठी म्हणून टीव्ही घेतला. पुढे नॅशनल नेटवर्क सुरु झालं आणि टीव्ही बघण्याचं प्रमाण वाढलं. टीव्हीवर चांगला कार्यक्रम आहे म्हणून मी माझं काम मागे ठेऊन टीव्ही बघत बसलोय असं कधी झालं नाही, कोणत्याही मालिकेचा कोणताही भाग चुकला म्हणून कधी वाईट वाटत नाही. माझ्या दृष्टीनं स्पोर्टस् हे सगळ्यात मोठं टीव्हीवरचं आकर्षण आहे. विंबल्डन फायनलच्या ७९ आणि ८० जून मधे झालेल्या मॅकेन्रो - बोर्ग लढती हा आत्तापर्यंतच्या कार्यक्रमातला सगळ्यात थ्रिलिंग अनुभव येतो. लक्षात राहिलेला टीव्हीवर बघितलेला कार्यक्रम म्हणजे वर्ल्ड कप फायनल. तसंच ऑलिंपिक जिम्नॅस्टिक्स आजपर्यंत कोणत्याच खेळाचं इतकं जवळून दर्शन झालं नव्हतं. विंबल्डन, ऑस्ट्रेलिया सारख्या वेगवेगळ्या देशांतून केलं जाणारं थेट प्रक्षेपण हे मोठं आकर्षण होतं, समकालिनत्व मला महत्वाचं वाटतं.

टीव्हीच्या कार्यक्रमांपैकी 'आमची माती आमची माणसं' 'कंट्री वाईड क्लासरुम' 'ज्ञानदीप' अशा कार्यक्रमांची परिणामकारकता मी मानतो. त्यातले काही कार्यक्रम उत्तम असतात, काही गचाळ असतात. माझे काही खेड्यातले मित्र आहेत. त्यांना शेतीवरचे कार्यक्रम फार परिणामकारक वाटतात. त्या दृष्टीनं मला हे कार्यक्रम महत्वाचे वाटतात. शहरी लोकांसाठी मग विनोदी कार्यक्रम, संगीत, गजरा, आरोही असे कार्यक्रम केले जातात. या कार्यक्रमांचा दर्जा अगदी निकृष्ट वाटतो. सुरुवातीला टीव्ही माध्यमावर हुकुमत नाही, माध्यम नवीन म्हणून दर्जा चांगला नसेल असं वाटत होतं आणि माध्यमाच्या कौतुकापोटी त्यावर प्रसिद्ध चेहरे दिसतात म्हणून कोणी दर्जाकडे लक्षच दिलं नव्हतं. पुढे मग टीव्हीनेच आपणहून इतर देशांमधले इतर भाषांमधले काही चांगले कार्यक्रम दाखवले. त्यामुळे आपल्या कार्यक्रमांचा भिकार दर्जा जास्त लक्षात आला, आपल्या कार्यक्रमांच्या वाईट दर्जाचं कारण म्हणजे आपल्या सांस्कृतिक अभिव्यक्तीतलं कोतेपण, दूरदर्शन हे स्वतंत्र माध्यम नाही, तर चित्रपट, नाटक, संगीत, चित्रकला ही कलाविष्काराची इतर माध्यमं लोकांपर्यंत पोचवण्याचं एक साधन असं झालं आहे. त्यामुळे मुळात वेगवेगळ्या माध्यमांतून कुणाला काही चांगलं मांडता येत नाही, त्यामुळे टीव्हीवरुन ते कमी दर्जाचं दिसतं.

टीव्ही हे सतत नवीन गोष्टी मागणारं माध्यम आहे. फार वेगानं टीव्हीचे कार्यक्रम लोकांसमोर येत रहातात. टीव्ही हे सिनेमाच्या जवळ जाणारं माध्यम असलं तरी सिनेमा माध्यमातले देशातले चांगले चांगले म्हणून जे कलाकार आहेत त्यांना काही फार चांगलं जमलंय असं नाही. मृणाल सेन, सत्यजित रे, रमेश सिप्पी, श्याम बेनेगल यांचे कार्यक्रम फार ग्रेट झाले असं नाही. त्यापेक्षा 'येस, मिनिस्टर' शेक्सपियरची नाटकं जास्त चांगली वाटली. मुळात टीव्हीसाठी काम करणारे/ लेखक- दिग्दर्शक आपल्यातलेच आहेत. ते फार inspired आहेत, सर्वोत्तम आहेत हे मानणंच चुकीचं. 'नेटवर्क कार्यक्रम' बाहेरच्या माणसांची असतात. पण तिथले आणि बाहेरचे दिग्दर्शक सारखेच रद्दी आहेत. 'दिंडी' तून तेंडुलकरांनी खूप बोअर मारलं. त्यांचा उद्देश गौरवास्पद होता पण कार्यक्रम मात्र अतिशय रटाळ होता.

टीव्ही माध्यम फार झपाट्यानं वाढत होतं तेव्हा टीव्हीतून समाजाचं प्रतिबिंब दिसावं, त्या दृष्टीनं कार्यक्रमांची निवड करावी असं धोरण ठरवलं होतं. हमलोग- बुनियाद सारखे कार्यक्रम जनतेशी संपर्क, म्हणून चांगले कार्यक्रम होते. 'बुनियाद'चा दर्जा खूप चांगला होता. 'नुक्कड' ही एक विचित्र केस आहे. सईद मिर्झा सारख्या ड्रॉइंगरुम मार्क्सिस्टनं जाहिरातबाजीमधलं तंत्र तिथे आणलं. त्या कार्यक्रमातून बाळबोध मार्क्सिझमचं स्किल दिसतं. संवाद, संदेश आणि अभिनय या कोणत्याच बाबतीत त्याची निर्मितीमूल्यं फार वेगळी नाहीत. काही वाईट अॅक्टर्सच्या मदतीनं महत्त्वाच्या वेळी हा कार्यक्रम दाखवला गेला. नुक्कडचं कल्चर ग्लॉसी नियतकालिकांसारखं होतं. गरिबी, राजकारण यांना फार चटपटीत उत्तरं त्यात दिली होती.

टीव्हीवरुन दाखवल्या जाणाऱ्या जाहिरातींतून भोगवादाकडे झुकणारी नवी संस्कृती तयार होत आहे. पण ते बंद होणं अशक्य. जाहिरातींचा परिणाम जनमानसावर किती होतो हे बघायचं असेल तर निरमा आणि पानपराग मसाल्याचा

**टीव्हीवरचे संगीताचे कार्यक्रम मला अजिबात आवडत नाही.. कोणताही कार्यक्रम पकड घेणारा नसतो. कोणताही ग्रेट कलाकार असला तरी त्याला मखरात बसवलं जातं. तंबोऱ्याच्या खुंटीपासून कॅमेरा माणसाच्या चेहऱ्यापर्यंत आणतात. अशा कार्यक्रमानं कलावंत, श्रोते यांचं नुकसान होतं.**



अनेक पटींनी वाढलेला खप बघावा. तसं जेवण झाल्यावर अगर वेळ आहे म्हणून पान मसाला खाणं हे इतकं गरजेचं आहे का ? पण तरीही मालाबद्दल तक्रारी येत असूनही लोक ते विकत घेत रहातात. तरीही माणसाची जीवनपध्दती बदलणारा हा मुख्य फोर्स नाही. जीवनपध्दती बदलणारे जे अनेक घटक आहेत त्यातलं टीव्ही हे एक साधन आहे. टीव्हीचं आजचं स्वरुप थांबवून सगळी जीवनपध्दती बदलू या असं म्हणता येणार नाही. एक विशिष्ट सामाजिक- राजकीय मॉडेल आपण निवडलं आहे. अमूक पध्दतीनं देश पुढे जावा असं राजकारण्यांना वाटतं. या आर्थिक रचनेत बदल झाला तरच हे चित्र बदलू शकेल. फक्त टीव्हीमुळे बदल होणार नाही. टीव्हीमधे बदल व्हावा असं जेव्हा वाटत असतं तेव्हा सगळ्या समाजातच बदल व्हायला पाहिजे असं वाटत असतं. सामाजिक बदल होणं मात्र अनेक गोष्टींवर अवलंबून आहे. सांस्कृतिक अभिव्यक्ती आणि समाजातली जीवनपद्धती यांचं एकमेकांशी नातं असतं आणि त्यातून समाज तयार होत असतो.

टीव्हीवरचे संगीताचे कार्यक्रम मला अजिबात आवडत नाहीत. शास्त्रीय संगीत ऐकणारा आणि त्यापासून आनंद घेणारा वर्ग आपल्या समाजात मर्यादित आहे. जेव्हा रेडिओ सुरु झाले तेव्हा संगीत या वर्गापर्यंत पोचायला मदत झाली. आज याच वर्गाकडे टीव्ही आहेत पण टीव्हीवरुन छायागीत, चित्रगीत, चित्रहार असे popular संगीत प्रकारच दाखवले जातात. शास्त्रीय संगीताचा राजाश्रय आधी गेला आणि आता शासकीय आश्रय गेला. शास्त्रीय संगीताला हा मोठा धोका आहे.

शास्त्रीय संगीतावरचा कोणताही कार्यक्रम पकड घेणारा नसतो. कोणताही ग्रेट कलाकार असला तरी त्याला मखरात बसवलं जातं आणि तंबोऱ्याच्या खुंटीपासून सुरवात करुन कॅमेरा माणसाच्या चेहऱ्यापर्यंत आणतात. असले कार्यक्रम दाखवून श्रोत्यांचं आणि कलाकाराचं नुकसान होतं. परदेशात संगीताचे कार्यक्रम फार सुंदर करतात. आपल्याकडे मात्र तंबोऱ्याची खुंटी काही सुटत नाही. ○


**६ वर्षाची**

# राष्ट्रीय बचत सर्टिफिकिटे

**६ वी व ७ वी मालिका**

- प्रतिवर्षी रु. ४०,००० पर्यंतची गुंतवणूक कलम ८०-सी अन्वये आयकर सवलतीस पात्र.
- कलम ८०-एल-अन्वये दरसाल रु. ७,००० पर्यंत व्याजावर आयकर भरावा लागत नाही.
- ६ व्या मालिकेतील सर्टिफिकिटांवर प्रतिवर्षी मिळणारे व्याज हे कलम ८०-एल आणि कलम ८०-सी या दोन्ही कलमानुसार आयकर सवलतीस पात्र.
- ६व्या मालिकेत दर सहा महिन्यानी ११% दराने चक्रवाढ पद्धतीने व्याजाची आकारणी करण्यात येते तर ७ व्या मालिकेत हे व्याज प्रत्यक्षात गुंतवणूकदाराला देण्यात येते.
- रु. ५ लक्ष मर्यादेपर्यंत संपत्तीकरात सूट.
- ६व्या मालिकेत रु. १०,००० गुंतविल्यास मुदतीअंती त्याचे १९,०१० रुपये मिळतात.
- ७व्या मालिकेत रु. १०,००० गुंतविल्यास दर सहा महिन्यानी रुपये ५५० इतके व्याज मिळते व मुदतीअंती मूळ रक्कम परत मिळते.

SMALL SAVINGS SERVE THE STATE & YOUR FAMILY

**अल्पबचत संचालनालय**
**महाराष्ट्र शासन**

DGIPR

# टीव्ही आणि व्हिडिओ - ज्ञानप्रसाराची द्रुत साधने

**प्रभाकर देवधर**

अध्यक्ष
भारतीय इलेक्ट्रानिक महामंडळ, नवी दिल्ली

दूरदर्शन आणि व्हीडिओ या दोन्ही अतिशय प्रभावी आणि आकर्षक अशा मनोरंजनाच्या साधनांचा भारतीय घरात झालेला प्रवेश विचारवंतांसाठी आणि देशाच्या भविष्याविषयी कदर बाळगणाऱ्या इतर नागरिकांसाठी थोडा काळजीचा विषय झाला आहे. जगातील साऱ्या प्रगत देशांत आणि विशेषतः अमेरिकेत अशाच काळजीपोटी, नव्या पिढीवर टीव्हीमुळे होणाऱ्या परिणामांचा सखोल अभ्यास चालू आहे. गेली २५ - ३० वर्षे रंगीत चित्रवाणीसंच या देशात विस्तृत प्रमाणात वापरले जात असल्याने त्याचे अनुभव आणि त्याबाबत ह्या देशांत झालेली शास्त्रीय चिकित्सा आपल्यालाही लाभदायक ठरेल.

जॉन गुडलँडनी ''ए प्लेस कॉल्ड स्कूल'' या आपल्या अप्रतीम पुस्तकात १९६० ते १९८० या वीस वर्षांच्या कालावधीत टेलिव्हिजनचा पगडा १३ ते १९ वर्षांच्या अमेरिकन तरुणांवर किती जबरदस्त बसला आहे ते उदाहरणासहित सिद्ध केले आहे. गेल्या वीस वर्षात तरुण मनांवर जास्तीत जास्त परिणाम करणाऱ्या १० गोष्टींत टेलिव्हिजनचा नंबर ८ वरुन ३ वर पोहोचला.

**दूरदर्शन आणि व्हिडिओ ही दोन्ही लोभस आणि शक्तिशाली माध्यमे दुधारी शस्त्रासारखी आहेत. अणुशक्ति प्रमाणेच ही अिलेक्ट्रॉनिक अुपकरणे सुद्धा आपल्या समाजाला अेकतर विध्वंसक आणि विघातक ठरतील किंवा विधायक आणि सकस समाजबांधणीची साधनेही ठरु शकतात. आम्ही ती कशी वापरतो यावरच अंतिम परिणाम अवलंबून रहाणार आहे.**

मारी विनने १९८३ मध्ये ''चिल्ड्रन विदाअुट चाइल्डहुड'' हा एक अभ्यासपूर्ण ग्रंथ प्रसिद्ध केला. त्यात अमेरिकन टीव्हीवरच्या कार्यक्रमावर कडाडून टीका केली आहे. प्रेक्षणीय आणि दैदीप्यमान स्वप्न दृश्ये निर्माण करण्यांत पारंगत मंडळींनी अगदी मामुली आणि विकारी विचारांना चकचकीत दृष्यांची आणि चमकदार शब्दांची झालर लावून अमेरिकन तरुण पिढीला अनावश्यक आणि फालतू गोष्टींची कशी चटक लावली याचे विस्ताराने विवरण केले आहे. हे पुस्तक वाचताना आमचे स्वतःचे दूरदर्शन आणि त्यावर दाखवले जाणारे समाजघातक कार्यक्रम वारंवार मनात येत होते आणि मन सुन्न होत होते.

सामान्यतः टेलिव्हिजनवर दाखवलेले प्रौढ स्त्रीपुरुष हे कामचुकार आणि बिनडोक दाखवलेले असतात; त्याशिवाय विनोद कसा निर्माण करणार ? लहान मुलांच्या तोंडी न पेलणारे वा न शोभणारे शहाणपण दाखवल्याखेरीज दिलखेचक कार्यक्रम कसा होणार ? मारी विनच्या पुस्तकांत रंगवलेल्या अमेरिकन मुलांना बालपण हे नाहीच. टीव्हीवरचे अचाट डायलॉग ऐकून अनेक शिशुमंडळी अकाली प्रौढ बोलू लागतात. भाषा

## अणुशक्ति प्रमाणेच ही अिलेक्ट्रॉनिक अुपकरणे सुध्दा आपल्या समाजाला एकतर विध्वंसक आणि विघातक ठरतील किंवा विधायक आणि सकस समाजबांधणीची साधनेही ठरू शकतात.

प्रौढ पण विचारशक्ती मात्र अपरिपक्व पुस्तक वाचताना भारतात येऊ घातलेल्या नवीन प्रश्नांची चाहूल वारवार लागत होती जणु काय आज *आमच्या पुढे उभ्या असलेल्या समस्या* कमी पडताहेत म्हणून दूरदर्शन नवीन निर्माण करीत आहे

आपण नेहमी ऐकत असाल की टीव्ही नाटकसिनेमा द्वारा हसत खेळत शिक्षण मिळते १९७३ साली अमेरिकन सरकारने नेमलेल्या एका राष्ट्रीय आयोगाने टेलिव्हिजन द्वारा मिळणाऱ्या शिक्षणावर सखोल अभ्यास करुन एक विस्तृत रिपोर्ट प्रसिद्ध केला त्यानी लिहिले आहे हे शिक्षण विद्यार्थ्यांना चिकित्सक ज्ञानसपादनापासून दूर करते. ज्यावेळी विद्यार्थी व्यापारी टेलिव्हिजनद्वारा नवीन गोष्टी मिळवू पहातो तेव्हा त्याला खर काय आणि कल्पित काय हे समजण कठिण ठरते

विद्यार्थ्यांच्या मनाला न पटणारे कुठलेही नवीन ज्ञान टीव्हीद्वारा देण्याचा प्रयत्न केला तर विद्यार्थी त्यावर विश्वास ठेवत नाही

आपल्या सामाजिक जीवनात टीव्ही येइस्तोवर प्रौढ तरुण आणि शिशू वयात मिळावयाचे ज्ञान अथवा माहिती अक्षरपारगततेवर अवलबून असे बाल साहित्य आणि प्रौढ साहित्य निरनिराळे असू शकत असे. टेलिव्हिजनमुळे लहानग्या बालकापासून अतीवृद्धापर्यंत साऱ्याना समानतेने माहिती मनोरजन वा ज्ञानार्जन होवू लागले. त्यामुळे विद्यार्थी- शिक्षक, पाल्य- शिक्षक, मुल आणि त्याची आई ह्याच्या सबधावरही विपरीत परिणाम होत आहेत. ''सेवेल''नी ''नेसेसरी लैसन्स'' ह्या पुस्तकात टेलिव्हिजनच्या या परिणामाच खूप विश्लेषण केल आहे लहान मुलाना टेलिव्हिजनद्वारा मोठ्या माणसाच्या जगात प्रवेश मिळाल्यामुळे एकेकाळी शिक्षक आणि वडीलधारी मडळींबाबत वाटणारा आदर, भिती त्याच्यावरच्या भाबडा विश्वास ह्या साऱ्याला तडा गेला. मोठ्या वयाच्या लोकानी साभाळलेली गुपिते त्याची दुख, प्रौढाच्या वागण्यातला परस्परविरोध पाहिल्यामुळे बालवयातच मनात अनेक विकृत कल्पना घर करतात, घडणाऱ्या गोष्टी दिसतात, शब्द कानात घुमतात पण बऱ्याच वेळा, *कारणमीमासा आणि जीवनाच्या प्रत्यक्ष* अनुभवाच्या अभावामुळे अनेक गैरसमजुती आणि अकाली विकृत प्रौढत्व लहानाच्या वाट्याला येत सामाजिक रुढी आणि अुपभोगात्मक सवयी या दोन्ही मूलभूत बाबतीत टीव्हीमुळे होणाऱ्या जबरदस्त परिणामाकडे हताशपणे बघत बसण्यापलिकडे आजचा सामान्य नागरिक काहीही करु शकत नाही हे सत्य आहे.


### अण्वस्त्रांप्रमाणेच

आमच्या तरुणपणी आमच्या वडिलानी ''शब्द हे शस्त्र आहे, जपून वापरा'' हे प्रसिद्ध वाक्य लिहीलेला फलक बैठकीच्या खोलीत लावला होता शब्दाना जर आम्ही शस्त्र मानत असलो तर शब्दाना आकर्षक आणि मोहक चलतचित्राची जोड देवून स्वप्न विक्रेत्यानी निर्माण केलेल्या दूरदर्शनवरच्या *कार्यक्रमाना अण्वस्त्राची* उपमा द्यावी लागेल. हे अण्वस्त्र आमच्या घराच्या बैठकीच्या खोलीत आणि शयनगृहात पोहोचलेल आहे परदेशात टीव्हीची ''इडियट बॉक्स'' म्हणून सभावना करतात .पण हा ''इडियट बॉक्स'' नसून साऱ्या कुटुबावर अत्यत दूरगामी परिणाम करणारी एक जबरदस्त शक्ती आहे हे आपण विसरता कामा नये. दूरदर्शन आणि व्हिडिओ ही साधने दुधारी शस्त्रासारखी आहेत अणुशक्ती प्रमाणेच ही इलेक्ट्रॉनिक उपकरणसुद्धा आपल्या समाजाला एकतर विध्वसक आणि विधायक ठरतील किवा विधायक आणि सकस समाजबाधणीची साधनेही ठरु शकतात आम्ही ती कशी वापरतो यावरच अतीम परिणाम अवलबून रहाणार आहे

या लेखाद्वारे ही दोन्ही घरगुती मनोरजनाची साधने, निष्क्रीय मनोरजनापलिकडे जाऊन, द्रुत ज्ञानप्रसारासाठी कशी वापरता येतील आणि अक्षराच्या कुलुपात बद केलेले ज्ञानभडार या इलेक्ट्रॉनिक किल्लीने खोलून देशातल्या असख्य खेड्यातील आणि लहानमोठ्या शहरातील *आमच्या निरक्षर देशबाधवापर्यंत* कसे पोहोचवता येईल ह्याचा सहजसाध्य आणि आर्थिक दृष्ट्या परवडेल असा मार्ग सुचवला आहे. ही निरक्षर माणसे अज्ञानी नसून कुठल्याही शिक्षितापेक्षा हुशारीत तिळभरही मागे नाहीत हे सर्वज्ञात आहे फक्त ज्या प्रकारे ज्ञानेश्वरानी जीवनधर्म अगम्य सस्कृत भाषेतून सोडवून सोप्या मराठीत, त्याच्या मातृभाषेत, सामान्यापर्यंत पोहोचवला, तशाच प्रकारे जीवनावश्यक माहिती, सामान्य ज्ञान, शास्त्रीय ज्ञान, हस्तकला, व्यवसायाबाबतच्या सल्लामसलती आणि शिक्षण इत्यादी अनेक जनहिताचे आणि जन जागृतीचे कार्य ह्या इलेक्ट्रॉनिक उपकरणाच्या आधारे आम्ही करु शकू, शिवाय प्रौढ शिक्षणाला हे एक नवीन प्रभावी अग कसे निर्माण करता येईल याचाही आराखडा आपल्यापुढे माडला आहे

आपल्या देशात ३० कोटी प्रौढ निरक्षर लोक आहेत ते निरक्षर असले तरी निर्बुद्ध मात्र निश्चितच नाहीत किंबहुना त्याच्या निरक्षरतेने त्याना शिक्षितापेक्षाही जास्त चलाख आणि चाणाक्ष बनवल आहे घरातल्या आणि धार्मिक सस्कारामुळे त्याना निरक्षर म्हटले तरी अशिक्षित म्हणता येणार नाही यात ३० कोटीपैकी बहुसख्य महिला आहेत आणि जवळजवळ सगळेच गरिबीत दिवस काढत आहेत अहमदाबादजवळ केलेल्या ''साईट'' ह्या प्रायोगिक सॅटलाइट टीव्ही कार्यक्रमातून एक गोष्ट सिद्ध झाली की गरीब लोक केवळ आर्थिकदृष्ट्याच गरीब नाहीत तर त्याची मुख्य कमतरता ज्ञानभाडवलाची आहे, त्याना माहिती हवी आहे कसलीही माहिती किवा ज्ञान मिळवण्याचा सामान्य आणि सध्यातरी उत्तम मार्ग म्हणजे लिहायला आणि वाचायला शिकणे अर्थात् जनगणनेच्या वेळी साक्षरतेचा शिक्का

मिळवण्यासाठी जरुर असलेले लेखनवाचन, खऱ्या अर्थाने ज्ञान मिळवण्यासाठी अगदीच अपुरे आणि तुटपुंजे ठरेल. बँकेची कामे करणे किंवा वृत्तपत्र वाचण्याइतके साक्षर बनण्यासाठी दररोज १ - २ तासाच्या हिशेबानी शिकायला किती वर्ष लागतील ? हे किती कठीण काम आहे हे पटवणं सोपं आहे. हा लेख वाचणाऱ्या कोणालाही जर दोन वर्षात तेलगु किंवा तामिल भाषा लिहायला वाचायला शिकायला सांगितली तर ते किती लोकांना जमेल याचा विचार केला की झालं.



## इलेक्ट्रॉनिक किल्ली

पण ज्ञान मिळवण्याचा, माहिती जमा करण्याचा दुसरा मार्ग दूरदर्शन आणि व्हिडिओद्वारा आता आपल्याला खुला झालाय. जणूकाय ज्ञानभांडारची ही एक नवीनच ''इलेक्ट्रॉनिक किल्ली'' आपल्याला गवसली आहे. परवाचीच गोष्ट. अुपग्रहामार्फत प्रसारित होणारा टीव्हीवरचा कार्यक्रम मी पाहत होतो. अेक निष्णात सारंगी वादक आपली कला सादर करीत होता. कार्यक्रमाचे सूत्रचालन करणारा अुस्तादाला मधून मधून प्रश्न विचारुन सारंगी या वाद्याबद्दल माहिती विचारत होता. सारंगीच्या जन्मकथेपासून, तांत्रिक बाबींपर्यन्त अनेक गोष्टी त्या कार्यक्रमातून कळल्या. मला सांगा अशा प्रकारचे सकस मनोरंजन आणि माहिती भारतासारख्या अवाढव्य देशाच्या कानाकोपऱ्यात पसरलेल्या आणि संख्येने कित्येक कोटींच्या घरात असलेल्या साक्षर, निम - साक्षर आणि निरक्षर अशा सर्वानाच समजू शकेल अशा पद्धतीने त्यांच्यापर्यन्त अितक्या जलद गतीने पोहोचविणे दुसऱ्या कोणत्या माध्यमाद्वारे शक्य होईल ? या दृष्टीने विचार केल्यास ही दोन माध्यमे म्हणजे भारतासारख्या अविकसित देशाला मिळालेली फार मोठी देणगी आहे असेच म्हणावे लागेल.

टेलिव्हिजनचा सध्या आपल्याकडे एकच चॅनल आहे. काही दिवसांत दुसरा चॅनलसुद्धा महाराष्ट्रभर मिळू लागेल. दोन्ही मिळून आठवड्यात ६५ ते ७० तास मिळतात. मनोरंजन आणि बातम्या ह्या दोन्ही अतिमहत्वाच्या कार्यक्रमांना सुद्धा हा वेळ जेमतेम पुरा पडतो. मातृभाषेतल्या कार्यक्रमांनाही पुरेसा वेळ मिळत नाही. त्याचबरोबर दूरदर्शनची वेळही शिक्षणप्रसाराला विशेष योग्य नाही. क्रमिक शिक्षण, धंदेशिक्षण, व्यवसायचर्चा असलेल्या कार्यक्रमात ज्यांना रस आहे किंवा ज्या विशिष्ट वर्गाला त्याची जरुर आहे असा वर्ग टक्केवारीचा विचार करता फारच लहान असल्यामुळे दूरदर्शन हे माध्यम असल्या कार्यक्रमांना योग्य नाही. शिवाय चित्रवाणीच्या साह्याने शिक्षण घेतांना शिकू इच्छिणाऱ्या प्रेक्षकांची सवड आणि दाखवलेला भाग पुनः पुन्हा बघण्याची सुविधा या दोन गोष्टींची जरुरही महत्वाची. त्यामुळे माझ्या स्वतःच्या कल्पनेप्रमाणे शिक्षणासाठी दूरदर्शनपेक्षा ''सामुदायिक व्हिडिओ'' जास्त सोयीचा ठरेल.

## कम्युनिटी व्हीडिओ.

त्यामुळेच ''कम्युनिटी व्हिडिओ'' ची कल्पना मी सरकारला सुचवली. ह्या योजनेनुसार १२००० रुपयात सरकारची कुठलीही सवलत न घेता २० इंची रंगीत दूरचित्रवाणीसंच आणि व्हिडिओ कॅसेट प्लेअर ''कम्युनिटी व्हिडिओ सेन्टर'' किंवा ''सार्वजनिक व्हिडिओ'' केन्द्राला देता येईल. हा संच ५००० तास विनातक्रार काम देईल असं मानलं तर असा एक सेट वापरायला ताशी २ रुपये खर्च येईल. ५००० तासानंतर हा सेट जो गृहस्थ ह्या काळांत सेटच्या देखभालीची जबाबदारी घेईल त्याला ४००० रुपयास विकावा असं सुचवून मेन्टेनन्स साठी अतिशय जरुर असलेला मनाच्या तयारीचा आणि उत्साहाचा प्रश्न सोडवला जाईल. त्याचप्रमाणेच सार्वजनिक व्हिडिओ सभेसाठी लागणाऱ्या कॅसेटस् आणि व्हिडिओ प्लेयर हे नेहमीच्या कॅसेटस् पेक्षा आकाराने आणि तांत्रिक दृष्ट्या निराळया करुन ही सार्वजनिक व्हिडिओ उपकरण व्हिडिओ पार्लर्ससाठी उपयोगांत आणली जाणार नाहीत ही महत्वाची जरुर पूर्ण केली आहे.

व्हिडिओच्या बाबतीतली सगळयात मोठी अडचण म्हणजे चित्रमुद्रित कॅसेटस् पुरवण्याची. किंबहुना पहिला सार्वजनिक व्हिडिओ सेट देशांत कुठेही लावण्यापूर्वी मातृभाषेत निर्माण केलेल्या कमीत कमी हजार शैक्षणिक कॅसेटस् तयार लागतील असं समजून आम्ही अशा कॅसेट बनवण्याच्या मागे लागलो आहोत. आणखी ६ ते १२ महिन्यात पुरेशा कॅसेटस् आम्ही बनवू शकू. आजपर्यंत १०० च्या वर कॅसेटस् तयारही झाल्या आहेत. ४५ मिनिटांची चित्रमुद्रित कॅसेट आज सुद्धा आम्ही ७५ रुपयांत विकत आहोत.

### कार्यक्रम कुठल्या प्रकारचे ?

सर्वप्रथम सरकारनेच समाजातील आर्थिक आणि शैक्षणिक दृष्ट्या मागे पडलेल्या लो‌कांसाठी अनेक योजना केल्या आहेत. त्या‌ंची संपूर्ण माहिती मातृभाषेत निरक्षरांपर्यंत पोहोचव‌ण्याची जरूर आहे. या साऱ्या योजनांचा लाभ होण्यासाठी प्रत्यक्ष मार्ग पूर्णपणे समजावला पाहिजे. तसेच खेड्यांत आणि लहानमोठ्या शहरात ज्या अनेक सरकारी अधिकाऱ्यांशी आणि इतर सरकारी नोकरांशी या निरक्षर लोकांना संबंध ठेवावा लागतो अशा साऱ्यांच्या बाबतीत परस्पर जबाबदारी आणि

अधिकार ह्याची बिनचूक जाणीव व्हिडिओद्वारा ह्या मडळींना द्यायला हवी हे सरकारी अधिकारी आमचे मालक नसून समाजात शातता, समभाव आणि शिस्त राखण्यासाठी आहेत हे स्पष्ट केल पाहिजे.

आपल्या देशातील बहुसख्य कारागीर हे अर्धशिक्षित किवा पूर्ण निरक्षर आहेत. त्याचे स्वतऱ्च्या कामाच्या विषयीच ज्ञान तुटपुज आणि दुसऱ्या कोणाकडे शागिर्दी करून मिळवलेल आहे. फावडं कस वापराव, प्लास्टिक इमल्शन पेंट लावताना भिंत कशी तयार करावी, पायावर पादत्राण बसवून देताना कुठला आकार कसा महत्त्वाचा. स्क्रू विकत घेताना त्याच मोजमाप कस सागावं, लाकडाचे निरनिराळे प्रकार, त्याची प्रत कशी ओळखावी अशा अनेक गोष्टी अशिक्षिताना आणि निरक्षरानाच नव्हे तर आमच्या इजीनियर मडळींनाही द्यावयास पाहिजे. सुतार, गवडी, शिपी, चाभार, लोहार, प्लबर, इलेक्ट्रिशियन, ट्रॅक्टर मेकेनिक्स ह्या साऱ्या व्यावसायिकाना धदे शिक्षण दिल्याखेरीज देशातील दिवसेंदिवस खाली जाणारी कामाची पातळी सुधारणे शक्य नाही. व्हिडिओमुळे ह्या साऱ्या गोष्टी अतिशय सोप्या होणार आहेत. आमच्या समाजातले उत्कृष्ट कारागीर आणि शिक्षक आमच्या खेड्यातील देशबाधवापर्यंत आम्ही घेवून जावू शकू आणि लेखी शब्दाची मदत न घेता ज्ञानप्रसार साधू शकू. इलेक्ट्रॉनिक्स शास्त्रान आपल्याला दिलेले हे वरदानच नाही काय ?

सार्वजनिक व्हिडिओ सचाचा उपयोग शाळेच्या वेळात खेड्यातील वा लहानमोठ्या शहरातील शाळात शालेय शिक्षकाच्या मदतीसाठी वापरता येईल. इतिहास, भूगोल, समाजशास्त्र, जीवनाविषयी माहिती ह्या विषयात शिक्षक कितीतरी रसपूर्ण माहिती त्याच्या विद्यार्थांना देवू शकतील. शास्त्रीय विषयाचा प्रचार तर जणू व्हिडिओ माध्यमासाठीच थाबलाय अस मला वाटत. शिक्षक तयार करण्याच अत्यत महत्त्वाच पण अत्यत अवघड कामही व्हिडिओ माध्यम सहजसाध्य करेल.

## किफायतशीर

तीस कोटी निरक्षर प्रौढ जनतेचाच फक्त विचार केला तरीसुद्धा व्हिडिओ किती किफायती ठरेल हे समजाऊन घेण्यासारख आहे. समजा येत्या दोन वर्षात फक्त ३ कोटी किंवा १० टक्के लोकाना आम्ही साक्षर करु अस ठरवल तर ह्या ३ कोटी लोकाना दोन वर्ष रोज १ ते २ तास शिकवण्यासाठी देशभर पसरलेला १० लाख शिक्षकवर्ग लागेल त्या शिक्षकाना प्रौढाना शिकवण्याचे प्रशिक्षण द्यावयास पाहिजे प्रत्येक शिक्षक ३० प्रौढाची काळजी घेईल अस मानल तर ह्या १० लाख प्रौढ शिक्षण वर्गांना दोन वर्षात ४००० कोटी रुपये खर्च येईल. त्याशिवाय हा कार्यक्रम यशस्वी होण्यात अनेक अडचणी आहेतच.

१. आमच्या निरक्षर मडळींना पुस्तकी शिक्षणाच्या जरुरीचे महत्त्व पटवण अतिशय कठीण.

२. रोजच्या जीवनाच्या धकाधकीत सध्याकाळी किंवा रात्री रोजच्या रोज शाळेत जाऊन शिक्षण घेण गरीबीत पिचणाऱ्या प्रौढाला अशक्यप्राय

३ १० लाख शिक्षक किंवा स्वयसेवक मिळण मुष्कील

४. प्रौढ शिक्षणवर्गासाठी जागा मिळण अवघड.

५. सामाजिक कार्यात काडीचाही रस नसलेल्या सरकारी नोकरवर्गाद्वारा असा कार्यक्रम राबवण जवळजवळ हास्यास्पद

अशा सार्वजनिक व्हिडिओ केन्द्राना किती खर्च येईल ?

१,००,००० खेड्यात किवा लहान गावात प्रत्येकी २ सार्वजनिक व्हिडिओ सेट लावले तरी याच्यासाठी फक्त २४० कोटी खर्च येईल. ह्यासाठी दर २५ केन्द्रासाठी एक हजार कॅसेटस्ची लायब्ररी ठेवली तर एकदर ४० हजार लायब्ऱ्यासाठी प्रत्येकी ७५ हजार रुपये लागतील सर्व मिळून ३० कोटी रुपये

दर २५ केन्द्राना एक देशसेवक नेमला आणि त्याने लायब्ररीच्या कॅसेटस् पुरवणे, मोटर-स्कूटरवरून आठवड्यातून दोन तीनदा प्रत्येक केंद्राला भेट देवून उपकरणाची देखरेख आणि साभाळ करणे अशा जबाबदाऱ्या घेतल्या तर असे ४०,००० देशसेवक लागतील. त्याचा दरवर्षी २५००० रुपये खर्च आला तर दोन वर्षात एकदर २० कोटी रुपये खर्च येईल.

एक लाख म्हणजे १५ टक्के खेड्यात प्रत्येक दोन व्हिडिओ- रगीत दूरचित्रवाणी सच ठेवल्यानतर सुद्धा ३०० कोटी रुपयाच्या आत सारा कार्यक्रम साधता येईल.

प्रत्येक खेड्यात या योजनेचा उपयोग साधारणत ३०० निरक्षरानी केला तर ३ कोटी लोक त्याच्या स्वत मातृभाषेत प्रशिक्षित होतील. शिवाय धदेशिक्षणामुळे आणि सामान्य माहितीच्या प्रसारामुळे मिळणारे फायदें असख्य होतीलच

याच सार्वजनिक व्हिडिओचा उपयोग शाळेतही होत असल्यानें शिक्षकाना मदत, आधार मिळेल आणि त्यामुळे शिक्षणदर्जा झपाट्याने सुधारेल.

शैक्षणिक व्हिडिओचा उपयोग शहरातील सपन्न नागरिकानाही अतिशय मोलाचा ठरेल. डॉक्टरी सल्ला, गृहिणींना बालसगोपनात आणि कलासपादनात मदत, विद्यार्थ्यांना घरी शिकवण्या आणि उजळणी करण्याच्या सुविधा अशा अनेक गोष्टी शक्य आहेत त्याचप्रमाणे मैदानी आणि इतर खेळाविषयी माहिती आणि शिक्षण, प्रसिद्ध तत्रज्ञ, शास्त्रज्ञ, धर्मगुरू ह्याची व्याख्यानें, कलाशिक्षण असे अनेक विषय दूरदर्शन आणि व्हिडिओ द्वारा जनतेपुढे आणता येतील. खर पहाता ह्या कार्यक्रमाची अतिम सीमा आमच्या कुवतीवरच अवलबून राहील.

दूरदर्शनची कार्यक्रमबाधणी आपल्या समाजावर अत्यत दूरगामी परिणाम करणार आहे हे आपण विसरता कामा नये हा प्रश्न फक्त बदलत्या काळाचा किवा दोन पिढ्यातील अपेक्षित अतराचा नाही दशकादशकात पडणारा विचारातील फरक किंवा बदलणारी सामाजिक मूल्ये, समाज सामान्यत सहजतेने सामावून घेतो. कितीही प्रयत्न केला तरीही दूरदर्शन आणि व्हिडिओचे काही मूलगामी परिणाम आम्ही बदलू शकणारच नाही पण त्यातही सावधानपूर्वक केलेल्या कार्यक्रमबाधणीने अनेक दुष्परिणाम टाळता येतील हेही तितकेच खरे व्यापारी उद्देशाने, जाहिरातखोरीसाठी, लोकाच्या मनोरजनाच्या कल्पनेतच बदल घडवू पहाणाऱ्या हुशार पण समाजाच्या खऱ्या गरजेची तमा न बाळगणाऱ्या सौदागरांची बाजू घ्यायची की सरकारी यत्रणेत झिजून गेलेल्या, कुठल्याच प्रकारची उमेद हरवलेल्या, स्वतऱ्च्या कर्तृत्वावरचा विश्वास उडालेल्या दूरदर्शनच्या नोकरीसाठी 'काहीतरी' निर्मिती करणाऱ्याना दोष द्यायचा हा खरोखर मुद्दाच नाही देशात अनेक क्रियाशील विचारवत आहेत, शब्दप्रभू आहेत, देशबाधणीच्या प्रेरणेने निष्ठापूर्वक काम करू इच्छिणारे कसलेले नट आणि निपुण कारागीर आहेत. एकमेकाला दोष न देता आणि आजपर्यन्त झालेल्या चुका कोणी अन् का केल्या ह्याची वाझोटी चर्चा थाबवून, साऱ्या मडळींना कामाला जुपले तर दूरदर्शन आणि व्हिडिओ ही समाजविकृतीची साधने न बनता देश सुधारणेसाठी मिळालेले एक वरदान, एक जलदगती वाहन ठरेल O

# एलवंथ अवर

**फिरोझ रानडे**

अशीच दुपारची वेळ होती. ऑगस्ट महिन्याचा पहिला आठवडा होता. त्यामुळे ऑगस्ट महिन्यात पडते तशी मुंबईत हवा पडली होती. काहीतरी वाचता वाचता श्यामला झोप लागली होती तर झोप यावी म्हणून राधा काहीतरी वाचत पडली होती.

तेवढ्यात फोन खणाणला व तो जाग्या असलेल्या राधानं घेतला आणि ती आपल्या नवऱ्याला अगदी पद्मश्री मिळाल्याबद्दलचा फोन आला आहे ह्या तऱ्हेच्या आनंदात व त्या लगबगीनं श्यामला उठवती झाली. विष्णूसारखा शेषशायी पद्धतीनं झोपलेल्या श्यामला गदागदा हलवत ती म्हणाली,

'अहो, उठा. दूरदर्शनवरचा कोणा प्रोड्यूसरचा फोन आला आहे. उठा.'

''त्यांना रॉंग - नंबर म्हणून सांग.'' श्याम जागा झाला होता पण डोळेसुद्धा उघडण्याचे कष्ट न घेता तो म्हणाला.

''तो चक्क फलाणे साहेब आहेत का म्हणून विचारतोय तर त्याला रॉंग - नंबर म्हणून काय सांगू? चला, उठा.''

अगदी भगवान जरी भेटीला आले असते तरी राधानं श्यामला इतकं तातडीनं उठवलं नसतं. पण आज - काल जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी दिसणाऱ्या दूरदर्शनच्या प्रोड्यूसरचा फोन म्हणजे प्रत्यक्ष भगवानाच्या दर्शनापेक्षा वरचढ होतं. तेव्हा तिचं गदगदा पद्धतीनं हलवणं काही कमी झालं नव्हतं. तेव्हा श्यामला उठणं भागच पडलं. ''अगं, फलाणे म्हणजे आपसात पत्रापत्री करतात ना? त्या अलाण्या - फलाण्यानं पैकी एक असतील,'' कुरकुरत कुरकुरत बाहेरच्या खोलीत जात तो म्हणाला, ''माझी मात्र उगाच झोपमोड.''

''ते अलाणे अन् फलाणे एकमेकांना पत्र लिहिण्याशिवाय काही करतात का?'' राधा त्याच्या मागोमाग जात अगदी त्याला खेटून उभी राहिली. गेल्या कित्येक महिन्यात राधा त्याच्या इतकी जवळ येऊन उभी राहिली नव्हती. फोन कुणाचाही असो ''हेही नसे थोडके'' असं म्हणत श्यामने फोन घेतला.

''हॅलो, मी फलाणे बोलतोय.''

''नमस्कार, मी सुभाष भागवत दूरदर्शनचा प्रोड्यूसर बोलतोय.''

सुभाष भागवत नाव ऐकल्यावर टीव्हीच्या कार्यक्रमानंतर दिसणाऱ्या असंख्य पाट्या त्यांच्या डोळ्यासमोर आला. आठवड्यातल्या तीन - चार कार्यक्रमानंतर भागवतांचा बोर्ड दिसायचा. पण ह्या भागवतांचं आपल्याशी काय काम असेल बुवा? असा प्रश्न त्याला पडला.

''तुमच्याकडे एक काम आहे, फलाणे साहेब.''

''बोला!'' श्याम बुचकळ्यात पडलेला असूनसुद्धा मोठ्या आनंदात म्हणाला.

''दर पंधरा ऑगस्टला ''आम्ही असे लढलो'' असा एक कार्यक्रम देत असतो.'' भागवत.

''व्वा! मी बघितले आहेत ना? स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलाखती तुम्ही घेता, तोच ना?''

''तोच तो.'' भागवत मोठ्या आनंदानं म्हणाले, ''तुम्ही स्वातंत्र्य लढ्यात भाग घेतल्याचं तुमचे मित्र अशोक कानडे म्हणत होते. त्यावेळीं तुम्ही सहभागी व्हावं अशी माझी विनंती आहे.''

''काय मी?'' भारत - रत्न मिळाल्याचं जरी कुणी सांगितलं असतं तरी श्यामला जितकं आश्चर्य वाटलं नसतं तितकं भागवतांची ती विनंती ऐकून वाटलं.'' अहो, ते कानडे दुसऱ्या कुणा फलाण्यांबद्दल सांगत असतील.''

''नाही हो, तुमच्याबद्दलच. बेचाळीस साली तुम्ही नाशकात होतात ना?''

'हो, होतो.' श्याम मोठ्या गर्वानं म्हणाला. आता नाशकात असण्यात गर्व करण्यासारखं काय आहे? पण हल्ली बऱ्याच गोष्टी गर्वानं सांगण्याची पद्धत निघाली आहे, त्याला अनुसरून तो म्हणाला होता.

''मग झालं तर! आता असं करा ना, उद्याच या केन्द्रावर. थोडं बोलू आणि जमलं तर रेकॉर्डिंग पण करून टाकू.'' भागवंताच्या बोलण्यात अजिजी होती.

''मी, नाशिकचा आहे हे खरं असलं तरी मी त्यावेळी जेमतेम ११ - १२ वर्षांचा होतो...

''तेच तर हवंय आम्हांला.'' श्यामला आपलं वाक्य पुरं करु न देता भागवत म्हणाले, ''स्वातंत्र्य युद्धात भाग घेतलेल्या बहुतेक सगळ्या मोठ्या लोकांच्या मुलाखती घेऊन झाल्याहेत. पण माझी

अशी कल्पना आहे की त्यावेळी तुमच्यासारख्या लहान मुलांनी पण कसा भाग घेतला होता ते दाखवायचं म्हणून. इंदिराजींची कशी वानरसेना होती तशी आपली तुमची.''

इंदिराजींचं नाव घेतल्यावर श्यामला पुढं काही बोलता येईना. बाईंना जाऊन आता चार वर्ष होत आली होती तरी त्यांच्या नावाचा दरारा काही कमी झाला नव्हता. तरी पण शेवटचा प्रयत्न म्हणून तो म्हणाला, ''पण... माझं ऐका तर खरं...''

''साहेब, आता पण नाही अन् परंतु नाही. एवढा आपला प्रोग्राम होऊनच जाऊ दे.'' भागवतांच्या स्वरातली व्याकुळता पाहून श्यामला पुढे नाही म्हणवेना.

''बरं, येतो. किती वाजता येऊ ?'' श्यामनं विचारलं.

''थॅन्क्यू व्हेरी मच. काहीतरी अकरा - सव्वा वाजता या. मी गेटवर सांगून ठेवतो.'' भागवतांचा जीव भांड्यात पडल्याचा आवाज इतक्या दुरुनही स्पष्टपणे ऐकू आला.

फोन ठेवून श्याम मागे वळतो तर राधा अजूनी पूर्वीसारखीच जवळ उभी असल्याचं त्याला जाणवलं. या टीव्हीवरच्या कार्यक्रमावद्दल बोलण्यात आपण राधाचं जवळपण सुद्धा विसरुन गेलो की.

''काय म्हणतो तो प्रोड्यूसर ?'' खरं म्हणजे राधानं टेलिफोनवरचं बोलणं काळजीपूर्वक ऐकलं होतं व श्यामच्या प्रफुल्लित चेहऱ्यावरुन तिनं अंदाज पण केला होता. तरी पण श्यामकडून सगळं ऐकण्यात वेगळी मजा होती.

''आहेस कुठे ? टीव्हीवर मला मुलाखतीकरता बोलावलाय.'' श्याम शंभर टक्के आनंदात व उत्साहात म्हणाला, ''चहा पाज बरं फक्कडसा.''

'चहा करते हो, पण तो काय म्हणाला ते तर सांगा.' राधानं श्यामचा दंड हलवत विचारलं.

''चहा कर आधी. चांगली झोप मोडलीस माझी.'' भाव खाण्याच्या मूडमधे श्याम म्हणाला.

''चहा न् झोप काय नेहमीचीच आहे. पहिले तो प्रोड्यूसर...

''ते सांगतो ग... निदान पाणीतरी ठेवून ये.''

''तुम्ही तरी असले आहात की नाही...'' असं म्हणत राधा तणतणत पद्धतीनं आत गेली व चहाचं पाणी ठेवून त्याच पद्धतीनं परत आली. पाण्याच्या आधी राधाच्या रागाला उकळी फुटल्याचं बघून, श्यामनं सांगायला सुरुवात केली.

''अगं ते सुभाष भागवत म्हणून प्रोड्यूसर आहेत ना ? त्यांच्याकडे'' आम्ही असे लढलो' हा कार्यक्रम आहे. स्वातंत्र सैनिकांच्या मुलाखतींचा असतो बघ तो कार्यक्रम. त्यात मी भाग घ्यावा अशी त्यांची इच्छा आहे.''

हे ऐकताच पु.लं. चा एखादा विनोदी लेख वाचावा तशी राधा खदाखदा हसू लागली. यात इतकं हसण्यासारखं काय आहे हे श्यामला कळेना. ''त्यात हसायला काय झालं ?'' पडक्या चेहऱ्यानं श्यामनं विचारलं.

''थांबा, पाणी उकळलं असेल.'' असं म्हणत हसत हसत ती आत गेली व काही मिनिटातच चहा घेऊन हसत हसत परत आली. ती काही मिनिटं श्यामनं कशी काढली ते त्याचं त्यालाच माहीत.

''हं ? हसायला काय झालंय एवढं ?''

''हसू नको तर काय करु ?'' राधाला हसण्याचा परत एकदा पु.ल. उमाळा आला. तरी स्वतःला सावरत ती म्हणाली, ''अहो, डोक्यावरचे पांढरे केस सोडून दिले तर तुमच्यात आणि स्वातंत्र्यसैनिकांत काय साम्य आहे ? तुमचा अन् स्वातंत्र्य लढ्याचा संबध काय ?'' राधा परत हसू लागलेली पाहून मात्र श्याम चिडला.

'' शहाणीच आहेस. फक्त मोठ्या माणसांनीच लढ्यात भाग घेतला होता असं नाही. आम्ही लहान मुलांनी पण घेतला होता. इंदिराजींची कशी वानरसेना होती तशी आमच्या नाशिकच्या मुलांची पण होती.''

हे ऐकताच राधा हसायचं थांबून चुप झाली. आता ती तशी इंदिराजींचं नाव ऐकून झाली होती की श्याम माकडसेनेतलां एक असेल यावर तिचा विश्वास बसला म्हणूनही असेल. पण त्यामुळे श्यामला उत्साह आला. ''अग, आम्हा सात - आठ मुलांची एक टोळी होती. आम्ही प्रभात फेऱ्या काढायचो, मिरवणुकी काढायचो. शाळेच्या भिंतींवर 'क्विट इंडिया' लिहायचा आमचा विचार होता. पण काही जणु म्हणाले की Quit आहे तर काहीजण ते Quiet आहे असं म्हणू लागले. तेंव्हा आम्ही राष्ट्रभाषेत 'भारत छोडो' लिहून मोकळे झालो. अशी त्यावेळची मजा !''

पण राधाला त्यात मजा वाटते आहे असं तिच्या चेहऱ्यावरून दिसेना. ती काहीतरी गंभीरपणे विचार करत होती.

''ते मजेचं राहू दे. थोडक्यात म्हणजे तुम्हाला टीव्ही वर बोलावलं आहे हे खरं ना ? मग विषय काय कोणताही का असेना. उद्या सकाळी जायचं ना ?''

''हो. काहीतरी अकरा - सव्वा अकरा वाजता...

पण त्याचं बोलणं संपायच्या आधीच ती आत निघून गेली आणि श्याम आपल्याशीच विचार करण्यात गढून गेला. आत्ता पर्यंतच्या स्वातंत्र्य सैनिकांनी दिलेल्या मुलाखती तो आठवून पाहू लागला. इंदिराजींच्या वानरसेनेबद्दल कुठं व कधी छापून आलं असावं इथपासून तर उद्या कपडे कुठले घालावे इथपर्यंत त्याचे विचार चालू होते. राधा घराबाहेर पडल्याचं त्याला कळलं सुद्धा नाही.

आणि सूर्य बुडून काळोख पसरायच्या आत श्यामला टीव्हीवर मुलाखतीकरता बोलावलं आहे


MARSH ELECTRONICS

क्राऊन, टेलिव्हिस्टा, ऑप्टॉनिका,
मर्फी, ऑरसन, जेटकिंग
रंगीत व कृष्णधवल टीव्हींची मालिका
रोखीने व सुलभ हप्त्याने

''रेडिओ - हाऊस''

लकडीपूलाजवळ, लक्ष्मीरोड पुणे ३०.
फोन - ४३३७४९.

**जुने टीव्ही बदलून नवीन मिळतील.**

ही बातमी सूर्य प्रकाशासारखी साऱ्या सोसायटीत पसरली.

प्रथम आले ते अर्थातच त्यांच्या मजल्यावरचे स्वातंत्र सैनिक बर्वेगुरुजी. त्यांनी आपला राग जिंकायचा प्रयत्न केला होता पण तो यशस्वी झाला नव्हता हे त्यांच्या लाल - लाल झालेल्या चेहऱ्याकडे बघून स्पष्ट दिसत होतं.

बर्वेगुरुजी सरकारमान्य स्वातंत्र्य सैनिक होते. तशी त्यांना ताम्रपट्टीपण मिळाली होती. दोन - चार पंधरा - ऑगस्टना त्यांना टीव्हीवर बोलावलंपण होतं. पण श्यामला बोलावल्याचं कळल्यावर त्यांचा राग - राग झाला होता.

''त्या दूरदर्शनवाल्यांनी तुम्हांला पंधरा ऑगस्टच्या कार्यक्रमाला बोलावलं आहे म्हणे ?''

यावर काय उत्तर द्यावं ह्याचा विचार करत असतांनाच खालच्या मजल्यावरचा तरुण कामत घाईघाईनं आला व श्यामशी हात-मिळवणी करुन म्हणाला, ''काँग्रेज्युलेशन्स्, काका, अगदी मनापासून अभिनंदन.'' शामने त्याला दोन कारणाकरता थँक्स दिले. एक अभिनंदनाकरता व दुसरं आता तो बर्वेगुरुजींना परस्पर तोंड देईल म्हणून.

''पण शामराव तुमचा टीव्हीवर नंबर लागला तरी कसा ?'' गुरुजींच्या या प्रश्नाचा शामला फार राग आला. म्हणजे मी काही खटपटी लटपटी करुन हे आमंत्रण मिळवलं आहे असं म्हणायचं आहे की काय गुरुजींना ? शाम काही बोलणार त्या आधीच कामत म्हणाला,


''टीव्हीवर नंबर कसा लागतो, ते तुम्हाला माहित असायला हवं गुरुजी. तुमचा तीन-चार वेळा तरी लागलाय.''

''मला नंबर वगैरे लावायची गरज नाही.'' बर्वे उसळत्या रागानं म्हणाले, ''मला सरकारनं स्वातंत्र्य सैनिक म्हणून चांगला ताम्रपट दिलाय.''

''याचा अर्थ तुम्ही ताम्रपटाच्या वेळी नंबर लावला होतात असा होतो.'' कामत तेवढ्याच उसळतेपणानं म्हणाला, ''या राज्यात नंबर लावल्याशिवाय कुणाला काहीही मिळत नाही.''

हे जरी कामत गुरुजींना उद्देशून म्हणाला होता तरी त्याच्या बोलण्यातला शेवटचा भाग श्यामला लागण्यासारखा होता. त्यामुळे श्यामचा चेहरा पडला. ''सॉरी हं काका'' श्यामचा पडेल चेहरा पाहून कामत म्हणाला. ''पण मला तुम्हाला उद्देशून काही म्हणायचं नव्हतं. आता तुम्हाला आपणहून बोलावलं असेल टीव्हीवाल्यांनी.''

या वाक्यानं श्यामचा चेहरा उजळला.




तेव्हढ्यात 'स्वयंसेवक' कर्वे व त्यांची धर्मपत्नी प्रवेश करते झाले. धर्मपत्नींना पाहून श्यामचा चेहरा जास्तच उजळला.

''या, या, या.'' श्यामने त्यांचे उत्साहाने स्वागत केले.

''सगळा चोरांचा बाजार.'' कर्वे रागाने असं म्हणत पण अगदी शांतपणे सोफ्यावर बसत म्हणाले.

''राधा वहिनी आत आहेत ?'' कर्वेबाईनी विचारलं.

''ती शेजारी गेलीय. येईल इतक्यात, तुम्ही बसा ना.'' श्याम कर्वेबाईना म्हणाला.

''मी येईन नंतर'' म्हणत बाई वळल्या. ''शेजारी गेल्या म्हणजे आता दीडदोन तास कसल्या येताहेत'' असं त्यांच पुटपुटतं बोलणं सगळ्यांच्या कानावर पडलं.

कर्वेबाईच्या बोलण्यामुळे बुवांच्या बोलण्यात 'व्यत्यय' आला होता. त्यामुळे ते जास्तच त्रासून म्हणाले, ''सगळा चोरांचा बाजार आहे नुसता.''

आपल्याला टीव्हीवर बोल्यावल्याचे कळल्यामुळे कर्वे आपले अभिनंदन वगैरे करायला आले असतील असा श्यामचा अंदाज. पण इथं तर कर्व्यांनी चक्क चोरबाजारच उघडला होता.

''तुम्ही डायरेक्ट चोर बाजारातूनच येताय वाटतं ?'' हा तरुण कामत कुणालाही, काहीही विचारायला मागे पुढे पहात नसे.

''कामत... जरा...'' श्याम कामतला दटावत म्हणाला, ''कर्वे कसला चोर बाजार ?''

''चोर बाजार म्हणजे टीव्हीवरचे लोक हो' कर्वे चिडून बोलू लागले, ''शाळकरी पोर असाल तुम्ही बेचाळीस साली. तुम्ही काय लढले असणार ?''

''लहान होतो म्हणून काय झालं ?'' आता मात्र श्यामचा पारा वाढला. ''आम्ही प्रभात फेऱ्या मिरवणुकी काढल्या भिंती - भिंतीवर 'भारत छोडो' लिहिलं...''

''पण आमच्या सारखा सत्याग्रह करून तुरुंगात गेला होतात ?'' कर्वे गुरुजींनी विचारलं.

ह्यावर श्याम निरुत्तर झाला तरी कर्वे बोलते झाले. ''मग आम्ही पण सत्याग्रह केला त्याचं काय ?'' कर्वे विचारते झाले. संघबंदीच्या चळवळीत कर्वे खरंच तुरुंगात गेले होते. पण भारतात सगळ्या सत्याग्रहांना व तुरुंगवासांना प्रतिष्ठा मिळाली असली तरी संघाचा सत्याग्रह बेवारशी राहिला होता.

''तुमचा कसला आलाय सत्याग्रह अन् तुरुंगवास ?'' परत उतावळा कामत.

''या श्यामरावांच्या प्रभात फेऱ्यांपेक्षा तरी आमचा सत्याग्रह काहीतरी कामाचा होता की नाही ? आणि त्यांना मात्र टीव्हीवर निमंत्रण पण आम्हाला...''

पण त्यांचं बोलणं पुरं व्हायच्या आधी राधा आली. मुलीला चांगलं स्थळ मिळालं की आयांचा चेहरा कसा फुलून येतो तसा राधाचा चेहरा फुलून आला होता. साऱ्या पंचक्रोशीत श्यामसारखी टीव्हीकडून मागणी दुसऱ्या कुणालाही आली नव्हती.

''जरा शेजारी गेले होते, तर जो भेटेल तो विचारतोय तुमच्या मिस्टरांना टीव्हीवर बोलावलंय ना' म्हणून सांगता सांगता अगदी पुरे वाट झाली.''

श्याम आणि राधा सोडून हे टीव्हीचं प्रकरण दुसऱ्या कुणाही माहित नव्हतं. तेव्हा राधानं आपणहून सांगितल्याशिवाय लोकांना काहीही कळायचा व त्यांनी त्याबद्दल विचारायचा प्रश्नच नव्हता. तेव्हा राधा चक्क थापा मारत होती हे सगळ्यांच्या लक्षात आलं.

पण पूर्वी जसं प्रेमात व युध्दात काहीही केलं तरी चालायचं तसं आजकाल निवडून येण्याकरता व टीव्हीवर येण्याकरता काहीही केलं तरी चालतं. त्यामुळे तिथं जमलेल्यांपैकी कुणी काही बोललं नाही.

''आता फक्कडसा चहा करते हं'' म्हणत राधा आत गेली. नंतर सगळ्यांचा चहा झाला. जाताना प्रत्येक जण 'श्यामराव नंतर भेटतो' असं अगदी हळू आवाजात सांगून गेला.

संध्याकाळी श्याम बाल्कनीत आला तर वाळत टाकलेले कपडे काढायला आलेल्या बायका, त्यांचे दमून आलेले नवरे व उगाच शिट्या वाजवत असलेली मुलं आपल्याकडे काही वेगळ्या नजरेनं पहाताहेत असं त्याला वाटलं.

श्याम आणि राधा जेवायला बसणार तेवढ्यात कर्वेबाई आल्या. सामान्यपणे कर्वेबाईना बघून राधाला आनंद होत नसे. पण आजची गोष्ट वेगळी होती. तेव्हा राधा मोठ्या आनंदानं ''या, या, या,'' म्हणाली. राधाकडे हसतमुखानं पहात व श्यामकडे वळत कर्वेबाई म्हणाल्या, ''तुमच्याकडे एक काम होतं फलाणे साहेब.''

''बोला.'' श्याम उत्साहानं म्हणाला.

''आम्ही सोसायटीतल्या काही बायका ज्ञानदीप मंडळ स्थापन करायचं म्हणतोय.'' बाई धडधडत्या अंत:करणानं सांगू लागल्या.

''उत्तम. आजकाल अशा ज्ञानदीपांची समाजाला फार गरज आहे. भारतात सध्या जो अज्ञानाचा अंधार आहे तो घालवायला असे शेकडो ज्ञानदीप हवेत.'' श्याम इतकं चांगलं बोलू शकतो हे राधाला प्रथमच कळत होतं. ''चला, म्हणजे उद्याचा कार्यक्रम चांगला होणार. मात्र अशी दोन चार वाक्य श्यामनं टाकायला हवीत.''

''पण एक अडचण आहे...'' कर्वे बाई

''आपण दूर करु ना सगळ्या अडचणी.'' श्याम.

'आमचं नाटक दूरदर्शनचे लोक करु देणार असतील तरच मंडळ स्थापन करायचं नाहीतर मंडळाचा उपयोग काय?' असं बायका विचारतात.''

''आत्तापर्यन्त मंडळाकरता नाटक असं होतं पण आता नाटकाकरता मंडळ अशी स्थिती आली आहे म्हणायची.'' श्याम मनाशी म्हणाला.

''तुम्ही उद्या टीव्ही सेंटरवर जाताहात तर आमच्याबद्दल सांगा ना.'' अजिजीच्या स्वरात कर्वेबाई.

''मग असं का नाही करत? तुम्हीही चला माझ्या बरोबर अन् सांगा व्यवस्थित.'' श्यामने एका दगडात दोन मारले.

टीव्ही स्टेशनवर जायचं ह्या कल्पनेनंच कर्वेबाईना आनंदानं कापरं भरलं व त्यांचा चेहरा उजळला पण तेवढाच राधाचा काळवंडला. बाकी



इतर वेळ असती तर राधानं श्यामला फाडून खाल्ला असता. पण उद्यापर्यंत तरी घरातलं वातावरण चांगलं ठेवण्याची गरज होती.

''मग मी उद्या नऊ - साडे नऊ पर्यंत येते.'' असं म्हणून त्या गेल्या अन् तेवढ्यात कामत आला. नेहमीप्रमाणे त्यानं येतायेताच सुरुवात केली.

'हे बरंय, आत्तापर्यंत वरचे लोक टीव्हीवर यायचे, आता खालचे लोक यायला लागलेत. मग आम्हां मधल्यांचा नंबर कधी लागायचाच नाही.''

त्यातले 'वरचे' म्हणजे कोण व 'मधले' व 'खालचे' म्हणजे कोण हे फोड करुन सांगायची गरज नाही. श्याम व राधा 'वरचे' असल्यामुळे त्यांचा संताप झाला.

''मग त्यांनी काय करावं, असं तुला वाटत ?'' राधा.

''काय करावं म्हणजे ? स्पष्टपणे त्या लोकांना जाऊन विचारावं की बुवा अस कां म्हणून ?''

''पण माझ्या गळ्यात हे झेंगट का ? तूच जाऊन विचार ना !'' श्याम सडेतोडपणे म्हणाला.

''मला वाटलंच होतं तुम्ही असं म्हणणार म्हणून. शेवटी तुम्ही सुद्धा त्यातलेच.'' असं म्हणत कामत निघून सुद्धा गेला.

राधा दार बंद करायला गेली तर गोगटे दाराशी उभे असलेले दिसले. हा कधीही न येणारा प्राणी आपल्याकडे का आलाय हे श्याम - राधाच्या लक्षात आलं.

''का हो पण मुलाखतीला चांगले पैसे वगैरे देत असतील नाही ?'' गोगटे ए.जी. ऑफिसमधे होते.

''काही कल्पना नाही बुवा. पण का ?''

''नाही, चांगले पैसे मिळत असतील तर मी पण प्रयत्न करीन. तिथं आमची अकांटसूची माणसं आहेत.''


''आता आणखी कुणी न येवो म्हणजे मिळवली.' राधा काकुळतीला येऊन म्हणाली.

''पण तुला सगळीकडे जाऊन 'बातम्या' द्यायची गरजच काय होती ?'' श्याम कामत व गोगट्यांमुळं थोडं चिडीला आला होता.

''मी काय केलं बाई ?'' राधा आश्चर्य दाखवत म्हणाली. ''जिन्यात दोघी भेटल्या, कॉरिडॉर मधे दोघींना सांगितलं. टेरेसवर दोघी - तिघी भेटल्या त्यांना ओझरतं सांगितलं. बस !''

''नशीब, आज तुमचं भजनी मंडळ नव्हतं.''

जेवायच्या वेळी राधानं परत विषय काढला. ''इतकी वर्ष तुम्ही असिस्टंट डेप्युटी होतात; पण



काळं कुत्रं कधी तुमच्याकडे आलं नाही. पण आज नुसतं टीव्हीवर मुलाखतीला जाणार म्हटल्यावर लोकांची नुसती रीघ लागलीय. जर तुम्ही प्रोड्यूसर असतात तर ?''

खरं म्हणजे काळ्या कुत्र्याच्या उल्लेखानं श्याम रागावला होता. पण तोही आपण प्रोड्यूसर असतो तर काय बहार झाली असती नाही ? असाच विचार करत होता. 'आपल्या घरी तर रीघ लागली असतीच पण आपण कल्पकतेनं चांगले चांगले कार्यक्रम दिले असते. काय आजकालचे कार्यक्रम असतात त्याला चव ना ढव...'

श्याम उद्याच्या मुलाखतीची मनातल्या मनात तयारी करतोय असं राधाला वाटलं म्हणून तीही काही बोलली नाही.

दुधाची पिशवी आली असेल म्हणून श्यामनं दार उघडलं तर समोर बर्वे गुरुजी !

''सकाळचं फिरुन येत होतो, म्हटलं जाऊन यावं तुमच्याकडे. नंतर इतर मंडळी वगैरे येतील.''

''या ना. या.'' श्याम म्हणाला.

''काल मी तुमच्या मनाला लागेल असं बोललो, त्याचं फार दुःख होतंय मला. कुणाचं मन दुखवणं ही सुद्धा हिंसा आहे असं बापू म्हणायचे.''

''बापू ? कोण बापू ?'' आजकाल बापूंचे दिवस राहिले नसल्यानं बापू म्हणजे कोण ते त्याला लक्षातच आले नाही. पण लक्षात आल्यावर ''हाँ, हाँ, म्हणजे तुम्ही महात्मा गांधींचं म्हणताय ?''

''हो, त्यांच्याबद्दलच. खरं म्हणजे आम्ही मोठ्या माणसांनी लढ्यात कामं केली तशी लहान मुलांनी पण केली.''

''वसचं, कसचं, साध्या मिरवणुका...'' श्याम कानकोंडेपणानं म्हणाला.

''पण त्यालाही महत्व आहे. पण दूरदर्शनवाल्यांनी एक तुमच्यासारखा व एक माझ्यासारखा असे बोलवायला हवेत.''

''हो ना'' श्याम डोकं हलवत म्हणाला.

''आज तुम्ही जाताहात तिथं, तर सांगा तिथल्या लोकांना म्हणजे मला तशी प्रसिद्धीची हाव आहे असं नाही. पण आम्ही कसे लढलो ते नव्या पिढीला कळायला हवं.''

''हो ना.'' परत श्यामनं डोकं हलवलं. खरं म्हणजे ''मग तुम्हीच जाऊन सांगा ना'' असं श्याम म्हणणार होता. पण काल कामत कडून धडा मिळाला होता व मन मोडणं ही पण हिंसाच आहे असं बापू म्हणून गेले होते. ''सांगतो, जमलं तर'' एवढं म्हणून तो मोकळा झाला.

राधा आज न उठवता लवकर उठली होती. व स्वैंपाकपाण्याला लागली होती.

'' हे आतापासून काय सुरू केलंस ?''

''माझ्याकडून मी तयार ठेवते. उगीच उशीर झाला तर त्या बयेला टॅक्सीनं घेऊन जाल तुम्ही''.

कर्वेबाईना टॅक्सीनं नेण्याच्या कल्पनेनं श्यामचे डोळे चमकले. पण त्या चमकलेल्या डोळ्यासमोर टॅक्सीचं मीटर येताच ती चमक गेली.

''अंहं, अगदी रंभा – उर्वशी जरी बरोबर आल्या तरी आम्ही मंडळी टॅक्सीनं जाणार नाही.''श्याम अभिमानाने म्हणाला.

''मला रंभा उर्वशीची काळजी नाही हो, त्या बयेची आहे.''

तेवढ्यात दारावरची बेल वाजली म्हणून तो रंभा उर्वशीला तिथंच सोडून सोडून दार उघडायला गेला. दारासमोर त्यांच्या सोसायटीतलेच पण दुसऱ्या ब्लॉक मधले रामस्वामी व त्यांची नऊ दहा वर्षांची मुलगी उभे होते.

'' सॉरी हं, सकाळी सकाळी तुम्हांला त्रास दिला.'' रामस्वामी गेले चाळीस वर्ष मुंबईत राहत होता. तो मराठी नाटकातल्या वा सेरियलमधल्या सारखं हेंगाडी बोलत नसे. शुद्ध ब्राह्मणी बोलायचा.

'नांही, त्रास कसला त्यात ? या ना.'' तोंडावर त्रास न दिसू देता श्याम म्हणाला.

'ही आमची विजयमाला कथ्थकली, ओडिसी, मणीपुरी सगळे डान्स इतके उत्तम करते...''

''मग तिचा टीव्हीवर कार्यक्रम का नाही ठेवत?'' रामस्वामीच्या मनात काय आहे ते ओळखून श्यामन त्याला टीव्ही मार्ग सुचवला.

''आमची ही पण तेच म्हणत होती. तुम्ही जाताच आहात तर शब्द टाकाना.''

''हो, हो, जरूर'' कामत व गाधीजींपासून घेतलेला धडा श्यामन गिरवला. जाता जाता रामस्वामीन विजयमालेचा फोटो, बायोडाटा व डायरेक्टरना केलेला अर्ज श्यामच्या हातात पकडवला त्या बरोबर मराठी मागे का? व मद्रासी पुढे का? हे श्यामचे दोन्ही प्रश्न एकदमच सुटले.

'या दूरदर्शनच नावाप्रमाणेच दूरुनच दर्शन होत म्हणायच'.वरळी जवळ येत चालली व पॅरिसला आयफेल सारखा टॉवर दिसू लागल्यावर श्याम विनोदान म्हणाला

पण कर्वेबाईच्या चेहऱ्यावर ढिम्मसुद्धा हसू फुटल नाही. एकतर त्याना विनोद कळला नसावा किंवा त्या त्याच्या भावी नाटकातले सवाद रवंथ करत असाव्यात

''मी श्याम फलाणे''. श्याम चौकशी-तरुणाला आपली ओळख करुन देत म्हणाला त्या तरुणाने श्यामला आपलं नाव, पत्ता वगैरे रजिस्टरमधे लिहायला सागितल. कुणाला भेटायचय ते विचारल व एक सायक्लोस्टाईड कागद त्याच्या हातात पकडवून ''परत येताना भागवताची त्याच्यावर सही घेऊन या.'' म्हणून सागितल.'ज्ञानदीप'वाल्याची चौकशी करता 'ते बोरिवलीला आऊट डोअरला गेले आहेत व तीन साडेतीन शिवाय येणार नाहीत' अस उत्तर मिळाल. ते ऐकून कर्वेबाईचा चेहरा पडला.

''आपण थाबू ना तो पर्यंत'' श्याम त्याना दिलासा देत म्हणाला

समोर टीव्हीची दुमजली इमारत दिसत होती. पुढल्या मोकळ्या जागेत चार- चार, पाच- पाच तरुणाचे थवे उभे होते काही तरुणीही होत्या कुणी त्याच्यातला पुढारी कार्यक्रमाविषयी त्याना सागत होता. त्या मुलाच्या चेहऱ्यावर उत्साह, टीव्हीवर यायला मिळणार याच समाधान अगदी उतू चाललेल दिसत होत.

असाच एक शाळकरी मुलाचा जथा इमारतीत जात होता. त्यांच्याबरोबर घामेजून गेलेल्या त्याच्या शिक्षिका आता आपल्याला एका मोठ्या प्रसगातून जायच आहे असे भाव त्याच्या तोंडावर होते ह्या सगळ्या गभीर वातावरणाचा श्यामवर परिणाम झाला व तोही गंभीर बनला.

''भागवत, भागवत'' अस मनाशी घोकत व खोल्यावरच्या नावाच्या पाट्या वाचत श्याम व कर्वेबाई कॅरिडॉरमधून जाऊ लागले. चार- पाच पाट्या टाकून झाल्यावर भागवताची पाटी दिसली. श्यामन दारावर टिकटिक केल व दार उघडल.

खोलीत कुणीच नव्हत पण खोलीच एकदर रुप रग पाहून टीव्हीचा कुणी प्रोड्यूसर तिथ बसत असेल ह्यावर त्याचा विश्वास बसेना.

एक जुन- पुराण टेबल, त्याला शोभेश्या तीन खुर्च्या, त्यातल्या एकीच प्लॅस्टिकच सीट निघालेल असा सगळा थाट होता भिंतींना कित्येक वर्षात रग काढला नव्हता ते स्पष्ट होतच, पण कित्येक दिवसात जमिनीवरचा केर तरी काढला होता की नाही या बद्दल सशय यावा अशी परिस्थिती होती बाजूला टेबलावर गच्च हिरव्या रगाचा एक पाण्याचा मग होता

''इथ भागवत बसतात की नुसतच 'गवत' ठेवतात?'' बाई पुटपुटत म्हणाल्या.

पण हे सगळ बघून श्यामला ना खत झाला ना खेद. त्याच्या आयुष्याची तीन तप सरकारी कचेरीत गेली होती ''अहो सरकारी कचेरी आहे ही.'' तो बाईंना म्हणाला


With Best Compliments From

PHONE 443807

व्हिडीओ एंटरप्राईजेस

VIDEO ENTERPRISES

SALES & SERVICES

● DYANORA ● BPL - SANYO ● VIDEOCON ● SALORA TV'S ● GODREJ REFRIGERATORS ● VIDEOCON WASHING MACHINE & V C R. & OTHER PRODUCTS ● B P L V C R. ● TAPE RECORDERS & B.P L. OTHER PRODUCTS ● PRE - RECORDED CASSETTES ● VCR BLANK GVC CASSETTES ● BOOSTERS ● JIWA MIXERS ● OTHER ELECTRONICS - ELECTRICAL APPLIANCES

1393, SHUKRAWAR PETH, VISHNUKRIPA SOCIETY, SHOP NO 6
NAVAVISHNU CHOWK, OFF BAJIRAO ROAD, PUNE 411 002



होमिओची प्रभावी व गुणकारी औषधे

डेन - टॉनिक
(लहान मुलाचे दात सुलभतेने येण्यासाठी)

ऑन - टॉनिक
(टॉन्सिलच्या विकारावर)

स्कोलाटोन
(विद्यार्थ्यांकरिता स्टडीटोन)

महाराष्ट्रातील सर्व
प्रमुख केमिस्टकडे उपलब्ध

कॅल्सीटोन
(मुलासाठी उत्तम टॉनिक)

निर्माते - होमिओ लॅबोरेटरीज

सी - १ सोनाउद्योग, अंधेरी (पू) मुंबई - ६९

''म्हणून काय झालं?'' टीव्हीवरच्या प्रोड्यूसरांची आहे ना ही? त्यांना भेटायला मोठी मोठी लेखक मंडळी, कलावंत, नाटककार येत असणार. तेव्हा त्यांना योग्यशी खोली नको?''

श्यामनं मनातल्या मनात कपाळाला हात लावला. सरकारात 'सब घोडे बारा टक्के' हा न्याय चालतो हे या बाईंना सांगायचं कसं? तेव्हा ते सोडून देऊन भागवत येईपर्यन्त थांबू या म्हणून सुचवलं. त्या दोघांनाही उन्हातून आल्यामुळं जाम तहान लागली होती. पण तिथं जगच होता; ग्लास वगैरे काही नव्हता. तेव्हा त्यांना तहान दाबून टाकायला लागली. काही वेळानं एक माणूस आला व टेबलावर रजिस्टर ठेवून जाऊ लागला.

''भागवत साहेब, केव्हा येणार आहेत माहित आहे?''

भागवतांचं नाव आयुष्यात प्रथमच ऐकतोय असा भाव त्या माणसाच्या चेहऱ्यावर दिसला. ''भागवत? काही कल्पना नाही बुवा. पण येतील एवढ्यात.''

पण एवढ्यात येणारे भागवत तेवढ्यातही आले नाहीत. बाईचाही गप्पांचा मूड नव्हता. तेव्हा श्यामनं शेजारी-पाजारी चौकशी करायचं ठरवलं.

ते दार उघडून कॅरिडॉरमधे आले तर एक निळी जीन व खादीचा कुडता घातलेला तरुण व आधुनिक पद्धतीची साडी नेसलेली तरुणी जवळजवळ धावत येताना दिसले. भटजींनी 'सावधान' म्हणायला सुरवात केली तरी अजुनी अक्षतांचाच पत्ता नाही अशी स्थिती असल्यावर वधू-मंडळींची जशी धावपळ होते तशी त्यांची झालेली दिसत होती.

''पण आत्ता अगदी एलेवंथ अवरला कार्यक्रम बदलतात म्हणजे काय?'' त्या तरुणीनं रागारागानं विचारलं.

''अग, पण साहेबांना सुद्धा एलेवंथ अवरला कळलं असेल. ते तरी काय करणार?'' तरुणानं उत्तर दिलं.

''असा घाईगर्दीत दिलेला कार्यक्रम चांगला होणार तरी कसा? कार्यक्रम मनाजोगता नको...''

''हे बघ, तू अजूनी नवीन आहेस म्हणून सांगतो.'' ते दोघं श्याम-बाईजवळ उभे राहून बोलू लागले. ''इथं फक्त कार्यक्रम द्यायचा असतो. चांगला मनाजोगता या सगळ्या गोष्टी इथं विसरायला लागतात.''

त्या मुलीचा चेहरा उदास झाला. त्यांना भागवतांना पाहिलंत का म्हणून विचारण्यात काही अर्थ नव्हता. तेव्हा श्याम व बाई पुढे निघाले. पुढच्या खोलीचं दार उघडं दिसलं म्हणून आत शिरले.

''तुम्ही असं एलेवंथ अवरला आम्हांला सांगताय. आम्ही करायचा तरी कसा तुमचा कार्यक्रम?'' कुणी प्रोड्यूसर साहेब समोर बसलेल्या खादीचं कुडता पैजामा व गांधी टोप्या घातलेल्या तीन इसमांकडे बघून करडेपणानं बोलत होते. बाजूला त्यांचा सहकारी उभा होता. त्या खादीधाऱ्यांच्या तोंडावर कधी दिसत नाही अशी अजिजी होती.

''आम्ही तरी काय करावं साहेब? परवा बापू साहेबांना एकदम सुचलं की आपला सुवर्ण महोत्सवाचा कार्यक्रम टीव्हीवर दावायाच हवा. आम्ही तडक निघालो, काल मुंबईला पोहोचलो. न् आज तुमच्याकडं.''

''तुमचं बरोबर आहे हो. पण आम्हांला कॅमेरा रेकार्डिंग मशीन, लाईट वगैरेची व्यवस्था करायची असते...'' सहकारी म्हणाला.

''तरीपण बापूसाहेब....'' दुसरा खादीधारी म्हणाला.

तीच तर पंचाईत होती. बापूसाहेब म्हणजे कमी प्रस्थ नव्हतं. साऱ्या महाराष्ट्रभर त्यांचं सहकारमहर्षी म्हणून नाव होतं. मुख्यमंत्र्यांचे ते अगदी खास जवळचे म्हणून प्रसिद्ध होते. त्यांना दुखवणं म्हणजे...


प्रोड्यूसर साहेब तोच विचार करत होते. पण दोन दिवसांनी कार्यक्रम. डिपार्टमेन्टमधली कॅमेऱ्यांची वानवा. त्यातले काही आजारी. जेवढंच नव्हतं तर कॅमेरामन, रेकॉर्डिस्ट वगैरेची पण व्यवस्था करायला लागणार होती. बापूसाहेबांना टीव्हीवर कार्यक्रम द्यावा हे एकदम सुचायला काय होतं? ही सगळी नसती × × × × आम्हांलाच करायला लागणार की नाही? पण मग बापूसाहेबांचं काय?

''हे बघा, मी तुम्हाला प्रॉमीस देत नाही. पण खटपट करतो. तुम्ही चार-साडे चार वाजता फोन करा.'' प्रोड्यूसर म्हणाले. त्या खादीधाऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसला. साहेब खटपट करतो म्हणाले म्हणजे माणसं पाठवणार व आपला कार्यक्रम टीव्हीवर होणार याची त्यांना खात्री असावीशी दिसली.

श्याम व कर्वेबाई दोन-चार मिनिटं खोलीत उभी होती. पण त्यांना कुणी ''काय हवंय?'' म्हणून विचारलं सुद्धा नाही. म्हणून ते बाहेर पडले.

''किती अजिजीनं बोलत होती ती मंडळी आणि तो प्रोड्यूसर कसा तोडून बोलत होता.'' बाहेर पडल्यावर कर्वेबाई म्हणाल्या.

''काय करेल बिचारा. दिवसातून असे डझनभर



तरी लोक येत असतील आणि सगळी अशी एलेवथ अवरला! सगळ्याना टीव्हीवर कार्यक्रम व्हावा ही हौस ''

''आता काय होईल हो ?''

''काय होईल म्हणजे धावाधाव करुन, इकडला तिकडला कॅमेरा व माणस शोधून काढून पाठवून देईल शेवटी बापूसाहेबाशी गाठ आहे ''

''पण मग कार्यक्रम चागला होईल ?'' कर्वेबाईनी भोळेपणान विचारल

''चागला न वाईट. कार्यक्रम झाल्याशी कारण. फीत कापताना दाखवतील, स्टेजवरची माणस दाखवतील, एक दोन शॉट पब्लिकचे घेतील, झाल काम. बापूसाहेबही खूष अन् गावकरी पण. मधल्यामधे ह्या प्रोड्यूसरला मात्र ताप.''

पूर्वी असे कार्यक्रम पाहिले की श्यामला नुसता राग येत असे. त्या प्रोड्यूसर्सना चागल्या कल्पना कशा सुचत नाहीत ? त्याच त्याच तऱ्हेचे शॉट ते का घेत असतात ? कधी सस्थेची इमारत दाखवली आहे, कधी गावातली काहीं देवळ वगैरे दाखवली आहेत अस कधीच कस होत नाही ? या सगळ्या प्रश्नाची उत्तर आता त्याला मिळत होती

''आता हो काय करायच ?'' कर्वेबाईंनी विचारल.

''काय करायच म्हणजे ? भागवताना शोधायच '' आपल्या विचार तद्रीतून जागा होत श्याम म्हणाला, ''इथ एक बरय ? तुम्ही कोण ? म्हणून कुणी कुणाला हटकत नाही. कुठल्याही खोलीत अगदी बिनदिक्कत जाव ''

अस म्हणून ते पुढच्या खोलीत बिन-दिक्कत जाणार तर त्याना समोरुन दोन माणस शातपणे बोलत येत असताना दिसली

त्यातल्या बोहऱ्यासारखी दाढी ठेवलेल्या उच गृहस्थाना श्यामन व कर्वेबाईंनी तात्काळ ओळखल. हे बोहरी गृहस्थ नाना विषयावर व नाना प्रश्नावर फारस खोलात न जाता सुध्दा फार मनोरजक लिहित मन स्वच्छ व भाषेवर प्रभुत्व यामुळे त्याची चोहोकडे फार वाहवा होत होती.

त्याना टीव्ही केंद्रावर पाहून श्यामला फार आश्चर्य वाटले. कारण काही महिन्यापूर्वी त्यानी टीव्ही समाजाला कसा मारक आहे, लहान मुलाच्या मनावर त्याचे कसे वाईट परिणाम होत असतात वगैरे मोठ रसाळपणे रगवून, आपण आपल्या घरात टीव्ही ठेवला नाहीये हे मोठ्या अभिमानाने सागितले होते. तो लेख श्यामलाच नव्हे तर महाराष्ट्राला असख्य वाचकाना आवडला होता. अर्थात तो वाचून कुणी टीव्ही विकत घ्यायच रद्द केल नव्हत किंवा आहे तो विकलाही नव्हता. फक्त त्याचा लेख आवडला होता इतकच

एका बाजूला टीव्हीला नाव ठेवायची हौस तर दुसऱ्या बाजूला टीव्हीवर येण्याची हौस! त्याची श्यामला खूप मजा वाटली.

श्यामचा व बाईंचा परत प्रवास सुरु झाला. आता तळमजल्यावरच्या खोल्या सपल्या होत्या. तेव्हा ते पहिल्या मजल्यावर जायला निघाले जिन्याच्या खालची मोकळी जागा असते तिथ लाकडी पार्टीशन घालून खोली बनवली होती. दारावर बोर्ड हाता 'ग्रथालय'. कर्वेबाईंच त्याच्याकडे प्रथम लक्ष गेल त्या आश्चर्यान म्हणाल्या, ''हे एवढस ग्रथालय- सगळ्या टीव्ही सेंटरचं ?' आता आत पुस्तक तरी किती असणार ? अन् ती बघायला तरी कोण येणार ?''

''काही अभ्यास करुन, पुस्तक वगैरे वाचून कार्यक्रम व्हावेत अशी सरकारचीच इच्छा


Bush Weston T.V., V.C.R., Audio Video चे अधिकृत विक्रेते

YOGESH ELECTRONICS

2008, Sadashiv Peth 'Gangajali' Tilak Rd.
Pune 411030

Phone :- 441244

Authorised Dealer of Audio Video Bush, Weston T.V. / V.C.R.

नसेल.'' श्यामन आपला अदाज व्यक्त केला

ते जिना चढून लगतच्या खोलीत गेले तर तिथ एक वयस्क सुकड्या बाई एका तरुण मुलीला डाफरत होत्या ''कॅमेरामन पगार आणायला गेला आहे हे मला सागण्यात काय अर्थ आहे?'' सुकड्या असल्या तरी त्या तावातावान बोलत होत्या ''तुम्ही मला अकरा वाजता रेकॉर्डिंगला बोलावल होतत ना? आता बारा वाजत आले आणि तुम्ही म्हणताय . .''

''तुम्ही म्हणताहात ते अगदी खर आहे'' ती तरुण मुलगी अगदी गयावया करत म्हणाली, ''आम्ही अगदी अकरा वाजता रेकॉर्डिंगची तयारी केली होती, प्रोड्यूसर होते, रेकॉर्डिस्ट होता ''

''पण कॅमेरामन?''

''तो ही होता पण नतर पगार आणायला जातोय म्हणून तो निरोप ठेवून गेला.''

''त्याला नतर जाता आल नसत? किवा त्याला इथ येऊन पगार देता आला नसता?'' परत सुकड्या बाई

आता ती मुलगी यावर काय उत्तर देणार? त्या बाईनी मानवजातीला पडणाऱ्या समस्याना उत्तर दिली होती. अशा समस्याची उत्तर सोपी असतात पण सरकारी कचेऱ्यातल्या सोप्या प्रश्नाना उत्तर नसतात

आज त्या कॅमेरामनचा पगार चुकला असता तर तो नतर मिळायला फार त्रास पडला असता सरकारी कचेऱ्यात अस पगार वाटत फिरण शक्य नसत पैश्याची जोखीम असते. श्याम हे समजू शकत होता पण त्या बाई? त्याच बोल बोल बोलण चालूच होत. श्यामला त्या मुलीची फार कीव आली

इथ इतक 'रामायण' चालू असता 'श्रीमद्भागवता'बद्दल चौकशी करण्याचा श्यामला धीरच झाला नाही तेव्हा ते निमूटपणे खोलीच्या बाहेर पडाले वळून थोड पुढ गेल्यावर त्याना कॅरिडॉरमधेच पार्टीशन घालून काही खोल्या बनवलेल्या दिसल्या ''मुबईत जागेची किती अडचण आहे हे दाखवण्याकरता जर टीव्ही फिल्म करायची असेल तर त्या लोकाना बाहेर जायला नको या इमारतीतच कॅमेरा फिरवला की झाल!'' श्याम बाईना म्हणाला

कर्वेबाई काही उत्तर देणार तेवढ्यात एक छान व सुबक तरुणी एका खोलीतून लगबगीन बाहेर येताना दिसली तिला पाहताच कर्वेबाई जणू किचाळल्याच, ''अहो ही ती आपली '' ती एक बातमी-कन्या होती तिच नाव-गाव सगळ बाईंना माहित होत पण त्या इतक्या उत्तेजित झाल्या होत्या की त्याना नाव-गाव काहीही आठवल नाही फक्त टीव्ही पेक्षा किती गोड दिसते नाही?' एवढच म्हणाल्या. श्यामन त्याला मान हलवून समती दिली.

पुढल्या खोलीत ते गेले तर एक गृहस्थ शातपणे वर्तमानपत्र वाचत असलेले दिसले / हा बहुधा 'बातम्या' विभाग असावा असा श्यामन अदाज केला.

''भागवत आपल्या खोलीत नाही हैत इथ आले होते?'' श्यामन विचारल

''भागवत? खोलीत नाहीत म्हणजे ते मोठ्या साहेबाकडे असतील त्याच व साहेबाच खूप सूत जमत ''

पूर्वी सूतान स्वर्गाला जात असत सुतान स्वर्गाला जात असत सुतान स्वराज्य मिळेल अस गाधी म्हणायचे पण साहेबाशी सूत जमल तर स्वर्ग व स्वराज्यापेक्षा जास्त फायदा होतो हे श्यामला स्वानुभावान माहित होते

''आता पर्यन्त भागवत आले ही असतील'' चालून चालून दमलेल्या कर्वेबाईनी सुचवल

आणि खरच तसच झाल होत भागवत खोलीत होते एवढच नाही तर त्याच्यासमोर एक वयस्क खादीधारी गृहस्थ बसले होते व त्याचा सहाय्यक भागवताना रजिस्टर दाखवून काही सागत होता.

''हे भोळे म्हणजे सस्कृतचे गाढे पडित आहेत त्याना वेदशास्त्रसपन्न अशी पदवी पण मिळाली आहे आपण त्याना दोनशे रुपये द्यायच म्हणत होतो. खर म्हणजे हे दोनशे सुद्धा कमी आहेत पण मधल्या साहेबानी त्याचे दिडशे केले आहेत ''

तेवढ्यात भागवताचे श्यामकडे लक्ष गेले ''मी फलाणे आणि ह्या कर्वेबाई '' श्यामन ओळख करुन देताच भागवतानी उठून नमस्कार केला श्याम-कर्वेबाईना पाहताच त्याचा सहाय्यक उठून उभा राहिला व टेबलाच्या बाजूकडे जाऊ लागला

''अरे, अरे, तुम्ही कशाला उठताय? तुम्ही बसाना'' श्याम म्हणाला खर पण नतर त्याच्या लक्षात आल की तिथ तीनच खुर्च्या आहेत आणि माणस आहेत चार त्याच कारणाकरता तो मघाचच्या खोलीतलाही सहाय्यक उभ्या-उभ्याच बोलत होता वाटत?

''सॉरी ह अगदी सॉरी'' आपण अकरा वाजताच आलो असल्याच श्यामन सागितल्यावर भागवत सागू लागले, ''अगदी एलेवथ अवरला मला 'वर्षा' वर पाठवला. साहेबाचा पधरा ऑगस्टचा सदेश रेकॉर्ड करायचा होता ''

''पण एलेवथ अवरला का?'' श्याम थोड रागान म्हणाला, ''पधरा ऑगस्ट कधी येतो ते सगळ्याना आधीपासूनच माहिती असत''

''अहो पण सदेश रेकॉर्ड कधी होणार आहे हे कुठ माहित असत? पहिल्यानी तो उद्याला व्हायचा होता पण एलेवथ अवरला साहेबाच दिल्लीला जायच ठरल तेव्हा ''

''मग बरोबर आहे'' श्याम उत्तरला


# लक्ष्मण आत्माराम पालशेतकर अँड सन्स

**दादरमधील जुनी सुविख्यात पेढी**

**सोन्या - चांदीचे अस्सल व कल्चर्ड मोत्यांचे आधुनिक फॅशनचे अलंकार व खड्यांचे व्यापारी सोन्याच्या शुध्दतेची खात्री**

न. चि. केळकर रोड, मुकुद निवास, देना बँकेजवळ, दादर, मुबई - ४०० ०२८
फोन. ४३०७८४९

''हे बघ भामरे, हे रजिस्टर ठेव इथ, मी साहेबाशी बोलतो त्या बाबतीत '' भागवत सहाय्यकाला म्हणाले, ''तू अस कर स्टुडियो रिकामा आहे का बघ आणखी अर्ध्या तासान 'आम्ही असे लढलो'च रेकॉर्डिंग करायच आहे. त्या मुलाखत घेणाऱ्या मालशेबाई दामलेबाईंकडे बसल्याहेत, त्याना पण बोलाव ''

तो सहाय्यक गेल्यावर भागवतानी श्यामची व त्या खादीधारी गृहस्थाची ओळख करुन दिली व त्यानी लढ्यात काय भाग घेतला ते पण सागितल तेवढ्यात त्याचा सहाय्यक आला

''साहेब, आपल रेकॉर्डिंग पुढे ढकलायला लागणार. अजुनी 'आपली माती व आपली माणस' चाललय

''अजूनी 'माती अन् माणस' चाललय ?'' भागवतानी हातातल्या घडाळ्याकडे बघत विचारल, ''ते तर साडे-अकरा वाजताच सपायला हव होत ''

अहो अगदी एलेवथ अवरला इटरकॉम बिघडला आता इथ रिपेरिंग येतय कुणाला अन् इथ स्क्रूड्रायवर आहे की आहे ?''

''मग ?'' श्यामन थोड काळजीच्या स्वरात विचारल

''मग काय ? कुणी चाकून प्रयत्न केला, तर कुणी ब्लेडन. शेवटी एकदावा दुरुस्त झाला आता तासभरात मोकळा होईल स्टुडियो ''

''आणि आम्ही एकविसाव्या शतकात जायच म्हणतोय '' श्याम मनाशी म्हणाला

''पण इटरकॉम इतका महत्त्वाचा असतो ?'' त्या खादीधारी गृहस्थानी विचारल

''फार महत्त्वाचा !'' भागवत सागू लागले.'' स्टुडियो अन् रेकॉर्डिंग रुम मधला हा एकमात्र दुवा असतो. इटरकॉमन कार्यक्रमाबद्दल एकमेकाना सूचना देता येतात. बर, आता आपण अस करु की कॅन्टिन मधे चहा वगैरे घेऊ एकदा लच-टाईम झाला की फार गर्दी होते नतर कार्यक्रमाच बोलू व नतर रेकॉर्डिंग.'' ते आपल्या जागेवरुन उठले बाकीचेही उठले व त्याच्या मागोमाग जाऊ लागले

कॅरिडॉरमधे आले तर त्याना समोरुन महाराष्ट्राचे एक सुप्रसिद्ध लेखक कुणाशी तरी बोलत बोलत येताना दिसले. त्या लेखक महोदयानी मराठी वाङमयात एक युग निर्माण केल होत हाताच्या बोटावर मोजता येतील असे इग्रजी भाषेत बोलणारे जे काही मराठी लेखक आहेत त्यातले ते एक होते. तरीपण त्याचा चेहरा म्हणावा तेवढा प्रफुल्लित नव्हता

त्याच्या मागोमाग भागवताचा एक सहकारी मोठ्या पडक्या चेहऱ्यान येत होता भागवताजवळ येताच तो तितक्याच पडक्या आवाजात म्हणाला,

''मोठा वाधा झाला बघ !''

''काय झाल ? ह्या गोडाब्याचा इडियन एकॉनॉमीवर इटरव्ह्यू होता ना ?'' भागवत

''होताना त्याप्रमाणे ते आले आम्ही त्याबद्दलच बोलत होतो तर दिल्लीहून मेसेज आला की हा कार्यक्रम दिल्लीहून करण्यात येणार आहे आणि गोडाब्याच्या मुलाखतीची काही गरज नाही ''

''आता दिल्लीहूनच मेसेज आल्यावर तू तरी काय करणार ?'' भागवत त्याला दिलासा देत म्हणाले

''ते खर रे पण ह्या गोडाब्याना फेस करायला लागणार आहे मला, त्या दिल्लीच्या लोकाना नाही इतक गिल्टी वाटत बघ ''

''काही वाईट वाटून घेऊ नकोस '' भागवत त्याला दिलासा देत म्हणाले ''आपण सगळे प्रोड्यूसर्स एकाच बोटीत आहोत एका बाजूने वरच्याच्या थपडा खायच्या व एका बाजूने पब्लिकच्या.''

सैनिकाची चहापाण्याची जी जागा असते त्याला कॅन्टिन अस म्हणतात इथ कॅन्टिन अगदी तसच होत सैनिकाकरता म्हटल म्हणजे ती जागा सुशोभित असायला हवी, तिथ चागल फर्निचर हव वगैरे गोष्टी जशा बाद ठरतात, तशा इथ बाद ठरलेल्या दिसत होत्या पत्र्याच्या खुर्च्या व पत्र्याची टेबल रगाचा बेरग झाला होता भितीवर काही चागली चित्र वा चागले फोटो काही म्हणजे काही नव्हत मात्र मेनू तोंडाला पाणी सोडणारा होता.

परत भागवताच्या खोलीत जाण्याकरता ते सगळे निघाले तर समोरुन खादीचा कुडता व निळी जीन घातलेला एक मध्यम वयाचा तरुण अत्यत आनदात व खुषीत येताना दिसला

''करुन टाकला बर तो प्रोग्राम !'' भागवताच्या जवळ येताच तो खुषीत म्हणाला

''म्हणजे प्राचार्य काळे आले होते ?'' भागवतानी थोड आश्चर्यान विचारल

''नाही ना. शेवटी मुधोळकराना बोलावल. मुधोळकर मस्त माणूस आहे अगदी एलेवथ अवरला बोलवा, नेहमी तयार असतो. त्याना घेतला अन् करुन टाकला कार्यक्रम ! सुटलो अच्छा निघतो ''

''दोन प्रोड्यूसर्स एखाद्या कार्यक्रमाविषयी अस 'करुन टाकला' ह्या भाषेत बोलतात ?'' श्याम मनाशी विचार करु लागला. ''प्राचार्य काळे आले नाहीत तर त्याच्या जागी मुधोळकराना धरल का ? तर ते एलेवथ अवरला सागूनही न कुरकुरता येतात हाच त्याचा एकमेव गुण मग त्याना त्या विषयात गम्य आहे की नाही ? हे बघायला इथ वेळ आहे कुणाला ? आणि तशी परिस्थिती तरी कुठ आहे इथ ?''

असा विचार करता करताच श्याम मनाशी दचकला '' म्हणजे ? आपल्याला पण अस एलेवथ अवरला बोलावल आहे की काय ? खरा स्वातत्र्य सैनिक मिळाला नाही तर नाही; निदान वानर सेनेतला तर मिळाला या हिशोबानी तर आपल्याला बोलवल नाही ? म्हणून तर भागवत गयावया करत होते व इदिरा गाधींच उदाहरण देत होते म्हणायचे ''

श्यामला भागवताचा अगदी राग राग आला. पुढेच चाललेल्या भागवताना तो काही म्हणणार तेवढ्यात त्याच्या मनात आले की भागवत तरी बिचारे काय करतील पधरा ऑगस्टचा कार्यक्रम तर व्हायला हवाच ना ? त्याना एलेवथ अवरला कुणी मिळाल नसेल म्हणून त्यानी आपल्याला विनवण भाग पडल कार्यक्रम झाला नसता तर किती आरडा ओरडी झाली असती- वर्तमानपत्रात रकानेच्या रकाने भरुन आले असते - वाचकाच्या पत्रव्यवहारात तर लाखोली वाहिली असती भागवताची डिपार्टमेन्ट तर्फे चौकशी झाली असती एक ना दोन

आपण भागवतासारखे प्रोड्यूसर नव्हतो, साधे डेप्युटी असिस्टट होतो याच श्यामला खूप बर वाटल व त्या बर वाटण्यातच तो भागवताच्या खोलीत शिरला

राजहस प्रकाशन सस्थेच्या, मालकीचे हे नियतकालिक सस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री ग माजगावकर यानी एच के. ट्रेडिग क ३३५ ब, शनिवार पेठ, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० या सस्थेच्या कार्यालयात प्रसिध्द केले

MANOOS ( Marathi Weekly ) (Licensed to post without prepayment of postage No. 11) Regd. No. PNC–W 28

